# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे  इतिवृत्तांत

**दिनांक ०६ मे  २००३ ते दिनांक २० ऑगस्ट २००३**

## रजिष्टर क्र. ०८

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## सर्वसाधारण सभा

| अ.क्र. | सर्वसाधारण सभेचा दिनांक | विषय क्र. व ठराव | प्रश्न क्रमांक (प्रश्नोंत्तरे) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | ०६/०५/२००३ | ६९/१ ते ७३/५ | | |
| २ | २७/०५/२००३ | ७४/१ ते ८२/१ | १४२ ते १४६ | |
| ३ | १९/०६/२००३ | ८३/१ ते १०१/८ | १४७ ते १५० | |
| ४ | १८/०७/२००३ | १०२ ते १०९/६ | १५१ ते १५३ | |
| ५ | २०/०८/२००३ | ११०/१ ते १४२/८ | १५४ ते १६५ | |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

दिनांक ०६.०५.२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंगळवार दिनांक ०६.०५.२००३ रोजी मा.महापौर सौ.विमलबाई भिकनसिंग राजपूत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहत येथे सकाळी ११.०० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा.आयुक्त यांचे सह कार्यालयीन अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | - | सभासद |
| २. | स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक | - | सभासद |
| ३. | स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | - | सभासद |
| ४. | स.स.श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार | - | सभासद |
| ५. | स.स.श्री. वाणि ठकुजी रामसिंग | - | सभासद |
| ६. | स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद | - | सभासद |
| ७. | स.स.श्री. शे.ईलियास किरमाणी शेख ऊमर | - | सभासद |
| ८. | स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी | - | सभासद |
| ९. | स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी | - | सभासद |
| १०. | स.स.श्री. राजु रामराव शिंदे | - | सभासद |
| ११. | स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव | - | सभासद |
| १२. | स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार | - | सभासद |
| १३. | स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब | - | सभासद |
| १४. | स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन | - | सभासद |
| १५. | स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | - | सभासद |
| १६. | स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे | - | सभासद |
| १७. | स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तम बिनवडे | - | सभासद |
| १८. | स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानू | - | सभासद |
| १९. | स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | - | सभासद |
| २०. | स.स.सौ. साधना गणेश सुरडकर | - | सभासद |
| २१. | स.स.सौ. विजया किशोर रहाटकर | - | सभासद |
| २२. | स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर | - | सभासद |
| २३. | स.स.सौ. ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे | - | सभासद |
| २४. | स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण | - | सभासद |
| २५. | स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | - | सभासद |
| २६. | स.स.श्री. नजर हमीद अ.गफुर | - | सभासद |
| २७. | स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | - | सभासद |
| २८. | स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | - | सभासद |
| २९. | स.स.श्री. डॉ.कराड भागवत किसनराव | - | सभासद |
| ३०. | स.स.सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखॉंन | - | सभासद |
| ३१. | स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव | - | सभासद |
| ३२. | स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब | - | सभासद |
| ३३. | स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसहाक | - | सभासद |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४. | स.स.सौ. खरात कुसूमबाई दौलत | - | सभासद |
| ३५. | स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव | - | सभासद |
| ३६. | स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव | - | सभासद |
| ३७. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | सभासद |
| ३८. | स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | - | सभासद |
| ३९. | स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय | - | सभासद |
| ४०. | स.स.श्री. सोपान भाऊराव वारे | - | सभासद |
| ४१. | स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा | - | सभासद |
| ४२. | स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर | - | सभासद |
| ४३. | स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम | - | सभासद |
| ४४. | स.स.सौ. संगिता बाळु मैंद | - | सभासद |
| ४५. | स.स.श्रीमती शाहीन जफर महमद जफर | - | सभासद |
| ४६. | स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मणराव | - | सभासद |
| ४७. | स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ | - | सभासद |
| ४८. | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | - | सभासद |
| ४९. | स.स.श्री. स.सलीम स.युसूफ | - | सभासद |
| ५०. | स.स.श्री. तकीहसन खान कासी महसन खान | - | सभासद |
| ५१. | स.स.श्री. गाजी सादीद्दीन गाजी जहीर | - | सभासद |
| ५२. | स.स.श्री. मीर हिदायत अली मीर लियाकत अली | - | सभासद |
| ५३. | स.स.सौ. सिद्दीकी नईम सुलताना | - | सभासद |
| ५४. | स.स.श्री. अफसर खान यासीन खान | - | सभासद |
| ५५. | स.स.सौ. सुलताना बेगम चाँद खान | - | सभासद |
| ५६. | स.स.श्री. लकडे भरत श्रीपती | - | सभासद |
| ५७. | स.स.श्री. किशोर बाबुलाल तुळशीबागवाले | - | सभासद |
| ५८. | स.स.श्री. जगदिश कन्हैय्यालाल सिध्द | - | सभासद |
| ५९. | स.स.सौ. बबिता सुभाष कागडा | - | सभासद |
| ६०. | स.स.श्री. स.अली सलामी स.मीरा सलामी | - | सभासद |
| ६१. | स.स.श्री. तनवाणी किशनचंद लेखराज | - | सभासद |
| ६२. | स.स.सौ. निखत परवीन ईजाज अली | - | सभासद |

**स्विकृत सदस्य**

१. स.स.श्री. भगवान देविदास घडमोडे

**संवाद :**

**डॉ.भागवत कराड :** सभागृहात ही दुसरी वेळ आहे की, वंदेमातरम् चालू असतांना कॅसेट मध्येच बंद पडली हा अपमान आहे. संबंधितांवर कार्यवाही करण्यांत यावी.

**श्री.ओक जयवंत :** सभागृहातील टेप बदलण्यांत यावा. सदरची कॅसेट तुटली आहे. ती बदलण्यांत यावी.

**मा.महापौर :** वंदेमातरम् दोन कॅसेट्स उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

**विषय क्र.६९/१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व ३० (७) आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रं.६८, ६९, ७० व ७४ अन्वये महिला व बाल कल्याण समितीच्या नऊ (०९) सभासदांची निवड करणे बाबत.

**नगरसचिव :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व (७) अन्वये महिला व बालकल्याण समितीच्या ०९ सदस्य पदासाठी निवड करण्याकरिता दिनांक २१ एप्रिल, २००३ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४, ४५ व ४७ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यांत आला आहे. त्यानुसार दिनांक २१ एप्रिल, २००३ ते २९ एप्रिल, २००३ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पुर्ण झाली असून दिनांक २९ एप्रिल, २००३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत महिला व बाल कल्याण समितीच्या ०९ सदस्य पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.५९ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यांत आली असून खालील सर्व उमेदवारांची नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत.

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | उमेदवारांचे नांव |
|---|---|---|
| १ | ४६ | सौ.नुसरत बानो फिरोज खान |
| २ | १२ | सौ. लिलावती बाळासाहेब घायतिलक |
| ३ | ८० | सौ. बबिता सुभाष कागडा |
| ४ | ५१ | सौ. कुलकर्णी जयश्री विजय |
| ५ | ४४ | सौ. खरात कुसूमबाई दौलत |
| ६ | ३६ | सौ. रशिदा बेगम गफ्फार यार खान |
| ७ | ६२ | सौ. शाहीन जफर महमूद जफर |
| ८ | स्विकृत सदस्य | सौ. सलमाबानो मिर मोहमंद अली |
| ९ | ७० | सौ. सिद्दीकी नईम सुलताना म.फसियोद्दीन |
| १० | ८३ | सौ. निखत परवीन एजाज अली |
| ११ | १४ | सौ. शिंदे रुख्मीनी राधाकिसन |
| १२ | ३२ | सौ. कांबळे निर्मला विठ्ठल |
| १३ | ५६ | सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर |
| १४ | १६ | सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे |

**पिठासीन अधिकारी :** वरीलपैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांना सुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल. सभेत सुचक किंवा अनुमोदक या पैकी एखादा उपस्थित नसेल तर इच्छुकाला या दोघोंपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे. त्याच्या संमतीने ३० मिनीटाच्या अवधीत आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना महिला व बाल कल्याण समितीच्या सदस्य पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्याप्रमाणे आपले नांव ३० मिनीटांत परत घ्यावे. मात्र वेळेनंतर नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

१. सौ. लिलावती बाळासाहेब घायतिलक
२. सौ. सलमा बानो मीर मोहमंद अली
३. सौ. सिद्दीकी नईम सुलताना मो.फसियोद्दीन
४. सौ. निखत परवीन एजाज अली
५. सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर

महिला व बाल कल्याण समितीच्या ०९ सदस्य पदाच्या निवडणूकीसाठी खालीलप्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| **अ.क्र.** | **प्रभाग क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|---|
| १ | ४६ | सौ.नुसरत बानो फिरोज खान |
| २ | ८० | सौ. बबिता सुभाष कागडा |
| ३ | ५१ | सौ. कुलकर्णी जयश्री विजय |
| ४ | ४४ | सौ. खरात कुसूमबाई दौलत |
| ५ | ३६ | सौ. रशिदा बेगम गफ्फार यार खान |
| ६ | ६२ | सौ. शाहीन जफर महमूद जफर |
| ७ | १४ | सौ. शिंदे रुख्मीनी राधाकिसन |
| ८ | ३२ | सौ. कांबळे निर्मला विठ्ठल |
| ९ | १६ | सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे |

**पिठासीन अधिकारी :** महिला व बाल कल्याण समिती ०९ सदस्य पदासाठी योग्य रितीने भरलेले वरील प्रमाणे ०९ नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिल्यामुळे सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४८ अन्वये खालील पालिका सदस्यांची महिला व बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी बिनविरोध निवड झाल्याचे मी घोषित करीत आहे.

| **अ.क्र.** | **प्रभाग क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|---|
| १ | ४६ | सौ.नुसरत बानो फिरोज खान |
| २ | ८० | सौ. बबिता सुभाष कागडा |
| ३ | ५१ | सौ. कुलकर्णी जयश्री विजय |
| ४ | ४४ | सौ. खरात कुसूमबाई दौलत |
| ५ | ३६ | सौ. रशिदा बेगम गफ्फार यार खान |
| ६ | ६२ | सौ. शाहीन जफर महमूद जफर |
| ७ | १४ | सौ. शिंदे रुख्मीनी राधाकिसन |
| ८ | ३२ | सौ. कांबळे निर्मला विठ्ठल |
| ९ | १६ | सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आणि महिला व बाल कल्याण समिती ०९ सदस्य पदासाठी योग्य रितीने भरलेले ०९ नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिल्यामुळे सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४८ अन्वये खालील पालिका सदस्यांची महिला व बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी बिनविरोध निवड करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | उमेदवारांचे नांव |
|---|---|---|
| १ | ४६ | सौ.नुसरत बानो फिरोज खान |
| २ | ८० | सौ. बबिता सुभाष कागडा |
| ३ | ५१ | सौ. कुलकर्णी जयश्री विजय |
| ४ | ४४ | सौ. खरात कुसूमबाई दौलत |
| ५ | ३६ | सौ. रशिदा बेगम गफ्फार यार खान |
| ६ | ६२ | सौ. शाहीन जफर महमूद जफर |
| ७ | १४ | सौ. शिंदे रुख्मीनी राधाकिसन |
| ८ | ३२ | सौ. कांबळे निर्मला विठ्ठल |
| ९ | १६ | सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे |

(मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांनी वरील सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.)

**विषय क्र.७०/२ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व ३० (७) आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.६८, ६९, ७० व ७४ अन्वये वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीच्या नऊ (०९) सभासदांची निवड करणे बाबत.

**नगरसचिव :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व (७) अन्वये वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीच्या ०९ सदस्य पदासाठी निवड करण्याकरिता दिनांक २१ एप्रिल २००३ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४, ४५ व ४७ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यांत आला आहे. त्यानुसार दिनांक २१ एप्रिल २००३ ते २९ एप्रिल २००३ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणे कार्यवाही पुर्ण झाली असून दिनांक २९ एप्रिल २००३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीच्या ०९ सदस्य पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.५९ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यांत आली असून खालील सर्व उमेदवारी नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | उमेदवारांचे नांव |
|---|---|---|
| १ | ३६ | सौ. रशिदा बेगम गफ्फार यार खान |
| २ | ०१ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| ३ | १५ | श्रीमती किवळेकर जयश्री सारंग |
| ४ | ४८ | सौ. मोरे जयश्री कुमारराव |
| ५ | ६९ | श्री. मिर हिदायत अली मीर बसालत अली |
| ६ | ६७ | श्री. तकी हसन खाँन कासीम हन खाँन |
| ७ | ४४ | सौ. खरात कुसूमबाई दौलत |
| ८ | २६ | श्री. साळवे माणिक लक्ष्मण |
| ९ | ८१ | श्री. सय्यद अली मीरा सलामी |

| | | |
|---|---|---|
| १० | ७० | सौ. सिद्दीकी नईम सुलताना मो.फसियोद्दीन |
| ११ | ४२ | श्री. मो.जावेद मो.ईसहाक |
| १२ | ५८ | श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम |
| १३ | ३३ | श्री. शिरसाठ संजय पांडुरंग |
| १४ | ५० | श्री. फुलारी नंदकुमार माधवराव |
| १५ | २९ | श्री. नजर हमीद अब्दुल गफुर |
| १६ | ४० | श्री. रतनकुमार नारायणराव पंडागळे |

**पिठासीन अधिकारी :** वरीलपैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल. त्यांना सुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल.

सभेत सुचक किंवा अनुमोदक या पैकी एकदा उपस्थित नसेल तर इच्छुकांला या दोहोंपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे. त्याच्या संमतीने ३० मिनीटांच्या अवधित आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीच्या सदस्य पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्या प्रमाणे आपले नांव ३० मिनीटात परत घ्यावे. मात्र वेळेनंतर नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पिठासिन अधिकारी :** वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीच्या ०९ सदस्य पदासाठी १६ उमेदवारांपैकी विहीत मुदतीत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतलेले आहे.

| **अ.क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|
| १ | सौ. रशिदा बेगम गफ्फार यार खान |
| २ | श्री. तकी हसन खॉंन कासीम हन खॉंन |
| ३ | सौ. खरात कुसूमबाई दौलत |
| ४ | श्री. साळवे माणिक लक्ष्मण |
| ५ | सौ. सिद्दीकी नईम सुलताना मो.फसियोद्दीन |
| ६ | श्री. मो.जावेद मो.ईसहाक |
| ७ | श्री. रतनकुमार नारायणराव पंडागळे |

वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीच्या ०९ सदस्य पदाच्या निवडणुकीसाठी खालीलप्रमाणे उमेदवार रिंगणात आहे.

| **अ.क्र.** | **प्रभाग क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|---|
| १ | ०१ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| २ | १५ | श्रीमती किवळेकर जयश्री सारंग |
| ३ | ४८ | सौ. मोरे जयश्री कुमारराव |
| ४ | ६९ | श्री. मिर हिदायत अली मीर बसालत अली |
| ५ | ८१ | श्री. सय्यद अली मीरा सलामी |
| ६ | ५८ | श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम |
| ७ | ३३ | श्री. शिरसाठ संजय पांडुरंग |
| ८ | ५० | श्री. फुलारी नंदकुमार माधवराव |

| | | |
|---|---|---|
| ९ | २९ | श्री. नजर हमीद अब्दुल गफुर |

**पिठासीन अधिकारी :** वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती ०९ सदस्य पदासाठी योग्य रितीने भरलेले वरील प्रमाणे ०९ नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिल्यामुळे सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४८ अन्वये खालील पालिका सदस्यांची वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सदस्य पदासाठी बिनविरोध निवड झाल्याचे मी घोषित करीत आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | उमेदवारांचे नांव |
|---|---|---|
| १ | ०१ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| २ | १५ | श्रीमती किवळेकर जयश्री सारंग |
| ३ | ४८ | सौ. मोरे जयश्री कुमारराव |
| ४ | ६९ | श्री. मिर हिदायत अली मीर बसालत अली |
| ५ | ८१ | श्री. सय्यद अली मीरा सलामी |
| ६ | ५८ | श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम |
| ७ | ३३ | श्री. शिरसाठ संजय पांडुरंग |
| ८ | ५० | श्री. फुलारी नंदकुमार माधवराव |
| ९ | २९ | श्री. नजर हमीद अब्दुल गफुर |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आणि वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती ०९ सदस्य पदासाठी योग्य रितीने भरलेले ०९ नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिल्यामुळे सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४८ अन्वये खालील पालिका सदस्यांची वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सदस्य पदासाठी बिनविरोध निवड करण्यांत सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव |
|---|---|
| १ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| २ | श्रीमती किवळेकर जयश्री सारंग |
| ३ | सौ. मोरे जयश्री कुमारराव |
| ४ | श्री. मिर हिदायत अली मीर बसालत अली |
| ५ | श्री. सय्यद अली मीरा सलामी |
| ६ | श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम |
| ७ | श्री. शिरसाठ संजय पांडुरंग |
| ८ | श्री. फुलारी नंदकुमार माधवराव |
| ९ | श्री. नजर हमीद अब्दुल गफुर |

(महापौर तथा पिठासिन अधिकारी यांनी वरील सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.)

**विषय क्र.७१/३ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व ३० (७) आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.६८, ६९, ७० व ७४ अन्वये शहर सुधार समितीच्या नऊ (०९) सभासदांची निवड करणे बाबत.

**नगरसचिव :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व (७) अन्वये शहर सुधार समितीच्या ०९ सदस्य पदासाठी निवड करण्याकरिता दिनांक २१ एप्रिल २००३ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४, ४५ व ४७ अन्वये निवडणुक कार्यक्रम घोषित करण्यांत आला आहे. त्यानुसार दिनांक २१ एप्रिल २००३ ते २९ एप्रिल २००३ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पुर्ण झाली असून दिनांक २९ एप्रिल २००३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत शहर सुधार समितीच्या ०९ सदस्य पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.५९ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यांत आली असून खालील सर्व उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत.

| **अ.क्र.** | **प्रभाग क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|---|
| १ | ०१ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| २ | २१ | सौ. साधना गणेश सुरडकर |
| ३ | ६९ | श्री. मिर हिदायत अली मीर बसालत अली |
| ४ | २६ | श्री. साळवे माणिक लक्ष्मण |
| ५ | ३७ | श्री. सुनिल यादवराव मगरे |
| ६ | ७७ | श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान |
| ७ | ७० | सौ. सिद्दीकी नईम सुलताना म.फसीयोद्दीन |
| ८ | ४२ | श्री. मोहमद जावेद मोहम्मद ईसहाक |
| ९ | २८ | श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| १० | ३५ | श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर |
| ११ | ६३ | श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण |
| १२ | ७९ | श्री. जगदिश कन्हैय्यालाल सिध्द |
| १३ | ५१ | सौ. कुलकर्णी जयश्री विजय |
| १४ | २३ | श्री. सावंत मधुकर दामोधर |

**पिठासीन अधिकारी :** वरील पैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांना सुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल.

सभेत सुचक किंवा अनुमोदक यापैकी एकदा उपस्थित नसेल तर इच्छुकांला या दोघोंपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे. त्याच्या संमतीने ३० मिनीटांच्या अवधित आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना शहर सुधार समितीच्या सदस्य पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्या प्रमाणे आपले नांव ३० मिनीटांत परत घ्यावे. मात्र वेळेनंतर नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पिठासीन अधिकारी :** शहर सुधार समितीच्या ०९ सदस्य पदासाठी १४ उमेदवारांपैकी विहीत मुदतीत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतलेले आहे.

| **अ.क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|
| १ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| २ | श्री. साळवे माणिक लक्ष्मण |
| ३ | श्री. सुनिल यादवराव मगरे |
| ४ | श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| ५ | श्री. जगदिश कन्हैय्यालाल सिध्द |

शहर सुधार समितीच्या ०९ सदस्य पदाच्या निवडणूकीसाठी खालील प्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| **अ.क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|
| १ | सौ. साधना गणेश सुरडकर |
| २ | श्री. मिर हिदायत अली मीर बसालत अली |
| ३ | श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान |
| ४ | सौ. सिद्दीकी नईम सुलताना म.फसीयोद्दीन |
| ५ | श्री. मोहमद जावेद मोहम्मद ईसहाक |
| ६ | श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर |
| ७ | श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण |
| ८ | सौ. कुलकर्णी जयश्री विजय |
| ९ | श्री. सावंत मधुकर दामोधर |

**पिठासीन अधिकारी :** शहर सुधार समिती ०९ सदस्य पदासाठी योग्य रितीने भरलेले वरीलप्रमाणे ०९ नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिल्यामुळे सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४८ अन्वये खालील पालिका सदस्यांची शहर सुधार समिती सदस्य पदासाठी बिनविरोध निवड झाल्याचे मी घोषित करीत आहे.

| **अ.क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|
| १ | सौ. साधना गणेश सुरडकर |
| २ | श्री. मिर हिदायत अली मीर बसालत अली |
| ३ | श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान |
| ४ | सौ. सिद्दीकी नईम सुलताना म.फसीयोद्दीन |
| ५ | श्री. मोहमद जावेद मोहम्मद ईसहाक |
| ६ | श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर |
| ७ | श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण |
| ८ | सौ. कुलकर्णी जयश्री विजय |
| ९ | श्री. सावंत मधुकर दामोधर |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आणि शहर सुधार समिती ०९ सदस्य पदासाठी योग्य रितीने भरलेले ०९ नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिल्यामुळे सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४८ अन्वये खालील पालिका सदस्यांची शहर सुधार समिती सदस्य पदासाठी बिनविरोध निवड करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव |
|---|---|
| १ | सौ. साधना गणेश सुरडकर |
| २ | श्री. मिर हिदायत अली मीर बसालत अली |
| ३ | श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान |
| ४ | सौ. सिद्दीकी नईम सुलताना म.फसीयोद्दीन |
| ५ | श्री. मोहमद जावेद मोहम्मद ईसहाक |
| ६ | श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर |
| ७ | श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण |
| ८ | सौ. कुलकर्णी जयश्री विजय |
| ९ | श्री. सावंत मधुकर दामोधर |

(महापौर तथा पिठासिन अधिकारी यांनी वरील सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.)

**विषय क्र.७२/४ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व ३० (७) सभा कामकाज निमावलीचे नियम क्र.६८, ६९, ७० व ७४ अन्वये माध्यमिक, पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीच्या शाळा समितीच्या नऊ (०९) सभासदांची निवड करणे बाबत.

**नगरसचिव :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) (७) अन्वये माध्यमिक, पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीच्या ०९ सदस्य पदासाठी निवड करण्याकरिता दिनांक २१ एप्रिल २००३ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४, ४५ व ४७ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यांत आला आहे. त्यानुसार दिनांक २१ एप्रिल, २००३ ते २९ एप्रिल, २००३ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पुर्ण झाली असून दिनांक २९ एप्रिल, २००३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत माध्यमिक, पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीच्या ०९ सदस्य पदासाठी खालीलप्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.५९ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यांत आली असून खालील सर्व उमेदवारांच नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | उमेदवारांचे नांव |
|---|---|---|
| १ | १२ | सौ. लिलावती बाळासाहेब घायतिलक |
| २ | ०१ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| ३ | २४ | सौ. सुवर्णा उमेश चंद्राशे |
| ४ | ६७ | श्री. तकीहसन खान कासीम हसन खान |
| ५ | ४४ | सौ. खरात कुसूमबाई दौलत |

| | | |
|---|---|---|
| ६ | ३७ | श्री. सुनिल यादवराव मगरे |
| ७ | ६८ | श्री. गाजी सादोद्दीन |
| ८ | ७० | सौ. सिद्दीकी नईम सुलताना म.फसीयोद्दीन |
| ९ | १० | श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव |
| १० | ५२ | श्री. पारे सोपान भाऊराव |
| ११ | ७४ | श्री. लकडे भरत श्रीपती |
| १२ | ७९ | श्री. सिध्द जगदिश कन्हैय्यालाल |
| १३ | ११ | सौ. पवार मंदाबाई प्रभाकर |
| १४ | ५९ | सौ. संगिता बाळू मैंद |
| १५ | ५४ | श्री. देसराडा प्रशांत सुभाष |
| १६ | २३ | श्री. सावंत मधुकर दामोधर |

**पिठासीन अधिकारी :** वरील पैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांना सुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल.

सभेत सुचक किंवा अनुमोदक या पैकी एकादा उपस्थित नसेल तर इच्छुकाला या दोघोंपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे. त्याच्या संमतीने ३० मिनीटाच्या अवधित आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना माध्यमिक, पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीच्या सदस्य पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्याप्रमाणे आपले नाव ३० मिनीटांत परत घ्यावे. मात्र वेळेनंतर नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पिठासीन अधिकारी :** माध्यमिक, पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीच्या ०९ सदस्य पदासाठी १६ उमेदरांपैकी विहीत मुदतीत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतलेले आहे.

| **अ.क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|
| १ | श्री. तकीहसन खान कासीम हसन खान |
| २ | सौ. खरात कुसूमबाई दौलत |
| ३ | श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव |
| ४ | श्री. सिध्द जगदिश कन्हैय्यालाल |
| ५ | सौ. पवार मंदाबाई प्रभाकर |
| ६ | सौ. संगिता बाळू मैंद |
| ७ | श्री. सावंत मधुकर दामोधर |

माध्यमिक, पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीच्या ०९ सदस्य पदाच्या निवडणूकीसाठी खालीलप्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| **अ.क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|
| १ | सौ. लिलावती बाळासाहेब घायतिलक |
| २ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |

३ सौ. सुवर्णा उमेश चंद्राशे
४ श्री. सुनिल यादवराव मगरे
५ श्री. गाजी सादोद्दीन
६ सौ. सिद्दीकी नईम सुलताना म.फसीयोद्दीन
७ श्री. पारे सोपान भाऊराव
८ श्री. लकडे भरत श्रीपती
९ श्री. देसराडा प्रशांत सुभाष

**पिठासीन अधिकारी :** माध्यमिक, पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती ०९ सदस्य पदासाठी योग्य रितीने भरलेले वरीलप्रमाणे ०९ नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिल्यामुळे सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४८ अन्वये खालील पालिका सदस्यांची माध्यमिक, पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती सदस्य पदासाठी बिनविरोध निवड झाल्याचे मी घोषित करीत आहे.

| **अ.क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|
| १ | सौ. लिलावती बाळासाहेब घायतिलक |
| २ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| ३ | सौ. सुवर्णा उमेश चंद्राशे |
| ४ | श्री. सुनिल यादवराव मगरे |
| ५ | श्री. गाजी सादोद्दीन |
| ६ | सौ. सिद्दीकी नईम सुलताना म.फसीयोद्दीन |
| ७ | श्री. पारे सोपान भाऊराव |
| ८ | श्री. लकडे भरत श्रीपती |
| ९ | श्री. देसराडा प्रशांत सुभाष |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आणि माध्यमिक पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती ०९ सदस्य पदासाठी योग्य रितीने भरलेले ०९ नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिल्यामुळे सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४८ अन्वये खालील पालिका सदस्याची माध्यमिक, पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती सदस्य पदासाठी बिनविरोध निवड करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

| **अ.क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|
| १ | सौ. लिलावती बाळासाहेब घायतिलक |
| २ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| ३ | सौ. सुवर्णा उमेश चंद्राशे |
| ४ | श्री. सुनिल यादवराव मगरे |
| ५ | श्री. गाजी सादोद्दीन |
| ६ | सौ. सिद्दीकी नईम सुलताना म.फसीयोद्दीन |
| ७ | श्री. पारे सोपान भाऊराव |
| ८ | श्री. लकडे भरत श्रीपती |
| ९ | श्री. देसराडा प्रशांत सुभाष |

(मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांनी वरील सदस्याचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.)

**विषय क्र.७३/५ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व ३० (७) आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.६८, ६९, ७० व ७४ अन्वये गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समितीच्या नऊ (०९) सभासदांची निवड करणे बाबत.

**नगरसचिव :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व (७) अन्वये गलिच्छ वस्ती निर्मूलन घर बांधणी व समाज कल्याण समितीच्या ०९ सदस्य पदासाठी निवड करण्याकरिता दिनांक २१ एप्रिल, २००३ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४, ४५ व ४७ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यांत आला आहे. त्यानुसार दिनांक २१ एप्रिल, २००३ ते २९ एप्रिल २००३ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पुर्ण झाली असून दिनांक २९ एप्रिल, २००३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत गलिच्छ वस्ती निर्मूलन घर बांधणी व समाज कल्याण समितीच्या ०९ सदस्य पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.५९ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यांत आली असून खालील सर्व उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत.

| **अ.क्र.** | **प्रभाग क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|---|
| १ | ४६ | सौ. नुसरत बानो फिरोज खान |
| २ | ०१ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| ३ | ५९ | सौ. संगिता बाळू मैंद |
| ४ | ४४ | सौ. खरात कुसूमबाई दौलत |
| ५ | स्विकृत सदस्य | सौ. सलमा बानो मीर मोहम्मद अली |
| ६ | ७५ | श्री. शेख मुनाफ शेख यासीन |
| ७ | ७० | सौ. सिद्दीकी नईम सुलताना म.फसीयोद्दीन |
| ८ | ५० | श्री. फुलारी नंदकुमार माधवराव |
| ९ | १० | श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव |
| १० | ६५ | श्री. ओक जयवंत केशवराव |
| ११ | १९ | श्रीमती मानकापे पार्वती लहानू |
| १२ | ०९ | श्री. कावडे साहेबराव राणुबा |
| १३ | ५४ | श्री. देसरडा प्रशांत सुभाष |

**पिठासीन अधिकारी :** वरील पैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांना सुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल.

सभेत सुचक किंवा अनुमोदक या पैकी एकदा उपस्थित नसेल तर इच्छुकाला या दोहोंपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे. त्याच्या संमतीने ३० मिनीटांच्या अवधित आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समितीच्या सदस्य पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच

सांगितल्याप्रमाणे आपले नांव ३० मिनीटांत परत घ्यावे. मात्र वेळेनंतर नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पिठासीन अधिकारी :** गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समितीच्या ०९ सदस्य पदासाठी १३ उमेदवारांपैकी विहीत मुदतीत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतलेले आहे.

| **अ.क्र.** | **प्रभाग क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|---|
| १ | ०१ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| २ | ७० | सौ. सिद्दीकी नईम सुलताना म.फसीयोद्दीन |
| ३ | १९ | श्रीमती मानकापे पार्वती लहानू |
| ४ | ५४ | श्री. देसरडा प्रशांत सुभाष |

गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समितीच्या ०९ सदस्य पदाच्या निवडणूकीसाठी खालील प्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| **अ.क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|
| १ | सौ. नुसरत बानो फिरोज खान |
| २ | सौ. संगिता बाळू मैंद |
| ३ | सौ. खरात कुसूमबाई दौलत |
| ४ | सौ. सलमा बानो मीर मोहम्मद अली |
| ५ | श्री. शेख मुनाफ शेख यासीन |
| ६ | श्री. फुलारी नंदकुमार माधवराव |
| ७ | श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव |
| ८ | श्री. ओक जयवंत केशवराव |
| ९ | श्री. कावडे साहेबराव राणुबा |

**पिठासीन अधिकारी :** गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण, समिती ०९ सदस्य पदासाठी योग्य रितीने भरलेले वरीलप्रमाणे ०९ नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिल्यामुळे सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४८ अन्वये खालील पालिका सदस्यांनी गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समिती सदस्य पदासाठी बिनविरोध निवड झाल्याचे मी घोषित करीत आहे.

| **अ.क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|
| १ | सौ. नुसरत बानो फिरोज खान |
| २ | सौ. संगिता बाळू मैंद |
| ३ | सौ. खरात कुसूमबाई दौलत |
| ४ | सौ. सलमा बानो मीर मोहम्मद अली |
| ५ | श्री. शेख मुनाफ शेख यासीन |
| ६ | श्री. फुलारी नंदकुमार माधवराव |
| ७ | श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव |

८ श्री. ओक जयवंत केशवराव
९ श्री. कावडे साहेबराव राणुबा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आणि गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समिती ०९ सदस्य पदासाठी योग्य रितीने भरलेले ०९ नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिल्यामुळे सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४८ अन्वये खालील पालिका सदस्यांची गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समिती सदस्य पदासाठी बिन विरोध निवड करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

| **अ.क्र.** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|
| १ | सौ. नुसरत बानो फिरोज खान |
| २ | सौ. संगिता बाळू मैंद |
| ३ | सौ. खरात कुसूमबाई दौलत |
| ४ | सौ. सलमा बानो मीर मोहम्मद अली |
| ५ | श्री. शेख मुनाफ शेख यासीन |
| ६ | श्री. फुलारी नंदकुमार माधवराव |
| ७ | श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव |
| ८ | श्री. ओक जयवंत केशवराव |
| ९ | श्री. कावडे साहेबराव राणुबा |

(महापौर तथा पिठासिन अधिकारी यांनी वरील सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.)

या बरोबरच जण गण मन या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे पिठासीन अधिकारी यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## दिनांक २७.०५.२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

मंगळवार दिनांक २७.०५.२००३ रोजी मा.महापौर सौ.विमलबाई राजपूत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात दुपारी १२.०० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा.आयुक्त व संबंधित अधिकारी यांचेसह खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | - | सभासद |
| २. | स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक | - | सभासद |
| ३. | स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | - | सभासद |
| ४. | स.स.श्री. वाणि ठकुजी रामसिंग | - | सभासद |
| ५. | स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद | - | सभासद |
| ६. | स.स.श्री. शे.ईलियास किरमाणी शेख ऊमर | - | सभासद |
| ७. | स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु | - | सभासद |
| ८. | स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी | - | सभासद |
| ९. | स.स.श्री. राजु रामराव शिंदे | - | सभासद |
| १०. | स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा | - | सभासद |
| ११. | स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब | - | सभासद |
| १२. | स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | - | सभासद |
| १३. | स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन | - | सभासद |
| १४. | स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | - | सभासद |
| १५. | स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे | - | सभासद |
| १६. | स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानू | - | सभासद |
| १७. | स.स.सौ. साधना गणेश सुरडकर | - | सभासद |
| १८. | स.स.सौ. विजया किशोर रहाटकर | - | सभासद |
| १९. | स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर | - | सभासद |
| २०. | स.स.सौ. ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे | - | सभासद |
| २१. | स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | - | सभासद |
| २२. | स.स.श्री. नजर हमीद अ.गफुर | - | सभासद |
| २३. | स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | - | सभासद |
| २४. | स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | - | सभासद |
| २५. | स.स.श्री. डॉ.कराड भागवत किसनराव | - | सभासद |
| २६. | स.स.सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखॉंन | - | सभासद |
| २७. | स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव | - | सभासद |
| २८. | स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | - | सभासद |
| २९. | स.स.श्री. नासेर खॉंन सरदार खॉंन | - | सभासद |
| ३०. | स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसहाक | - | सभासद |
| ३१. | स.स.श्री. मोहन मेघावाले | - | सभासद |
| ३२. | स.स.सौ. खरात कुसूमबाई दौलत | - | सभासद |
| ३३. | स.स.सौ. मुसरत बानो फिरोज खॉंन | - | सभासद |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | सभासद |
| ३५. | स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | - | सभासद |
| ३६. | स.स.श्री. सोपान भाऊराव वारे | - | सभासद |
| ३७. | स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा | - | सभासद |
| ३८. | स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर | - | सभासद |
| ३९. | स.स.श्री. अशरफ मोतीवाला | - | सभासद |
| ४०. | स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम | - | सभासद |
| ४१. | स.स.सौ. संगिता बाळु मैंद | - | सभासद |
| ४२. | स.स.श्री. रणधीर अशोकसिंग होलिये | - | सभासद |
| ४३. | स.स.श्रीमती शाहीन जफर महमद जफर | - | सभासद |
| ४४. | स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मणराव | - | सभासद |
| ४५. | स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ | - | सभासद |
| ४६. | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | - | सभासद |
| ४७. | स.स.श्री. तकीहसन खान कासी महसन खान | - | सभासद |
| ४८. | स.स.श्री. मीर हिदायत अली मीर लियाकत अली | - | सभासद |
| ४९. | स.स.सौ. सिद्दीकी नईम सुलताना | - | सभासद |
| ५०. | स.स.श्री. अफसर खान यासीन खान | - | सभासद |
| ५१. | स.स.श्री. लकडे भरत श्रीपती | - | सभासद |
| ५२. | स.स.श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान | - | सभासद |
| ५३. | स.स.श्री. जगदिश कन्हैय्यालाल सिध्द | - | सभासद |
| ५४. | स.स.सौ. बबिता सुभाष कागडा | - | सभासद |
| ५५. | स.स.सौ. निखत परवीन ईजाज अली | - | सभासद |

**स्विकृत सदस्य**

१. स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२. स.स.श्री. भगवान देविदास घडमोडे
३. स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
४. स.स.श्री. तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग धिल्लन

**संवाद :**

**डॉ.भागवत कराड :** हृदय रोग तज्ञ डॉ.नितु मांडके यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांनी १२००० रुग्णांवर शस्त्रक्रिया केल्या आहेत. त्यांना सभागृहातर्फे ०२ मिनीटे श्रध्दांजली अर्पण करावी. तसेच स्वातंत्र्य सेनानी स्व.हिरुभाऊ जगताप यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पण करावी.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :** ठिक आहे. सर्वांनी श्रध्दांजलीसाठी उभे रहावे.

(याचवेळी स्व.डॉ.नितु मांडके तसेच स्वातंत्र्य सेनानी स्व.श्री.हिरुभाऊ जगताप यांना सभागृहातर्फे ०२ मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.)

**श्री.नंदकुमार घोडेले :** या सभागृहातर्फे ज्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यांत येते, त्यांचे नातेवाईकांना तसे सात्वंन पत्र देऊन श्रध्दांजली अर्पण केल्याचे कळविण्यांत यावे.

**डॉ.भागवत कराड :** दोन नवीन स.सदस्य निवडून आलेले आहेत. त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यांत यावे.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर :** यास माझे अनुमोदन आहे.

(याचवेळी मा.महापौर यांनी नुतन स.सदस्य श्री.रणधीर अशोकसिंग होलिये यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यांत आले तर नुतन स.सदस्य श्री.मोहन मेघावाले यांचे थोड्या वेळानंतर पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.)

**मा.महापौर :** बन्सीलालनगर येथील बांधकाम परवानगी संदर्भात चौकशी अहवाल आलेला आहे. ते वाचून दाखविण्यांत येत आहे.

**श्री.संजय शिरसाठ :** नविन आयुक्त यांनी पदभार स्विकारला त्यांचा त्यांनी परिचय करुन द्यावा. (मा.महापौर, मा.आयुक्त यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतात.)

**मा.आयुक्त :** माझं नांव रामचंद्र नारायणराव जोशी असे आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी असून मागील महिन्यात दिनांक १९ एप्रिल, २००३ रोजी मी या महापालिकेचा आयुक्त म्हणून पदभार स्विकारलेला आहे. महाराष्ट्र राज्याचाच मी रहिवासी असून या राज्यातच माझा जन्म झालेला आहे. व माझे शिक्षणही पूर्ण येथे झालेले आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर उपजिल्हाधिकारी पदावर माझी विदर्भात नियुक्ती झाली. त्यानंतर अशा पदावर व विविध महसुल व अन्य विभागात मी काम केलेले असून शासकीय सेवेत मी जवळपास २२ वर्षापासून आहे. मला २००० मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेत पदोन्नती मिळाली. परंतू माझी सेवा जेष्ठता व कामाचा अनुभव विचारात घेता १९९५ पासून मला मानीव दिनांक देण्यात आलेला आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने जे कार्यक्रम/योजना या महानगरपालिकेत माझ्या कार्यकाळात राबविल्या जातील. त्या जास्तीत जास्त नागरिकांच्या लाभदायक असेल. असेच प्रयत्न आपण करणार आहोत. मला जी बोलण्यास संधी दिली, स्वागत केले, त्याबद्दल व्यासपीठाचा व आपला आभारी आहे.

**श्री.संजय शिरसाट :** मागील बैठकीत डॉ.किरण सुरवसे यांना या महापालिकेच्या सेवेतून कार्यमुक्त करण्याचा ठराव पारित केलेला होता. २४ तासात अंमलबजावणी करावयास हवी होती. अद्याप त्यांना का कार्यमुक्त करण्यांत आले नाही. ठराव पास झालेला असतांना कार्यवाही करण्यांत आली नाही व ते आजच्या बैठकीत सभागृहात उपस्थित आहे. त्यांना सभागृहात बसू देऊ नये.

**श्री.सुनिल मगरे :** आताच डॉ.सुरवसे यांना कार्यमुक्त केले नाही. म्हणून मुद्दा स.सदस्यांनी मांडला. ठराव पारित होऊनही प्रशासनाने कार्यवाही केलेली नाही. या बरोबरच मी एक प्रश्न उपस्थित करु इच्छितो की मी, श्री.सुरवसे बरोबर इतर अनेक ठराव पारित झालेले आहे. याची दखल घेतली गेली नाही. याचा अर्थ या सभागृहाचा अधिकाऱ्यांवर काही वचक राहिलेला नाही. अनधिकृत टॉवर्स बाबत सर्वेक्षण करुन १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश मागील बैठकीत दिले होते. तसेच ज्या ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी जातीचा दावा करुन या महापालिकेच्या सेवेत जे फायदे व सवलती घेतल्या त्या बाबतही चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्णय घेतलेला होता. सदरचे अहवाल प्रशासनाने सादर केलेले आहेत का? अहवाल सादर केलेले नसतील तर संबंधित जे कुणी अधिकारी

दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे. जर कार्यवाही होत नसेल तर या सभेतील निर्णय घेण्याला अर्थ नाही. सभा घेऊ नये.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** जनरल चर्चा घेणार आहात काय? किंवा विषय पत्रिकेवर चर्चा करणार काय?

**श्री.संजय शिरसाट :** या सभागृहात विभाग प्रमुख उपस्थित असावेत.

**श्री.प्रशांत देसरडा :** स.सदस्य यांनी डॉ.किरण सुरवसे यांना कार्यमुक्त करण्याबाबतची सुचना केली. त्या बाबतीत प्रशासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केलेली आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** असे अनेक बाबीवर या सभागृहात निर्णय घेतलेले आहेत. त्याची सुध्दा अंमलबजावणी का झाली नाही. यात व्याज माफ करण्याचा निर्णय, अनधिकृत टॉवर्स, अनधिकृत बांधकामा बाबतच मुद्दे आहेत.

**मा.महापौर :** जे अधिकारी सभागृहाचा सुचनेनुसार काम करण्यास सक्षम नसतील. त्यांचेवर प्रशासन कार्यवाही करेल.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** अतिक्रमणाचा विषय निघाला म्हणून चर्चा करतो आहे. स.स.श्री.भरत लकडे यांचे वार्डाचे एका व्यक्तीने महापालिकेच्या खुल्या जागेवर अतिक्रमण केले. स्वतःच्या नावाने पी.आर.कार्ड तयार केले. सदरचे अतिक्रमण काढू शकतो. असे विधी सल्लागार सांगतात. प्रशासकीय अधिकारी तसेच मालमत्ता अधिकारी यांचेकडे गेल्यास एकमेकांचे दोन्ही अधिकारी नांव दाखवितात. ऑफिस ऑफिस टी.व्ही.वर मालिका आहे, तो प्रकार या महापालिकेमध्ये होत आहे. ही जागा जवळपास १ कोटीची आहे. वारंवार स.सदस्य यांनी पत्र दिले, कार्यवाही होत नाही. कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर नियमाने कार्यवाही व्हावी.

**श्री.संजय शिरसाट :** सर्वसाधारण सभेचा ठराव झालेला असतांना ते अधिकारी सभागृहात उपस्थित राहतात का त्यांना कार्यमुक्त करण्यांत आले नाही.

**उपआयुक्त (प्र.) :** डॉ.किरण सुरवसे यांना महापालिका सेवेतून कार्यमुक्त करण्याचा ठराव मागील सर्वसाधारण सभेत पारित झाला. त्या ठरावाची प्रत कालच नगर सचिव यांचेकडुन प्राप्त झालेली आहे. त्यांना सेवेतून कार्यमुक्त करण्यां संदर्भात टिप्पणी तयार केली आहे.

**श्री.संजय शिरसाट :** ठराव झालेला असतांना कार्यवाही करण्यास उपआयुक्त (प्र.) सक्षम नसतील मा.उपआयुक्त यांनी या संदर्भात तात्काळ निर्णय घ्यावा. तसा खुलासा करण्यांत यावा.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** डॉ.किरण सुरवसे यांना ठराव पारित झाल्यानुसार महापालिका सेवेतून कार्यमुक्त करण्या संदर्भात पत्र दिले नसेल व ते सभागृहात उपस्थित आहे. तर नियमाने बरोबर आहेत. सभेला उपस्थित राहणे ही त्यांची जबाबदारी आहे.

**श्री.तकी हसन खाँन :** कार्यमुक्त केले नाही. ते त्यांची सभेत उपस्थित राहून सेवा करीत आहे. उपस्थित राहणे त्यांचे कर्तव्यच आहे.

**श्री.संजय शिरसाट :** मा.महापौरच या सभागृहाचे पिठासीन अधिकारी आहे. या सभागृहात कोणास बसू द्यायचे कोणास नाही. हा अधिकार महापौरांचा आहे. श्री.बनसोडे, मुख्य लेखापरिक्षक यांना सुध्दा सभागृहात बसू दिले नव्हते. यांना सुध्दा बाहेर जाण्याच्या सुचना द्याव्यात.

**मा.महापौर :** बन्सीलाल नगर येथील बांधकाम परवानगी संदर्भात चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** या सभागृहाचे कामकाज नियमाने चालावे. विरोधी आघाडीच्या सर्व सदस्यांचे सहकार्य आपल्या पाठीशी आहे. जो निर्णय घेणार तो योग्य असावा. जेणे करुन सभागृहातील सदस्यांना मान्य असेल. डॉ.किरण सुरवसे यांना कार्यमुक्त केले नसेल व ते सभागृहात उपस्थित आहे ते नियमाने बरोबर आहे. त्यांना बाहेर जाण्या संदर्भात वैयक्तिक अशा सुचनेनुसार निर्णय होऊ नये. प्रशासनाने त्यांना एक पत्र वगैरे देऊन कळविले असते तर ते सभागृहात उपस्थित राहिले नसते. काही ठरावाच्या बाबतीत तात्काळ अंमलबजावणी होते. अंमलबजावणी का झाली नाही विलंब का झाला याचा खुलासा आवश्यक आहे. सिडको-हडको भागात एक दिवसा आड पाणी येते. व्याज माफ करण्याचा निर्णय या सभागृहाने घेतला व्याज आकारणे हे नियमात नसतांना व्याज आकारणी होते. या सभागृहाची एक प्रकारची दिशाभूल प्रशासन करीत आहे. बरेचशे नागरिक पाणीपट्टी भरण्यास जातात. त्यांना व्याज आकारणी होते.

**श्री.भगवान घडमोडे :** सभागृहाच्या निर्णयाची अंमलबजावणी का होत नाही. हा महत्वाचा प्रश्न आहे. अधिकारी दिशाभूल करणारी उत्तरे देतात.

**उपआयुक्त (प्र.) :** गेल्या महिन्याच्या बैठकीत प्रस्ताव मंजूर झालेला होता. डॉ.सुरवसे यांना कार्यमुक्त करण्याच्या ठरावाची कार्यवाही चालू आहे. सदर सभेचे इतिवृत्त आजच्या बैठकीत कायम होत आहे. कार्यमुक्त करण्या संदर्भात वरीष्ठांकडे प्रकरण गेलेले आहे. आरोग्य विभागाचे विभाग प्रमुख डॉ.कुलकर्णी हया सभेला उपस्थित असल्याने डॉ.सुरवसे यांना सभेला उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही.

(याच वेळी डॉ.सुरवसे सभागृहा बाहेर जातात.)

**श्री.तकी हसन खाँन :** टी.डी.आर. चा प्रस्ताव यापुर्वी मंजूर झाला. महापालिकेच्या फायद्याचा प्रस्ताव होता. अद्याप शहर सुधार समिती कडुन पुन्हा सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर झालेला नाही. व्याज आकारणी करण्याचा निर्णय घेतला. पुन्हा ६ महिन्यापुर्वीच थकीत रक्कमेवर व्याज आकारण्यांत येऊ नये म्हणून निर्णय घेतला अद्याप का कार्यवाही केलेली नाही. एक अधिकारी यांना सेवेतून कार्यमुक्त करण्या संदर्भात एवढा वेळ चर्चा करणे बरोबर नाही. नागरिकांची विकास कामे होण्याच्या दृष्टीने चर्चा व्हावी. बन्सीलालनगर येथील भुखंड बाबतचा चौकशी अहवालाच्या प्रती सर्व स.सदस्यांना देण्यात याव्यात. सविस्तर चर्चा होऊन निर्णय घेण्यांत यावा.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** डॉ.सुरवसे यांना कोणत्या नियमाने बाहेर जाण्यास सांगितले खुलासा द्यावा.

**श्री.तकी हसन खॉन :** संबंधित अधिकाऱ्यांना बाहेर जाण्याची सुचना केली ती बरोबर नाही. नियमाने बरोबर नाही. सभेला उपस्थित राहून ते त्यांचे विभागाचे अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळत आहे. नियमाला धरुन निर्णय घेण्यांत यावा. कुण्या अधिकाऱ्यांचा अपमान होईल असे निर्णय या सभागृहाने घेणे योग्य नसून या सभागृहाची सुध्दा जनतेसमोर बदनामी होता कामा नये. योग्य निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा आहे.

**उपआयुक्त (प्र.) :** विभाग प्रमुख उपस्थित असल्याने डॉ.सुरवसे यांना सभागृहात उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** गेल्या ४ महिन्यापासून संबंधित अधिकारी सभेला उपस्थित असतात. तेव्हा त्यांना सभागृहाबाहेर का पाठविण्यांत आले नाही. विभाग प्रमुख उपस्थित असल्याबाबत प्रशासन खुलासा करत आहे.

**श्री.तकी हसन खॉन :** आज प्रशासन जागरुक झाले का? यापुर्वी सभागृहात उपस्थित राहण्याचे त्यांना पत्र दिले जात असे का? याचा सुध्दा खुलासा व्हावा. आज त्यांचेवर कार्यवाही होते, उद्या दुसऱ्या अधिकाऱ्यांवर होईल. असे निर्णय घेणे सभागृहाला शोभणारे नाही. व्याज आकारणी करण्याचा निर्णय नियमबाह्य आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ महानगरपालिकेस अधिकार पोहचत नाही. नियमाने व्याज आकारु शकत नाही. खुलासा करावा.

**मा.महापौर :** पाणीपट्टी/मालमत्ता कर थकीत रक्कमेवर व्याज माफ करण्याचा निर्णय घेतलेला होता त्याची अंमलबजावणी का झाली नाही. खुलासा करावा.

**श्री.जयवंत ओक :** पाणीपट्टी/मालमत्ता कराच्या थकीत रक्कमेवर व्याज माफ करण्याचा निर्णय घेतलेला असतांना अद्याप कार्यवाही झाली नाही. या संदर्भात २ महिन्यापासून सभागृहात चर्चा होते. प्रशासनाने मत घ्यावे. ठोस असा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यांत यावा. जनतेचा प्रश्न आहे. व्याज आकारणी होते, म्हणून जनता पैसे भरण्यास येत नाही. त्यामुळे महापालिकेचे उत्पन्न कमी होते आहे. सर्वांना बोलण्याची संधी द्यावी. एक सदस्य ४-४ वेळेस बोलतात. हे बरोबर नाही राजकीय भाषण कुणी करु नये. योग्य व नियमाला धरुन चर्चा झाली पाहिजे. या सभागृहात महापौरांच्या मान सन्मान राखला पाहिजे.

**मा.महापौर :** उपआयुक्त (म.) यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** सन २००२-२००३ च्या अर्थ संकल्पीय सभेत पाणीपट्टी/मालमत्ता कर या थकीत रक्कमेवर व्याज आकारणी करण्याचा निर्णय घेतलेला होता. जे नागरिक अगोदरच्या काळात ३० जून पुर्वी कर भरतील त्याचेसाठी ५% सवलत दिलेली आहे. जे भरणार नाही. त्यांचेसाठी १५% व्याज आकारणीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेने मान्य केलेला होता. त्यानुसार व्याज आकारणी होत आहे. त्यानंतर दि.७ व ८.०१.२००३ च्या विशेष सर्वसाधारण सभेत सदर थकीत रक्कमेवर व्याज आकारण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यांत आला. त्यानुसार संचिका मुख्य लेखाधिकारी यांचेकडे सादर केली असता यासाठी स्वतंत्र ठरावाची गरज आहे. असा अभिप्राय दिला.

**श्री.जयवंत ओक :** स्वतंत्र एक ठराव आताच घेण्यांत यावा. सर्व पक्षाचे सदस्यांचे सहीने ठराव पारित करावा व थकीत रक्कमेवर आकारण्यांत येणारे व्याज माफ करावे.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** व्याज आकारणी करण्याचे नियमात नाही, का आकारण्यांत येते.

**डॉ.भागवत कराड :** व्याज आकारणी करण्याची अंमलबजावणी केली शासनाची परवानगी घेतली होती का? ते लोक कर भरणा करीत आहे. त्यांचेसाठी काहीना काही प्रमाणात सुट देण्यांत यावी.

**मुख्य लेखाधिकारी :** आताच खुलासा केल्याप्रमाणे मागील अर्थ संकल्पात थकीत रक्कमेवर व्याज आकारणी करण्याचा निर्णय याच सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले

होते. त्यांची थकबाकी रक्कम व चालू वर्षाची रक्कम भरण्याची मनोवृत्तीच नाही. अशा नागरिकांसाठी थकीत रक्कमेवर व्याज आकारणीचा प्रस्ताव होता जे वेळेपुर्वी भरतात, त्यांचेसाठी उलट सवलती दिलेल्या आहेंत. प्रशासकीय धोरण म्हणून तसा ठराव प्रशासनाने आणलेला होता. इतर महापालिकेमध्ये सुध्दा प्रशासकीय पातळीवर काम करण्याचे धोरण ठरविलेले असते. नाशिक महापालिकेमध्ये सुध्दा असेल ठरविले. वर्तमान पत्रात जाहिरात आली त्यानुसार वसुली होते. व्याज आकारुन त्यातून उत्पन्न मोठ्या प्रमाणात मिळेल असा हेतू नाही. ३१ मार्च (वर्षाच्या शेवटपर्यंत) ज्या थकबाकीदाराने रक्कम भरणा केली नाही. त्यावर व्याज आकारणी होते. जसे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, टेलिफोन ई. खाते आकारणी करते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये व्याज आकारणी बाबत तरतूद नाही. परंतू एक धोरण म्हणून ही पध्दत आपण अवलंबिलेली आहे. व्याज माफ करण्या बाबत स्वतंत्र ठराव घेऊन निर्णय घ्यावा. व्याज माफ करण्याचा जो निर्णय घेतला तो चर्चेअंती घेतलेला आहे. ठराव नाही.

**श्री.तकी हसन खान :** व्याज आकारणीचा निर्णय घेतला. नियमात नसतांना प्रस्ताव का ठेवण्यांत आला. माफ करण्याचा निर्णय घेतला. नियमात नसतांना प्रस्ताव का ठेवण्यांत आला. माफ करण्याचा निर्णय घेतला त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी. व्याज वसुल करणे नियमात नाही. शासन निर्णयप्रमाणे अंमलबजावणी केलेली आहेत का?

**श्री.जयवंत ओक :** या प्रस्तावाच्या संदर्भात कुणीही राजकीय वळण देऊ नये. सर्वांच्या सम्मतीने ठराव पारित करावा.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात पाणीपट्टी/मालमत्ता कर थकीत रक्कमेवर व्याज आकारणी करण्याचा प्रस्ताव होता, आताच खुलासा केला. या सभागृहाचे निर्णय घेतलेले किती प्रस्ताव शासनाकडे पाठविले गेले. किती पाठविले नाही याची सुध्दा माहिती मिळणे गरजेचे आहे. पाणीपट्टी/मालमत्ता करावर थकीत रक्कमेवर व्याज आकरणी सुरु केली. ते माफ करण्यासाठी स्वतंत्र ठरावाची आवश्यकता आहे असे म्हटले. यापुर्वी जवळपास ३ महिन्यापासून या विषयांवर सभागृहात वेळोवेळी चर्चा होत असतांना प्रशासनाने का प्रस्ताव सादर केला नाही. व्याज आकारले जात असल्याने कर भरणारे लोक पुढे येत नाही. ज्यांना एक दिवसा आड पाणी येते. त्यांना ६ महिनेच पाणी पुरवठा होतो. अशांना फक्त १२००/- ऐवजी ६००/- रु.पाणीपट्टी आकारणी केली पाहिजे. ते न होता १२००/- रु पाणीपट्टी आकारणी होते, उलट त्या रक्कमेवर व्याज आकारणी होत असल्यास कुणीही कर भरणा भरणार नाही. नागरिकांवर एक मोठ्या प्रकारे अन्याय होत आहे. आता स्वतंत्र ठराव देण्याची मागणी झाली. त्या ठरावात वरीलप्रमाणे उल्लेख करुन ज्यांना जेवढे पाणी दिले जाते. तेवढीच पाणीपट्टी आकारणी करावी. सर्वानुमते प्रस्ताव घेवुन मंजूर करावा.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर :** थकीत रक्कमेवर व्याज माफ झाले म्हणून कर भरणाऱ्यामध्ये संभ्रम निर्माण झाला. आताच मुख्य लेखाधिकारी यांनी स्वतंत्र ठराव ठेवण्याबाबत माहिती दिली पुढील सभेत ठराव घेऊन थकीत रक्कमेवर व्याज आकारणी होते. ती माफ करण्यांत यावी. व पहिला ठराव विखंडीत करावा.

**मा.महापौर :** या संदर्भात येत्या सर्वसाधारण सभेत एक ठराव घेऊन व्याज माफ करण्या संदर्भात निर्णय घेतला जाईल.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सिडको-हडको भागात एक दिवसा आड पाणी दिले जाते. याचा अर्थ ६ महिनेच पाणी पुरवठा होतो. अशा नागरिकांना फक्त अर्धी पाणीपट्टी आकारण्यांत यावी. हा सुध्दा निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

**मा.महापौर :** स.स.श्री.भरत लकडे यांचे वॉर्डात झालेले अतिक्रमणा संदर्भात खुलासा द्यावा.

**प्रशासकीय अधिकारी :** रामविहार गृह निर्माण संस्था येथील झालेले अतिक्रमण दि.१७.११.२००२ त्या ठिकाणचे अनाधिकृत बांधकाम पाडण्यांत आलेले होते. त्या जागेचे पी.आर.कार्ड महापालिकेच्या नावाने नाही. संबंधित व्यक्तीच्या नांवे पी.आर.कार्ड आहे. महापालिकेच्या नावे ती जागा घेण्यासाठी मालमत्ता विभागामार्फत अपील करण्यांत आलेले असून अपील चा क्र.२६५/३ असा आहे. सदर व्यक्तीचे नांव शेख रहीन शेख पाशा असे आहे.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** अतिक्रमण काढले असेल तर त्या जागेवर तार कुंपन केले का? महापालिकेच्या नावाने बोर्ड लागलेला आहे का? त्या जागेवर गॅरेज दुकान मालक यांनी अतिक्रमण केले त्यांचे गाड्या सुध्दा तेथे सद्य:परिस्थितीत उभ्या असतात. अधिकारी चुकीची माहिती देऊन दिशाभूल करीत आहे. स.सदस्य सतत ३ वर्षापासून या संदर्भात मुद्दा उपस्थित करतात.

**प्रशासकीय अधिकारी :** ज्यावेळी अतिक्रमण काढले. त्यावेळी पाटी लावली की नाही हे मला माहित नाही.

**श्री.भरत लकडे :** महापालिकेने अतिक्रमण काढलेलेच नाही. अधिकारी चुकीची माहिती देत आहे. महापौर डॉ.कराड असतांना त्यांनी हे अतिक्रमण काढण्याचे आदेश दिले होते. ज्या अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली नाही. त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** स.सदस्य ३ वर्षापासून हा प्रश्न उपस्थित करीत आहे. विधी सल्लागार सांगतात अतिक्रमण काढू शकतो. मालमत्ता अधिकारी/प्रशासकीय अधिकारी एकमेकांचे नांव सांगतात. उडवाउडवीची उत्तरे देतात. जवळपास १ कोटीची जागा असून महापालिकेचे त्याकडे लक्ष नाही. अधिकारी यांनी कार्यवाही न केल्याने त्यांचेवर कार्यवाही करणे गरजेचे आहे.

**श्री.भरत लकडे :** अधिकारी सक्षम नसेल तर बदली करावी.

**श्रीमती पार्वती मानकापे :** माझ्या वॉर्डात पाहणी करुन नाल्याच्या बाजूचे अतिक्रमण काढण्याचे आदेश डॉ.भागवत कराड व श्री.विकास जैन महापौर असतांना दिले होते. दोनच दिवसाची मुदत देण्यांत आलेली होती. अद्याप अतिक्रमण काढलेले नाही. आता काही दिवसांनी पावसाळा सुरु होईल. त्यामुळे अशा काळात जीवित हानी/आर्थिक हानी होण्याची शक्यता आहे.

**सौ.निखत परवीन :** वार्डात अतिक्रमण होते. अनधिकृत इमारती होतात. दोन-दोन वेळेस नोटीस दिली जाते. कलम २६० ची नोटीस त्यांचे उत्तर मिळत नाही. अतिक्रमण कोठे होते हे सुध्दा अधिकाऱ्यांना माहिती नसते. स.सदस्यांच्या पत्रांना उत्तरे दिली जात नाही.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** जागा महापालिकेच्या नांवे असतांना संबंधितांनी पी.आर.कार्ड कसे तयार केले.

**मा.महापौर :** सतत तीन वर्षापासून स.सदस्य श्री. भरत लकडे हे अतिक्रमण होत असल्याबाबत तक्रार करीत असतांनाच संबंधित विभागाने तात्काळ कार्यवाही

न केल्याने संबंधित व्यक्तीने त्यांचे नावे पी.आर. कार्ड तयार केले. कार्यवाही करण्यास जे अधिकारी सक्षम नसतील. त्यांचेवर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**श्री.प्रशांत देसरडा :** पी.आर. कार्ड तयार होण्याच्या अगोदर स.सदस्य यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या ही बाब निदर्शनास आणून दिलेली आहे. वारंवार त्यांनी सभागृहात त्या जागेच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला होता. खऱ्या अर्थाने त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

**डॉ.भागवत कराड :** ही जागा महानगरपालिकेची असेल तर त्यावर महापालिकेतर्फे त्वरीत कार्यवाही करण्यांत यावी. मालमत्ता अधिकारी यांना सुचना द्याव्यात.

**सौ.निखत परवीन :** वार्डात अनधिकृत इमारतीचे काम पुर्ण होते. तरी अधिकाऱ्यांना सुचना करुनही कार्यवाही होत नाही. दोन वेळेस पत्र दिले उत्तर मिळाले नाही.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर :** आताच अतिक्रमणाच्या संदर्भात चर्चा चालू आहे. संबंधित व्यक्तीने महापालिकेच्या जागेवर स्वतःच्या नावाने पी.आर.कार्ड तयार केले. त्या व्यक्तीवर नियमाने कार्यवाही करणे गरजेचे होते. मा.आयुक्त नव्यानेच येथे रुजू झाले. लगेच त्यांनी खुल्या जागा संबंधित संचिका मागवून घेतल्या त्याबद्दल त्यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करतो. जो अधिकारी कामचुकारपणा करीत असेल त्यांचेवर कार्यवाही झालीच पाहिजे. ३ वर्षापासून स.सदस्य या संदर्भात मागणी करीत आहे. हि महापालिकेची जागा असून पी.आर. कार्ड वरील नाव रद्द करणे अत्यंत गरजेचे आहे. व महापालिकेच्या नावाचे पी.आर.कार्ड तयार करुन घ्यावे. अशा महापालिकेच्या शहरात भरपूर जागा असून अतिक्रमण झालेले आहे. जागा महापालिकेच्या ताब्यात घेण्याबाबत तात्काळ कार्यवाही करुन शहरातील अशा महपालिकेच्या जागेवर अतिक्रमणे सर्वेक्षण करुन ज्यांनी अशा महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण केले त्या व्यक्तीवर फौजदारी गुन्हे दाखल करावे जेणेकरुन यापुढे महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण करण्यास कुणी पुढे येणार नाही. अशा प्रकरणाची चौकशी करण्यासाठी मा.आयुक्तांनी एक समिती नेमावी व निर्णय घ्यावा.

**मा.आयुक्त :** सर्वसाधारणपणे एखादी मालमत्ता महापालिकेची आहे. सी.टी.सर्व्हे झाला असेल तर पी.आर.कार्डावर येते. मालकी बदलली तर हस्तांतर होते. या ठिकाणी आताच खुलासा केला की, अतिक्रमण काढण्याचा प्रयत्न केला. केवळ मालकी नसल्याने इच्छा असूनही अतिक्रमण काढता आले नाही. या संदर्भात अधिक्षक भूमी अभिलेख यांचेकडे अपील केलेले आहे. महापालिकेच्या मालमत्तेचे संरक्षण करण्याचे काम हे मालमत्ता विभागाचे आहे. हे मिळकत महापालिकेस प्राप्त होण्यासाठी मालमत्ता अधिकाऱ्यांनी केलेल्या अपिलाचा क्रमांक घेवून त्यावर विचार विनिमय करुन प्रकरण तात्काळ बोर्डवर येण्यासाठी विधी सल्लागार यांनी आपली बाजू समर्थपणे मांडण्यात यावी. आवश्यकतेप्रमाणे मा.महापौर व माझे आदेश प्राप्त करुन घ्यावे.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** पी.आर.कार्ड संबंधित व्यक्तीने २००१ मध्ये तयार केले. परंतू त्यापुर्वी पासन स.सदस्य अतिक्रमण झाल्याची तक्रार करतात.

**मा.आयुक्त :** शहरातील सर्व ज्या महापालिकेच्या मोकळया जागा आहे. त्या संरक्षित राहिल्या पाहिजे. अतिक्रमण केलेले नसले पाहिजे. जागा महापालिकेच्या ताब्यात असणे आवश्यक आहे. मी या महापालिकेत रुजू झाल्या नंतर लगेच

अशा मोकळया जागा बाबत माहिती घेतली. माहिती प्राप्त झाल्यानंतर माझ्या या महितीच्या संदर्भात उपआयुक्त (म) यांना एक पत्र दिले आहे. माझा हेतू हाच की, मला, महापौरांना, सभागृहाला सुध्दा कळावे की, ज्या ज्या ठिकाणी मोकळया जागा असतील त्याचे वर्णन, क्षेत्रफळ, हद्दीत अतिक्रमण झालेले आहेत का, तसेच मिळकतीच्या मालकी हक्कात फेरफार झाले तर आपल्या मालमत्तेस दुसऱ्या खाजगी व्यक्तीचे नांव कसे झाले कोणत्या तरी अधिकारात फेरफार झाले असेल, नांव लागले ते कसे? याची सर्व माहिती घ्यावी लागणार आहे.

**श्री.मीर हिदायत अली :** सर्व्हे नं.६ मध्ये न.भु.क्र.१५१८७ ले आऊट करुन मिळकत धारकाने खुल्या जागेची रजिष्ट्री महानगरपालिकेस करुन दिली आहे. त्यानंतरही पी.आर.कार्डवर पार्टीचे नांव येते. दोन महिन्यापासून या संदर्भात वृत्तपत्रात चर्चा येते. स्थायी समितीच्या बैठकीत वारंवार या जागेच्या संदर्भात चर्चा झालेली आहे. १५-२० दिवस दररोज वृत्तपत्रात जाहीररित्या येत होते. त्याची दखल प्रशासनाने घेतलेली नाही का? कोट्यावधी रुपयाची ही महापालिकेची मालमत्ता आहे. महापालिकेचे दुर्लक्ष होत आहे.

**सौ.निखत परवीन :** आमखास मैदान लगत महापालिकेच्या जागेवर प्लॉट पाडून अतिक्रमण करण्यांत आले. जवळच झोन कार्यालय व महानगरपालिकेचे मुख्य कार्यालय आहे. कोण अनधिकृत भूखंड पाडतात. आमखास मैदानाची जागा महानगरपालिकेची आहे.

**सौ.साधना सुरडकर :** शहरातील भूखंड यावर झालेले अतिक्रमाना संदर्भात या सभागृहात चर्चा होत आहे. शहानूरवाडी भागात अतिक्रमण झाले, वृत्तपत्रात मुख्य पृष्ठावर बातम्या आल्या. २ वेळा प्रशासनाकडे तक्रार करुनही कार्यवाही होत नाही. दुर्लक्ष होत आहे. आता वृत्तपत्रात बातमी आली. तातडीने अतिक्रमण काढावे. मा.आयुक्तांनी अशा खुल्या जागांचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करावे. ज्या ज्या ठिकाणी अतिक्रमण असेल ते तात्काळ काढण्यांत येते..

**डॉ.भागवत कराड :** शहानुरवाडी भागात नागरिकांनी आरक्षणाच्या जागेवर घरे बांधली. दैनिक सामना वृत्तपत्रात बातमी आली. प्रशासकीय अधिकारी विभागाने वेळीच कार्यवाही केली नाही. तक्रार करुनही इमारत निरिक्षक व प्रशासकीय अधिकारी डोळेझाक करतात. जेव्हा अतिक्रमण झाले, तेव्हा प्रशासकीय अधिकारी कोण होते. त्यांचेवर तसेच त्यावेळेसचे इमारत निरिक्षक कोण होते, त्यांचेवर सुध्दा कार्यवाही व्हावी. महानगरपालिकेचे विकास योजनेतील आरक्षित जागेवर अनधिकृत बांधकाम होऊ नये. या शहरात २०X३० ची सर्रासपणे प्लॉटींग चालु आहे. असे प्लॉटीग होण्यास प्रतिबंध करावे. प्रशासकीय अधिकारी यांना वारंवार सुचना केल्या. इमारत निरिक्षकावर आरोप आहे. ते संगणमत करतात. अनधिकृत बांधकाम होऊ देऊ नये.

**श्री.प्रशांत देसरडा :** अनधिकृत घरे होऊन सुध्दा एम.एस.ई.बी. लाईट देतात. विद्युत पुरवठ्यासाठी महानगरपालिकेची त्या मालकाला एन.ओ.सी.घ्यावी लागते. एन.ओ.सी. न घेताच एम.एस.ई.बी. लाईट कनेक्शन (मीटर) कोणत्या नियमाने दिले जाते. हेडगेवार दवाखान्यासमोर अतिक्रमण झाले. त्यांना एम.एस.ई.बी. विद्युत पुरवठा कसे करते. नियमाने दिले जात नसेल तर महानगरपालिका एस.एस.ई.बी. विभागावर काय कार्यवाही करु शकते. ती

करण्यांत यावी. महापालिकेने हरकत घेतली आहे का, नळ कनेक्शन दिले. चौकशी करावी.

**सौ.लिलावती घायतिलक :** मागील प्रश्नावर वारंवार चर्चा होते, जे मुळ विषय असतात. त्यावर चर्चा झाली पाहिजे. सर्व विषय झाल्याशिवाय सभा स्थगित करावयाची नाही.

**श्रीमती पार्वती मानकापे :** सुतगिरणी गारखेडा भागात महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे. कार्यवाही होत नाही.

**श्री.सुनिल मगरे :** नंदनवन कॉलनी रस्त्याच्या डाव्या बाजुला जागा आहे. ५० फुट रस्ता दर्शविला आहे. लष्कर ५० फुट रस्ता सोडून बांधते. नव्याने तार फेन्सींग सुरु केली. दोन दिवसापुर्वी दै.सकाळ व आज दै.लोकमत मध्ये बातमी आहे. शांतीपुरा कडुन २०-२५ फुट जागेमध्ये अतिक्रमण करुन सुरु केले आहे. नंदनवन कॉलनी पडेगांव हा भाग विकसीत होतो. रस्ता वाहतुकीस अपुरा पडत आहे. अपघात होतात. रुंदीकरण आवश्यक आहे. लष्कराने या रस्त्यावर अतिक्रमण केले आहे. याबद्दल सविस्तर निवेदन दिलेले आहे. मालमत्ता अधिकारी यांनी जाऊन पाहणी करुन कार्यवाही करावी. नंदनवन कॉलनी भागातच महापालिकेचा ओपन स्पेस आहे. तेथे नामांकित खेळाडूने अतिक्रमण केले. बास्केट बॉलचे पोल उभे केले. खाजगी कोचींग चालतात. सदर व्यक्ती विद्यार्थ्यांकडुन फिस रुपाने पैसा जमा करतात. महापालिकेला त्याचा काही फायदा नसून त्या व्यक्तीने अतिक्रमण करुन उत्पन्न मिळवित आहे. आतापर्यंत प्रशासनाने कुठलीही कार्यवाही केलेली नाही.

**सौ.सिद्दीकी नईम सुलताना :** एक्सप्रेस लाईन टाकण्यात आली. परंतू वार्डात १५ मिनीटे पाणी येत नाही.

**श्रीमती शाहीन जफर :** यापुर्वीच्या बैठकीत शिक्षण विभागाचा प्रस्ताव होता शिक्षणाधिकारी उपस्थित नव्हते. या बैठकीस मालमत्ता अधिकारी उपस्थित नाही. ज्या मुद्द्यावर चर्चा होते. तेच अधिकारी उपस्थित नसतात. सभागृहाचे कामकाज चालते ते बरोबर नाही.

**श्री.जयवंत ओक :** महापालिकेच्या अंतर्गत ज्या ओपन स्पेस आहे, त्या संदर्भात मा.आयुक्त यांनी रुजू झाल्यानंतर लगेच माहिती घेण्याचा प्रयत्न केला. त्याबद्दल त्यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो. शहरातील महापालिकेच्या जागेवर होत असलेले अतिक्रमण थांबविणे गरजेचे असून अशा लोकांवर कार्यवाही करण्याची गरज आहे. शासनाने गुंठेवारी कायदा काढला त्याची अंमलबजावणी व्हावी. भूखंडाच्या संदर्भात प्रशासनाला काय जी कार्यवाही करता येते ती करण्यांत यावी. शहरात महापालिकेच्या जागा किती, त्यावर अतिक्रमण किती, किती प्रकरण न्याय प्रविष्ट, किती प्रकरणाचा निकाल महापालिकेच्या बाजूने लागलेला आहे. अशा मोकळ्या जागेवर ड्रेनेज / पाणी लाईन टाकलेल्या आहेत का? याची माहिती स.सदस्यांना देण्यात यावी. माझ्या माहिती प्रमाणे ५०% प्रकरणाचा निकाल महापालिकेच्या बाजुने आहेत. ५०% महापालिकेच्या विरोधात निकाल गेले. महापालिकेच्या जागा ताब्यात कशा घेता येतील. यासाठी प्रयत्न करावे. हा विभाग सक्षम केली पाहिजे. महानगरपालिकेच्या जागांवर एखाद्या व्यक्ती पी.आर.कार्ड स्वत:च्या नावाने काढतो. अशा व्यक्तीवर कायदेशीर कार्यवाही झाली पाहिजे. जागेचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने मा.आयुक्तांनी आदेश द्यावेत.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर :** दै.सामना वृत्तपत्रात शहानुरवाडी भागात अतिक्रमण झाल्याची बातमी प्रसिध्द झाली. याकडे महापालिकेने दुर्लक्ष केलेले आहे. तसेच नंदनवन कॉलनीतील रस्त्यावर होत असलेले अतिक्रमणाचा मुद्दा उपस्थित झाला. जागा सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने मा.आयुक्त, मालमत्ता अधिकारी, नगर रचनाकार यांनी एकत्र बैठक घेऊन योग्य निर्णय घेण्याची गरज आहे. मा.आयुक्तांना विनंती की, आपण सर्वे भुखंडाची माहिती घ्यावी. सर्व स.सदस्यांना द्यावी. अतिक्रमण काढण्याची कार्यवाही त्वरीत होणे गरजेचे आहे.

**मा.आयुक्त :** सभागृहाच्या भावना मी लक्षात घेतलेल्या आहे. यापुर्वीच कार्यवाही करण्याचे आदेश मी दिलेले आहे. महापालिकेच्या प्रत्येक विभागाची माहिती घेऊनच कार्यवाही करावी लागणार आहे. प्रत्येक विभागाची कार्यपध्दती समजून घ्यावी लागेल. जागेच्या संदर्भात एका संचिकेवर मी सूचना केलेली आहेत की, झोननिहाय शहरातील महापालिकेच्या मोकळया जागा किती, कुठे व किती जागेवर अतिक्रमण झालेले आहे. माहिती घेणार आहेत. त्यानंतर झोन अधिकारी, विधी सल्लागार, मालमत्ता अधिकारी यांना एकत्र बसून ज्या महापालिकेच्या मालकीच्या जागेवर अतिक्रमण आहे. त्या जागा मोकळया कशा पध्दतीने करता येतील. त्यासाठी कार्यवाही करण्यांत येईल. या जागा संरक्षित ठेवणे गरजेचे आहे. परंतू सदर खर्चासाठी अर्थसंकल्पात तरतूद असावयास पाहिजे. निधी सुध्दा उपलब्ध करुन घ्यावा लागणार आहे. माहिती प्राप्त झाल्यानंतर सभागृहासमोर तपशिल ठेवला जाईल. त्यानुसार सभागृहात जो निर्णय होईल. त्या निर्णयानुसार कार्यवाही करता येईल. असे केल्यास निश्चितपणे अतिक्रमणास आळा बसेल.

**श्री.मिर हिदायत अली :** शहराच्या आजु बाजुला प्लॉटींग होत आहे. त्याबाबत विक्री करणाऱ्यांना नोटीस दिली पाहिजे.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** पाण्याचा प्रश्न महत्वाचा आहे. सिडको, हडकोला एक्सप्रेस लाईन सुरु होऊन देखील पाणी मिळत नाही.

**सौ.सिद्दीकी नईम सुलताना :** वार्डात १०-१५ मिनीटे पाणी होते. त्याचा खुलासा द्यावा. एक्सप्रेस लाईन होऊन उपयोग नाही.

**डॉ.भागवत कराड :** एक्सप्रेस लाईनचे काम १ मे २००३ पर्यंत पुर्वी होईल व यानंतर सिडको-हडको भागात दररोज पाणी दिले जाईल,असे आश्वासन देण्यांत आलेले होते. परंतू आजही काही भागात एक दिवसा आड व वेळेवर पाणी येत नाही.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** जायकवाडी धरणाची पाणी पातळी अत्यंत खाली गेलेली आहे. पाणी पंपीग होण्याची क्षमता ही १५-२०% कमी झालेली आहे. पाण्याची पातळी जोपर्यंत वर येत नाही. तो पर्यंत योग्य प्रमाणात पंपींग होणार नाही. एक तास पाणी द्यावयास पाहिजे. ज्या विशिष्ट परिस्थितीत स.सदस्या म्हणतात ते मी बघून येतो. पाणी पुरवठा कमी प्रमाणात होत असल्याने जुन्या शहरात सुध्दा १ दिवसा आड पाणी पुरवठा सुरु केलेला आहे. सिडकोत सुध्दा एक दिवसा आडच पाणी दिले जाते. सर्वांनी सहकार्य करावे. असे अपेक्षित आहे. तरी सर्वच भागात दररोज पाणी पुरवठा करण्यांचा प्रयत्न करतो.

**श्रीमती शाहीन जफर :** एक दिवसा आड पाणी दिले जाते. तर एक तास तरी पाणी दिले पाहिजे.

**मा.महापौर :** ज्या भागात पाणी कमी प्रमाणात येते. तेथे कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाणी पुरवठा सुरळीत करावा. मागील सर्वसाधारण सभेत बन्सीलालनगर येथील महानगरपालिकेच्या जागेवर दिलेल्या बांधकाम परवानगी संदर्भात चौकशी अहवाल प्राप्त झालेला आहे. नगर सचिव अहवाल वाचून दाखवितात.

**श्री.सुनिल मगरे :** अहवालाच्या प्रती सर्व सदस्यांना देण्यांत याव्यात.

**डॉ.भागवत कराड :** अहवालाच्या प्रती सर्व सदस्यांना देण्यांत याव्यात. पुढील सभेत त्यावर चर्चा व्हावी.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर :** अहवाल वाचून दाखववावा. त्याचे प्रती सर्व स.सदस्यांना देण्यांत याव्यात.

**मा.महापौर :** नगर सचिव यांनी अहवाल वाचून दाखववावा.

**डॉ.भागवत कराड :** अहवालाच्या प्रती सदस्यांना देणार असेल तर वाचून दाखविण्याची गरज नाही.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर :** सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन स.सदस्यांना अहवाल प्रत द्यावी. योग्य निर्णय घेण्याचे अधिकार आपल्याला आहे. सभागृहात वाचून दाखववावा. ज्यांना ऐकावयाचे नसेल त्यांनी बाहेर जावे.

**डॉ.भागवत कराड :** अहवालांच्या प्रती द्याव्यात. सभागृह नेते युतीचे आहेत. त्यांनी सभागृहाबाहेर जावे असे म्हटले शब्द मागे घ्यावे. असे बोलणे बरोबर नाही.

(याच वेळी सभागृहात मोठमोठ्याने बोलणे चालू असते काहीही ऐकू येत नाही.)

**उपमहापौर :** अहवाल प्राप्त झालेला आहे, स.सदस्यांना देण्यांबाबत माझे सहमत आहे.

**श्री.प्रशांत देसरडा :** अहवाल वाचण्यात येऊ नये. प्रत्येक सदस्यांना प्रती देण्यांत याव्यात. यावर अभ्यास केल्या नंतर पुढील बैठकीत चर्चा करता येईल.

**मा.महापौर :** अहवालाच्या प्रती सर्वांना देण्यांत याव्यात. सभा १ तासासाठी तहकूब करण्यांत येते. (वेळ दुपारी २.२० वाजता सभेला पुन्हा सुरुवात दुपारी ३.३० वाजता)

**मा.महापौर :** बन्सीलालनगर येथील बांधकाम परवानगी संदर्भात चौकशी अहवाल सदस्यांना देण्यांत आलेला असून नगर सचिव यांनी अहवाल सभागृहाला वाचून दाखववावा.

**नगरसचिव :** (पान ५४ वर सोबत अहवालाची प्रत जोडली आहे.)

**श्री.सुनिल मगरे :** या प्रकरणांवर निर्णय घेण्याच्या अगोदर स.सदस्यांना अभ्यास करु द्यावा. पुढील बैठकीत चर्चा करुन निर्णय घेण्यांत यावा. कोणत्याही सभासदांची/सभागृहाची बदनामी होणार नाही, याची दखल घेतली जावी.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** ३-४ दिवसापुर्वी हा अहवाल स.सदस्यांना द्यावयास पाहिजे होता. चर्चा करता आली असती. ऐनवेळी अहवाल देऊन चर्चा करुन निर्णय घेणे योग्य नाही. जो अहवाल दिला तो अपूर्ण आहे. जे २५% विकास केलेला कोणता भाग (हिस्सा) महापालिकेस देणार याचा उल्लेख केलेला नाही. या अहवालाच्या संदर्भात अभ्यास करुन योग्य निर्णय घेता येईल. चौकशी अधिकारी हे प्रशासनाचे अधिकारी असून मा.आयुक्त यांनी चुकीच्या पध्दतीने बांधकाम परवानगी दिली असे म्हणू शकणार नाही. प्रशासनाचीच बाजू

मांडणार आहे, यात शंका नाही. शक्य तेवढा वेळ या अहवालावर अभ्यास करण्यासाठी देण्यांत येऊन निर्णय घ्यावा.

**डॉ.भागवत कराड :** यावर अभ्यास करण्यासाठी वेळ द्यावा. २५% कोणती दुकाने महापालिकेस देणार आहे, तो सुध्दा अहवालात उल्लेख करावा. पुढील सर्वसाधारण सभेत यावर चर्चा घडुन आणावी.

**श्री.संजय शिरसाट :** या जागे संदर्भात सभागृहात चर्चा झाली. चौकशी नियुक्त केली. चौकशी अहवाल सादर होईपर्यंत कामास स्थगिती दिलेली आहे. अहवाल आता सादर झाला आहे. यावर पुढील बैठकीत चर्चा होऊन निर्णय होणार या कालावधीत संबंधित विकासक न्यायालयात गेल्यास व दावा करुन नुकसान मागणी केल्यास महापालिका त्यास जबाबदार राहील, याची सुध्दा नोंद घ्यावी.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर :** अहवाल सादर झाला. स.स.श्री.कोकाटे यांनी सुचना मांडल्यानुसार २५% दुकाने महापालिकेस कोणती व कोणत्या बाजुने देणार त्याचा आताच खुलासा घ्यावा. काय दुरुस्त्या असतील. त्या करण्यांत याव्या. गंभीर स्वरुपाचे हे प्रकरण असून दोन सदस्यांना यामुळे राजीनामे द्यावे लागलेले आहे.

**श्री. इलियास किरमाणी :** मा.आयुक्तांनी पैसे घेतल्याचा आरोप स.सदस्यांनी केलेला होता. आयुक्तांनी पैसे घेतले की नाही याचा अहवालात खुलासा केलेला नाही. केलेले आरोप खोटे होते का?

**डॉ.भागवत कराड :** परवानगी मा.आयुक्त देतात. चौकशी मुख्य लेखाधिकारी करतात हे कितपत योग्य आहे. आयुक्तांची चौकशी करण्यासाठी सेवानिवृत्त एखाद्या बाहेरील विभागातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी.

**श्री.संजय शिरसाट :** चौकशी समिती नियुक्त केली. तेव्हांच हा मुद्दा उपस्थित करावयास पाहिजे. मुख्य लेखाधिकारी यांनी अहवाल दिलेला आहे. त्यांनी त्यांचे मत व्यक्त केले. आदेशित केलेले नाही. निर्णय सभागृहाला घ्यायचा आहे.

**श्री.प्रशांत देसरडा :** मुख्य लेखाधिकारी यांनी या अहवालात प्रशासनीय भूमिका मांडलेली आहे. मा.आयुक्तांची मुख्य लेख्याधिकारी चौकशी करु शकतात का? नियमाने बरोबर आहे का?

**मा.महापौर :** पुढील बैठकीत या अहवालावर सविस्तर चर्चा करुन निर्णय घेता येईल. आता विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

**विषय क्र.७४/१ :**

दिनांक १९.०३.२००३ ची सर्वसाधारण सभा, दि.२९.०३.२००३ व ३०.०३.२००३ च्या विशेष सर्वसाधारण सभेच्या आणि दि.१९.०४.२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.नंदकुमार घोडेले :** इतिवृत्त दिनांक १९.०३.२००३ पान क्र.२० वरील पुर्ववत शब्द वगळावे.

**श्री.रतनकुमार पंडागळे :** इतिवत्त दिनांक १९.०३.२००३ पान क्र.१५ वर कायम स्वरुपी कर्मचारी यांना प्रतिवर्षी प्रति दोन गणवेश प्रत्यकी देण्यांत यावे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** इतिवृत्त दिनांक १९.०४.२००३ पान क्र.८ वर विषय क्रमांक ६१/३ मध्ये दि.२०.१२.२००२ च्या सर्वसाधारण सभेचा विषय क्र.१०१/४ ऐवजी विषय क्र.१०/४ अशी दुरुस्ती करावी.

**मा.महापौर :** दुरुस्तीसह इतिवृत्त मंजूर करण्यांत येते.

**ठराव :**

इतिवृत्त दिनांक १९.०३.२००३ विषय क्र.४५/३ मधील ठरावातील वाहन चालक ऐवजी पुर्ववत लिपिक या वाक्यातील पुर्ववत शब्द वगळण्यास आणि विषय क्र.३९/४ चा दुरुस्ती प्रस्ताव अ.क्र.२ मध्ये आणि ठरावामध्ये कायमस्वरुपी कर्मचारी यांना प्रतीवर्षी प्रति दोन गणवेश प्रत्येकी देणेत यावे व दि.१९.०४.२००३ चे इतिवृत्त पान क्र.८ विषय क्र.६१/३ मध्ये दि.२०.१२.२००२ च्या सर्वसाधारण सभेचा विषय क्र.१०१/४ ऐवजी १०/४ अशी दुरुस्ती करण्यास आणि इतर दुरुस्त्यांसह दि.१९.०३.२००३ व दि.३०.०३.२००३ च्या विशेष सर्वसाधारण सभा आणि दि.१९.०४.२००३ च्या सर्वसाधारण सभेतील इतिवृत्त कायम करण्यांत सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.७५/२ :**

कार्यकारी अभियंता, जलनि:सारण व विद्युत, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बिबिका मकबरा पाठीमागे मो.पहाडसिंगपुरा भागातील कला हाऊसिंग सोसायटी, विद्या विहार, संभाजी कॉलनी, थत्ते लेआऊट कॉलनी, ग्रंथालय कॉलनी, निपट निरंजन कॉलनी, नर्सेस हाऊसिंग सोसायटी हया व वसाहती मंजूर रेखांकनातील असून १००% विकास खर्च भरलेला आहे. हया वसाहतींना जलनि:सारण वाहिनीची व्यवस्था नाही. तसेच सदर वसाहतीतील ड्रेनेज Disposal करिता नाल्यात मुख्य सिव्हर लाईन नसल्यामुळे नाल्यात मुख्य सिव्हर लाईन टाकणेंचा प्रस्ताव आहे. नाल्यास मो.बेगमपूरा, विद्युत कॉलनी ते कला हाऊसिंग सोसायटी पर्यंत नाल्यात ५०० मी.मी. व्यासाची जलनि:सारण वाहीनी टाकणेच्या कामासाठी सन २०००-२००१ च्या महाराष्ट्र जीवन व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची नुसार रक्कम रु.२१,६७,९१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची दिनांक ०८.०४.२००३ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२१,६७,९१०/- चे अंदाजपत्रकास मूंजरी बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा.महापौर :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बिबिका मकबरा पाठीमागे पहाडसिंगपुरा भागातील वसाहतींना जलनि:सारण वाहीनीची व्यवस्था करण्याकरिता मुख्य सिव्हर लाईन टाकणे करिता तयार केलेले रक्कम रु.२१,६७,९१०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७६/३ :**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री.जे.व्ही.आर. प्रसादराव विशेष सचिव व प्रकल्प संचालक, राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, दिल्ली आणि श्री.मनमोहनसिंग, प्रधान सचिव व उपआयुक्त, कुटूंब कल्याण यांनी औरंगाबाद महानगरपालिकेकडे एड्स या रोगावर उपचारासाठी येणाऱ्या औषधी व सामुग्रीवर जकात माफी देण्याची मागणी केली आहे.

जकात नियम १९८४ कलम (४) च्या तरतूदीनुसार आयात मालावर जकात वसुली केली जाते व कलम (५) मध्ये जकात आकारणी पासून सुट दिलेल्या वस्तुची यादी दिली आहे. त्यात एड्स या रोगावर उपचारासाठी औषधी व यंत्रसामुग्री यांचा समावेश नाही.

शासनाचे मागणीनुसार सहानुभूती पुर्वक विचार करुन माफी देण्यात यावी म्हणून पत्राद्वारे कळविले आहे. महानगरपालिकेस जर एड्स या रोगावरील उपचारासाठी औषधी व इतर साधन सागुग्रीवर जकात माफी दिल्यास महानगरपालिकेस होणारे आर्थिक नुकसान विचारात घ्यावे लागेल. व सदरची सुट भरुन काढण्यास नवीन पर्याय शोधणे तसेच जकात नियमात १९८४ कलम (५) मध्ये दुरुस्ती केल्यानंतरच जकात माफी देणे शक्य होईल. सदरची बाब धोरणात्मक असल्याने वरीलप्रमाणे प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.महापौर :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एड्स या रोगावर उपचारासाठी येणाऱ्या औषधी व सामुग्रीवर जकात नियम १९८४ कलम (५) मध्ये दुरुस्ती झाल्यानंतर जकात नियम १९८४ कलम (५) मध्ये दुरुस्ती झाल्यानंतर जकात माफी देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७७/४ :**

नगर रचना विभागा महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, स.नं.४ नारेगांव येथे महानगरपालिकेच्या मालकीची ५ हेक्टर ८१ आर जागा आहे. जी मंजूर विकास योजना वाढीव हद्दनुसार आरक्षण क्र.८ विस्तापीतांचे पुनर्वसन या प्रस्तावासाठी आरक्षित आहे.

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.३९१/३ दि.१९.०५.२००१ नुसार ४० आर. जमीन गोसावी समाज स्शशानभूमी साठी व ४० आर जमीन मुस्लीम ब्रिस्तानसाठी निश्चित करण्यासाठी मान्यता देण्यांत आली होती.

या मान्यतेनंतर गोसावी समाजाने महानगरपालिकेने प्रस्तावित केलेले जमीन नाकारली त्यामुळे मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती, स्थायी समिती, वार्ड स.नगरसेवक, मा.उपआयुक्त (म.), मा.सहाय्यक संचालक नगर रचना, उप अभियंता उद्यान बांधकाम व मालमत्ता अधिकारी यांनी दि.१७.०७.२००२ रोजी स्थळ पाहणी करुन न्याने जागा ठरवून त्यास मा.सर्वसाधारण ठराव क्र.८/२ दि.२०.११.२००२ नुसार ४० आर (१ एकर) जमीन गोसावी समाज स्मशान भूमीसाठी मान्यता देण्यात आली असून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गोवा फेरबद्दल करण्यास मान्यता दिलेली आहे. व या ठरावामध्ये पुर्वी मंजूर केलेला ठराव क्र.३९१/३,

दि.१९.०५.२००१ रद्द केला आहे. पुर्वीचा ठराव रद्द झाल्यामुळे मुस्लीम समाजासाठी प्रस्तावित केलेली कब्रस्तानची जागा आपोआप रद्द झाली परंतू या प्रभागाचे स.नगसेवक व मुस्लीम समाजाची मागणी लक्षात घेता पुर्वी प्रस्तावित केलेली कब्रस्तानची जागा सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.३९१/३ दि.१९.०५.२००१ अन्वये मुस्लीम कब्रस्तान विकसीत करण्यासाठी ४० आर. (१ एकर) जमीनीस मान्यता दिलेली होती. हे पाहता पुर्वीचा ठरावानुसार ४० आर. जमीन मुस्लीम कब्रस्तानच्या वापरा करिता तसेच प्रस्तावित तसेच मुस्लीम कब्रस्तान लगत अस्तित्वात असलेली हिंदु स्मशान भूमीची १ एकर ४० आर जमीनसह आवश्यक तो किरकोळ फेरबदल किवास योजना आरक्षण क्र.८ मान्य करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्याची तसेच सदर प्रस्तावित कब्रस्तानची जागा विकसीत करण्यासाठी व प्रस्ताव मान्यतेनंतर लगेच जागेचा वापर सुरु करण्याची मान्यता या प्रस्तावात व्हावी. प्रस्ताव मान्यतेनंतर विकास योजना गौण फेरबदलाचा प्रस्ताव कार्यवाही व शासन मान्यतेस्तव पाठविण्याचे अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांना देण्यांचे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**मा.महापौर :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गट नं.४ नारेगांव येथे महापालिकेच्या जागेपैकी प्रस्तावित केल्याप्रमाणे ४० आर. (१ एकर) जमीन मुस्लीम कब्रस्तानासाठी व त्यालगत अस्तित्वात असलेली ४० आर (१ एकर) जमीन हिंदू स्मशान भूमीसाठी ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित कब्रस्तानची जागा विकसीत करण्यांस व लगेचच जागेचा वापर सुरु करण्यासही मंजूरी देण्यांत येते. आणि सदर जमीन वापराबाबत मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गोवा फेरबदलाची कार्यवाही करण्यांस आणि या संबंधात अधिसूचना प्रसिध्द करणे, सूचना, हरकती मागविणे सुनावणी देणे परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करणे ई. अधिकार आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना प्रदान करण्यांस सर्वानुमते मंजूर देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७८/५ :**

वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीने मंजूरी देऊन शिफारस केलेला ठराव क्रमांक ९/२ दि.०९.०४.२००३ घन कचरा व्यवस्थापना संबंधी मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये श्रीमती अलमित्रा पटेल यांनी दाखल केलेल्या न्यायालीयन याचिका संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने वर्ग अ दर्जाच्या शहरामध्ये घनकचरा व्यवस्थापनचा अभ्यास करुन सुधारणा करण्या बाबत शिफारस करण्यासाठी बर्मन समितीची स्थापना केली होती. प्रस्तुत समितीने केलेल्या शिफारशी तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार केंद्र शासनाच्या पर्यावरण वन मंत्रालयाने नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० निर्गमित केलेले आहेत. त्यानुसार महानगरपालिकांना शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट कालावधीत ३१ डिसेंबर २००३ पुर्वी अंमलबजावणी करावयाची आहे. या अंतर्गत कचऱ्याची वर्गवारी करणे, कचरा उचलणे साठवणूक, वाहतूक, प्रक्रिया व कचऱ्याची विल्हेवाट लावणे अंतर्भूत आहे.

दिनांक ०९.०४.२००३ रोजी संपन्न झालेल्या वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीच्या झालेल्या व आरोग्य समितीच्या सभेत नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी २०००) चे अंमलबजावणी संदर्भात सादर करण्यांत आलेल्या प्रस्तावावर विचार विनिमय होऊन खालील मंजूर देण्यांत आली.

नागरी घनकचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी-२०००) चे अंमलबजावणी करण्याकरिता प्रस्तावित कृती योजनेस मंजूरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रकल्पाची फिजीबिलीटी तपासून व आवश्यक त्या सर्व दुरुस्त्यासह सदर प्रस्ताव प्रशासनाने सर्वसाधारण सभेपूढे ठेवावा अशी शिफारस करण्यांत येत आहे.

त्यानुसार तांत्रिक दुरुस्त्या करुन नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी-२०००) चे अंमलबजावणीसाठी सुधारित कृती योजना तयार करण्यांत आली असून सर्व साधारण सभेच्या विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा.महापौर :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० ची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी व त्याची अंमलबजावणीसाठी प्रस्तावित सुधारित कृती योजना मसुद्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

नागरी घनकचरा, व्यवस्थापन व हाताळणी नियमावली-२००० अंमलबजावणी बाबत सुधारित कृती योजना

| अ. क्र. | सद्यस्थिती | सर्वोच्च न्यायालयाची सुचना | कृती | कालमर्यादा | जबाबदार अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | अ) कचरा निर्मिती १) कचऱ्याचे केमीकल १) औरंगाबाद मनपा ॲनालिसेस महाराष्ट्र मध्ये अंदाजे ३०० टन प्रदुषण नियंत्रण मंडळ कचरा दररोज निर्माण किंवा शासन मान्य होतो. या कचऱ्याचे प्रयोगशाळा यांच्या फी जकील ॲनॅलिसीस कडून करुन घेणे झालेले आहे. | १) कचऱ्याचे केमीकल ॲनालिसेस महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ किंवा शासन मान्य प्रयोगशाळा यांच्या कडून करुन घेणे | कचरा केमीकल ॲनालिसीस साठी पाठविणे. | जुलै-२००३ | उद्यान अधिक्षक |
| | ब) झाडलोट | | | | |
| २. | १) सर्व रस्ते झाडले जात नाही. फक्त ८०% रोड झाडले जातात.<br>२) सध्या झाडण्यासाठी लहान दांडीचे झाडू वापरले जातात. | १) १००% रस्त्याची झाडलोट होणे आवश्यक आहे.<br>२) वर्षाचे ३६५ दिवस रस्ते झाडणे आवश्यक आहे.<br>२) सर्व सफाई कामगारांना मोठ्या दांड्याचे व पसरट झाडू तसेच घमेला, फावडा, लेदर ग्लोज, गम बुट देणे बंधनकारक आहे. | १) सफाई कामगारांचे वेळापत्रक ठरविणे.<br>२) सर्व झाडू पायरी पायरीने बदलून टाकणे व सर्व साहित्य उपलब्ध करुन देणे. | ३१.१२.०३<br>३१.१२.०३ | विभागीय अधिकारी स्वच्छ निरिक्षक<br>भांडार प्रमुख |
| ३. | क) रस्त्यावर कचरा टाकण्यास व जमा करण्यास मनाई करणे.<br>१) रस्त्यावर सर्वत्र कचरा फेकला जातो.<br>२) कचऱ्याचे वर्गीकरण वेगवेगळी साठवणूक सध्या केली जात नाही.<br>३) कचरा कुंड्यांना | १) रस्त्यावर कचरा टाकण्यास मनाई करणे.<br>२) ओला व सुका यांचे वर्गीकरण करणे.<br>३) हिरव्या रंगाच्या कुंड्या ओल्या कचऱ्यासाठी, पांढरा रंग, सुक्या कचऱ्यासाठी व काळा | १) स्थानिक वर्तमानपत्रातून जाहिर सूचना देणे व दंड आकारणे.<br>२) नागरिकांना आवाहन करणे व जनजागृतीकरणे तसेच ओला व सुका कचरा वेगवेगळ्या कुंड्यांत जमा | जुलै २००३ | १) आरोग्य वैद्यकीय अधिकारी व जनसंपर्क अधिकारी<br>२) आरोग्य वैद्यकीय अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, विभागीय |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सध्या कुठलाही रंग दिलेला नाही. | रंग इतर कचऱ्यासाठी देणे. | करण्यास सांगणे.<br>३) हिरव्या, पांढऱ्या व काळ्या रंगाच्या कचरा कुंड्या तयार करणे. | डिसेंबर २००३ | अधिकारी<br>३) उद्यान अधिक्षक |
| ४. | (ड) कचरा गोळा करण्याची पध्दत<br>१) सध्या १०% भागातून घरा घरातून कचरा गोळा केला जातो. | १) १००% घरा घरातून कचरा गोळा करणे.<br>२) सार्वजनिक ठिकाणी कचरा जाळण्यास प्रतिबंध करणे. | १) घंटा गाडीद्वारे प्रत्येक घरचा कचरा गोळा करणे,<br>२) निवासी व अन्य भागातील कचरा हातगाडी व छोट्या वाहनाद्वारे गोळा करणे.<br>३) हॉटेल, व्यापारी कार्यालयीन संकुले यांच्यासाठी विशिष्ट पध्दतीने कचरा उलचणे,<br>४) फळे, भाजीपाला, मासमच्छी यातून निर्माण होणाऱ्या (बायो डिग्रेडेबल) कचऱ्याची उचल व पुर्न प्रक्रिया<br>५) बायो मेडीकल वेस्टसाठी स्वातंत्र पध्दती. | ३१.१२.०३ | विभागीय अधिकारी, भांडार प्रमुख |
| ५. | (ई) शहरातील कचऱ्याची वाहतुक व त्यासाठी वापरण्यात येणारी विविध वाहने<br>१) कचरा सार्वजनिक कचरा कुंड्यातून नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथे नेला जातो.<br>२) कचरा एकाच शिप्टमध्ये उचलला जातो.<br>३) कचरा मॅनुअंती उचलला जातो.<br>४) टारपोलीन चे आच्छादन १००% केले जात नाही.<br>५) सध्या मनपात | १) कचऱ्याची हाताळणी टाळणे.<br>२) कचऱ्याच्या वाहनांवर टार्पोलनिचे अच्छादन करणे.<br>३) कचऱ्याची अनेक वेळा हाताळणी टाकणे. | १) कचरा नेतांना टार्पोलनीने झाकणे.<br>२) कचरा उचलण्याचे टिप्पर्स घेणे.<br>३) बंद कंटनेर असलेल्या ॲटो रिक्शा तसेच बंद असलेल्या ट्रालीज घेणे.<br>४) अस्तित्वात असलेल्या वाहनांचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी शिफ्ट वाढविणे व व्हि.आय.पी. | ३१.१२.०३ | विभागीय अधिकारी, भांडारपाल, यांत्रिकी विभाग |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | उपलब्ध असलेली वाहने, कॉम्पॅक्टर-१, ट्रक्स-१३, ट्रक टिप्पर-१८, टॅक्टर ट्रलर-१०, ॲटो रिक्शा-६. | | रोडवर रात्रीच्या वेळी साफसफाई करणे. | | |
| ६. | (फ) डिसपोजल कचऱ्यावर विविध प्रकारे प्रक्रिया व अंतिम विल्हेवाट<br>१) सध्या ओल्या व सुक्या कचऱ्यावर वेगळी प्रक्रीया होत नाही. | १) अंतीम लँडफिल्डसाईट वर एकत्रित मिसळलेला कचरा जावू नये तसेच,<br>२) रिसायकल करता येणारा लॅडफिल्डसाईटवर जाऊ नये.<br>३) बी.एम.डब्ल्यु. अंतीम विल्हेवाटासाठी वेगळी व्यवस्था करणे. | १) कचऱ्या पासून पुर्ननिर्मिती,<br>२) वस्तीपातळीवर ओल्या कचऱ्यासाठी गांडूळ खत निर्मिती पध्दत.<br>३) कचरा वेचकांचा सहभाग,<br>४) एन.जी.ओ. चा सक्रीय सहभाग. | ३१.१२.०३ | उद्यान अधिक्षक, प्रकल्प संचालक, विभागीय अधिकारी |
| ७. | नारेगांव कचरा डेपो येथे कचरा प्रक्रीयेशिवाय फेकला जातो. परंतू ही जागा विमानतळापासून १० किलोमिटरच्या आत असल्याने सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहे की कचरा डेपो २० किलोमिटर अंतराच्या पुढे हलवावा. | १) पर्यायी जागा शोधा.<br>२) या जागेवरसर्व सुविधा उदा.वजन काटा, ब्रिजके, पाणी, वायर फेसिंग, इत्यादी उपलब्ध करुन देणे. | करोडी गट नं.१३५ जिल्हा औरंगाबाद या जागेस महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद पुरातत्व विभाग, औरंगाबाद यांचे ना हरकत प्रमाणपत्र मिळाले असून ही जागा मनपाकडे हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्या मार्फत शासनाकडे पाठविण्यांत आला आहे. या जागेवर नवीन लॅण्ड फिलींग सुरु करणे हा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. या जागेवर सर्वोच्च न्यायालयाने सुचविल्या प्रमाणे उपलब्ध करणे. | ३१.१२.०३ | आरोग्य वैद्यकीय अधिकारी, शहर अभियंता, उद्यान अधिक्षक, विधी सल्लागार |
| ८ | दंड आकारणी व | प्रशासकीय भार | १) विशेष स्वच्छता | जुलै मध्ये | आरोग्य |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कचऱ्याद्वारे उत्पन्न वाढविणे.<br>१) कचऱ्यापासून मनपाला सध्या अत्यल्प उत्पन्न मिळते. तसेच दुकान हॉटेल्समधील कचरा रस्त्यावर व नाल्यात फेकला जातो. | आकारणी | कर म्हणून हॉटेल्स, दुकानदार, बांधकाम साहित्य, मंगल कार्यालय, सिनेमा हॉल, यांच्याकडुन कर आकारणे.<br>२) रस्त्यावर कचरा टाकल्यास दंड आकारणे.<br>३) गोठे, तबेले, स्लॉटर हॉऊस, यांच्याकडुन स्वच्छता कर आकारणी | सुरुवात व ३१.१२.०३ पर्यंत पुर्ण. | वैद्यकीय अधिकारी, विभागीय अधिकारी, स्वच्छता निरिक्षक, मालमत्ता अधिकारी, पशुधन अधिकारी, आरोग्य निरिक्षक |
| ९. | एन.जी.ओ.चा सहभाग व लोक सहभाग (Community/Part ieipation)<br>स्वयंमसेवी संस्थाचा सहभाग सध्या नाही. | एन.जी.ओ.चा सहभाग वाढविणे | १) एन.जी.ओ.ला आवाहन करणे मिटींग बोलावणे, त्यांना विशिष्ट विभागाची जबाबदारी देणे उदा. रेल्वे स्टेशन, बस स्टँड इत्यादी ठिकाणे सुशोभीकरण साठी देणे.<br>२) छोट्या छोट्या कॉलनी मधून ३१.१२.२००३ गांडूळ खत निर्मिती प्रकल्प राबविणे.<br>३) एन.जी.ओ. कडून सिनेमा हॉल गार्डन व पब्लीक प्लेसेस मध्ये लिटरबीन्स उपलब्ध करुन घेणे. | २१.१२.०३ | आरोग्य वैद्यकीय अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, प्रकल्प संचालक, विभागीय अधिकारी |
| १०. | विभागीय अधिकारी व सफाई कर्मचारी यांचे प्रशिक्षण व मोटोव्हेशन सध्या अप्रशिक्षित आहे. | | सफाई कर्मचारी, एन.जी.ओ. तसेच सन्माननीय नगरसेवक यांचे प्रशिक्षण घेणे. | जुन,जुलै २००३ | आरोग्य वैद्यकीय अधिकारी, प्रकल्प संचालक, उद्यान अधिक्षक |
| ११. | आरोग्य तपासणी | | दर चार महिन्याला | चार | आरोग्य |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सफाई कामगारांची कालबध्द आरोग्य तपासणी वर्षातून एकदा होते. | | आरोग्य तपासणी करणे. | महिन्यातून एकदा | वैद्यकीय अधिकारी, व मनपा कर्मचारी संघटना |
| १२. | सफाई कामगारांना प्रोत्साहन चांगले काम करणाऱ्या सफाई कामगारांना सध्या काही दिले जात नाही. | | प्रोत्साहनपर सत्कार करणे, प्रशस्तीपत्र देणे इत्यादी. | वेळोवेळी | आरोग्य वैद्यकीय अधिकारी, विभागीय अधिकारी. |

स्वाक्षरीत/-
आरोग्य वैद्यकीय अधिकारी
महानगरपालिका, औरंगाबाद.

## <u>पुरवणी विषय</u>

**विषय क्र.७९/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, राजाबाजार भागात शहागंज चमन मध्ये लाहे पुरुष कै.सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यांत यावे. तसेच राजाबाजार भागातील नवाबपूरा चौरस्थावर भारताचे माजी पंतप्रधान कै.लालबहादूर शास्त्री यांचा पुतळा उभारण्यांत यावा, ही तेथील सर्व माजी नगराध्यक्षा सह इतर स्थानिक लोकांची मागणी असून ती आपण सर्वसाधारण सभे पुढे ठेवत असून मंजूरी द्यावी.

**सुचक :** श्री.राधाकृष्ण गायकवाड,
श्री.किशोर तुळशीबागवाले.
**अनुमोदक :** श्री.आनंद तांदुळवाडीकर,
श्री.भर लकडे.

**संवाद :**
**मा.महापौर :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राजाबाजार भागात शहागंज चमन मध्ये लोह पुरुष कै.सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेस व राजाबाजार भागातील नवाबपुरा चौरस्त्यावर माजी पंतप्रधान कै.लालबहादूर शास्त्री यांचा पुतळा उभारण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८०/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दैनिक वेतनावरील व्यक्ती अपघाती निधन झाल्यास तसेच अपंग झाल्यास त्या व्यक्तीच्या जागेवर त्याच्या कुटूंबातील व्यक्तीस घेण्याबाबत असा ठराव घेणे बाबत तरी वरीलप्रमाणे ठराव सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्यांत यावा, ही विनंती.

**सुचक :** श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे,
**अनुमोदक :** श्री.रावसाहेब ममतु औताडे, श्री.भाऊसाहेब ताठे, सौ.जयश्री कुलकर्णी, सौ.लिलावती घायतिलक, श्रीमती जयश्री किवळेकर, श्री.सुरजितसिंग खुंगर, श्री.मोतीलाल जगताप, श्री.राजु शिंदे, श्री. सोपान वारे.

**संवाद :**
**मा.महापौर :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दैनिक वेतनावरील व्यक्तीचे अपघाती निधन झाल्यास किंवा अपंग झाल्या त्यांचे जागेवर त्यांच्या कुटूंबातील व्यक्तीस घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८१/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, या शहराने साहित्य, क्रिडा व अनेक क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव लौकिक कमिावलेले आहे. या शहराने अनेक साहित्यीक, खेळाडू घडविलेले आहे. या महानगरपालिकेने यापुर्वी त्यांचे कामाची दखल घेवून त्यांना स्मृतिचिन्ह देवून सन्मानित केले. अर्थसहाय्यही केलेले आहे. क्रिडा क्षेत्रात या शहराने दोन आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रिकेटपटृ निर्माण केलेले आहे. श्री.संजय बांगर व श्री.इकबाल सिद्दीकी या दोन्ही क्रिकेट पटूंनी भारताच्या संघाचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. भारतीय संघाचा राज्यस्तरावर राष्ट्रीय स्तरावर सत्कार करुन सन्मानित करण्यात आलेले आहे. हे दोन्ही क्रिकेट पटू औरंगाबाद शहराचे असून या शहराच्या इतिहासात प्रथमच स्थानिक खेळाडूंनी भारतीय संघात स्थान मिळविले आहे. व या शहराचे नांव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्वलीत केले, अशा खेळाडूचा महानगरपालिकेतर्फे स्मृतिचिन्ह देवून जाहिर सत्कार करण्यांत यावा. त्याचप्रमाणे या दोन्ही खेळांडूना मदत म्हणून महानगरपालिकेने त्यांच्या निवासासाठी महानगरपालिकेच्या मालकीच्या गारखेडा येथील स.नं.५३ पैकी ३०० चौ.मी. प्रत्येकी नाममात्र रु.१/- मुल्यावर प्रदान करण्यास व सत्कार समारंभात येणाऱ्या संभाव्य खर्चात मान्यता मिळणेस प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.भाऊसाहेब ताठे, श्री. संजय शिरसाट, श्री. नंदकुमार घोडेले, श्री.राधाकृष्ण गायकवाड, श्री.अशरफ मोतीवाला.

**अनुमोदक :** श्री.आनंद तांदुळवाडीकर, श्री.रतनकुमार पंडागळे, श्री.नंदकुमार फुलारी, श्री.प्रकाश निकाळजे.

**संवाद :**

**श्री.भगवान घडमोडे :** जागा न देता फक्त या क्रिकेट पटूंचा सत्कार करण्यांत यावा. प्रत्येक जन जागा मागतील.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर :** शहरातील खेळाडू आहेत. इतर खेळाडूंचा मोठ्या स्तरावर सत्कार झालेला आहे. आपल्या शहराचे खेळाडू आहेत. आपणही कमी पडू नये. असे मत आहे. या दोन खेळाडूंचे या शहरात वास्तव्यासाठी जागा देण्याचा प्रस्ताव आहे. तो मान्य करावा. ही जागा देतांना त्यांना इतरांना गहान किंवा विक्री कोणत्याही मार्गाने हस्तांतर करु नये अशी अट टाळण्यांत यावी. प्रस्ताव मान्य करावा.

**श्री.भगवान घडमोडे :** सन्मान करावा. या महापालिकेचे उत्पन्नाचा विचार करावा. इतर महापालिकेचे उत्पन्न जास्त आहे.

**श्री.भरत लकडे :** खेळाडूंना जागा देऊ नये, महापालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. सन्मान करावा. जागा दिल्यास नॅशनल पातळीवरील बरेच खेळाडू आपल्याकडे येतील त्यांना सुध्दा जागा द्याव्या लागणार आहे.

**श्री.मोतीलाल जगताप :** महापालिकेकडे जास्त प्रमाणात जागा असतील. त्या विक्री काढून येणाऱ्या गरीब जनतेसाठी वार्डात विकास करावा. खेळाडूंना मानपत्र देऊन सत्कार करावा. जागा देण्यांत येऊ नये.

**श्री.प्रशांत देसरडा :** प्रस्ताव ठेवला योग्य असुन स.सदस्यांच्या ज्या भावना आहे, त्याचा आमच्या सुध्दा आहे. परंतू महापालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता जागा देण्यांत येऊ नये. सन्मान करावा. खेळाडू निर्माण होण्यासाठी अर्थसंकल्पात तशी दरवर्षी तरतूद ठेवावी. खेळाडू तयार होतील. व तो उद्देश सुध्दा सपल होईल. असे माझे मत आहे. महिला खेळाडू दिपाली

रोकडे जाधव, तसेच फ.मु.शिंदे यांची मुलगी रुचा शिंदे ही सुध्दा महिला क्रिकेट मध्ये भारताचे नेतृत्व करते. स.सदस्य श्री.जगताप यांचे मताशी मी सहमत आहे.

**सौ. निखत परवीन :** या शहरातील किंवा महाराष्ट्रातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहनात्मक बक्षीस देण्यांत येतात. सत्कार होतो. सन २०००-२००१ मध्ये दिले नाही. असे प्रोत्साहनात्मक बक्षीस व सत्कार होण्याबाबत आदेशित करावे.

**श्री.राजु शिंदे :** जागा द्यायची असेल गरवारे क्रिडा संकुलनामध्ये देण्यात यावी.

**सौ.साधना सुरडकर :** एखाद्या क्रिकेट असोसिऐशनला दिले तर यातून १० खेळाडू तयार होतील. वैयक्तिक यांना देण्यांत येऊ नये.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** यापुर्वी छत्रपती महिला पुरस्कार मिळालेले आहे. त्याचा सुध्दा महपालिकेतर्फे सत्कार झाला पाहिजे. असे बरेच गुणवंत या शहरात आहेत. त्यांना जागा देणार का?

**श्री.राजु शिंदे :** जागा देऊ नये. द्यायची असेल तर सर्वच खेळाडूंचा समावेश करावा. वामन दादा कर्डक यांना सुध्दा जागा द्यावी.

**श्री.मधुकर सावंत :** ५१,०००/- हजार रुपये देऊन सन्मानीत केलेले आहे. त्याप्रमाणे सन्मान करावा. या सभागृहात करावा. अशी माझी विनंती आहे.

**श्री.राजु शिंदे :** सिडको-हडको भागास पाणी टंचाई आहे. पाण्याची व्यवस्था नाही. सन्मान करवा. जागा देण्यांत येऊ नये.

**श्री.मोहन मेघावाले :** माझ्या वार्डात एक दिवसा आड पाणी येते. भरपूर पाणी दिले जात नाही. पाण्याची व्यवस्था करण्यांत यावी. काही लोकांना १५-२० मिनीटे पाणी मिळते.

**श्री.जयवंत ओक :** रुपाली रोकडे, रुचा शिंदे, कबड्डीचे खेळाडून कस्तुरे, यासारखे अनेक खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय पातळीवर पुरस्कार मिळविलेले आहे. त्यांना ही जागा देणार का? जागा न देता सन्मानीत करावे. याचा सभागृहात कार्यक्रम घ्यावा.

**श्री.राजु शिंदे :** फक्त समान करण्याचा निर्णय घेण्यांत यावा. जागा देण्याची पध्दत सुरु करु नये. सर्वच खेळाडू जागा मागतील.

**डॉ.भागवत कराड :** जागा देण्यांत येऊ नये. जो काही निर्णय घेणार त्यास फक्त त्यांना सन्मानित करण्यांत यावे.

**श्री.जयवंत ओक :** शासन अशा खेळाडूंना जागा देऊ शकतात. त्यांनी शासनाकडे मागणी करावी.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर :** सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन जागा न देता या खेळाडूंचा सन्मान करावा.

**मा.महापौर :** या खेळाडूंना जागा न देता फक्त महापालिकेतर्फे स्मृतीचिन्ह देवून सन्मान व सत्कार करण्यात यावा. यास मान्यता देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार भारतीय क्रिकेट संघातील प्रतिनिधीत्व करणारे या शहरातील खेळाडू श्री.संजय बांगर व श्री. इकबाल सिद्दीकी यांचे महानगरपालिकेतर्फे स्मृतिचिन्ह देऊन सन्मान व सत्कार करण्यास व या कार्यक्रमासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**मा.महापौर :** ऐनवेळचा एक विषय मंजूर करण्यात येत आहे.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.८२/१ :**

महानगरपालिका हद्दीतील विविध प्रमुख चौकामध्ये बऱ्याच क्रांतीकारक राष्ट्रीय महापुरुषांचे पुतळे बसविलेले आहेत. शहरा मधील प्रमुख ठिकाणी महाराणा प्रतापसिंह याचा पुर्णाकृती पुतळा बसविणे बाबत समाज बांधव नागरिकांनी मागणी केलेली आहे. या युग पुरुषांचा पुतळा या शहरात कुठेही अद्याप उभारण्यांत आलेला नाही. महाराणा प्रतापसिंह यांचे कार्य भावी पिढीस स्मरणात रहावे, त्यांचे महान कार्याची स्फुर्ती मिळावी. यासाठी महानगरपालिके मार्फत जसे विविध महापुरुषांचे पुतळे शहरात उभारले गेले त्याच धर्तीवर महानगरपालिका हद्दीतील मुख्य चौकास व मध्यवर्ती जागी महाराणा प्रतापसिंह यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.आनंद तांदुळवाडीकर,

**अनुमोदक :** श्री.नंदकुमार फुलारी, श्री. भरत लकडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात विविध महापुरुषांचे पुतळे उभारले गेले. त्याच धर्तीवर महापालिका हद्दीतील मुख्य चौकात व मध्यवर्ती जागी महाराणा प्रतापसिंह यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही होते.

## औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

### चौकशी अहवाल

दि.१५.०२.२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीमध्ये व २०.०३.२००३ रोजीच्या सर्व साधारण सभेमध्ये आदेशित केल्यानुसार बन्सीलालनगर येथील आरक्षण क्र.३२४ विकसीत करण्याचा संचिकेबद्दल चौकशी करण्यात आली असून त्यांचे अहवाल खालीलप्रमाणे देत आहो.

शासन अधिसूचना क्र.पीटीएस/३००१/१५६६/प्र.क्र.-२७१/२००/नवि-३० मंत्रालय, मुंबई-३२, दि.१७ ऑगस्ट २००२ अन्वये ईपी-७६ ला शासनाने मान्यता दिली असून आरक्षण क्र.३२४ दुकान केंद्र हे कायम करण्यात आले आहे.

शेड्युल 'S' नुसार समावेशक आरक्षण प्रस्तावाचे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नियम १४.०५.०४ म्हणून समावेश केला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ आणि नियम १५१ नुसार स्थानिक प्राधिकरणाच्या राज्य शासनाच्या अथवा नियोजन प्राधिकरणाचा ठराव करुन राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला शक्ती प्रदान करता येतात.

कलम १५२ नुसार कलम १३, ४४, ४५ व ४६ च्या कलमांच्या प्रयोजनार्थ महानगरपालिकेचे बाबतीत महानगरपालिका आयुक्त किंवा यासाठी तो नियुक्त करीत अशा इतर अधिकारी यांनी या शक्तींचा वापर व त्यांचे पालन करण्याचा अधिकार आहे.

A] शेड्युल S नुसार Sr.II (D) शॉपींग सेंटर समावेशक आरक्षणात विकसीत करण्याचे ३ प्रकार दिले आहेत. ते खालीलप्रमाणे.

| | प्रकार | | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|---|
| १) | महानगरपालिका स्वतः भूसंपादन करुन विकास करेल | - | भूसंपादन करावयाचे झाल्यास येणारा खर्च या बाबतीत सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक असते. |
| २) | दुकान केंद्राने आरक्षण जमीन मालक स्वतः विकसीत करेल. बांधण्यात येणाऱ्या दुकानांपैकी २५% दुकाने महानगरपालिकेला बांधकामाची किंमत +१५% या दराने विकत घ्यावी लागतील. | - | या पर्यायाने बांधकाम परवानगी दिल्यास मोबदला जमीन मालकाला द्यावयाचा असल्याने येणाऱ्या खर्चाबद्दल सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक राहील. |
| ३) | जमीन मालक २५% दुकाने विनामूल्य महानगरपालिकेस देणार असल्यास २५% चटई क्षेत्र निर्देशांक जमीन मालकास देणे. | - | यामध्ये बांधकाम परवानगीचा समावेश असल्याने व विकास नियंत्रण नियमावली मध्ये आयुक्तांना सदरील अधिकार प्रदान केल्याने आयुक्त स्तरावर परवानगी देणे. |

B] नगर रचना विभागाने संचिकेत टिप्पणी सादर करतांना विकास नियोजन नियमावलीचे कलम १३.५ चे तरतूदीनुसार सुरळीत नियोजनाच्या दृष्टीने आरक्षणाच्या रचनेत बदल करता येऊ शकतो. परंतू अशा रचना बदलामुळे आरक्षणाचे क्षेत्रात बदल होता कामा नये व असा रचनात्मक बदल एकाच

मालकाच्या जागेत प्रस्तावित असावा व अशा रचनात्मक बदलास मा.आयुक्त मान्यता देवू शकतात, हि टिप्पणी सादर केली आहे. हा मद्दा बरोबर असून यानुसार त्यांनी परवानगी दिली आहे. तथापि मा.आयुक्तांची या मुद्यास मान्यता प्राप्त असल्यास धोरण म्हणून प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे आवश्यक आहे. किंवा नाही हया बाबी टिप्पणीत नमूद केल्या नाहीत, त्यामुळे प्रकरणात चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

C] दि.१७ ऑगस्ट २००२ नुसार ईपी-७६ मंजूर झालेला असून समावेशक आरक्षण ही नवीन संकल्पना त्यामुळे मंजूर केलेली आहे. त्यामुळे सदरील योजना राबवितांना मंजूरी कशी द्यावी. सभेची यास मान्यता आवश्यक राहील का? हया बाबी उपस्थित झाल्यात संदर्भाने ADTP यांचे प्रकरणात अहवाल घेतला असता त्यांनी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये या बाबीचा समावेश झाल्याने आयुक्त परवानगी देण्यास सक्षम असल्याचे नमूद केले आहे, या संदर्भाने मी पुर्ण महापालिका व नाशिक महापालिका येथून ही माहिती घेतली असता त्यांनी कळविले की, विकास नियंत्रण नियमावलीमध्ये जर या संकल्पनेचा समावेश झालेला असेल तर पुनश्चः सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. कोल्हापूर व नवी मुंबई महानगरपालिकेमधूनही या संदर्भाने माहिती घेतली असता कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव पाठविला जातो. तर नवी मुंबई मध्ये सिडको प्राधिकरण सर्व कामे करीत असल्याचे महानगरपालिकेकडे असे प्रस्ताव नाहीत, अशी माहिती मिळाली आहे. कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये विकास नियंत्रण नियमावलीमध्ये या बाबीचा समावेश झाला आहे की नाही, त्यांचे नियम काय आहेत हे तपासणे गरजेचे वाटते.

<u>निष्कर्ष :</u>

MRTP ACT चे कलम १५२ नुसार विकास नियंत्रण नियमावली राबविण्याचे अधिकार आयुक्तांचे आहेत. विकास नियंत्रण नियमावलीचे कलम राबविण्याचे अधिकार आयुक्तांचे आहेत. विकास नियंत्रण नियमावलीचे कलम १४-०४-२००४ नुसार आयुक्तांनी त्यांचे अधिकारात बन्सीलालनगर दुकान केंद्र बांधण्याची परवानगी दिलेली आहे. ती बरोबर आहे. मुद्दा 'C' नुसार विविध महानगरपालिकेतील माहिती त्यास अनुसरुन आहे. त्यामुळे प्रकरणात महापालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. सद्य परिस्थितीत अशी आरक्षणे भूसंपादित करणे करिता महानगरपालिकेकडे पैसा नाही, सर्व साधारण सभेतील चर्चेनुसार जरी सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव ठेवला असता तरी प्रशासनातर्फे निधी उपलब्ध नसल्याने, विकास कामे आरक्षण विकसीत करावे असाच प्रस्ताव ठेवण्याची शिफारस लेखा विभागातर्फे केली गेली असती. परंतू विविध महानगरपालिकेतील कार्यप्रणाली विचारात घेता सभेपूढे प्रस्ताव ठेवण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे प्रकरणात कार्यवाही व्हावी.

१) विकास नियंत्रण नियमावली नुसार बांधकाम परवानगी असल्याने, बांधकामावरील स्थगिती उठविण्यात यावी त्यामुळे महानगरपालिकेचे कुठलेही आर्थिक नुकसान होत नाही.

२) कोल्हापूर महानगरपालिकेतील पध्दतीनुसार सर्वसाधारण सभेत प्रस्ताव येतो. हयामुळे इतर महानगरपालिकेतील पुणे, नाशिक, औरंगाबाद येथील पध्दतीमध्ये मतभिन्नता असल्याने सदरील बाब शासनाने मार्गदर्शनास्तव पाठविण्यांत यावी व शासनाने मार्गदर्शन प्रात करुन घ्यावे म्हणजे अशी प्रकरणे हाताळतांना अडचणी उद्भवणार नाहीत.

३) विकास नियंत्रण नियमावली राबविण्याचे अधिकारी MRTP ACT नुसार आयुक्तांना प्रदान आहेतच तथापि समावेशक आरक्षणामध्ये काय पध्दती अवलंवावी या बाबत स्पष्टता शासनाची घेतल्यास प्रशासन व लोकप्रतिनिधीची सभागृह यामध्ये समन्वयक राहील व प्रकरणात संभ्रम होणार नाहीत त्या दृष्टीने मार्गदर्शन घेण्यात यावे.

४) महानगरपालिकेस २५% बांधकाम विकासकाने त्याचे स्वत:चे बांधकामा अगोदर करुन देण्याची अट नमूद करण्यात यावी. यापुर्वीचा अनुभव असा आहे की, विकासक स्वत:चे बांधकाम पुर्ण करुन ते विक्री करुन नंतर महानगरपालिकेचे बांधकाम करतो. त्याकरिता ही अट आवश्यक आहे. या प्रकरणात बांधकाम केव्हा करुन द्यावे, ही अट दिसून येत नाही. त्यामुळे परवानगीमध्ये ही अट नमूद करण्यांत यावी.

उपरोक्त नुसार अहवाल सादर.

स्वाक्षरीत/-
महेंद्र खैरनार
मुख्य लेखाधिकारी
महानगरपालिका, औरंगाबाद.

## प्रश्नोत्तरे

मा.श्री.अब्दुल रशिद अ.सत्तार, नगरसेवक :

**प्रश्न क्र.१४२ :**

कर मुल्य निर्धारण अधिकारी १ व २ यांना वारंवार पत्र क्र.६६/०३ दि.०७.०१.२००३ तसेच पत्र क्र.१०१/०३ दिनांक १७.०२.२००३ प्रमाणे मालमत्ता कर आकारणी विषयी माहिती भागविली असतांना सदरील माहिती आतापर्यंत देण्यात आलेली नाही. याचे कारण काय? सदरील प्रकरणात काही घोटाळा आहे का? भष्ट्राचार झालेला आहे का? किंवा या बद्दलची माहिती न देण्याचे कारण काय आहे?

याबाबत सविस्तर उत्तर सर्वसाधारण सभेत पुरविण्यांत यावे.

**उत्तर :-** उपआयुक्त (म.)

### औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद
### कर आकारणी विभाग-१

दि.०१.१०.२००२ ते ३१.१२.२००२ पर्यंत नवीन बिन निवासी (निवासत्तेर) इमारतींना कर आकारणी करण्यात आलेल्या इमारतींची माहिती पुरविणे बाबत.

| अ. क्र. | मालमत्ताधारकाचे नांव | आकारणी क्र. | मोहल्ला | करयोग्य मुल्य | एकूण कर | कर लागू झाल्याची दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | चौधरी किशोर अशोक | ६३५ दु.क्र.१ | द्वारका सदन, जालना रोड | ४७६३ | ३६२७ | ०१.०४.२००२ |
| २ | बकले रुपचंद व इतर | ६३६, दु.क्र.२६ | जटवाडा रोड, हर्सुल | ३१३२ | १७०८ | ०१.१०.२००२ |
| ३ | स.जावेद सलीम स.फकीर मो. | ६५६ | शहाबाजार | ५२१६ | २८४१ | ०१.१०.२००२ |
| ४ | काथार रामचंद्र नारायण | ६७६, दु.क्र.१५ | सुरेवाडी | १६४२ | ८५५ | ०१.०९.२००२ |
| ५ | आसराणी पनुराम विजय | ६८०,५-२३-९३ | दलालवाडी | २४२४६ | १५२७७ | ०१.०८.२००२ |
| ६ | जाधव कांता मनसुब | ६८३, दु.क्र.११७ | मारोतीनगर, हर्सुल | १६३१ | ८४६ | ०१.०६.२००२ |
| ७ | गुणवंत व्ही.पाटील | ६६० दु.क्र.६ व ७ | सत्यधर्म कॉम्पलेक्स, जालना रोड | १७१४० | ९९४१ | ०१.०४.२००२ |
| ८ | युसूफ खॉन महेबुब खॉन | ६८५, दु.क्र.६ व ७ | जाधववाडी | २५२७ | १३१५ | ०१.०४.२००२ |
| ९ | राजेंद्रसिंग दिवानसिंग | ७६९, दु.क्र.४-१८-२६/१३ | जालनारोड | ९५७०० | ६४१२१ | ०१.१०.२००२ |
| १० | सुपेकर धनीराम उदाराम | ७७,३-१४-२ | किराणाचावडी | १८१६६ | १०५३४ | ०१.०८.२००२ |
| ११ | अग्रवाल बिना घनश्याम | ७७५, दु.क्र.बी-३ | चंद्रकांता आर्केड, समर्थनगर | ६१४५ | ३५०२ | ०१.०४.२००१ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | NPO शेख सलीम मो.अब्दुल रहेमान | ७७५, ४-११-८४/पी | जयवंतपुरा | ६९८८ | ३९८५ | ०१.११.२००२ |
| १३ | अंबारवाडकर विठ्ठलराव रंगनाथराव | ७९५, दु.क्र.१९० | शिवकृपा अपार्टमेंट, समर्थनगर | १६६२१ | ९६३९ | ०१.०४.२००१ |
| १४ | अंबारवाडकर विठ्ठलराव रंगनाथराव | ७९६ | शिवकृपा अपार्टमेंट, समर्थनगर | ३२४० | १७६८ | ०१.०४.२००१ |
| १५ | वाडेकर वनमाला विश्वास व प्रसाद विश्वास | ८१०, दु.क्र.११,१२ | चंद्रकला आर्केड, समर्थनगर | ११४३७ | ६६३५ | ०१.०४.२००१ |
| १६ | अभक अकबर खान पठाण | ८१३, ५-२४-१६/पी | दलालवाडी | २९९२ | १५५६ | ०१.१०.२००२ |
| १७ | शहा मनीलाल NPO जैन रमेशकुमार हेमराज | ८१५, ४-१-२० | भाजी बाजार | १६६०० | २६२८ | ०१.०४.२००२ |
| १८ | NPO सौ. नलिनी नेमीचंद सुराणा | ८१५, ४-१७-६ | जुना मोंढा | १४६६६ | ८५०५ | ०१.१२.२००२ |
| १९ | फुले पंडीत हिरामन | ८२६, दु.क्र.१५६/पी | सुरेवाडी, हर्सुल | १७०६ | ८८७ | ०१.०४.२००२ |
| २० | शेख हबीब पाशा शेख गुलास रसुल | ८५७,१-१६-३२ | जुनाबाजार | ४४७१ | २४३६ | ०१.०४.२००२ |
| २१ | राजेंद्र खंदारकर | ८६७, ४-६-११७ | श्रध्दा अपार्टमेंट | ३१६४ | १७२१ | ०१.१०.२००२ |
| २२ | अग्रवाल पुरुषोत्तम | ८७५,४-६-११७ | अंगुरीबाग | १०२३८ | ५९४१ | ०१.०६.२००२ |
| २३ | शेख युसूफ शेख इसाक | ८७९,१ | पहाडसिंगपुरा | १८१४ | ९४१ | ०१.०६.२००२ |
| २४ | मालकर एकनाथ शामराव | ८९०, गट क्र.१४ | कोमल कॉलनी, पडेगांव | २७५४ | १४३० | ०१.०३.२००२ |
| २५ | जाधव संजय विश्वनाथ | ८९१, दु.क्र.३२ | सुंदरनगर, पडेगांव | १३९३ | ७२४ | ०१.०८.२००२ |
| २६ | कापकर आशाबाई शंकर | ८९७, दु.क्र.२ | गुलमोहर कॉलनी, पडेगांव | ६२२१ | ३५४५ | ०१.१०.२००२ |
| २७ | शहा कन्हैय्यालाल नटवरलाल | ८७८ | सु.ह.रोड | १७६३६ | १०२३१ | ०१.१२.२००२ |
| २८ | अ.हई अ.सईद | ९०३ | दिलरस कॉलनी | २३१३४ | १४५७५ | ०१.०४.२००१ |
| २९ | शेख इसाक बाबामियाँ | ९०४, १-३१-१/पी | फाजलपुरा | ४८६ | २४८ | ०१.०४.२००२ |
| ३० | चरखा सुनिल शंकरलाल | ९२२,४-८-८१ | नरहरी कॉम्पलेक्स, टिळकपथ | २९९२ | १५५६ | ०१.०४.२००२ |
| ३१ | बोराळे पाटी प्रमिला दिगंबर | ९३५, ए-२ | सरस्वती कॉलनी | १६१२४ | ९३५२ | २८.०८.२००२ |
**सौ.संगिता मैंद :** माझ्या वार्डात साफसफाई कमी प्रमाणात होते. ४-४ दिवस कचरा उचलला जात नाही. कचरा एकाच जागेवर पडल्याने सडतो व तेथेच कुजतो त्यामुळे आजाराचे प्रमाण वाढण्याची शक्यता दाट आहे. साफसफाई कमी प्रमाणात होत असतांना ३ कर्मचारी झोन अधिकारी यांनी कमी करुन दुसऱ्या वार्डात दिले. हे योग्य नाही. घंटा गाडीचा प्रस्ताव मंजूर झाला. माझ्या वार्डात

अद्याप घंटागाडी सुरु केलेली नसून बऱ्याचा वार्डात घंटा गाड्या दिलेल्या आहे. घंटागाडी देण्यांत येऊन जे कर्मचारी कमी केले ते देण्यांत यावे. तसेच संबंधित झोन अधिकारी हे कार्यालयात भेटत नाही. फोन केल्यास संपर्क होत नाही. साफसफाई वेळेवर होणे गरजेचे आहे.

**सौ.कुसुमबाई खरात :** पावसाळ्याचे दिवस स्वच्छतेबाबत चर्चा होते, अभिनंदन, माझा वार्ड १०,०००/- लोक संख्येचा आहे. १५० लोक घाटी दाखल झाले होते. माझ्या स्वेच्छा निधीतून घंटा गाडीची मी मागणी केली आहे. ती पण देण्यांत आलेली नाही. सिध्दार्थ नगरला परवाच्या पावसाने जे पाणी साचले. त्यामुळे ५० घरांना धोका आहे. माझ्या वार्डात पाहणी करावी. माझ्या घरासमोर पाणी साचते. एक एक महिना मचरा उचलला जात नाही. गाडी येत नाही, साफसफाई होत नाही.

**सौ.निखत परवीन :** माझ्या वार्डात कचरा काढण्याबाबत झोन अधिकारी यांना वारंवार सुचना दिल्या. आपल्या दालनात सुध्दा सर्व परिस्थितीची आपणांस माहिती दिली. नाल्यातील जोपर्यंत अतिक्रमण काढले जात नाही, तो पर्यंत कचरा काढणार नाही. नाली साफ होणार नाही. असे झोन अधिकारी सांगतात. ३ वर्षापासून या संदर्भात सुचना करीता आहे. कार्यवाही होत नाही.

**श्री.मोहन मेघावाले :** शहरात स्वच्छता कशी राहील. या संदर्भात प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर :** शहरातील स्वच्छता व्हावी, या संदर्भात पोटतिडीकने स.सदस्यांनी भावना व्यक्त केल्या. हे शहर ऐतिहासिक शहर असून अशा परिस्थितीत कचऱ्याच्या संदर्भात वृत्तपत्रात बातम्या झळकतात. कचरा उचलला जात नसेल तर दुर्देव आहे. कचऱ्याच्या गाड्या पाणी पुरवठ्यासाठी वापरण्यात येत असेल तर, भाडे तत्वावर गाड्या घेऊन कचरा उचलण्याची कार्यवाही तात्काळ करावी व पुन्हा अशा बातम्या वृत्तपत्रात येणार नाही, याची दाखल घ्यावी. सद्य परिस्थिती वृत्तपत्रात छापून येते. यास नगरसेवक जबाबदार नसून प्रशासन जबाबदार आहे. आयुक्तांनी या संदर्भात जातीने दखल घेऊन कार्यवाही करावी. तसेच स.सदस्य भगवान रगडे यांनी त्यांचे वार्डातील भावना मांडल्या. मागील वर्षी धारेणात्मक निर्णय घेऊन ज्यांना गरज आहे, त्यांनी कचरा विनामुल्य घेऊन जाण्यास जाहीर प्रगटन काढून कार्यवाही केलेली होती. कचऱ्याचे प्रमाण कमी होते. त्याप्रमाणेच यावर्षी सुध्दा तशी कार्यवाही केल्यास योग्य होईल. शेतकऱ्यांना शेतीसाठी खत लागते. आता योग्य वेळ असून जाहीर प्रगटन करावे व कचरा घेऊन जाण्यास कळवावे.

**मा.महापौर :** घन कचऱ्या संदर्भात आरोग्य वैद्यकीय अधिकीर यांनी खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** घनकचरऱ्याचा व्यवस्थापना संबंधी नियम २००० च्या अंतर्गत कृती आराखडा तयार केलेला आहे. शहरात ३०० टन कचरा रोज निघतो. त्यापैकी ८०% कचरा उचलण्यात येतो. १००% आहे. शहरात ३०० टन कचरा रोज निघतो. त्यापैकी ८०% कचरा उचलण्यात येतो. १००% कचरा उचलला जावा व त्याची योग्य रितीने विल्हेवाट लावण्यात यावी. परंतू ही प्रक्रीया पुर्ण करण्यास ०६ महिने कालावधी लागेल. हा प्रकल्प टप्प्या टप्प्याने करण्याचा प्रयत्न आहे. व हा प्रकल्प तातडीने कसा पुर्ण होईल याचा प्रयत्न करण्यांत येत आहे. यात पहिला महत्वाचा मुद्दा असा की झोन

अधिकारी तसेच मजूर लोकांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. कचरा उचलण्याने होणारे फायदे व न उचलल्यास होणारा परिणाम याची माहिती कामगारांना देणे आवश्यक आहे. त्यात जनतेचा सुध्दा सहभाग असणे आवश्यक आहे. कचरा उचलण्याने होणारे फायदे व न उचलल्यास होणारा परिणाम याची माहिती कामगारांना देणे आवश्यक आहे. त्यात जनतेचा सुध्दा सहभाग असणे आवश्यक आहे. कचरा हा कचरा कुंडीतच टाकल्यास दुर्गंधीचे प्रमाण कमी होऊ शकते. औरंगाबाद महानगरपालिकेत सध्या १५१२ मजूर साफसफाईचे स्वच्छतेचे काम करतात. २१ कर्मचारी गाडीवर लागतात. १८५ मजूर कचरा उचलण्यासाठी लागतात. मजूरांची संख्या कमी नाही. झोन अधिकारी यांनी गांभीर्य लक्षात घेतल्यास, आहे त्याच कर्मचाऱ्यांकडुन कचरा उचलला जाऊ शकतो.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** घनकचऱ्याच्या प्रकल्पास सहा महिने लागतील. असा खुलासा झाला. तो पर्यंत नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. खुलासा संयुक्तीक वाटत नाही. मा.आयुक्त भोगे असतांना एका दिवसांत दोन वेळेस कचरा उचलला जात असे. तेच कर्मचारी आज ही काम करतात. या परिस्थितीत दररोज कचरा का उचलला जात नाही, याचा खुलासा द्यावा.

**श्री.स.अली सलामी :** जे सफाई कामगार आहे, त्यांचे आरोग्याच्या दृष्टीने किती वेळेस वर्षातून आरोग्य शिबीर घेतले जाते. किती व कोणकोणत्या सवलती त्यांना दिल्या जातात. माझ्या माहितीप्रमाणे २० ते २५% कामगार मेडिकल रजेवर असतात. त्यामुळे कामगार कमी पडतात. त्यांचे आरोग्य चांगले राहण्याच्या दृष्टीने का कार्यवाही करीत नाही. त्यांना सुविधा सवलती दिल्या जात नाही. त्यांचे आरोग्य चांगले ठेवणे ही जबाबदारी महापालिकेची आहे. प्रत्येक दिवशी किती कर्मचारी सुट्टीवर असतात, खुलासा करावा. किती टक्के प्रमाण आहे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** सफाई कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आरोग्य शिबीर यापुर्वीच डिसेंबर २००२ मध्ये घेतलेले आहे.

**मा.महापौर :** मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

**मा.आयुक्त :** कृती आराखडा घनकचरा व्यवस्थापन नियमावली २००० नुसार कृती आराखडा तयार केलेला आहे. केंद्र शासनाने सर्व नगरपालिका/ महानगरपालिकांना घनकचऱ्याच्या संदर्भात आदेशित केलेल आहे. मागील बैठकीत त्या संदर्भात विषय होता. जुन-जुलै मध्ये जे प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम आहे, त्या संदर्भात आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा केला. ३ दिवसापुर्वी क्षेत्रीय आयुक्त झोन अधिकारी यांना सुचना दिलेल्याच आहेत. काही झोनचे अहवाल ही प्राप्त झालेले असून संपूर्ण झोन अधिकारी, त्यांचकडील मजूर, गाड्या ई.बरोबर घेऊन ठरलेल्या वेळेनुसार जो ८-१० तासाचा असेल. त्यावेळात खऱ्या अर्थाने काम करीत नाही. तोपर्यंत कचरा साफ होणार नाही. घनकचरा व्यवस्थापन २००० चा प्रकल्प हा वेगळा आहे. ओला कचरा, सुकलेला कचरा वेगवेगळा ठेवावा लागतो. कृति आराखडा अंमलबजावणी होण्यास ०६ महिने लागतील. याचा अर्थ ०६ महिने काहीच कार्यवाही होणार नाही, असा नाही. गैरसमज करुन घेऊ नये. प्रशासनाने काम सुरु केलेले आहे. ज्या त्रुट्या असतील त्यास गती देण्याची गरज आहे. वार्डाची रचना व कचऱ्याचे प्रमाण सुध्दा कमी जास्त आहे. ज्या

भागात मोठ्या प्रमाणात कचरा आहे. व ज्या प्रमाणात तो उचलवयास पाहिजे तो. उचलला जात नाही. असे काही ४-५ ठिकाण स.सदस्यांनी सुचवावे अशी एक समिती नियुक्त करावी. व कचरा उचलला जातो किंवा नाही लक्ष ठेवावे, त्यात सदस्य ठेवावे.

**श्री.मीर हिदायत अली :** ०६ महिने झाले घंटा गाड्या देण्यांत येत नाही. मुख्य कार्यालयाच्या झाडाखाली एक गाडी पावसाने खराब होत आहे. ०६ महिन्यात का कार्यवाही झाली नाही. खुलासा करावा. माझ्या घरासमोर ड्रेनेजचे पाणी वाहत होते. या कामाच्या संदर्भात संचिका होती. ०७ तारखेला वाटाघाटी होणार होती. काम करण्यांत आले नाही. तसेच संरक्षित भिंतीचे एक काम होते. आयुक्तांनी सदर काम रिकॉल केले. ०३ दिवसात अल्प मुदतीची निविदा काढून कार्यवाही करावी असे निर्देश होते. ०१ महिना झाला. अद्याप निविदा काढल्या नाही. कामास उशीर केला व दोन दिवसाच्या पावसात अनेक लोकांच्या घरात पाणी गेले. नुकसान झाले, यास जबाबदार कोण? ताबडतोब अशा कामाचे वाटाघाटी करुन काम सुरु करावे. झोन अधिकारी यांना ड्रेनेजच्या संदर्भात आदेश द्यावे. लेबर कर्मचारी उपलब्ध आहे. हजेरीवर सह्या करतात. परंतू साईडवर नसतात. विचारणा केला असता आजारी होते, म्हणून सांगतात. कुणी जेवणास जातात, पुन्हा येतच नाही. हे सर्व एकमेकांच्या संम्मतीने होते. कर्मचारी काम करण्याचे टाळाटाळ करतात. झोन अधिकाऱ्यांचे लक्ष नसते.

**श्री.सुनिल मगरे :** जी चर्चा होते, ती योग्य असून सत्य आहे. कचऱ्याच्या संदर्भात विचारणा होते. त्या त्या वेळी कर्मचारी वर्ग अपूरा आहे, असे उत्तर दिले जाते. जो कर्मचारी कार्यरत आहे. त्यांचेकडुन संपूर्ण काम होत नाही. असे सांगण्यात येते. परंतू हजेरी पटावर जेव्हढे कर्मचारी आहे, ते सर्व उपस्थित राहून काम केले तर शहरात कुठेही कचरा पडून राहणार नाही असे माझे मत आहे. महापालिकेमध्ये हजेरी मस्टरवर बोनस हजेरी लाऊन कर्मचारी पगार घेतात. उपआयुक्ता पासून तर जवान पर्यंत साटेलाटे झालेले असते. त्यामुळे कर्मचारी असून सुध्दा त्यांचेकडुन काम करुन घेतले जात नाही. व बोगस हजेरी भरुन येणारे पैसा वरीष्ठापासून ते जवान पर्यंत वाटून घेतला जातो ही सत्य परिस्थीती आहे. याची खात्री करुन घ्यायची असेल. तर मा.आयुक्त यांनी प्रत्यक्ष झोनला भेटी देऊन कार्यवाही करावी. अधिकारी, कर्मचारी यांचेवर प्रशासनाने नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. असे प्रश्न उपस्थित होणार नाही व वृत्तपत्रात सुध्दा बातम्या येणार नाही. बोगस हजेऱ्या दाखवून जे महापालिकेचे आर्थिक नुकसान करीत असेल यावर प्रशासनाने नियंत्रण असणे आवश्यक आहे.

**सौ.साधना सुरडकर :** वेगवेगळ्या विभागामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे पडलेले आहे. काही वार्डाची भौगोलिक रचना लक्षात घेता मजूरांची संख्या कमी प्रमाणात आहे. माझा वार्ड मोठा आहे. ६ कर्मचारी आहेत. वार्डाची भौगोलिक रचना मोठी आहे. ३० कॉलन्या आहेत. २-४ कॉलनीत काम होते. उर्वरीत कॉलनीत त्यानंतर साफ सफाई करतात. प्रत्येक दिवशी प्रत्येक वेगळ्या कॉलनीत कचरा साफसफाई केला जातो. त्यामुळे सुरुवातीच्या वेळी साफ केलेली कॉलनी १५ दिवसानंतर साफसफाई होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढिगारे लागलेले आहे. कचरा कुंड्याची वर्षभरापासून

मागणी करते. दिल्या जात नाही. कचरा कुंड्या नसल्याने रस्त्यावर कचरा टाकण्यात येतो. माझ्या वार्डात नवीन वसाहती असल्याने बऱ्याच ठिकाणी ड्रेनेजच्या चेंबरवर झाकणे नाहीत. पावसाच्या दिवसात ड्रेनेज चोकअप होतात. या चेंबर मध्ये अपघात होण्याची सुध्दा भिती आहे. मागणी करुनही ढापे दिले जात नाही. लहान गरजा नागरिकांच्या पुर्ण करु शकत नसेल तर योग्य नाही. प्रशासनाने या बाबतीत लक्ष देणे गरजेचे आहे. ढापे आणि कचरा कुंड्या देण्यांत याव्यात. कचऱ्याची साफसफाई आठवड्यातून माझ्याकडे १ वेळेस होते. किमान ३ वेळेस व्हावी. अशी अपेक्षा आहे.

**सौ.लिलावती घायतिलक :** बोगस हजेरी लाऊन कायमस्वरुपी कर्मचारी घरी राहतात. परंतू जे दैनिक वेतनावर काम करतात. त्यांचे कडून सक्तीने जास्तीच्या प्रमाणात काम करुन घेतले जाते. याकडे मा.आयुक्त व मा.महापौर यांनी जातीने लक्ष द्यावे. व प्रमाकानुसार काम करुन घेण्यांत यावे.

**श्री.सुनिल मगरे :** झोन वाईज किती कर्मचारी साफसफाई काम करतात, उपआयुक्त (प्र.) यांनी खुलासा द्यावा.

**श्री.भगवान रगडे :** माझ्या वार्डात जो कचरा येतो, योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात न आल्याने दुर्गंधी सुटलेली आहे. समितीच्या अहवालात महापालिकेची फसवणूक केली, असे आहे. त्यामुळे सभागृहात चर्चा होऊन संबंधितावर गुन्हा दाखल करण्यांत यावा. म्हणून निर्णय घेतला होता. अद्यापपर्यंत का कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

**श्री.जयवंत ओक :** झोन वाईज किती कर्मचारी कार्यरत आहे. त्यातील सफाई कामगार किती आहे.

**श्री.मीर हिदायत अली :** माझ्या वार्डात एक कायमस्वरुपी लेडीज कर्मचारी दुसऱ्या वयोवृध्द कर्मचाऱ्यास कमी पैसे देऊन त्यांचे जागेवर काम करुन घेतले जाते.

**सौ.बबिता कागडा :** माझ्या वार्डात दररोज साफसफाई होत नाही. आज कुणीही सफाईसाठी आले नाही. मा.सभापती यांनी पाहणी केली. वार्डात कचरा मोठ्या प्रमाणात पडलेला असून मा.महापौर, मा.आयुक्त यांनी वार्डात प्रत्यक्ष भेट द्यावी. अधिकारी यांची झोनमध्ये भेट होत नाही.

**श्रीमती पार्वती मानकापे :** झोनला मा.आयुक्तांनी भेट देऊन किती व कोणकोणते कर्मचारी काम करतात. त्याची शहानिशा करावी. मागील वेळेस शिंदे नावाचे कर्मचारी जे कार्यरत होते, त्यांना यादीतून वगळण्यांत आले होते. जे कार्यरत नाही. त्यांचे नांव टाकण्यात आले आहे.

**मा.महापौर :** झोन वाईज किती सफाई कर्मचारी कार्यरत आहे. खुलासा देण्यांत यावा.

**उपआयुक्त (प्र.) :** साफसफाई कर्मचारी एकूण कायम स्वरुपी ७२३, दैनिक वेतनावर ५७१ असे एकूण १२९४ मजूर कर्मचारी सफाईचे काम करतात. शासनाने झा समिती स्थापन केलेली होती. एकूण शहरासाठी किती असावे. नॉम केलेले होते, जे की, शहरातील गटारीची लांबी लक्षात घेऊन कर्मचारी नियुक्त केलेले असतात. औरंगाबाद शहराची गटारांची लांबी जुना रेकॉर्ड माझ्याकडे आहे. ३२ लक्ष रनिंग मीटर आहे. ०५ हजार चौ.मीटर क्षेत्रासाठी एक स्त्री कामगार असावे. व ७ हजार रनिंग मीटर साठी एक पुरुष कामगार असावा. त्यावेळेला शासनाच्या नॉम प्रमाणे २४० कर्मचारी कमी होते. सुमारे १५० मजूर मयत व सेवानिवृत्त झाले आहे. गटारीची लांबी, सफाई क्षेत्र ५-६

मजूर कमी पडतात. शासनाने नोकर भरती बंद केली. दोन शिप्ट मध्ये काम करण्यांत येते. पुढच्या वेळी सविस्तर अहवाल देण्यांत येईल.

**श्री.प्रकाश निकाळजे :** सभागृहात असा प्रश्न उपस्थित केला गेला की, झोननिहाय सफाई कामगार किती, कार्यरत किती, रजेवर किती? याचा खुलासा द्यावा. १५० प्रकरण अनुकंपा धरतीचे चालू आहे. २०-२५ कर्मचारी घेण्यांत आले. उर्वरीत घेण्याची कार्यवाही चालू आहे. प्रश्न तेवढाच आहे की, एवढ्या कर्मचाऱ्यांकडुन संपूर्ण झोनची साफसफाई होणे शक्य आहे का? झोनचा रिपोर्ट काढल्यानंतर गटारीची लांबी व स्वच्छतेचे क्षेत्र विचारात घेतो व झा समितीच्या नॉम प्रमाणे प्रत्येक झोन मध्ये ५-१० कर्मचारी कमी पडतात. तसेच शासनाने नवीन कामगार भरती करण्यांस बंदी घातलेली आहे. म्हणून जे मजूर उपलब्ध आहेत. त्यांचेकडुन स्वच्छतेचे काम करुन घ्यावे लागणार आहे. दोन शिप्ट मध्ये साफसफाई होईल प्रश्न उपस्थित झाला तो ही प्रयत्न करण्यात आला. परंतू कामगार संघटनेने यास विरोध केलेला आहे. त्यांचेशी पुन्हा चर्चा करुन दोन शिप्ट मध्ये काम करुन घेता येईल का याचा प्रयत्न होईल. अधिकाऱ्यांच्या घरी कर्मचारी काम करतात. नियमाप्रमाणे तेव्हढेच कर्मचारी दिलेले असून पुढील बैठकीत सविस्तर माहिती देण्यांत येईल. माझ्या माहितीप्रमाणे ५-६ अधिकाऱ्यांकडे कर्मचारी दिलेले आहे.

**श्री.जयंवत ओक :** एकूण १२९४ कर्मचारी काम करतात. यात सफाई कर्मचारी किती, गटार साफ करणारे किती, झोन निहाय माहिती देण्यांत यावी. एवढ्या कर्मचाऱ्यांकडुन संपूर्ण शहराची साफसफाई होणे आवश्यक आहे.

**उपआयुक्त (प्र.) :** झोन निहाय पुरुष स्त्री मजूरांची माहिती पुढील प्रमाणे

| झोन क्र. | कायमस्वरुपी | दैनिक वेतन | एकूण |
|---|---|---|---|
| १ | १४९ | ७६ | २२५ |
| २ | १४९ | ५३ | २०२ |
| ३ | ७० | ५० | १२० |
| ४ | १०८ | ९५ | २०३ |
| ५ | ६२ | ११८ | १८० |
| ६ | ८७ | ८७ | १७४ |
| ७ | फक्त म्हाडा कॉलनी | | |
| ८ | ९८ | ९२ | १९० |
| | **एकूण** | | **१२९४** |

**श्री.सुनिल मगरे :** कमी जास्त कसे होऊ शकणार नाही. प्रशासनाकडे रेकॉर्ड नाही का? त्या कर्मचाऱ्यांना पगार दिला जातो. आपल्याकडे रेकॉर्ड आहे. अंकुश आहे. कमी जास्त असून शकतात असे बोलणे बरोबर नाही.

**श्री.स.अली सलामी :** रजेवर किती टक्के कर्मचारी असतात.

**उपआयुक्त (प्र.)** : नियमित २०% कर्मचारी रजेवर असतात.

**श्री.रतनकुमार पंडागळे :** शहरातील स्वच्छतेच्या संदर्भात सविस्तर चर्चा होत आहे. डॉ.भागवत कराड महापौर असतांना त्यावेळी केंद्रीय नगर विकास मंत्री आले होते, त्यांनी शहरात पाहणी केली, सर्वात स्वच्छ शहर औरंगाबाद

आहे, म्हणून प्रशंसा केलेली होती. म्हणून काम करणारे कामगार आपलेच आहे. शहर स्वच्छ करतात. सकाळीच उठून ते त्यांचे खऱ्या अर्थान सफाईचे काम करतात. त्यांचे बध्दक वेगळ्या अशा सूचना करुन चर्चा करणे बरोबर नाही. हे शहर मोठ्या प्रमाणात वाढत आहे. शासनाकडुन नोकर भरतीला अनेक अडचणी येतात. अनेक नवीन वसाहती होतात. व प्रत्येकांची अशी भूमिका असते की, माझ्या वार्डात काम झाले पाहिजे. ४०% वसाहती वाढलेल्या असून झा समितीच्या रिपोर्टनुसार सुध्दा कामगार संख्या कमी आहे. कामगार कमी असतांना जास्तीचे काम करण्याची अपेक्षा केली जाते. काम वाढले असेल तर नोकर भरती करण्यास शासनाची का वाट पहावी लागते हे सभागृह प्रशासन सक्षम नाही का? जनता टॅक्स भरतात ३२ लोकानी ले-आऊट मंजूर केलेले आहे. त्या भागात सुविधा नाही. कर्मचारी संख्या कमी आहे. म्हणून त्या ठिकाणी एक ही कामगार सफाईसाठी दिला जात नाही. एकीकडे लोकांकडुन कर वसुल करणार सुविधा देणार नसेल तर शहराचा विकास कसा होईल. म्हणून अपुरा कर्मचारी वर्ग पुर्ण भरती कसा करता येईल व उपलब्ध होणाऱ्या या कर्मचाऱ्यांकडुन सफाईचे काम कसे करुन घेता येईल याचाच विचार करावा. कामगार यांचे बाबतीत योग्य सुचना व आरोप प्रत्यारोप करणे योग्य नसून उपआयुक्त (प्र.) यांचेवर आरोप केलेले असून त्यांनी याचा सविस्तर खुलासा करावा. किंवा झोन अधिकाऱ्यांकडुन खुलासा घ्यावा. जाधववाडी, भावसिंगपुरा भागाजवळ मोठ्या प्रमाणात वसाहती वाढलेल्या असून अपुरा कर्मचारी वर्ग असून तो वाढविण्यांत यावा. त्यासाठी हे सभागृह सक्षम असून कामगार वाढविण्याचा निर्णय घेण्यांत यावा.

**श्री.सुनिल मगरे :** मी आयुक्तांवर आरोप केलेले नसून जे कर्मचारी घरी बसतात. त्यांचे हजेरी लावण्यांत येते. त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे. १२९४ कर्मचारी स्वच्छतेचे काम करीत असेल तर हे संपूर्ण शहर स्वच्छ होईल, असे माझे मत आहे. जे काम करतात त्यांचे बद्दल निश्चित आम्हाला जाणीव आहे. यात शंका नाही.

**श्री.जयवंत ओक :** ज्या भागात १००% बेटरमेंट चार्जेस भरला जातो. त्या भागात सुविधा दिल्या जात नाही. कर्मचारी साफसफाईला जात नाही. जेथे ले-आऊट झालेला आहे. बेटरमेंट चार्जेस भरतात अशा भागात स्वच्छतेचे काम झाले पाहिजे. सफाई करण्यासाठी अशा भागाचे खाजगीकरण करण्याचे आदेश द्यावेत. आताच सुचना मांडल्या. एका वार्डात एकच कर्मचारी काम करतात. काही भागात ४-४ दिवस कचरा उचलला जात नाही. अशी परिस्थिती आहे. असे होत असेल तर शहराचा विकास कसा होईल. कर्मचारी कमी असेल तर दैनिक वेतनावर भरती करावी. ज्या भागात मोठ्या प्रमाणात कचरा पडलेला आहे, तो खाजगीकरण मार्फत उचलण्यांत यावा.

**श्री.भगवान रगडे :** कचऱ्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात आलेली नाही. अहवालात दिले. महापालिकेची संबधिताने फसवणूक केलेली असून त्यांचेवर फसवणूकीचा गुन्हा का दाखल करण्यांत आलेला नाही, खुलासा करण्यांत यावा.

**श्री.सुनिल मगरे :** अनुकंपा धरती प्रकरण का प्रलंबित आहे. माझ्या माहिती प्रमाणे शासनाची यात मान्यतेची गरज नसतांना का प्रलंबित राहिलेली आहे. यास जबाबदार कोण? प्रशासनास काय अडचण आहे. खुलासा द्यावा.

**मा.आयुक्त :** अनुकंपा धरतीवर नौकरीत सामावून घेण्या संबंधिताल प्रकरणास मी आल्यापासून स्वतः तपासणी केली. १४९ प्रकरणे आढळून आलेले आहे. संबंधितांना व विभागाला त्रुट्या बाबत कळविलेले आहे. कोणत्या त्रुट्या आहेत हे पाहण्यात येईल.

**श्री.सुनिल मगरे :** दैनिक वेतनावर बरेच कर्मचारी काम करतात. या सर्व कर्मचाऱ्यांची जेष्ठता यादी तयार करण्यांत यावी. ज्यांनी ५ वर्षापासून काम करीत आहे. त्यांचा सुध्दा यादीत समावेश असावा. सदर कर्मचाऱ्यांची जेष्ठता यादी विभागाच्या समोर फलकावर लावण्यांत यावी. जेणेकरुन प्रत्येकाला जेष्ठतेनुसार क्रमांक किती आहे हे कळेल.

**श्री.गणेश तांबे :** २०० मजूर कर्मचाऱ्यांची ३-४ वर्षापुर्वी भरती केली त्यात काही कर्मचाऱ्यांच्या नावात बदल केलेला होता. दुसऱ्याच आडनावाचे कर्मचारी यांना सेवेत घेण्यांत आले होते. असा प्रकार होऊ नये, म्हणून जेष्ठता यादी तयार करण्यांत यावी. सर्व कर्मचाऱ्यांना माहितीस्तव कळविण्यांत यावे. जे काम करतात त्यांनी त्यांचे हक्कापासून वंचित ठेवले जाते असा प्रकार यापुढे होऊ नये.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** १२९४ कर्मचारी काम करीत असतील तर त्यांचे अभिनंदन करतो परंतू हे शहर स्वच्छ असावयास पाहिजे. कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कुणाचा विरोध नाही. जर १० कर्मचाऱ्यांच्या ग्रुप मधून ४ कर्मचारी काम करीत असतील. उर्वरीत ६ जे काम करीत नाही, त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे. वार्डातील नागरिक आमच्या घरी येऊन तक्रारी करतात.

**श्री.अविनाश कुमावत :** आताच खुलासा झाला. सफाई मजूर कामगार १२९४ आहे, ८३ वार्डात विभागले असता एका वार्डासाठी १२-१५ कर्मचारी येतात. त्यापैकी ४-५ कर्मचारी काम करतात. बाकी कर्मचारी कुठे जातात. ही संख्या कमी प्रमाणात होते.

**श्री.गणेश तांबे :** औरंगाबाद शहर स्वच्छ आहे ते खरोखरच स्वच्छ आहे का याची शहानिशा होणे आवश्यक आहे. महापौरांच्या वार्डात सुध्दा कचरा आहे. कुणीही येईल व सभागृहात प्रशस्ती पत्र देईल हे शहर स्वच्छ आहे. हे मला संयुक्तीक वाटत नाही. संपूर्ण शहरात वार्डावार्डात मोठ्या प्रमाणात कचरा साचलेले आहे. त्यासाठी कर्मचारी नाही. अमुक वार्डात इतके कर्मचारी आहे, नेहमी आकडे दाखविल्या जाते, परंतू प्रत्यक्षात तेवढे कर्मचारी कामावर येतात का हा महत्वाचा मुद्दा आहे. भावसिंगपुरा भागात २२ कर्मचारी आहेत. उपस्थित ७ पेक्षा कमी असतात. ही परिस्थिती सर्वच वॉर्डात असेल तर स्वच्छता होणार नाही. हजेरी पुर्ण कशा भरल्या जातात. अधिकारी दोषी आहेत का? हे सर्व झोन अधिकारी तसेच जे सुपरव्हिजन करीत असतील त्यांचे संगमत करुन हा प्रकार होत असेल तर तो प्रशासन थांबविणार आहे की नाही. ज्या वार्डातील कर्मचारी काम करीत नसतील तर त्या वार्डाची साफसफाई खाजगी संस्थेमार्फत करण्याचा निर्णय घेण्यात यावा.

**सौ.कुसूमताई खरात :** संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तेव्हा माझ्या वार्डात कार्यक्रमाच्या वेळी फक्त ०२ महिला मजूरांनी सहभाग नोंदविला होता.

**श्री.अ.रशिद अ.सत्तार :** भोगे साहेब आयुक्त असतांना सकाळी ५ ते ७ च्या दरम्यान झोनमध्ये भेटी देत असत. आताच्या आयुक्तांनी सुध्दा झोनला सकाळी भेटी द्याव्यात कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवावे. जे काम करीत नसतील त्यांचेवर कार्यवाही करण्यांत यावी.

**डॉ.भागवत कराड :** हे शहर ऐतिहासिक शहर आहे. ते स्वच्छ असावयास पाहिजे. अशा प्रकारच्या भावना स.सदस्यांनी मांडल्या जे कर्मचारी कार्यरत आहे. ते काम करतात की नाही शंका निर्माण केलेली आहे. काही वर्षापुर्वी एवढेच कर्मचारी काम करीत होते. शहर स्वच्छ असायचे. लोक सुध्दा कचरा कुंडीतच कचरा टाकत होते. त्यावेळी कचरा कुंडीतच टाकावा व बक्षीस मिळवा अशी योजना होती. वाहनाची संख्या व मंजूरांची संख्या तेवढीच आहे. कचरा उचलला जात होता. तो ही दोन वेळेस याचा अर्थ आता झोन अधिकारी यांचे कर्मचाऱ्यांवर नियंत्रण नाही. ते ठेवणे गरजेचे आहे. शहरात कचऱ्याचे ढीग लागलेले आहे. मा.आयुक्तांनी झोन अधिकाऱ्यांवर नियंत्रण तसेच झोन अधिकारी यांनी त्यांचे झोनचे मजूर लोकांवर नियंत्रण ठेवल्यास या शहरातील पुर्णतः साफसफाई होऊ शकेल.

**श्री.तकी हसन खॉन :** स्वच्छता अजिबात होत नाही. असा गैरसमज करुन घेतलेला आहे. ७०-८०% सफाई/स्वच्छतेचे काम होते. उर्वरीत २०-३०% सफाई होत नाही. ती करण्यासाठी काय उपाययोजना करता येईल. याबाबत निर्णय घेण्यांत यावा. १२९४ कर्मचारी काम करतात. तरी स्वच्छता होत नाही. नियंत्रण नाही असे मत सभागृहाने व्यक्त केले. ड्रेनेज, रस्त्याची लांबी खुलासा केला तो जुना आहे. आता गटार, रस्ते वाढले आहे, मजूर असणे आवश्यक आहे. जे कार्यरत कर्मचारी आहे. त्यांचेकडुन काम करुन घेण्यांत यावे. थोड्याफार प्रमाणात मजूर वाढविण्याची गरज आहे. जे ड्रेनेजचे कर्मचारी आहेत. त्यांचेकडे काम करण्यासाठी साहित्य नसेल. तर हे दुर्देव आहे. झोनल कमिशनर समितीचे सभापती, महापौर व इतर पदाधिकारी यांनी झोनला भेटी दिल्या पाहिजे. प्रभाग समितीचे सभापती यांनी तेथे बसून काम करुन घ्यावे. झोन अधिकारी कोणत्या पध्दतीने व कसे काम करतात याची शहानिशा केली पाहिजे. नुसती चर्चा करुन कचरा उचलला जाणार नाही. प्रत्यक्षात कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**मा.महापौर :** कचरा उचलला जात नाही. स.सभासदांनी तीव्र भावना व्यक्त केल्या. स.सदस्य श्री.रगडे यांचे वार्डात संपूर्ण कचरा पडतो. सत्यम एजन्सी मालकाने महापालिकेची फसवणूक केली. समितीने अहवालात दिले. त्यानुसार प्रशासन आता पर्यंत गुन्हा का दाखल करीत नाही.

**विधी सल्लागार :** या प्रकरणांत मा.आयुक्तांच्या सुचनेप्रमाणे या संबंधीचा वृत्तांत महानगरपालिकेचे वकील श्री.डी.व्ही. सोमण यांचे अभिप्रायासाठी पाठविले आहे. आरोग्य विभागाने आवश्यक असलेली माहिती त्यांना दिलेली आहे. १-२ दिवसात नोटीसचे प्रारुप त्यांचेकडुन प्राप्त होईल. त्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडे पाठविण्यांत येईल.

**श्री.स.अली सलामी :** सन २००० हा प्रकल्प सक्षम सत्यम फर्टीलायझरला दिले होते. ०३ वर्ष झाले कार्यवाही का केली नाही. कोण कार्यवाही करणार.

**विधी सल्लागार :** १-२ दिवसांत नोटीसचे प्रारुप प्राप्त होईल. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यांत येईल. त्यांना म्हणणे मांडण्यासाठी वेळ देण्यांत येईल.

**श्री.स.अली सलामी :** आरोग्य अधिकारी, विधी सल्लागार या दोघोपैकी कोणत्या विभागामार्फत पोलिस गुन्हा दाखल करणार आहे.

**विधी सल्लागार :** ज्या विभागाचे प्रकरण आहे, व जो विभाग हे प्रकरण हाताळत आहे, तसेच निवड केलेल्या समितीत त्यांचा समावेश असल्याने आरोग्य विभागामार्फत गुन्हा दाखल करावे लागेल.

**श्री.भगवान रगडे :** यापुर्वी सर्वसाधारण सभेत चर्चा झालेली होती. मुख्य लेखाधिकारी यांनी या प्रकरणाच्या बाबतीत १५ दिवसात कार्यवाही करण्यांत येईल असे सांगितले होते. का गुन्हा दाखल झाला नाही. ०३ वर्ष झाले महापालिकेने सत्यम फर्टिलायझर्सच्या मालकावर काहीच कार्यवाही केलेली नाही. संबंधितांचा कालावधी संपले त्यानंतर गुन्हा दाखल होणार का? संबंधितांकडे महापालिकेचे १२ लक्ष रुपये आहे, तसेच फसवणूक केली म्हणून त्याचे मशिनरी जप्त कराव्या. एकूण महापालिकेस ७० लक्षचा फायदा होईल. महापालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारेल.

**मा.आयुक्त :** फॅक्टरी बंद आहे. कोणती कार्यवाही करावयाचे हयाची माहिती नव्हती. विधी सल्लागार यांचेकडुन तात्काळ माहिती घ्यावी. नोटीसला अंतिम स्वरुप देण्यांत यावे. तात्काळ माहिती मागवून घ्यावी. नोटीस फायनल करुन घ्यावी. सभागृहाने ठराव घेतलेला असल्याने अंमलबजावणी अपेक्षित आहे. ३-४ दिवसात निश्चितपणे निर्णय घेण्यांत येईल. जो काही ठराव झाला होता. त्याची अंमलबजावणी होणे सभागृहाला अपेक्षित आहे, हे तितकेच खरे आहे. येत्या १५-२० दिवसात निश्चितपणे पुढील कार्यवाही केली जाईल.

**श्री.भगवान रगडे :** ३०० टन कचरा दररोज माझ्या वार्डात येतो. त्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात येत नाही. त्यासाठी प्रशासन काय उपाययोजना करणार आहे.

**मा.महापौर :** ०३ तासापासून कचरा उचलण्याच्या संदर्भात चर्चा चालू आहे. स.सभासदांच्या भावना लक्षात घेऊन या शहरातील कचरा व साफसफाईचे काम कसे होईल, यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी. कचरा उचलण्यासाठी वाहनाची संख्या कमी असेल तर खाजगी भाडे तत्वावर वाहने (गाड्या) घेऊन कार्यवाही करण्यांत यावी. झोन अधिकारी यांनी आहे, तेवढे कर्मचारी यांना उपस्थित ठेऊन कचरा योग्य वेळी उचलला जाईल, याची दखल घ्यावी. नारेगांव येथील साचलेल्या कचऱ्यावर योग्य ते औषध फवारणी करण्यांत यावी. जेणेकरुन नागरिकांना पोलिओ, कॉलरा या सारखे रोग लागणार नाही. त्यासाठी प्रशासनाने वाहनांची संख्या वाढवून दररोज कचरा उचलला जाईल, याची दखल घ्यावी. आजची सभा ३० मिनीटासाठी तहकूब करण्यांत येते.

(वेळ २.५० वाजता सभेला पुन्हा ३.४० वाजता सुरुवात)

**मा.महापौर :** विषय पत्रिकेवर चर्चा करण्यांत यावी.

**डॉ.भागवत कराड :** जनरल चर्चा न घेता विषय पत्रिकेवर निर्णय घेण्यांत यावे.

**श्री.नंदकुमार घोडेले :** प्रशासकीय विभागाचा चार्ज पुन्हा श्री. कंकाळ यांचेकडे देण्यांत आलेला आहे. स.स.श्री.विकास जैन, महापौर असतांना श्री.कंकाळ यांचेकडील चार्ज काढून घेण्यांत आला होता. त्यांचे बाबतीत लोकांच्या अनेक तक्रारी होत्या म्हणून त्यांची बदली केली होती. आता पुन्हा चार्ज देण्याची का गरज पडली. हे पद टेक्नीकल की नॉन टेक्नीकल आहे. या सभागृहाने निर्णय घेतल्या नंतरही पुन्हा त्यांना चार्ज देऊन त्या पदावर ते सक्षम अधिकारी म्हणून कार्यरत आहेत का? ते पद नॉन टेक्नीकल म्हणून मंजूर केलेले आहे. टेक्नीकल अधिकारी कसे दिले याचा उपआयुक्त (प्र.) यांनी खुलासा करावा. ठराव मंजूर झालेला असतांना चार्ज का देण्यांत आला.

**डॉ.भागवत कराड :** सहा महिन्यापुर्वीच प्रशासकीय अधिकारी या पदावर श्री.कंकाळ हे कार्यरत होते. त्यांचे बाबतीत अनेकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या त्यामुळे या सभागृहात चर्चा होऊन त्यांची बदली करण्यात यावी म्हणून या सभागृहाने निर्णय घेतला होता. ०६ महिन्यानंतर पुन्हा तेच अधिकारी यांना तेच पद दिले जाते. हे कितपत योग्य आहे. त्यांनी चांगले काम केलेले आहे का. ते सक्षम आहेत का. त्यांचे कार्यकाळात अनेक ठिकाणी प्लॉटींगचे काम होत गेले. बांधकामे थांबलेली नाही. माझ्या वार्डात ४ ठिकाणी अनाधिकृत बांधकामे होत होती. श्री.कंकाळ यांना अनेकवेळा लेखी, तोंडी सुचना करुनही बांधकाम थांबविण्यात आलेले नाही. दखल घेतली नाही. आता पुन्हा त्यांना मा.आयुक्तांच्या अधिकारात पद घेण्यांत आले. प्रशासनाने खुलासा करावा.

**श्री.अफसर खान :** मा.आयुक्त यांना अधिकार आहे चर्चा करणे बरोबर नाही, यात लोकप्रतिनिधी यांनी दखल घेऊ नये.

**डॉ.भागवत कराड :** संबंधित अधिकाऱ्यांचे सी.आर. बघावे. ज्यांनी आतापर्यंत चांगले काम केलेले आहे, त्यांना या पदावर देण्यात यावे. श्री.कंकाळ यांची त्वरीत बदली करण्यांत यावी. महापालिकेच्या हिताचे होईल.

**श्री.स.अली सलामी :** नावानिशी एखाद्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत विरोध करणे योग्य नाही. कोणत्या अधिकाऱ्यांना कोणत्या पदाचा चार्ज द्यायचा हा अधिकार आयुक्तांचा आहे. बन्सीलालनगर येथील बांधकाम परवानगी दिली. त्यावेळी सी.एस.सोनी यांचेकडे प्र.चार्ज होता. त्या संदर्भात या सभागृहात गंभीर चर्चा झाली. त्यावेळी कुणीही प्र.चार्ज बाबत मुद्दा उपस्थित केला नाही. अनेक अधिकाऱ्यांकडे आयुक्तांनी प्र.पदभार सोपविलेले आहे. चार्ज कुणाकडे ही असो त्या अधिकाऱ्यांकडुन काम कसे करुन घ्यायचे हा मुद्दा महत्वाचा आहे. सभागृह विरोध करुन नांवे दाखवित असेल तर आयुक्तांचे काम काय असेल. २०X३० चे प्लॉटिंग चालू आहेत. श्री.कंकाळ यांचे काळात काम चालु असते. इतरांना हा चार्ज दिल्यास अनाधिकृत बांधकाम होत नाही. असा प्रकार नाही. इतर अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात सुध्दा अनेक अनधिकृत बांधकाम झाली. दुसरे बदलून आणले तर होणार नाही हे कशावरुन बन्सीलालनगर/सेव्हनहिल भागात होत असलेले बांधकाम बाजुला ठेऊन बदलीच्या संदर्भात या सभागृहात चर्चा करणे योग्य नाही. बन्सीलालनगर येथील बांधकाम चौकशी संदर्भात मा.आयुक्तांची चौकशी करण्यासाठी मुख्य लेखाधिकारी यांना नियुक्त करणे कितपत योग्य आहे. अनधिकृत बांधकाम

कसे थांबविता येईल, या संदर्भात चर्चा करणे योग्य होईल. आताच सूचना करण्यांत आल्या. कर्मचारी कामाला जात नाही. कर्मचारी यांचे कडुन काम करुन घेण्याची जबाबदारी ही प्रशासनाची आहे. जर एखादा अधिकारी चुकीचे काम करीत असेल तर जरुर कार्यवाही केली पाहिजे. त्यांचे निलंबन केले तरी आमची सहमती आहे.

**डॉ.भागवत कराड :** हे सभागृह सर्वोच्च आहे. महापौरांनी आदेश दिल्यानंतर ज्या अधिकाऱ्याकडुन या पदाचा चार्ज काढण्यात आला होता. त्यानां ०६ महिन्यानंतर पुन्हा देण्यांत आला हे योग्य नाही.

**श्री.स.अली सलामी :** सर्वांना सारखा न्याय द्यावा. एका अधिकाऱ्यांच्या बाबतीत तडवी नजर ठेऊनन त्यांचे पदाला विरोध करुन बदली करण्या संदर्भात चर्चा करणे बरोबर नाही. हि पध्दत बंद करावी. आयुक्त यांना अधिकार होते, त्यांनीच त्याची बदली प्रशासकीय अधिकारी म्हणून केलेली आहे.

**श्री.नासेर खॉन अ.रहेमान खॉन :** यापुर्वी जे अधिकारी होते. त्यांनी काय केले. ०३ महिन्यापुर्वी मी व श्रीमती शाहीन जफर यांनी पत्र दिले. त्या जागेवर कब्जा झाल्यानंतर ३५ दिवसिांची नोटीस दिली. त्यांना न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला. यापुर्वीही अधिकाऱ्यांनी कामे केलेले आहेत. माझ्या वार्डात अर्धा एकर जागेवर अनिधकृत कामे चालू होते. संबंधित अधिकारी श्री.रामटेके यांना वारंवार सूचना करुन ही अतिक्रमण झालेले काढण्यांत आले नाही. पद कोणास दिले तरी चालेल परंतू त्या अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यवाही केली पाहिजे. अमुक अधिकारी चांगले काम करतात. अमुक अधिकारी करीत नाही, असे म्हणणे चुकीचे ठरेल. मा.आयुक्त यांनी अशा अधिकाऱ्यांना ताकीद देऊन होत असलेले अनाधिकृत बांधकाम थांबवावे.

**श्री.नंदकुमार घोडेले :** श्री.कंकाळ हे टेक्नीकल किंवा नॉन टेक्नीकल यापैकी कोणत्या संवर्गात येतात. हे पद नॉन टेक्नीकल असतांना टेक्नीकल वर्गातील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करणे योग्य नाही.

**श्री.जयवंत ओक :** प्रशासकीय अधिकारी पदाच्या संदर्भात चर्चा चालू आहेत. या पदावर झोन अधिकाऱ्यामधून हे पद भरावे असा निर्णय झाला. श्री.कंकाळ यांचेच काळात स.स.श्री.भरत लकडे यांचे वार्डात अतिक्रमण झाले. त्यांनी ते अतिक्रमण काढण्या संदर्भात अनेक वेळ सूचना दिल्या ते काढले नाही म्हणून श्री.कंकाळ यांची बदली करण्यांत आली. एका अधिकाऱ्यांना काढून चालणार नाही. तर ज्यांचे कडे प्र.पदभार असेल अशा सर्व पदावरील अधिकाऱ्यांचा पदभार काढून घ्यावा. जे अधिकारी काम करणार नाही. त्यावर नियमाने कार्यवाही झाली पाहिजे. यात दुमत नाही. जे टेक्नीकल आहेत. त्यांचा चार्ज काढून घ्यावा. दोन-दोन पदांचे चार्ज एकाच अधिकाऱ्यांकडे कित्येक दिवसापासून आहे, ते प्र.पदभार काढून हे प्रशासन स्वच्छ करावे. मा.आयुक्तांनी सर्व विभागावर लक्ष ठेवून काम करुन घ्यावे.

**श्रीमती शाहीन जफर :** वार्डात महापालिकेच्या जागेवर लोकांनी अतिक्रमण करु घरे बांधली तेव्हांचे प्रशासकीय अधिकारी श्री.रामटेके यांना अनेक वेळा तोंडी लेखी सूचना या संदर्भात दिल्या. परंतू कोणतीच कार्यवाही झालेली नाही. श्री.कंकाळ हे पुर्वी प्रशासकीय अधिकारी होते, त्यांचे काळात अतिक्रमण होण्याचे प्रमाण कमी होते. चांगल्या प्रकारे काम करतात. त्यांना या पदाचा दिलेला चार्ज योग्यच आहे.

**श्री.भगवान रगडे :** अनधिकृत बांधकाम संदर्भात चर्चा होत आहे. महापालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असतांना सुध्दा कुणीही परवानगी घेऊन बांधकाम करीत नाही. खऱ्या अर्थाने ज्यांचेकडे यंत्रणा आहे. कोणीही असो श्री.जरारे, श्री.रामटेके, श्री.कंकाळ कोणीही असो आपल्या पदाचा वापर केला तर महापालिकेचे उन्नतीत भर पडेल. अनेक अनिधकृत काम होत आहेत. जाधववाडी भागात भर रस्त्यावर काम चालु न्यायालयाचे जै-से थे आदेश असतांना सुध्दा एका व्यक्तीने बांधकाम थांबविले नाही. यामध्ये महापालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. याची जाणीव अधिकारी ठेवत नाही. व अतिक्रमण/अनधिकृत होत असलेले बांधकाम थांबवित नाही. जवाहर कॉलनी भागात खोल्या व १०x१८ ची सहज जागा १-२ रुम बांधतांना एका न्हावी समाजाचे श्री.पंडीत यांनी बांधकाम केले. परवानगी नसल्याने बांधकाम पाडले. एखाद्या गरीबाचे घर अनिधकृत असेल तर महापालिकेचा संबंधित विभाग त्या ठिकाणी जाऊन ते अतिक्रमण काढले जाते. परंतू श्रीमंत लोकांचे अतिक्रमण काढण्यास अधिकार का चाल ढकल करतात. एका जागेवरील बांधकाम परवानगी नाही म्हणून पाडण्यात आले. परंतू त्या बांधकामाच्या बाजुलाच त्रिमुर्ती चौकात एका मोठ्या जागेवर शॉपींग सेंटरचे बांधकाम चालू आहे. त्या व्यक्तीने परवानगी घेतलेली आहे का, खुलासा करावा. तसेच मेहरसिंग नाईक चौकात काम चालू आहे. परवानगी दिली नसेल तर का पाडण्यात आलेले नाही. प्रशासकीय अधिकारी पद कुणाला द्यावे असे मी म्हणणार नाही. वार्डाचा विकास व महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती कशी सुधारेल. महानगरपालिकेचा विकास होण्याच्या दृष्टीने जे बांधकाम करतात. त्यांनी महापालिकेची परवानगी घेतली पाहिजे. जेणेकरुन महापालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारेल. परंतू जे अनधिकृत बांधकाम थांबवू शकत नाही. नुकसान करतात अशा अधिकाऱ्यांवर सुध्दा कार्यवाही झाली पाहिजे.

**श्री.माणिक साळवे :** प्रशासकीय अधिकारी हे पद टेक्नीकल की, नॉन टेक्नीकल आहे. खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.)** : प्रशासकीय अधिकारी हे पद नॉन टेक्नीकल झालेले आहे. श्री.कंकाळ या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे.

**श्री.नंदकुमार घोडेले :** हे पद ३-४ वर्षापुर्वीच नॉन टेक्नीकल म्हणून ठराव पारीत झालेला असतांना अद्याप या पदावर कायम स्वरुपी अधिकारी दिले नाही, का उशीर झाला खुलासा करण्यांत यावा.

**उपआयुक्त (प्र.)** : या पदावर कायम स्वरुपी अधिकारी देण्या संदर्भात मा.आयुक्त यांचेशी चर्चा करुन कार्यवाही केली जाईल.

श्री.स.अली सलामी : महापालिकेमध्ये स्थापत्य, विद्युत व ड्रेनेज एक कार्यकारी अभियंता पाहतात. लाईट व ड्रेनेज अशी वेगवेगळी कामे पाहतात. दोन्ही टेक्नीकल वेगवेगळ्या पदव्या असतांना एकाच अधिकाऱ्यांना दोन्ही पदाचे कार्यकारी अभियंता नियुक्त केले जे आहेत हयांचे कडून कामे घ्यावे.

**श्री.भगवान घडमोडे :** अतिक्रमणाच्या संदर्भात सविस्तर चर्चा या सभागृहात झालेली आहे. कोणीही अधिकारी झाल्यास अतिक्रमण थांबणार नाही. परंतू जे इमारत निरिक्षक असतात. त्यांनी माहिती देणे आवश्यक आहे. नगरसेवक हे ट्रस्टी असतात. या नात्याने वार्डात अतिक्रमण होत असेल तर त्या संबंधित तक्रार

करतात. तक्रार केल्यानंतर अमुक नगरसेवकांनी पैसे मागविले असे इमारत निरिक्षक चुकीची माहिती देतात. पंडीत नावाचे २५००० मागितले असे म्हणतात. माझ्याकडे त्याचे निवेदन आहे. गरीब आहे. सहकार्य करा. आपले प्रश्न वेगळे असेल, हेवा दावा असेल परंतू जेव्हा नगरसेवकांचा प्रश्न येतो तेव्हा बॉडीचा अंकुश पाहिजे. विनंती आहे की, नगरसेवक वेगवेगळ्या पक्षाचे आहेत. पारदर्शकता आणावयाची असेल तर चुक असेल तर चुक म्हणावे. स.सदस्यांवर आरोप करायचे की नाही याचा विचार करावा. कोणता अधिकारी द्यावयाचा आमची हरकत नाही. प्रशासन सक्षम आहे. आमचे काम आहे, अंकुश ठेवणे, नजर ठेवणे, कोठे अतिक्रमण होत आहे, कोणाचा हात आहे, हयगत करु नये. वचक ठेवावा. इमारत निरिक्षक आयुक्तांना सुध्दा चुकीची माहिती देतात. एवढे निढविलले आहेत.

**श्री.अ.रशिद अ.सत्तार :** श्री.कंकाळ यांनी यापुर्वी काम केलेले आहे. प्रशासनाने त्यांची माहिती घेतलेलीच असेल त्यामुळे प्रशासकीय अधिकारी पदाचा चार्ज त्यांचेकडे ठेवावा.

**श्री.अफसर खॉन :** अंकुश ठेवू आपली परंपरा आहे. मा.आयुक्तांच्या अधिकारात श्री.कंकाळ यांना त्या पदाचा चार्ज दिला. कुणाच्या नावाचा विरोध करणे बरोबर नाही. प्र.चार्ज ज्यांचेकडे असतील ते ते अधिकारी जबाबदार राहतील. एखादा अधिकारी चांगले काम करीत असेल तर त्यांना त्या पदावरुन हटविणे योग्य नाही. दोन दोन पदाचा चार्ज देवून ते अधिकारी चांगले पध्दतीने काम करीत असेल तर प्र.चार्ज ठेवण्यास हरकत नसावी. अमुकच अधिकारी चांगले काम करतात. तसा हट्ट धरणे व त्यांनाच या पदावर द्यावे. आजच बदली करावी असे म्हणणे बरोबर नाही. यामुळे विकास होणार नाही. कोणते अधिकारी चांगल्या पध्दतीने काम करतात. हे बघण्याचे काम मा.आयुक्तांचे आहे. जे नियमाने कामे करीत नाहीत. त्यांचेवर कार्यवाही सुध्दा झाली पाहिजे.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** स.सदस्य श्री.भरत लकडे यांचे वार्डातील एका जागेवर एका व्यक्तीने अतिक्रमण केले. स.सदस्य ०३ वर्षापासून त्या संदर्भात लेखी तोंडी सूचना संबंधित विभागाला देतात. आतापर्यंत त्यांनी ३० ते ३५ पत्र दिले. जवळपास १ कोटी रुपयाची जागा आहे. सदर व्यक्तीला न्यायालयात जाण्यास अधिकारी वेळ देतात. त्या व्यक्तीने स्वतःच्या नावाचे पी.आर.कार्ड तयार केले. तक्रार केली म्हणुन त्या व्यक्तीने स.सदस्या विरुध्द पोलिसात गुन्हा दाखल केला. त्या व्यक्तीच्या नावांवर असलेले पी.आर.कार्ड रद्द व्हावे व ती जागा महापालिकेच्या मालकीची होण्यासाठी मा.आयुक्तांनी जातीने लक्ष द्यावे. व प्रशासकीय अधिकारी पदावर कायमस्वरुपी अधिकारी देण्यासाठी प्रशासनामार्फत ताबडतोब कार्यवाही करावी. अतांत्रिक पद आहे. नियमाप्रमाणे भरण्यांत यावे.

**मा.महापौर :** प्रशासकीय अधिकारी हे पद नियमाप्रमाणे भरण्यात यावे.

**श्री.भगवान रगडे :** हर्षनगर बौध्द विहाराचा भाग हा घोषित झोपडपट्टीचा भाग आहे. त्या ठिकाणी कोणाकडेही पी.आर.कार्ड नाही. एका व्यक्तीकडे पी.आर.कार्ड असून बौध्द विहाराच्या बाजुला संबंधिताने बांधकाम केलेले आहे. येण्या जाण्यासाठी रस्ता सोडलेला नाही. नगररचना विभागाने विकास योजना रस्त्याच्या जागेवर बांधकाम परवानगी दिली. बांधकाम परवानगी कोणत्या

नियमाप्रमाणे दिलेली आहे. त्याचा खुलासा व्हावा. सदरचे बांधकाम काढण्या संदर्भात काही लोक महापालिका गेट समोर आमरण उपोषणास बसलेले आहे. त्यांची तब्येत खराब झालेली असून पोलिस विभागामार्फत काही उपोषणार्थींना घाटी दवाखान्यामध्ये दाखल करण्यांत आले आहे. प्रकृती बिघडली आहे. या संदर्भात प्रशासनाने चौकशी करावी. महपालिकेच्या संबंधित विभागाने डी.पी.रस्त्यावर बांधकाम परवानगी दिली. नसती तर हा प्रकार झाला नसता नियमाखाली परवानगी दिली. दलित मुस्लीम दंगा होण्याची शक्यता आहे.

**श्री.शेख इलियास किरमाणी :** ती जागा स्वत:ची म्हणतात. बांधकाम परवानगी दिली ती कायदेशीर आहे. मा.आयुक्तांनी पडताळणी करावी.

**श्री.भगवान रगडे :** शहरात शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम या सभागृहाचे सुध्दा आहे. बांधकाम परवानगी देऊन दोन समाजामध्ये भांडणे लावण्याचे काम महानगरपालिकेच्या संबंधित विभागाकडुन होल आहे. असा माझा आरोप आहे, जे बांधकाम केलेले आहे ते तात्काळ पाडण्यांत यावे. अशी माझी मागणी आहे.

**श्री.राजु शिंदे :** स.सदस्य श्री.रगडे यांनी जो मुद्दा उपस्थित केला. त्या संदर्भात प्रशासनाने खुलासा करावा. या शहरात ५२ स्लम भाग असून कोणकडेही पी.आर.कार्ड नाही. या व्यक्तीला कसे देण्यांत आले.

**श्री.नंदकुमार घोडेले :** विषय क्र.१ घेण्यांत यावा. बन्सीलालनगर येथील स्थगिती उठवावी.

**मा.महापौर :** स्थगिती उठविण्यांत येते.

**डॉ.भागवत कराड :** आमचा विरोध आहे. बन्सीलालनगर अहवालावर चर्चा घडवावी. नंतर निर्णय घ्यावा.

**मा.आयुक्त :** हर्षनगर येथील बांधकामाच्या संदर्भात चर्चा केलेली आहे. पी.आर.कार्ड त्यास कसे देण्यांत आले. हा मुद्दा उपस्थित झाला. पी.आर.कार्ड महापालिका देत नाही. पी.आर.कार्ड जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन दिले जाते. या संदर्भात जिल्हाधिकारी यांचेकडुन माहिती घेत आहेत. जिल्हाधिकारी यांना फोन केला सहाय्यक संचालक नगर रचना यांना स्वत: पाठविले होते.

**श्री.गणेश तांबे :** हा भाग घोषित स्लम आहे. विकास आराखड्यात सदर रस्ता येत असतांना परवानगी कशी दिली. या भागात कुणाकडेही पी.आर.कार्ड नाही. सदर एकाच व्यक्तीला पी.आर.कार्ड कसे मिळाले.

**मा.आयुक्त :** डी.पी. प्लॅनमध्ये रस्ता आहे. तो झाला की, नाही मालकी हक्काबाबत पी.आर.कार्ड हे सर्वात महत्वाचे आहे. सहाय्यक संचालक नगर रचना यांनी परवानगी दिली आहे. मा.जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल येईल. नकाशामध्ये ही जागा रस्त्याने बांधीत होत आहे किंवा नाही हे आपण बघू शकता अहवाल झाल्यानंतर आपण सर्व मा.महापौर यांच्या दालनात हा नकाशा बघू शकता जागेची वस्तुस्थिती नकाशा ई.बाबी संबंधी मा.महापौर यांचेकडे बसवून मिटवून टाकावे. अनधिकृत बांधकाम झालेले असेल तर कार्यवाही होईल.

**श्री.गणेश तांबे :** सध्या बौध्द विहाराच्या बाजुला बांधकाम चालू आहे. मा.जिल्हाधिकाऱ्यांकडुन अहवाल येईपर्यंत तुर्त तात्पुरत्या स्वरुपाची स्थगिती देण्यांत यावी. स्थगिती

न दिल्यास शहराची कायदा व सुव्यवस्था खराब झाल्यास त्यास आपण जबाबदार राहू. दोन जातीमध्ये तेढ निर्माण होऊ नये.

**श्री.राजु शिंदे :** तुर्त बांधकामास स्थगिती देण्यांत यावी.

**मा.महापौर :** अहवाल प्राप्त होईपर्यंत तुर्त तेथील बांधकामास स्थगिती देण्यात येते.

**श्री.प्रशांत देसरडा :** बन्सीलालनगर येथील बांधकाम परवानगी संदर्भात यापुर्वी सभागृहात चर्चा झाली. मा.आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात परवानगी दिली. असेल तर मान्य नाही. प्रशासकीय अहवाल मागवा. सभागृहात परवानगीची मान्यतेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत यावा. कोल्हापूर महानगरपालिकेत सर्वसाधारण सभा परवानगी देते. तशी रितसर परवानगी द्यावी.

**डॉ.भागवत कराड :** बन्सीलालनगर प्रकरणांत आमच्या सदस्यांचा विरोध आहे.

**विषय क्र.८३/१ :**

दिनांक ०६.०५.२००३ व दिनांक २७.०५.२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**मा.महापौर :** इतिवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

दिनांक ०६.०५.२००३ व दिनांक २७.०५.२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

**विषय क्र.८४/२ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, म.न.पा. यांनी रु.६७.३० कोटी किंमतीच्या सिडको व विस्तारीत भागाच्या पाणी पुरवठा योजने संदर्भातील, योजना पुर्नबांधणी अनुषंगाने प्रस्ताव अवलोकनार्थ व मंजूरीसाठी सादर केला आहे.

आजच्या परिस्थितीत शहरास जुन्या व नव्या योजनेद्वारे साधारणपणे ११०.०० द.ल.लि. निव्वळ पाणी पुरवठा होत आहे. शहराची वाढती मागणी, वाढती लोकसंख्या विचारात घेऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने सन १९९७-९८ मध्ये रु.६७.३० कोटी किंमतीची २०८.०० द.ल.लि. क्षमतेची व शहराची वर्ष २०११ ची गरज भागविण्याच्या दृष्टीने एक वाढीव योजना सिडको व विस्तारीत भागासाठीची मार्च १९९८ मध्ये प्रशासकीय मान्यता घेऊन तयार केली.

सन १९९८-९९ या वर्षात योजनेतील एका उपागाच्या (नक्षत्रवाडी ते एक ५ दरम्यानची १११८/९१४ मी.मी. व्यासाची गुरुत्व वाहिनी) निविदा काढून कामास सुरुवात केली. सन १९९८-९९ व १९९९-२००० वर्षात उपलब्ध निधीमधून सदर जलवाहिनीचे काम साधारणपणे ६५०० मिटर लांबीचे पूर्ण केले. सन १९९९-२००० नंतर निधीची उपलब्धता न झाल्याने हा प्रकल्प पुर्णपणे बंद पडला. रु.६७.३० कोटी किंमतीच्या योजनेचा वित्तीय आराखडा खालीलप्रमाणे होता.

| | | |
|---|---|---|
| योजनेची निव्वळ किंमत | - | रु.५७.२८ कोटी |
| १७.५% इ.टी.पी. | - | रु.१०.०२ कोटी |
| ढोबळ किंमत इ.टी.पी.सहीत | - | रु.६७.३० कोटी |
| <u>वित्तीय आराखडा :</u> | | |
| शासन अनुदान (२३.३३%) | - | रु.१५.७० कोटी |
| आयुर्विमा महामंडळ कर्ज | - | रु.१६.१२ कोटी |

| | | |
|---|---|---|
| बाह्य कर्ज | - | रु.३५.४७ कोटी |
| **एकूण** | **-** | **रु.६७.३० कोटी** |

आयुर्विमा महामंडळाने रु.१६.१२ कोटींचे कर्ज उपलब्ध करुन देण्यास असमर्थता दाखविली. त्यामुळे बाह्य कर्ज ढोबळ किंमतीच्या साधारण ७०% पर्यंत (रु.४७.११ कोटी) घ्यावे. यासाठी हुडको या वित्तीय संस्थेकडे रु.४७११.३४ लाखाचा कर्ज प्रस्ताव सादर केला. या कर्ज प्राप्ती करीता सतत पाठपुरावा केल्यानंतर हुडको वित्तीय संस्थेने सन २००२-०३ मध्ये रु.४४००.०० लाख (रु.४४.०० कोटी) कर्ज प्रस्तावास मान्यता दिली. सदर कर्ज मंजूर करतांना संस्थेने अटी व शर्ती घातल्या, यामध्ये करारनामा, शासन हमीपत्र, ESCREW ACCOUNT इत्यादी जाचक अटी घातल्या. सदर अटीची पुर्तता म.न.पा. च्या आर्थिक परिस्थितीमुळे पूर्ण करणे शक्य नसल्याने हुडको तर्फे कर्ज मिळण्याची शक्यता कमी असल्याने याबाबत पर्याय शोधणे गरजेचे झाले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने योजनेचे आराखडे तयार करतांना उपांगाच्या अंदाजपत्रकात ५% किरकोळ खर्च, २% आस्थापना खर्च अंतर्भूत केला. त्याचप्रमाणे एकूण निव्वळ किंमतीवर १७.५% ई.टी.पी. चा अधिभार लावला. त्यामुळे या योजनेत एकूण २४.५% चा अतिरिक्त भार लागला.

आजचे पाणी परिणाम (११० द.ल.लि.) जरी कमी पडत असले तरी वाढीव २०८.०० द.ल.लि.ची गरज त्वरीत लागत नाही. व वाढीव योजनेची त्वरीत गरज देखील नाही. सदर योजना टप्प्या टप्प्याने बांधली व गरजेपुरते परिणाम वाढविले. तरी गरज व मागणी पूर्ण होऊ शकते. या उद्देशाने योजनेंच्या बांधणीचा सखोल अभ्यास केला. व योजनेची किंमत प्रत्यक्षात मांडली. त्याबाबतचा अहवाल येणेप्रमाणे, तसेच मुळ योजनेच्या वित्तीय आराखड्याची माहिती सादर.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडे मार्च २००३ पर्यंत प्राप्त निधी तसेच मार्च २००३ पर्यंतचा योजने वरील झालेल्या खर्चाचा तपशिल

| | | |
|---|---|---|
| शासकीय अनुदान | - | रु.८८५.०५ लाख |
| आयुर्विमा मंडळ कर्ज | - | रु.५९९.५० लाख |
| म.न.पा. फंडातून निधी | - | रु.२६८.७३ लाख |
| एकूण | - | रु.१७५३.२८ लाख |

मार्च २००३ अखेर पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने रु.१४२६.६१ लाख खर्च केला असून एक्सप्रेस जलवाहिनीच्या सेव्हन हिल ते एन-५ पर्यंतच्या कामाकरिता रु.१५० लाख खर्च अपेक्षित आहे. तेव्हा योजनेवर एकूण रु.१४२६.६१ +१५०.०० असा १५७६.६१ लाख खर्च लागणार आहे. तरीही म.जी.प्रा.कडे शिल्लक निधी रु.१७५३.२८ - १५७६.६१ = १७६.६७ लाख रहातो. त्यामुळे जलवाहिनी संदर्भात आज निधी उपलब्धतेची गरज नाही. म.न.पा. स शासकीय अनुदानातील उर्वरीत निधी रु.६८३.१७ लाखाच्या प्राप्तीसाठी पाठपुरावा करावा लागणार आहे.

एकूण प्राप्त परिस्थिती पहाता अटीमुळे कर्ज प्राप्ती होणे शक्य नाही. तसेच कर्जाचा बोझा टाळणे करीता योजनेची पुर्नबांधणी करुन योजना म.न.पा.तर्फेच करावी असे संकल्पन आहे. योजनेची प्रत्यक्षात उपांगनिहाय किंमत खालीलप्रमाणे येते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अशुध्द पाण्याची पंपींग मशिनरी<br>उध्दव/ढोरकीण पंप गृह सर्व अरेस्टरसह | - | रु.९४९.१२ लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | ढोरकीन येथे अशुध्द पाण्याचे पंप व संपगृह (६.५ द.ल.लि.) | - | रु.१४६.६० लाख |
| ३. | ६२.०० द.ल.लि. क्षमतेचे जल शुध्दीकरण केंद्र फारोळा | - | रु.५४६.४० लाख |
| ४. | शुध्द पाण्याची पंपीग मशिनरी फारोळा | - | रु.६८५.२५ लाख |
| ५. | २६ लक्ष क्षमतेचा जलकुंभ ५८५० मिटरवर | - | रु.६७.७७ लाख |
| ६. | ४० लाख क्षमतेचे जलकुंभ सातारा व पुंडलिकनगर | - | रु.१७९.०० लाख |
| ७. | सेंट फ्रॉन्सीस जवळ संप व पंपगृह | - | रु.७७.६० लाख |
| ८. | सेंट फ्रॉन्सीस येथील पंपीग मशिनरी | - | रु.१७७.०५ लाख |
| ९. | एन-५ येथील पंपीग मशिनरी | - | रु.७८.४० लाख |
| १०. | फारोळा जलशुध्दीकरण केंद्रावरील पुर्नस्थापित निसर्ग व्यवस्था (रिसाक्लींग) | - | रु.४०.०० लाख |
| ११. | म.रा.वि.म. चार्जेस सर्व ठिकाणी | - | रु.४९.०० लाख |
| १२. | जायकवाडी उध्दवावरील ४५० अ.श.पंप व दुरुस्ती | - | रु.८०.०० लाख |
| | एकूण | - | रु.३०७६.६४ लाख |

उपरोक्त गोषवाऱ्यावरुन असे दिसते की, सदर योजनेची किंमत रु.३०६७.६४ + म.जि.प्रा. कडून मार्च २००३ पर्यंत झालेला खर्च १७५३.२८ लाख अशी एकूण रु.४८२९.८२ लाख होते. म्हणजेच मुळ किंमतीत (६७३०.४९-४८२९.८२=१९००.५७ लाख) जवळपास १९ कोटी रुपयांची बचत होते. पर्यायाने म.न.पा. चा फायदा होतो व आर्थिक नुकसान टाळता येते. यामुळेच योजना पुर्नबांधणी बाबत प्रस्ताव सादर केला आहे.

या संदर्भात शहराची गरज जस जशी वाढेल त्या त्या प्रमाणात योजना टप्प्यानुरुप केली जाईल. एक्सप्रेस जलवाहिनीच्या कार्यान्वितेनंतर एकूण योजनेचे टप्पे व पुर्तता खालील प्रमाणे करता येईल.

<u>टप्पा १ :-</u> (सन २००६ सालच्या १०.४६ लाख लोकसंख्येसाठी)

या टप्प्यामध्ये एक्सप्रेस जलवाहिनीच्या कामाच्या पुर्ततेनंतर तसेच ४५० अश्वशक्तीचा एक पंप ऊदवावर बसवून, जुन्या पंपाच्या दुरुस्तीनंतर एकूण विसर्ग १६१ द.ल.लि. प्राप्त होईल. हा विसर्ग सन २००६ सालच्या १०.४६ लाख लोकसंख्येस पुरेल. यामध्ये एक्सप्रेस जलवाहिनी, एक पंप ४५० अश्वशक्त, पुर्नस्थापित विसर्ग व्यवस्था व पंप दुरुस्ती इत्यादी बाबी अंतर्भुत केल्या आहेत.

<u>टप्पा :- २</u> (सन २००९ सालच्या ११.४३ लाख लोकसंख्येसाठी)

या टप्पा अंतर्गत ऊदवावरील अतिरिक्त पंप, ढोरकीन येथील पूर्ण बुस्टींग व्यवस्था, फारोळा येथील पंपीग मशिनरी, गारखेडा परिसरातील सर्व पंपीग मशिनरी, बुस्टींग व्यवस्था, पुंडलिक नगर भागासाठी जलकुंभ इत्यादी कामाचा समावेश आहे.

<u>टप्पा :- ३</u> (सन २०१३ सालच्या १२.६० लाख लोकसंख्येसाठी)

अंतिम टप्प्यात टप्पा दोन मधील उर्वरीत कामे पूर्ण करणे. तसेच ४.०० द.ल.ली/२.६६ ल.ली. क्षमतेचे जलकुंभ बांधणे इत्यादी कामांचा समावेश केला आहे.

टप्पेनिहाय योजनेचा गोषवारा :

| | | |
|---|---|---|
| टप्पा १ (झालेल्या खर्चासहीत) | - | रु.१८४३.०० लाख |
| टप्पा २ (प्रस्तावित) | - | रु.१५६७.३२ लाख |
| टप्पा ३ (प्रस्तावित) | - | रु.१४१८.८२ लाख |

निष्कर्ष :

उपरोक्त टिप्पणी विचारात घेता उर्वरीत योजना म.न.पा. तर्फे राबविल्यास रु.३०.७६ कोटी खर्च येणार आहे. तसेच म.जी.प्रा. तर्फे होणारा खर्च रु.१७.५३ कोटी विचारात घेता संपूर्ण योजना रु.४८.२९ कोटी मध्ये पूर्ण होणार आहे. यामुळे म.न.पा. सुमारे रु.१९.०० कोटीचा खर्च वाचणार आहे. म.न.पा. कडे तज्ञ अभियांत्रिकी वर्ग उपलब्ध असून शासनाने नियुक्त केलेल्या TSPS मार्फत तांत्रिक सल्ला घेण्यांत येईल. तसेच मुळे योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने तयार केलेली असून ती शासनामार्फत प्रशासकीय मान्यता/तांत्रिक मान्यता प्राप्त आहे. हीच कामे फक्त म.न.पा. तर्फे राबवायचे आहेत. या बाबी विचारात घेता महानगरपालिकेचे आर्थिक हित लक्षात घेता म.जी.प्रा.ऐवजी योजना म.न.पा. मार्फत राबविण्याची विनंती शासनास करणे, हुडको मार्फत ४४ कोटी कर्जाचा फेर विचार करुन कर्ज न घेणे, टप्पा टप्प्याने योजना म.न.पा. निधीतून राबविणे, व काही प्रमाणात कर्ज उभारणी करणे, यास मान्यता देणे व उर्वरीत जे कर्ज उभारावे लागेल. त्या कर्ज उभारणीस शासनाने हमी देणे बाबत शासनास विनंती करणे, करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.नदकुमार घोडेले :** या प्रस्तावा संबंधी माहिती देण्यांत यावी.

**श्री.संजय शिरसाट :** या विषयावर कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** शासनाचे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे सचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १६.०१.२००३ रोजी बैठक झाली. त्या बैठकीत औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत होणारा सिडको-हडको येथील ६७ कोटीच्या पाणीपुरवठा योजनेच्या संदर्भात चर्चा झाली. हडको कडील कर्जा बाबत ही चर्चा झाली. ज्या ज्या योजना मंजूर झालेल्या आहेत. त्याचा पुन्हा: आढावा घेण्यांत यावा व आर्थिक बचत कशी होईल ते पाहावे. अशा सुचना देण्यांत आल्या. लेखा विभाग व पाणी पुरवठा विभागाने संयुक्तरित्या विचार विनिमय करुन मा.सचिवांनी दिलेल्या सुचनेच्या अनुषंगाने पुन:रचना करावी. असे ठरविले. ६७ कोटीची ही योजना होती. त्यातील काही काम करण्यांत अले. उर्वरीत या योजनेचे काम बाकी आहे. एक्सप्रेस जलवाहिनी याच कामाचा एक भाग आहे. व याला पाणी पुरवठा सध्याच्या उपलब्ध पाणी साठ्यातूनच देण्यांत येते. शहरात पाणी पुरवठा थोडा विस्कळीत झालेला आहे. हे मान्य करण्यासारखे आहे. सध्या जायकवाडी जलाशयातून शहरात ११०.०० द.ल.लि. पाणी शहरात येत नाही. १०-१२ एम.एल.डी.पाणी होते. सदर योजनेचे काम टप्प्या टप्प्याने करण्याची गरज आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे नोडल एजन्सी म्हणून काम करते. त्यांना १७ १/२ टक्के इ.डी.पी. २% व इतर ५% असे २४ १/२% महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला द्यावे लागते. साधारणत: जीवन प्राधिकरणाला द्यावे लागते. साधारणत: हे १९ कोटी होतील.

**श्री.संजय शिरसाट :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला एक्सप्रेस जलवाहिनीचे काम दिले जो प्रस्ताव होता. त्यात पंप नव्हते. आज ३४ लक्ष रुपयाचा एक पंप टाकावा लागेल. म्हणून प्रस्ताव येतो. ही बाब काम सुरु करतांनाच सदर एजन्सीच्या लक्षात आलेली नाही का यात महापालिकेचे नुकसान होत आहे. त्यांच्या चुकीमुळे होत आहे.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** पाणी पुरवठा योजना चांगली आहे. सिडकोला कोणच्या भरवश्यावर पाणी देतो. एका नळ जोडणी करिता रु.३३००/- खर्च करुन पाणी आणतो. व १२०० ला देतो. सिडको कार्यालयाकडून काही मिळेल का? खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** १९८५ ला सिडकोने सिडकोतील पाणी पुरवठा योजना महापालिकेकडे हस्तांतरीत केलेली आहे. तसा करारनामा झालेला आहे. करारनामा स्पष्ट आहे. सिडको पाणी पुरवठ्याचे पाईप बदलून देईल. साठवण क्षमता वाढवून देईल. सिडकोने वाद केला सिडकोकडुन या कामाचे पैसे मिळवण्याकरिता सिडकोचे प्रधान सचिव यांचे सिडको भवन मुंबई येथील बैठकीला गेलेला होतो. त्यांना अर्बी ट्रेडर नेमले आहे. पैकी ५-६ कोटी देण्याचे मान्य केलेले आहे. त्यातच श्री. कुलकर्णी नावाचे सचिव यांची बदली झाली. त्यांना पुन्हा या संदर्भात पत्रव्यवहार करणार आहोत.

**श्री.नंदकुमार घोडेले :** कार्यकारी अभियंता व मुख्य लेखाधिकारी यांनी हा प्रस्ताव सादर केला. महापालिकेच्या हिताचा असून १९ कोटी रुपये महापालिकेचे वाचणार त्याबद्दल या अधिकाऱ्याचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यांत यावे. व हा प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

**श्री.तकी हसन खॉन :** टप्प्या टप्प्याने काम केल्यास एकूण खर्च किती होणार आहे.

**श्री.भगवान घडमोडे :** पाणी पुरवठा अधिकारी यांनी चांगला व महापालिकेच्या फायद्याचा प्रस्ताव आणला त्यांना वेतनवाढ देण्यांत यावे.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** १९८५ ला महापालिका व सिडकोचा पाणी पुरवठा योजना महापालिकेकडे हस्तांतरीत करतांना काय करारनामा झाला. सभागृहात वाचून दाखवावा. सिडको कडून पैसे घेवून योजना पुर्ण करा. सिडकोने भुखंडातून कमवले आहे. आम्ही प्रस्तावा विरुध्द नाही.

**मा.महापौर :** सिडको पाणी पुरवठा योजना महापालिकेकडे हस्तांतर करतेवेळी झालेल्या करारनाम्याची प्रती पुढील सर्वसाधारण सभेत ठेवण्यांत याव्यात. हा प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रुपये ६७.३० कोटी किंमतीची योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळा ऐवजी, औरंगाबाद महानगरपालिकेने स्वत: बांधणी केल्यास व राबविल्यास म.न.पा. स जवळपास रुपये १९.०० कोटींचा फायदा होतो, त्यामुळे ही योजना इतर महानगरपालिका औरंगाबाद कडील अभियंत्यांच्या कडुन राबवावी. त्यास्तव योजना बांधणी संदर्भात Project Management Consultant नेमून काम करुन घ्यावे. तसेच या बाबत स्थापत्य अभियांत्रिकीची उपांगे व यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाची उपांगे या करिता ही Project Management Consultant नेमण्यांत यावेत. योजना पूर्ण झाल्यानंतर योजनेची उपयोगिता तपासून घेण्याकरिता मान्यवर संस्थेकडुन Third Party Inspection करुन घेऊन तसे प्रमाणपत्र सादर करणे. Project Management Consultant ला बंधनकारक राहील.

ही योजना टप्प्या टप्प्याने राबविणे व त्यासाठी विशेष निधीची उभारणी व उपलब्धता करुन घेण्यासाठी प्रशासनाने करावयाच्या कार्यवाहीसाठी सर्वानुमते मान्यता देण्यांत येते. गरज भासल्यास आवश्यकतेनुसार हुडकोकडुन कर्ज येणे, त्या कर्जासाठी Escrew Account ची अट वगळण्यासाठी Hudco ला विनंती करणे, Escrew Account ची अट वगळून शासनाने म.न.पा. औरंगाबादसाठी कर्जाची हमी घ्यावी. म्हणून विनंती करणे, Hudco कडून कर्ज घेण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही Nodel Agency ठेवण्याची अट वगळणे इ.बाबत प्रशासनाने शासनास विनंती करावी. सदर अटी वगळून जर Hudco महानगरपालिकेस कर्ज असेल तर ते घेण्यांत हरकत नाही. नसता म.न.पा. निधीतून टप्प्या टप्प्याने निधी उपलब्ध करुन देण्यांत यावा. अथवा बँकेमार्फत कर्ज उभारणी करण्यांत यावी. तसेच या प्रकल्पासाठी शासन अनुदान लवकरात लवकर मिळणेकरिता म.न.पा. प्रशासनातर्फे राज्य शासनाकडे प्रयत्न करण्यांत यावे. शहरातील जनतेला पाणी पुरवठा मानकाप्रमाणे म.न.पा. प्रशासनातर्फे राज्य शासनाकडे प्रयत्न करण्यांत यावे. शहरातील जनतेला पाणी पुरवठा मानकाप्रमाणे होणे करिता सदर योजना तात्काळ हाती घेणे आवश्यक आहे. त्यांकरिता म.न.पा. फंडातून दरवर्षी विशेष निधीची टप्प्या टप्प्याने तरतूद करुन पाण्याच्या वाढीव परिणामकरिता आवश्यक ती उपांगे उभारण्या करिता कार्यवाही तात्काळ हाती घ्यावी. यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

सदरचा अभ्यासपूर्ण व म.न.पा. च्या आर्थिक फायद्याच्या प्रस्ताव सादर केल्याबाबत मुख्य लेखाधिकारी तसेच कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांचे अभिनंदन करण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८५/३ :**

कार्यकारी अभियंता (जलनिःसारण व विद्युत) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जायकवाडी ते औरंगाबाद पाणी पुरवठ्यासाठी लागणाऱ्या विजेचे देयक महानगरपालिका दरमहा रु.१ कोटी प्रमाणे विजमंडळाला अदा करते. प्रत्यक्षात पाणी पुरवठा साठी विज बिल महिन्याकाठी त्यापेक्षा जास्तच येत असते. या कारणाने उर्वरीत राहिलेले विज देयक ही थकबाकीत जमा होऊन थकबाकी वाढत जात आहे.

महाराष्ट्र शासनाने पत्र क्रमांक जीइसी२००३/१४०३/नवि-२४/विभाग मंत्रालय, मुंबई-३२, दि.३०.०५.२००३ तसेच विज मंडळाची थकबाकी भरण्यासंबंधी परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१०/२००२/प्र.क्र.-८६/नवि-२७ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १४.०५.२००३ नुसार निर्देश जारी केले असून यात दरमहा येणारे विज देयक नियमित भरणे बाबत व असलेली थकबाकी त्वरीत अदा करणे बाबत नमूद केले आहे. थकीत फरकाची रक्कम, एका हफ्त्यात भरणे शक्य नसल्यास विज मंडळाकडून परत फेडीचे हप्ते ठरवून त्वरीत अदा करावयाची आहे.

पालिकेच्या यापुर्वी झालेल्या निर्णयानुसार वीज बिल दरमहा रु.१.०० कोटी पर्यंतच अदा करण्यांत येते. वर नमूद केलेल्यानुसार शासन निर्देशानुसार येणारे दरमहा वीज देयक व आतापर्यंत अदा करण्याची राहिलेली थकबाकी योग्य ते हप्ते ठरवून घेऊन वीज मंडळाला अदा करणे आवश्यक आहे.

ज्या स्थानिक स्वराज्य संस्था शासन परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करणार नाही. अशांच्या विद्युत जोडण्या तोडण्यात याव्यात. असे निर्देश नागपूर खंडपीठाने दिले आहेत. ज्या महानगरपालिका ठरविल्यानुसार हप्त्याची परतफेड करत नसतील तर त्यांना देण्यांत येणाऱ्या शासकीय अनुदानाच्या हप्त्यातून रक्कम परस्पर विज मंडळाकडे भरणा करण्यांत याव्यात. असेही शासन परिपत्रकात नमूद केलेले आहेत.

अशा परिस्थिती मध्ये वीज पुरवठा खंडीत झाल्यास त्याचा गंभीर परिणाम पाणी पुरवठ्यावर होणार आहे, कारण शहराला जायकवाडी येथून पाणी हे पंपीग द्वारेच पुरवठा करणे शक्य आहे.

त्यामुळे मा.आयुक्त यांनी संचिकेत दिलेल्या मंजूरी नुसार यापुढे दरमहा येणारे विज बिल अदा करणे व थकीत फरकाची रक्कम ठरवून दिलेल्या हप्त्याप्रमाणे अदा करणे योग्य होईल.

करिता उपरोक्त प्रस्ताव विचारार्थ सादर.

सोबत :- शासनाने परिपत्रक क्रमांक/संकीर्ण-१०/२००२/प्र.क्र.-८६/नवि-२७/मंत्रालय मुंबई-३२, दिनांक १४.०५.२००३ माहितीस्तव व पत्र क्रमांक जीई/२००३/१४०३, नवी-२४/नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ३०.०५.२००३ च्या पत्रांची छायांकित प्रत जोडली आहे.

महानगरपालिका/नगरपालिका यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची वीजेची देयके व थकबाकी भरण्यासंबंधी

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन परिपत्रक क्रमांक - संकीर्ण-१४/२००२/प्र.क्र.-८६/नवि-२७ मंत्रालय मुंबई-४०० ०३२.

दिनांक १४ मे, २००३

परिपत्रक :-

राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका यांची रस्त्यावरील दिवे/पाणी पुरवठा यासाठी लागणाऱ्या वीजेची थकबाकी अंदाजे रुपये ५४२ कोटी आहे. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालया मध्ये नागपूर खंडपीठ येथे दाखल केलेल्या जनहित याचिकेमध्ये सन्माननीय उच्च न्यायालयाने "ज्या महापालिका, नगरपालिका किंवा सार्वजनिक संस्था वीज देयक नियमित भरणार नाहीत. अशांच्या विद्युत जोडण्या तोडण्यात याव्यात" असे निर्देश दिले आहेत. वास्तविक ज्या नागरी संस्था पाणी पुरवठा किंवा दिवा बत्तीसाठी वीजेचा वापर करतात. त्यांनी वीज बिलाची रक्कम दरमहा नियमित भरलीच पाहिजे. जर एखाद्या महानगरपालिका/नगरपालिकेत वीजेची थकीत बिले असतील तर त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाकडून जिल्हाधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने परतफेडीचे हप्ते ठरवून घ्यावेत व ठरविलेल्या हप्त्याप्रमाणे रकमेचा भरणा करावा. ज्या महानगरपालिका/नगरपालिका ठरविल्यानुसार हप्त्याची परतफेड करत नसतील तर जिल्हाधिकाऱ्यांनी त्या महानगरपालिका/नगरपालिकांना देण्यांत येणाऱ्या शासकीय अनुदानातून हप्त्यांच्या रक्कमा परस्पर महाराष्ट्र वीज मंडळ कडे भरणा कराव्यात.

याशिवाय महानगरपालिका/नगरपालिका यांनी दिवाबत्ती इ. सुविधा पुरविण्यास अधिक खर्च करतात. त्यांच्या या खर्चात काटकसर करावी. व थकबाकीची रक्कम वाढणार नाही, याची नोंद घ्यावी. प्रसंगवशात येथे असे नमूद करण्यात येते की, महानगरपालिका/ नगरपालिका यांच्या उत्पन्नातील अधिक रक्कम सार्वजनिक देयके देण्यासाठी राखून ठेवावीत व मंडळास अदा करावी. अन्यथा, आयुक्त/मुख्याधिकारी यांना व्यक्तीस जबाबदार धरण्यात येऊन कर्तव्य चुकी केल्याबद्दल शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपालांच्या आदेशानुसार व नावाने.

स्वाक्षरित/-
(सुभाष लाला)
सचिव

प्रत :
आयुक्त, सर्व महापालिका,
संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा,
नगर विकास विभाग (नवी-१४,२४,२७)

**संवाद :**

**श्री.संजय शिरसाट :** रद्द करावे.

**डॉ.भागवत कराड :** दर महिन्याला किती वीज बील येते. व किती रक्कम देणे आहे.

**मा.आयुक्त :** या संदर्भात वरीष्ठ पातळीवर कालच मुंबई येथे एक बैठक झाली. श्री.खैरनार, मुख्य लेखाधिकारी हे सुध्दा त्या बैठकीस उपस्थित होते. बैठकीतील झालेली चर्चा मुख्य लेखाधिकीर हे सभागृहाच्या निदर्शनास आणून देतील.

**मुख्य लेखाधिकारी :** कालच या संदर्भात नगर विकास खात्याचे मुख्य सचिव श्री.लाला विद्युत मंडळाचे चेअरमन श्री.बसाक यांची संयुक्त बैठक झाली. त्यामध्ये हा मुद्दा उपस्थित झालेला होता. महानगरपालिकेकडील थकबाकी रक्कमे संदर्भात शासनाने ३ जी.आर. सुचना वजा पाठवलेले आहे. शासन निर्णयाची प्रत सोबत दिलेली आहे. मा.सचिव यांनी असे निर्देश दिले की, पाणी पुरवठ्यासाठी दरमहा येणारे विजेचे बिल महानगरपालिकेने रेग्युलर भरणा केले पाहिजे व थकीत रक्कमाबाबत नंतर निर्णय घेण्यांत येईल. मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या एका निर्णयाप्रमाणे या महनगरपालिकेचा वीज पुरवठा सुध्दा खंडीत होऊ शकतो. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेसह बोलणी झाली. शासन स्तरावरील आदेश महानगरपालिका पाळत असेल तर शासकीय अनुदान जिल्हाधिकारी यांचे मार्फत मिळते ते परस्पर वळती करण्यांत येईल व हे सभागृहा समोर ठेवण्याची सुचना दिल्या. महापालिकेचे पाणी पुरवठा वीजबिल दरमहा रु.१.५५ कोटी पर्यंत असते. आता सध्या वीज मंडळास १.१० कोटी रुपये दरमहा अदा केले जाते. पथदिवे ४५ लाख व १५ लाख अंतर्गत पाणी उपसा (पंपीग) एकूण वीज बिल हे २.१० कोटी प्राप्त होते. महानगरपालिका पथदिव्यांचे ४५ लाख व इंटरनल पंपीग चे १५ लाखाचे बील नियमित भरते. यापुर्वी १ कोटी दरमहा वीज अदा केले जात होते. गेल्या महिन्यात मा.महापौर, मा.आयुक्त, एम.एस.ई.बी. व महापालिका पदाधिकाऱ्या सोबत बैठक झाली. त्या बैठकीत आणखी १० लक्ष रुपये वाढवून देण्याचा निर्णयानुसार आता सध्या वीज मंडळास १.१० कोटी वीज बील दरमहा अदा केले जाते. प्रशासनाने शासन निर्देशानुसार प्रस्ताव सादर केला त्यानुसार दरमहा १.५० ते १.५५ कोटी रक्कम वीज मंडळास अदा करावी लागणार आहे. म.रा.वि.म. वीज कपात धारेणाचा अवलंब करु शकते.

**श्री.अविनाश कुमावत :** विषय क्र.४ मध्ये दिले. नवीन पथदिवे उभारणे बंद केल्यास १० लक्ष रुपये महापालिकेचे वाचतील असे नमूद आहे.

**श्री.प्रशांत देसरडा :** पाणी पुरवठ्यांसाठी वापरणारी वीज ही ग्रामीण भागात वापरली जाते. त्यामुळे कृषी दराने वीज आकारण्याचा प्रस्ताव शासन दरबारी असून शासनास वारंवार मागणी करुनही मान्यता दिली जात नाही. जेव्हा यास मंजूरी मिळेल तेव्हाच वीज बील भरणा करावे.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर :** हा प्रस्ताव मंजूर केल्यास शहराचा विकास होणार नाही. नामंजूर करावा. या महापालिकेतील सर्व पक्षांचे पदाधिकारी तसेच जेष्ठ सदस्य यांचे शिष्टमंडळ एम.एस.ई.बी. चे श्री.बसाक यांचेसह चर्चा करु इतर स्थानिक आमदार/खासदार यांचेही निदर्शनास आणून दिले जाईल. महाराष्ट्रातील इतर शहराची पाणी पुरवठा योजना व या महापालिकेतील शहरासाठी लागणारी पाणी पुरवठा योजना ही वेगळी असून तेथे ग्रायव्हीटीने पाणी येते. या शहरासाठी येणारे पाणी पंपीग करुन आणले जाते. व जे पंपीग होते ते ग्रामीण भागात होते, म्हणून कृषी दराने पाणी पुरवठ्यावरील विजेचे बील आकारण्यांत यावे. अशी मागणी शिष्टमंडळाद्वारे केली जाईल. व ही मागणी पुर्ण न झाल्यास एम.एस.ई.बी. सुध्दा एक सेवा भावी संस्था आहे. शहरात महापालिकेच्या हद्दीत असलेले एम.एस.ई.बी. चे पोल वर कर तसेच शहरात येणारी वीज यावर सुध्दा जकात आकारणी व्हावी. हा विषय नामंजूर करण्यांत यावा.

**डॉ.भागवत कराड :** एम.एस.ई.बी. चे देणे किती आहे.

**मुख्य लेखाधिकारी :** एकूण १६८ कोटी रुपये एम.एस.ई.बी चे देणे आहे. मुद्दल रक्कम १०० कोटी असतील परंतू वरील ६८ कोटी हे व्याज (इंट्रेस) व दंड असेल.

**डॉ.भागवत कराड :** वारंवार एम.एस.ई.बी विभगाचे थकीत वीज बील भरण्याबाबत महापालिकेस पत्र येतात. त्यानुसार प्रस्ताव सभागृहा समोर आणला जातो. ही कायमची प्रथाच सुरु झाली. त्या प्रस्तावावर चर्चा होते. कृषी दराने वीज बील आकारले जात नसेल तर शहरातील एम.एस.ई.बी. विभागाचे डी.पी.पोल यावर कर आकारावा. तो आकारता येतो का? खुलासा देण्यांत यावा. तसेच जकात देखील आकारणी करता येते का?

**मुख्य लेखाधिकारी :** ०३ वर्षापुर्वीच निर्णय घेतला होता. कर आकारणी बद्दल एम.एस.ई.बी. चे अधिकाऱ्यांसह चर्चा केली. डी.पी. व पोल चे भाडे लावत असाल तर त्यांचेकडे सरचार्ज लावण्याची तरतूद आहे. जकात संबंधी मुंबई महापालिकेने प्रस्ताव मंजूर केला होता, परंतू शासनाने अमान्य केलेला आहे. कृषी दराने विज आकारण्याबाबत शासनाकडे काही नाही, आता वीज मंडळाचे विज नियामक मंडळ स्थापन झाले. त्यामुळे फायदा होणार नाही. या संदर्भात अपिल केले असता एम.एस.ई.बी. ला अगोदर १० कोटी रुपये भरावे, असे प्राथमिक सुनावणीत सांगण्यात आले.

**डॉ.भागवत कराड :** दर महिन्याला सद्यस्थितीत जर १.८० कोटी वीज बील येत असेल तर दिवसा व रात्रीचे दर वेगळे आहेत त्या दराने आकारणी केल्यास कमी होऊ शकते. तसेच पाणी पुरवठा पंपीगसाठी जे मशिनरी आहेत. त्या दुरुस्त करुन घेतल्यास आणखी वीज बिल कमी येऊ शकते.

**मुख्य लेखाधिकारी :** पुर्वी १.८० कोटी येत होते. आता रात्रीचे दर आकारण्यांत येत असल्याने १.५० कोटी पर्यंत देयक येते. शासनाने देखील सुचना केली की,

कमीत कमी बील येण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेने आपआपल्या स्तरावर प्रयत्न करावे. १.५० कोटीचे १ कोटी बिल कसे येईल. प्रयत्न करणे गरजेचे आहे. जे सद्य:स्थितीत वीज बील दर महिन्याला येते ते अदा करणे भाग आहे. महापालिकेने काय निर्णय घेतला. ०८ दिवसांत अहवाल शासनास पाठवणे आवश्यक आहे.

**डॉ.भागवत कराड :** १.१० कोटी देण्यांत येतात. त्यामध्ये १५ लक्ष वाढ करुन १.२५ कोटी देण्यांत यावे.

**श्री.संजय शिरसाट :** १० लक्ष रुपये नुकतेच एक महिन्यापुर्वीच वाढवून दिले हा प्रस्ताव नामंजूर करण्यांत यावा.

**मा.महापौर :** प्रस्ताव नामंजूर करण्यांत येतो. सभा ०५ मिनीटासाठी तहकुब करण्यांत येते.

(वेळ ५.२० वाजता सभेला सुरुवात पुन्हा ५.३५ वाजता)

**ठराव :**

सदरील प्रस्ताव सर्वानुमते नामंजूर करण्यांत येतो.

**विषय क्र.८६/४ :**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण व विद्युत) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वीजेच्या कमतरते मुळे, वीजेच्या वापरात बचत करणे व विजेचा वापर कमी करणे अपरिहार्य ठरले आहे, त्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे खालील कार्यवाही करणे योग्य वाटते.

१) वर्ष २००२-२००३ व २००३-२००४ या अर्थसंकल्पाशिवाय कोणतेही नवीन पथदिवे उभारणे बंद करणे.

२) मुख्य रस्त्यावर असलेले पथदिवे काढून एक आड एक लावणे, त्यासाठी चालू असलेले दिवे योग्य नियोजन करुन वापरात आणणे. बंद असलेले दुरुस्त करुन वापरात आणणे.

वरीलप्रमाणे उपाय योजना केल्यास अंदाजे १२५५ दिवे आहे. त्या व्यवस्थेतून उपलब्ध होतील. फलस्वरुप यातून रु.३३७ लाख पर्यंतची बचत होऊ शकेल.

३) शहरातील विविध भागातील सोडियम तसेच मर्क्युरी दिवे लागलेले आहेत, त्यापैकी २० फुट (६ मीटर) किंवा त्यापेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यावरील फिटींग काढून, त्या ठिकाणी ४० वॅटचे ट्युब लावणेस्तव विजेच्या बिलात, कमी वीज खर्चल्यामुळे कमतरता येईल. याशिवाय या उपाय योजनेमुळे जे दिवे उपलब्ध होणार आहेत, ते इतर आवश्यक ठिकाणी वापरता येऊ शकतील. एकंदरीत हा उपाय केल्यामुळे रु.६३३ लाखाची बचत होऊ शकेल.

४) रेखांकनातील मोकळ्या जागेत लावलेले सर्व दिवे काढून त्यावरील बल्ब, चोक इत्यादी साहित्य पथ दिव्यांच्या नवीन मागणीसाठी, देखभाल व दुरुस्ती साठी इतरत्र वापरता येईल. या शिवाय अनावश्यक ठिकाणे (मोकळ्या जागेतील) २ सेट, थ्री सेट, फोर सेट काढून टाकल्यास यातून अंदाजे एकूण रु.५७,०००/- च्या खर्चात बचत होईल.

५) शहरात महानगरपालिकेकडून बांधण्यात आलेल्या समाज मंदिरामध्ये विद्युत व्यवस्था करण्यांत आलेली आहे. तथापि जे समाजमंदिरे नियमित उपयोगात नसतील अशा समाज मंदिरातील पुरवठा खंडीत करण्यात येऊन, विद्युत मीटर बंद करणे, व

उपलब्ध विद्युत साहित्य इतर आवश्यक ठिकाणी वापरणे शक्य आहे. यातूनही चांगल्या प्रमाणात बचत होऊ शकेल.

६) कार्यालयाच्या काळानुरुप गरजेसाठी वेगवेगळी कनेक्शन घेण्यांत आलेली आहेत. त्यामुळे विद्युत मीटर भाडे, प्रत्येक मीटरसाठी वेगळे अदा करावे लागते, त्यामुळे खर्चात वाढ होते. कार्यालयासाठीचा H.T. Supply चालू झाल्यावर पुर्वीची मीटर बंद करता येतील व यातून कार्यालयाची आर्थिक बचत शक्य होईल.

वरील मुद्दा क्रमांक २, ३ व ४ लक्षात घेता वीजेचा वापर कमी करणे, वीजेचे देयक कमी करण्याच्या दृष्टीने अंमलबजावणी झाल्यास महानगरपालिकेची महिन्याकाठी अंदाजे रु.१०.०० लाख बचत होऊ शकते.

याबचतीमुळे महानगरपालिकेस दरमहा येणाऱ्या वीज बिलात मोठ्या प्रमाणावर बचत होऊ शकते. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.महापौर** : हा विषय स्थगित करण्यांत येत आहे.

**ठराव :**

सदरील विषय स्थगित ठेवण्यांस मंजूरी देण्यांत आली.

**विषय क्र.८७/५ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे की, पाणी पुरवठा या विषयाशी संबंधित वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक तक्रारी, सुचना हरकती तसेच त्याच्या नळपट्टी संबंधी तक्रारी महानगरपालिकेस शहरातील नळ ग्राहकांकडून तसेच नागरिकांकडून प्राप्त होतात.

सदर तक्रारी त्वरीत निकाली काढण्यासाठी तक्रार करण्याच्या नळ ग्राहकाला/ नागरिकांना तक्रार मांडण्यासाठी एक व्यासपीठ असावे. या कविता जल अदालत नावाने व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याचा या विभागाचा मानस आहे. या मध्ये तक्रारदाराच्या तक्रारीवर त्वरीत निवाडा करण्याची कारवाई करण्यांत येईल. यामध्ये चुकीची पाणी बिले, पाणीपट्टी, बिल न येणे इत्यादी तक्रारीचा ही समावेश असेल.

जल अदालत साठी चार सदस्यीय मंडळ नेमण्यांत येईल, त्यात खालील अधिकाऱ्यांचा समावेश असेल.

१. मा.आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला एक अधिकारी.
२. उप आयुक्त (महसुल)
३. मुख्य लेखाधिकारी
४. कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)

सदर जल अदालत दोन महिन्यामधून एकदा, एका विशिष्ट दिवशी नागरिकांना कळावून त्यांच्या तक्रारी ऐकून त्यावर निवाडा करण्यांत येईल. व त्यानुसार पुढील कार्यालयीन कार्यवाही करण्यांत येईल.

पाणी पुरवठ्याची चुकीची बिलाी दुरुस्ती, चुकीचे बिल असल्यास ते कमी करणे इत्यादी अधिकार जल अदालत ला द्यावेत. असे मत आहे. तरी यावर विचार विनिमय होणे करिता प्रस्ताव सर्व साधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.नंदकुमार फुलारी :** यामध्ये ०४ सदस्यांचा समावेश करण्यांत यावा. व त्यांची नांवे मा.महापौरांनी निश्चित करावी.

**श्री.सुरजितसिंग खुंगर :** ०२ जल प्रतिनिधीचा समावेश करावा.

**मा.महापौर :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे. ०४ सदस्यांची नांवे नंतर देण्यांत येतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पाणी पुरवठा व नळपट्टी संबंधी प्राप्त तक्रारींचा निपटारा करण्यासाठी प्रस्तावात नमूद केलेल्या ०४ सदस्यीय मंडळ आणि त्यात ०४ पालिका सदस्यांचा समावेश करुन जल अदालत स्थापन करण्यांस व प्रस्तावात नमूद केलेले अधिकारी व कामकाज पध्दतीस आणि ०४ पालिका सदस्य, मा.महापौर यांनी नेमण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८८/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, १ जानेवारी २००१ च्या सर्वसाधारण सभेमध्ये पुढीलप्रमाणे विषय क्र.२१३/६ नुसार ठराव पारित झाला आहे. तो असा, प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स.न.२४,२५,२६ व २७ मधील अभिनंदन कॉलनी, भुजबळनगर, न्यु नंदनवन कॉलनी, अमन कॉलनी इत्यादी वसाहतीकरिता १९३/९४ मध्ये सैन्य दलाच्या हद्दीतून २८२ मीटर लांबीचा खडीरस्ता लष्कर खात्याने बंद केल्यास दुसरा पर्यायी रस्ता उपलब्ध होत नसल्याने लोकहिताच्या दृष्टीने सदरचा मुख्य पोच रस्ता भूसंपादन करुन महानगरपालिका हद्दीतील समाविष्ट करण्यासाठी छावणी मंडळाकडील दि.१७.०४.१९९९ च्या पत्रकान्वये ४९३३.११ चौ.मी. क्षेत्रफळाच्या जागेचा मोबदला रक्कम रु.१४,७९,९३३/- लष्कर खात्याला अदा करणे करिता किंवा लष्कर खात्याने प्रस्तावित केलेले वरील रक्कमेच्या हद्दी पर्यंतची काम महानगरपालिकेने विकसीत करणे करीता सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

वरील नुसार ठराव पारित झाल्यानंतर मनपाकडून लष्कर खात्यास वेळोवेळी पत्रव्यवहार करुन देखील लष्कर खात्याने कोणत्या ठिकाणी विकासाचे काम करणे आहे, याबाबत नकाशे पाठविले नाही किंवा विकासाचे स्थळ देखील दाखविले नाही. त्यामुळे वरील ठरावाची अंमलबजावणी झालेली नाही.

आर.व्ही.सिंग मेजर यांनी ०३ एप्रिल, २००३ च्या पत्रान्वये मनपास असे कळविले आहे की, दि.१ एप्रिल, २००१ ते ३१ मार्च, २००४ च्या चालु दरानुसार वरील जागेची रक्कम रु.१९,३३,८००/- लष्कर मालमत्ता अधिकारी पुणे यांनी काढली आहे व ही वाढीव रक्कम मनपा अदा करण्यास तयार आहे का? असल्यास पुढील कार्यवाहीसाठी त्वरीत उत्तर अपेक्षित केले आहे. तसेच पत्रात हे देखील नमूद केले आहे की, सुधारित रक्कम रु.१९,३३,८००/- रक्कमे बाबत मंजूरी मिळाल्यानंतर स्थानिक लष्कर खाते विकासाच्या प्रस्तावा बाबत निर्णय घेण्यांत येईल.

प्रस्तुत प्रकरणाची पार्श्वभुमी पुढीलप्रमाणे आहे. पडेगांव परिसरात लष्कराची जमीन आहे, या जमीनीलगतच मनपा हद्दीत अनाधिकृत वस्ती निर्माण झालेल्या आहेत. या वस्तीस

रहदारी करिता रस्ता नसल्याने उघडी लष्कराच्या जमीनीतून नागरिक रहदारी करीत आहे. सन १९९७ मध्ये लष्कराने त्यांच्या हद्दीत तार कुंपन घालण्याचे ठरविले. त्या वेळेस नागरिकांना रहदारीत अडचण निर्माण झाली.

त्यावेळचे मा.महापौर यांनी लष्कर अधिकारी व मनपा प्रशासन यांचे समेट घडवून लष्कराने नागरिकांना २८२ मी.लांबीचा रस्ता (४९३३.११ चौ.मी.) जमीनीतून नागरिक रहदारी करीत आहे. सन १९९७ मध्ये लष्कराने त्यांच्या हद्दीत तार कुंपन घालण्याचे ठरविले त्या वेळेस नागरिकांना रहदारीत अडचण निर्माण झाली.

त्यावेळाचे मा.महापौर यांनी लष्कर अधिकारी व मनपा प्रशासन यांचे समेट घडवून लष्कराने नागरिकांना २८२ मी. लांबीचा रस्ता (४९३३.११ चौ.मी.) सोडावा याबाबत निर्णय घेतला व लष्कर अधिकारी यांनी त्या मागणी केली त्याप्रमाणे १९ जानेवारी, २००१ मध्ये सर्वसाधारण सभेने ठराव मंजूर केला.

परंतू तद्नंतर त्यावर ठोस अशी कार्यवाही झालेली नाही. परंतू दि.२९.०६.२००० रोजी तत्कालीन मा.आयुक्त व लष्कर अधिकारी तसेच त्या वस्तीतील नागरिकांचे प्रतिनिधी यांची बैठक बोलविणे बाबत ठरले. बैठक होऊन तत्कालीन मा.आयुक्त यांनी सदरील रक्कम नागरिकांनी वर्गणी करुन भरणा करावा, असे मत प्रदर्शित केले. तद्नंतर पुढे कार्यवाही झ ालेली नाही.

दि.१४.०५.२००३ रोजी मेजर आर.व्ही.सिंग यांनी मनपास पत्र दिले आहे की, नवीन दराने जमीनीचा मोबदला रक्कम रु.१९,३३,८००/- भरणा करावा.

सन १९९७ ते २००३ पर्यंत या प्रकरणात ठोस निर्णय झालेला नाही. त्या परिसरात प्रामुख्याने अनाधिकृत वस्त्या निर्माण झाल्या आहेत.

या अनाधिकृत वस्तीची हद्द लष्कराच्या हद्दीत अगदी लागूनच आहे, जर खाजगी मिळकती धारकांने खाजगी प्लॉटींग करतांना दोन्ही हद्दीला लागून रस्ता सोडला असता तर ही वेळ निर्माण झाली नसती व मनपा हा भुर्दंड पडला नसता.

जरी या वस्त्या १९९५ पुर्वीच्या आहेत. तरी त्यांना नवीन शासनाच्या आदेशाप्रमाणे गुंठेवारी कायदा लागू आहे. यातून त्या वस्तीतून प्रत्येक प्लॉट धारकांकडुन रक्कम वसुल करावी व नंतर भरणा करावा असे मत आहे.

तरी सदरील बाबतीमध्ये धोरणात्मक निर्णय होणे करिता प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**मा.महापौर :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लष्कराच्या जमिनी लगतच महानगरपालिका हद्दीत अनधिकृत वसाहती झालेल्या आहेत. शासनाने गुंठेवारी कायदा लागू केल्याने लष्कराकडे भरणा करावी लागणारी रक्कम प्रत्येक भूखंडधारकांकडून वसुल करुन भरणा करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८९/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालयात महानगरपालिकेतर्फे विनंती करण्यांत आल्यानुसार श्री.रमेश मोतीलाल रुणवाल यांनी ५५१ नाणी संग्रहालयास दिलेल्या आहेत. संग्रहालयात नाणी दिल्यामुळे श्री.रुणवाल व

महानगरपालिकेमध्ये ५-११-२००१ रोजी करार करण्यांत आलेला आहे. करारातील अट क्र.१६ नुसार श्री.रुणवाल यांचे इच्छेप्रमाणे महानगरपालिका हद्दीत एका वर्षाला एक वेळ रु.२५,०००/- (रु.पंचवीस हजार) पर्यंतच्या खर्चाची सार्वजनिक विकासाची कामे करता येतील, असे नमूद आहे. या अटीनुसार श्री.रुणवाल यांनी अद्याप एकही विकासाचे काम सुचविलेले नाही. त्यांनी सुचविलेले काम करारानुसार करता येतील.

मा.सर्वसाधारण सभेचे दिनांक ०५.१०.२००२ विषय क्र.६११/१३ नुसार अप्रशासकीय ठराव पारित झाला आहे. जो की, श्री.रुणवाल यांनी मनपा सोबत केलेल्या कराराशी विसंगत आहे. पारित झालेल्या ठरावास तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेल्या असल्यामुळे ठराव क्र.६९१/१३ दिनांक ०५.१०.२००२ रद्द करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**डॉ.भागवत कराड :** विषय क्र.६९१/१३ कोणता त्यांची माहिती द्यावी.

**मुख्य लेखाधिकारी :** दिनांक ०५.१०.२००२ च्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र.६९१/१३ अशासकीय प्रस्ताव नगरसेवकांनी मांडला होता. श्री.रुणवाल यांचे सोबत महापालिकेने दिनांक ०५.११.२००१ रोजी करार केला. करारातील अट क्र.१६ नुसार श्री.रुणवाल यांचे इच्छेप्रमाणे महापालिका हद्दीत एका वर्षाला एक वेळ रु.२५,०००/- (रु.पंचवीस हजार) पर्यंतच्या खर्चाची सार्वजनिक विकासाची कामे करता येतील. असे नमूद आहे. दिनांक ०५.१०.२००२ रोजी मंजूर केलेला ठराव पारित झाला. ज्यात २५,०००/- रोखीने द्यावे असे आहे. श्री.रुणवाल यांनी महापालिका सोबत केलेल्या कराराशी विसंगत आहे. ठराव क्र.६९१/१३ हा प्रस्ताव रद्द करण्यास प्रस्ताव सादर आहे.

**श्री.प्रशांत देसरडा :** त्यांच्या कराराप्रमाणे देण्यांत यावे.

**मा.महापौर :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभा विषय क्र.६९१/१३ दिनांक ०५.१०.२००२ अन्वये पारित झालेला ठराव याद्वारे रद्द करण्यांत येतो व या प्रकरणांत झालेल्या करारनाम्याप्रमाणे कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९०/८ :**

उपआयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला की, महिला व बाल कल्याण समिती अंतर्गत गरजू महिलांना शिवणयंत्र देतांना लाभार्थीकडे किमान १ वर्षे कालावधीचे शासनमान्य शिवणकामाचे प्रशिक्षण यशस्वीरित्या उत्तीर्ण केल्याबद्दल शासकीय प्रमाणपत्राची प्रत असावी अशी अट दिनांक २०.१०.२००१ च्या सर्वसाधारण सभेमध्ये मान्य केलेली आहे.

महिला व बाल कल्याण समितीने दिनांक २३.०४.२००२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत पुढीलप्रमाणे प्रस्ताव मंजूर केला कारण एक वर्ष कालावधीचे शासनमान्य शिवणकामाचे प्रशिक्षण घेतलेल्या महिला (गरजू) कमी असून, सहा महिने कालावधीचे प्रशिक्षणे झालेल्या गरजू महिलांनाही शिवणयंत्र मंजूर करणे संदर्भाने सर्वसाधारण सभेच्या निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

**मा.महापौर :** ०१ वर्षाऐवजी ०६ महिने कालावधीचे प्रशिक्षण झालेल्या गरजू महिलांनाही शिवणयंत्र देण्यांस मान्यता देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महिला व बाल कल्याण समिती अंतर्गत गरजू महिलांना शिवणयंत्र देतांना लाभार्थीकडे १ वर्षाऐवजी ०६ महिने कालावधीचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केल्यानंतर शिवणयंत्र मंजूर करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९१/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांनी महापालिकेच्या महिला पालिका संदस्यांसाठी दिनांक १४ व १५ जुलै २००३ रोजी नवी दिल्ली येथे सभाशास्त्र व त्या संबंधी विषयावर दोन दिवसांचे प्रशिक्षण सत्र आयोजित केले आहे.

सदर प्रशिक्षण कालावधीत प्रत्येकी दोन हजार रुपये (रु.२,०००/-) प्रशिक्षण शुल्क आकारणी केली जाणार असून यात निवास, भोजन, चहापान, न्याहरी व वाचन साहित्य इत्यादींचा समावेश आहे. या शिवाय रेल्वेने प्रवास केल्यास सुमारे रु.३,६००/- प्रवास भाडे प्रत्येकी व प्रसंगानुरुप खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रशिक्षण सत्रास तीन ते चार महिला पालिका सदस्यांना पाठविणेस मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

**सौ.विजया रहाटकर :** सर्व महिला सदस्यांना जाणेस परवानगी देण्यांत यावी. ज्या-ज्या इच्छुक आहेत अशा सर्वांना पाठवावे. मा.महापौरांना त्यांचे अधिकार द्यावेत.

**मा.महापौर :** वरील दुरुस्ती सह प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यांत येतो. ज्या-ज्या सदस्यांना जायचे असेल. त्यांनी त्यांची नांवे विनाविलंब माझेकडे कळवावीत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १४ व १५ जुलै, २००३ या कालावधीत अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांनी नावे दिल्ली येथे आयोजित प्रशिक्षण शिबीरास ज्या ज्या महिला पालिका सदस्यांना जायचे असेल त्यांना पाठविण्यास, त्यांची नांवे निश्चित करण्याचा अधिकार मा.महापौरांना देण्यांस आणि येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९२/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांनी पालिका सदस्यांसाठी दिनांक २२ ते २४ जुलै, २००३ या कालावधीत जयपूर (राजस्थान) येथे नागरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधीचे उत्तरदायित्व व तत्सम विषयावर कार्यशाळा आयोजित केलेली आहे.

तसेच दिनांक २५ ते २७ ऑगस्ट, २००३ या कालावधीत मुंबई येथे जलस्त्रोत पुनर्भरण या विषयावर प्रशिक्षण सत्र आयोजित केले आहे.

वरील दोन्हीही प्रशिक्षण सत्रासाठी प्रशिक्षणाचे ठिकाणी राहण्याची व्यवस्था संस्थेतर्फे केलेली नसल्याने खर्च स्वत: करावा लागणार आहे. वरील प्रशिक्षण सत्रासाठी प्रत्येकी दोन पालिका सदस्यांची निवड करण्यासाठी व येणाऱ्या संभाव्य खर्चास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा.महापौर** : प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. प्रशिक्षणार्थी यांची नांवे निश्चित करुन देण्यांत येतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांनी पालिका सदस्यांसाठी दिनांक २२ ते २४ जुलै, २००३ या कालावधीत जयपूर (राजस्थान) येथे नागरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधीचे उत्तरदायित्व व तत्सम विषयावर आयोजित प्रशिक्षण सत्र या दोन्हीही प्रशिक्षणास प्रत्येकी दोन पालिका सदस्यांना पाठविणेस आणि त्यांची नावे मा.महापौर यांनी निश्चित करणे व प्रशिक्षणाकरिता येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळचा विषय</u>

**विषय क्र.९३/११ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, भारतीय लोक प्रशासन संस्थाने, नवि दिल्ली यांनी दिनांक २२ ते २४ जुलै, २००३ रोजी महानगरपालिका प्रशासनास पालिका सदस्यांचा सहभाग या विषयावर महापौर, उपमहापौर, व निर्वाचित पालिका सदस्यांसाठी चर्चासत्र (कान्फरन्स) विनामुल्य आयोजित केली आहे. तेथे राहण्याची व निवासाची व्यवस्था केली असून त्यासाठी प्रति दिवस प्रति व्यक्ती रु.२००/- शुल्क भरावे लागेल, शिवाय रेल्वेने प्रथम वर्ग प्रवासासाठी रु.३,६००/- प्रति व्यक्ती व इतर प्रसंगावधान खर्च मिळवून सुमारे रु.४,५००/- प्रति व्यक्ती खर्च अपेक्षित आहे. मा.महापौरांनी पदाधिकारी यांना पाठविण्याची शिफारस केली आहे. तरी सदर चर्चा सत्रात व पदाधिकारी यांना पाठविण्यासाठी संभाव्य खर्चाच्या मंजूरीसह प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा.महापौर** : सदरील प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो. नगर सचिव यांनी किंवा एका कर्मचाऱ्यांने आवश्यकता वाटल्यास पदाधिकाऱ्यांसोबत जावे.

**ठराव क्र.९३/११ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अखिल भारतीय लोक प्रशासन संस्थात, नवी दिल्ली यांनी दिनांक २२ ते २४ जुलै, २००३ रोजी महानगरपालिका प्रशासनास पालिका सदस्यांचा सहभाग या विषयावर दिल्ली येथे आयोजित प्रशिक्षणात इच्छुक पदाधिकारी यांना सहभाग

घेणेसाठी आणि नगरसचिव किंवा एका कर्मचाऱ्यास आवश्यक वाटल्यास जाण्यास व येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र.९४/१ :**

प्रभाग समिती अंतर्गत येणाऱ्या विविध वार्डातील फुटकळ विकास कामे करण्यासाठी सन २००२-०३ वर्षाच्या अर्थसंकल्पात १५ लाख रक्कमेची तरतूद करण्यात आली होती. प्रभागा अंतर्गत येणाऱ्या सर्व वार्डासाठी सन्माननीय सदस्यांना प्रत्येकी ७५ हजार रु. रक्कम अखत्यारित फुटकल काम करण्यासाठी वापरण्यांत आली. सदरील कामे हे लेखा विभागातून निर्देशित केल्यानुसारच करण्यात आली. परंतू सन २००३-०४ च्या वर्षाच्या अर्थसंकल्पात प्रभाग समितींना १५ लाख रुपये रक्कमेच्या विकास कामे करणे बाबत कुठलीही तरतूद करण्यांत आली नाही. करिता प्रभाग समिती सभापतींना १५ लाख रुपये पर्यंतची विकास कामे करण्याचा अधिकार देणे बाबत तरतूद सन २००३-०४ च्या अर्थसंकल्पात करण्यात यावी. बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**सुचक :** श्री.नंदकुमार फुलारी,<br>
**अनुमोदक :** श्रीमती पार्वती मानकापे,<br>
सौ निखत परवीन ईजाज अली,<br>
श्री. मोहम्मंद जावेद मोहमंद इसहाक.

**संवाद :**<br>
**मा.महापौर** : मंजूरी देण्यांत येते.

**ठराव क्र.९४/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००३-०४ या वर्षातच्या अर्थसंकल्पात प्रभाग समितीचा विकास कामे करण्यांबाबत मागील आर्थिक वर्षाप्रमाणे तरतूद ठेवण्यांत आलेली नसल्याने प्रभाग समितींना या आर्थिक वर्षात रु.१५ लाख पर्यंतची विकास कामे करण्याची तरतूद करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९५/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये शहर सुधार समिती, आरोग्य समिती, शिक्षण समिती व गलिच्छ वस्ती निर्मूलन व समाज कल्याण समिती निर्माण करुन सभापतींची निवड झालेली आहे. तथापि सभापतींना बसण्याकरिता दालन, फर्निचर, आवश्यक कर्मचारी वर्ग, तसेच चहापानाकरिता मासिक खर्चास मंजूरी दिलेली नाही. करिता वरीलप्रमाणे खर्चास मंजूरी देऊन आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन द्यावा.

त्याचप्रमाणे नवनिर्वाचित समितीचे सदस्यांना महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकेमध्ये समितीत्यांचे चालणाऱ्या कामकाजाचे अभ्यास करिता व माहिती घेण्यासाठी इतर महानगरपालिका भेटी देण्यास्तव अभ्यास दौरा आयोजित करण्यास तसेच या दौऱ्याकरिता येणाऱ्या खर्चास मंजूरी देण्याकरिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.भरत लकडे,
श्री.भाऊसाहेब वाघ.
**अनुमोदक :** सौ.जयश्री मोरे,
सौ.साधना सुरडकर.

**संवाद :**
**डॉ.भागवत कराड :** चार विशेष समित्यांच्या सभापतींना चहापान करिता मासिक खर्चास मंजूरी देण्यांत यावी. त्याचप्रमाणे महिला व बाल कल्याण समिती उप-सभापती यांना सुध्दा चहापान मासिक खर्चास मान्यता देण्यांत यावी.
**मा.महापौर :** दुरुस्तीसह प्रस्तावास मान्यता देण्यांत येते.

**ठराव क्र.९५/२ :**
प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे शहर सुधार समिती, आरोग्य समिती, शिक्षण समिती व गलिच्छ वस्ती निर्मूलन व समाज कल्याण समिती सभापती यांचे दालनावर फर्निचर आणि आवश्यक कर्मचारी वर्ग व अभ्यंगतासाठी मासिक खर्चास तसेच अभ्यास दौरा आयोजित करण्यास आणि येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच उपसभापती, महिला व बाल कल्याण समिती यांचे कडील अभ्यगंतासाठी येणाऱ्या मासिक खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९६/३ :**
प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, समर्थनगर भागात वाचनालयासाठी ईमारत उभारणेचे कामाचा समावेश अंदाजपत्रक करण्यांत आलेला आहे. येथील रहिवाश्यांनी या भागात वाचनालयाऐवजी जिम्नॅशियम हॉल किंवा व्यायामशाळा बांधणे बाबत मागणी केली आहे. या भागात व्यायाम शाळा नसल्यामुळे रहिवाश्यांची अत्यंत गैरसोय होत आहे.
रहिवाश्यांची मागणी व गैरसोय विचारात घेता या भागात वाचनालयासाठी इमारत बांधणे ऐवजी जिम्नॅशिअम हॉल अथवा व्यायाम शाळा उभारणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.
**सुचक :** श्री.आनंद तांदुळवाडीकर
**अनुमोदक :** श्री.अब्दुल रशिद अब्दुल सत्तार,
श्री.प्रकाश निकाळजे.

**संवाद :**
**मा.महापौर :** प्रस्तावास मान्यता देण्यांत येते.

**ठराव क्र.९६/३ :**
प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, समर्थनगर भागात वाचनालयासाठी इमारत उभारणेचा अंदाजपत्रकात समावेश करण्यांत आलेला आहे. त्याऐवजी जिम्नॅशियम हॉल अथवा व्यायाम शाळा उभारणे अशी दुरुस्ती करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९७/४ :**

महानगरपालिकेमार्फत महापालिका हद्दीतील मिळकत धारकांकडे थकीत असलेल्या मालमत्ता कर व पाणीपट्टीवर व्याज आकारणेत येत आहे. व्याज आकारणी करणे बाबत यापुर्वी ठराव मंजूरी करण्यांत आलेला आहे. बऱ्याच मालमत्ता धारकांची प्रकरणे कित्येक वर्षापासून न्यायप्रविष्ट आहेत.

मालमत्ता कर व पाणीपट्टी वरील थकीत रकमेवर व्याज आकारणी करणे बाबतची तरतूद मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात नाही. त्यामुळे यापुर्वी अशा थकीत रकमेवर व्याज आकारणी करणे बाबत घेण्यात आलेला निर्णय योग्य वाटत नाही. व्याज आकारणी करणे बाबत यापुर्वी सभागृहाचे पारित केलेला ठराव विखंडीत करण्यात यावा.

मालमत्ता कर व पाणीपट्टी वरील व्याज आकारणे बंद केल्यास बहुतांशी मालमत्ता धारक थकबाकीची रक्कम टप्पा टप्प्याने भरतील जेणेकरुन मालमत्ता कर व पाणीपट्टी व वसुली वाढेल व त्यामुळे महापालिकेच्या दैनंदिन कर वसुलीत वाढ होईल. व उत्पन्नात भर पडेल. मालमत्ता कर पाणीपट्टीवरील आकारण्यांत येणारे व्याज रद्द करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.आनंद तांदुळवाडीकर,

**अनुमोदक :** श्री.अब्दुल रशिद अब्दुल सत्तार,

श्री.प्रकाश निकाळजे.

**संवाद :**

**डॉ.भागवत कराड :** जे नागरिक रेग्युलर मालमत्ता कर थकीत नाही. त्यांचेसाठी काहींना काही व्याज आकारणे गरजेचे आहे. आकारले नाही तर ते देखिल भरणार नाही. ठराव मंजूर करावयाचा असेल तर जे रेग्युलर भरतात त्यांना १०% सुट देण्यांत यावी.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर :** मालमत्ता कर/पाणी पट्टी थकीत रक्कमेवर व्याज आकारण्याचा निर्णय यापुर्वीच घेतलेला आहे. त्यानंतर वसुलीच्या बैठकीत व्याज लावण्यात येऊ नये असा निर्णय झाला. मागील सर्वसाधारण सभेत व्याज आकारण्यांत येते, म्हणून चर्चा झाली त्यावर स्वतंत्र प्रस्ताव द्यावा असे मत प्रशासनाने व्यक्त केले, त्यानुसार प्रस्ताव सादर केलेला असून नियमाप्रमाणे थकीत रक्कमेवर व्याज आकारणी करु शकत नाही. ॲक्ट मध्ये नाही. व्याज माफ होणार अशा बातम्या वृत्तपत्रात आल्या आहेत. ठराव मंजूर करण्यांत यावा.

**श्री.प्रशांत देसरडा :** आपण सर्व महापालिकेचे ट्रस्टी आहोत. महापालिकेचे हित जोपासने व जनतेची कामे करणे ही जबाबदारी आपली सर्वांचीच आहे. जे रेग्युलर भरणार नाही, त्यांचेसाठी काहींना काही व्याज आकारणे योग्य होईल जे भरतात त्यांचेसाठी सवलत द्यावी. एक झोन अधिकाऱ्यांचे वैयक्तिक मत घेतले असता व्याज आकारणी होते. म्हणून जास्त वसुली झालेली आहे. किती लावावयाचे हा मुद्दा वेगळा.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर :** मालमत्ता कर कुणी भरीत नसतील तर मालमत्ता जप्त करता येतात. जो कुणी नळपट्टी भरणार नाही. तर नळ कट करता येते. परंतू नियमानुसार थकीत रक्कमेवर व्याज आकारणे योग्य नाही. प्रस्ताव योग्य असून मान्य करावा. व्याज न आकारल्यास वसुल जास्त होऊ शकते.

**डॉ.भागवत कराड :** व्याज आकारणी केली नाही. तर जे रेग्युलर कर भरतात ते सुध्दा नागरिक करु भरणा करणार नाही. व्याजाची भिंती असते म्हणून लोक भरतील.

**श्री.प्रशांत देसरडा :** जे रेग्युलर भरतात, त्यांना १५% सवलत द्यावी.

**श्री.विकास जैन :** महापालिका ही सेवा भावी संस्था आहे. जनतेकडुन पैसा जमा करुनच शहरातील विकास कामे महापालिकेमार्फत केले जाते. मालमत्ता कर/पाणीपट्टी कराव्या संदर्भात काही प्रकरणे न्यायप्रविष्ट झालेली आहे. महापालिकेला त्यामुळे तुट सहन करावी लागते. येणारे उत्पन्न येत नाही. व्याज आकारणी केल्यास आणखी प्रकरणे वाढतील न्यायप्रविष्ट असलेली प्रकरणे तात्काळ निकाली काढावी. महापालिकेचे उत्पन्न वाढेल. तसेच जास्तीत वसुली होण्यासाठी शासनाकडून उपआयुक्त दर्जाचे अधिकारी येणार होते. ते तात्काळ बोलविण्यांत येऊन महापालिका ही जनतेच्या अडी अडचणी विकास कामाच्या माध्यमातून कामे करीत असते. व्याज आकारणी करु नये, यापुर्वी ठराव घेतला होता तो चर्चेद्वारे निर्णय होता आज स्वतंत्र ठराव प्राप्त झाला. नियमानुसार ज्यात आकारणी करु शकत नाही. म्हणून आता पर्यंत जे व्याज आकारण्यात आले. वसुल करण्यांत आले ते चालु वर्षाच्या बिलातून वजा करुन बिल देण्यांत यावे. व्याजाची रक्कम स्विकारु नये. ज्याचा विरोध असेल त्याचा विरोध नोंदवावा. ठराव मंजूर करण्यांत यावा.

**सौ.विजय रहाटकर :** आपण सर्व महापालिकेचे हितचिंतक आहोत. चांगले निर्णय घेण्याचा आपणास अधिकार आहे. सर्वात समान हक्क कसे देता येईल. हे बघणे गरजेचे आहे. मालमत्ता कर/पाणीपट्टीच्या संदर्भात अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट आहे. महापालिकेला त्या नागरिकांकडुन काही आर्थिक फायदा नसतांना उलट प्रकरणामध्ये महापालिकेचा खर्च होतो. व जे रेग्युलर भरतात. त्यांचेवर व्याज आकारणी करु नये. परंतू जे रेग्युलर भरणार नाही. त्यांना व्याज आकारणी करण्यांत यावी. नसता जे रेग्युलर भरतात त्यांचेवर अन्याय होणार आहे. आपण कोण्याही एका पक्षाचे महापौर नाहीत. निर्णय घेतांना सभागृहाचे मत लक्षात घेऊन निर्णय घेण्यांत यावा. महापालिकेच्या हिताचा निर्णय घेण्यांत यावा. चुकीचा पायंडा पाडू नये.

**श्री.तकीहसन खान :** कार्यवाही कोणाच्याही मर्जीने करता येत नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४१ प्रमाणे डिमांड बील त्यात फक्त ५० पैसे दंड त्यानंतर मालमत्ता जप्त करणेची कार्यवाही करता येते. व्याज आकारणे नियमाने बरोबर नाही.

**श्री.प्रशांत देसरडा :** १५% व्याज आकारणी होते. ते कमी करुन जे रेग्युलर भरतात. त्यांचेसाठी १०% सुट देण्यांत यावी.

**मा.महापौर :** जे रेग्युलर व जून जुलै महिन्यात टॅक्स भरतात. त्यांचेसाठी ५% सुट देण्यांत यावी. प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव क्र.९७/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मालमत्ता कर व पाणी पट्टीच्या थकी बिलावर व्याज आकारणी करणे बाबतचा यापुर्वी पारित केलेला ठराव रद्द करण्यास व जे भोगवटाधारक जून व जुलै महिन्यात मालमत्ता कर व पाणी पट्टीचा भरणा करतील. त्यांना चालु वर्षीच्या मागणी रक्कमेवर ५% सुट देण्यास बहुमताने मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९८/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराची सुधारित विकास योजना मंजूर झाली. त्यात किलेअर्क येथील काला दरवाजा लम्प, विद्यमान ३० मीटर क्षेत्र ०.५३ हे जमीन नियोजित ३५ मीटर रुंद रस्त्यालगत सि.टी.स.क्र.३७४२ ची जमीन आरक्षण क्र.८ उद्यानासाठी आरक्षित केलेली आहे.

या परिसरात अनेक सरकारी जागा आहेत. उदा.शासकीय कला महाविद्यालय, शिवाजी मैदान, जिल्हाधिकारी यांचे निवासाच्या लगत असलेली जमीन तसेच नेहरु बालोद्यान, छत्रपती शिवाजी वास्तुसंग्रहालय डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र शिवाय या जागे लगतच मोठे कब्रस्तान आहे. १०० फुट रुंद रस्ता आहे. उत्तरेस नव्यानेच महाविद्यालय झाले असून त्यांचे भव्य क्रिडांगण आहे.

विकास योजनेत उद्यानाचे आरक्षणाचा उद्देश खेळती हवा, सुर्यप्रकाश आहे. या परिसरात गरजेपेक्षा जास्त खुली जागा, क्रिडांगणे, बगीचा, शासकीय पडीक जमीन, कब्रस्तानची जमीन व इत्यादी असल्याने हा उद्देश सफल होतो. शिवाय नेहरु उद्यान, सलीम अली सरोवर, हिमायत बाग, शासकीय महाविद्यालयाचे उद्यान ई मुळे उद्यानाचा उद्देशही सफल होत असल्याने व या परिसरातील जनतेला उद्यानाची व्यवस्था आहे. ज्या कारणासाठी आरक्षण प्रस्तावित केले. त्या उद्देशाची पुर्ती होत असल्याने आता नव्याने आरक्षणाखालील जमीन खरेदी करणे, विकास करणे व संरक्षण करणे इत्यादीवर कोट्यावधी खर्च येईल. व आज महानगरपालिकेला अनेक खरेदी सुचना मिळत आहेत. ती आरक्षणे देखील निधी अभावी संपादन करता येत नाही. सबब वरील सर्व बाबींचा विचार करुन लगतचे जमीन वापराप्रमाणे प्रस्तावित आरक्षण क्र.८ उद्यानाखालील संपूर्ण जागा आरक्षणातून वगळून निवास भागात सामील करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्यास तसेच सदर कार्यवाही अंतर्गत अधिसूचना काढणे, हितसंबंधितांना सुचनाही देणे व परिपूर्ण प्रस्ताव शासनास पाठविण्याचे अधिकार मा.आयुक्तांना प्रदान करणेसाठी प्रस्ताव सर्वासाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**सुचक :** श्री.रतनकुमार पंडागळे,
**अनुमोदक :** श्री.संजय शिरसाट.

**संवाद :**

**मा.महापौर :** या प्रस्तावासह विषय क्र.६ व ७ यास स्विकृतीसह मंजूर करण्यांत येते. व विषय क्र.८ नामंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किलेअर्क येथील काला दरवाजा जवळ नियोजित ३५ मीटर रुंद रस्त्यालगत सी.टी.एस.क्र.३७४२ या जमिनीवरील औरंगाबाद शहर सुधारित विकासउ योजने अंतर्गत उद्यानासाठी आरक्षित असलेली प्रस्तावित आरक्षण क्रमांक ८ खालील संपूर्ण जागा आरक्षणातून वगळून निवास भागात सामील करण्यास बहुमताने स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्यास तसेच सदर कार्यवाही अंतर्गत अधिसूचना काढणे, हितसंबंधांना सूचना देणे व परिपूर्ण प्रस्ताव शासनास पाठविण्याचे अधिकार मा.आयुक्तांना प्रदान करण्यांत येतात.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९९/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहराची मंजूर विकास योजना १९७५ (जुनी हद्द) यामध्ये मौजे शहानुरवाडी येथील स.नं.१२/भाग ही मिळकत आरक्षण क्रमांक २६७ धोबीघाट या आरक्षणासाठी राखीव असेलली जमीन खाजगी वाटाघाटीने संपादित करण्यात आली. मागील १८ वर्षात धोबीघाट या आरक्षणासाठी संपादित जमीनीपैकी केवळ ४% जमीन याच कारणासाठी वापरात आली असून उर्वरीत जमीनीचा वापर विकास योजनेत आरक्षित केलेल्या उद्देशापेक्षा वेगळा केला जात आहे.

सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित केलेली जमीन त्याच सार्वजनिक उद्देशासाठी वापरणे बंधनकारक आहे. परंतू या आरक्षणाखालील संपादित जमिनीचा वापर वेगळा केलेला नाही. तसेच औरंगाबाद शहराची विकास योजना सुधारणा करतांना या आरक्षणाच्या वापरात बदल करण्यांत आला. असून संपादित जमीन ज्या उद्देशासाठी ताब्यात घेतली आहे. तो बदलून वाणिज्य उपयोगी सुविधा केंद्रासाठी नव्याने तीच जागा आरक्षित केली आहे. तसेच पीरबाजार या आठवडी बाजारासाठी व धोबीघाट करता उपलब्ध होऊ शकत नाही. या जमिनीपोटी कुठलाही मोबदला मुळ मालकाने घेतला नाही. संपादित जमिनीबाबत वाढीव मोबदला मिळण्याकरिता संबंधी जमीन मालकाने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केलेली असून त्यामध्ये वाढी जमीन मालकास महानगरपालिकेस नव्याने दिड ते दोन कोटी रुपयांचा आर्थिक बोजा पडणार आहे. तसेच मुळ जमीन मालकांची संमती न घेता संपादित जमिनीचा उद्देश बदलण्यात आला. या कारणासाठी प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

महानगरपालिकेच्या ताब्यातील सर्वच जमीन जाण्याची शक्यता आहे. तसेच १८ वर्षापर्यंत सार्वजनिक प्रयोजनासाठी या जमिनीचा वापर केला नसल्याने जमीन मालकास इतर कायदेशिर मार्गाने जमीन परत मिळविण्याचा मार्ग सुखकर झाला आहे. अशा परिस्थितीत महानगरपालिकेवर कोणताही आर्थिक बोजा पडू नये व ताब्यातील व सध्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे. तितकी जमीन ताब्यात रहावी व करिता संबंधित जमीन मालकाशी वाटाघाटी करणे आवश्यक आहे. अशा वाटाघाटीने जमीनमालक २५% जमीन विना मोबदला विना अट महानगरपालिकेच्या ताब्यात देत असल्यास व सर्वच स्तरावरील न्यायालयातून महानगरपालिकेच्या विरुध्दची प्रकरणे मागे घेत असल्यास या जमिनीपैकी ७५% जमीन राज्य शासनाच्या शासननिर्णय क्रमांक IRI/३४७३/HL दि.१०.१०.१९७३ मधील तरतुदीनुसार मुळ जमीन मालकास परत करण्यात यावी. व या जमिनीचा वापर रहिवास उपयोगी करणे बाबत प्रशासनाकडून महाराष्ट्र व प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करण्यात यावी. वरीलप्रमाणे किरकोळ फेरबदलाची कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवण्यास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना अनुमती देण्यांत येत असून पुढील वैधानिक कार्यवाही मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबादयांनी पुर्ण करावी. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.प्रकाश निकाळजे,
**अनुमोदक :** श्री.अब्दुल रशिद अब्दुल सत्तार,
श्री.आनंद तांदुळवाडीकर.

**संवाद :**
**मा.महापौर :** या प्रस्तावास स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराची मंजूर विकास योजना १९७५ (जुनी हद्द) सर्व्हे क्र.१२/भाग शहानुरवाडी आरक्षण क्रमांक २६७ धोबीघाट यासाठी आरक्षित असून खाजगी वाटाघाटीने संपादित केलेले असून विकास योजना सुधारित मध्ये सदर जागा सुविधा केंद्रासाठी आरक्षित केलेली आहे. सदर आरक्षणाखाली २५% जमीन विना मोबदला, विना अट, वाटाघाटीने महानगरपालिकेच्या ताब्यात देत असल्यास व सर्व स्तरावरील न्यायालयातून महानगरपालिकेच्या विरुध्द प्रकरणे मागे घेत असल्यास या जमीनी पैकी ७५% जमीन शासन निर्णय क्रमांक आय.आर.आय/३४७३/एच.एल.दि.१०.१०.१९७३ मध्ये तरतूदीनुसार मुळ जमीन मालकास परत करण्यास आणि महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार किरकोळ फेरबद्दल करण्याची कार्यवाही करण्यास बहुमताने स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. तसेच सदर किरकोळ बदलाची आवश्यक असलेली कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्याचे अधिकार आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांना प्रदान करण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१००/७ :**

औरंगाबाद म.न.पा. मध्ये अनधिकृत नळ अधिकृत करण्याची मोहिम राबवून देखील अनेक नळे अनधिकृत वापरात असल्याचे दिसून येते. त्यामुळे म.न.पा. चे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच अनधिकृत नळे शोध मोहिम घेऊन देखील पुर्णतः सफलता मिळाली नाही. असे निदर्शनास येते. करिता प्रस्ताव सादर करण्यांत येते की, ज्या भागामध्ये किंवा ज्या परिसरामध्ये म.न.पा. ने जलवाहिन्या टाकलेल्या आहेत. तेथे संपूर्ण मालमत्तांना मालमत्ता करा बरोबरच नळपट्टी देखील आकारण्यांत यावी. मालमत्ता कराच्या डिमांड नोटीसी बरोबरच नळपट्टीची डिमांड नोटीस पाठविण्यांत यावी किंवा मालमत्ता कराच्या डिमांड नोटीसामध्येच नळपट्टीचा समावेश करावा. ज्यामुळे अनधिकृत नळाचा प्रश्न सुटेल. शोध मोहिमेवर होणारा प्रशासनाचा खर्च वाचेल. तसेच इमाने-इतबारे नियमित नळपट्टी अदा करणाऱ्या मालमत्ता धारकांवर दरवाढीचा अतिरिक्त बोजा लादला जाणार नाही. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर.

**सुचक :** सौ.सिद्दीकी नईम सुलताना,
**अनुमोदक :** श्री.किशोर तुळशीबागवाले,
श्री.अब्दुल रशिद अब्दुल सत्तार.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अनधिकृत नळ जोडणीवर आळा घालण्यासाठी ज्या परिसरामध्ये महानगरपालिकेच्या जलवाहिन्या टाकलेल्या आहे, अशा भागातील संपूर्ण मिळकतींना मालमत्ता करा बरोबर नळपट्टी देखील आकारण्यास आणि मालमत्ता कराच्या डिमॉट नोटीसी बरोबरच नळपट्टीची डिमांड नोटीस पाठविणे किंवा मालमत्ता कराच्या डिमांड नोटीस मध्येच नळपट्टीचा समावेश करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०१/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी कमी असल्याने महापालिकेच्या आस्थापनेवरील पात्र, अनुभवी/जेष्ठ अधिकाऱ्यामधून उपआयुक्त (म.) आणि करमूल्य निर्धारक व संकलक ही पदे भरण्यात येऊन

सदरील पदावर प्रतिनियुक्तीने अधिकारी न पाठविणे बाबत शासनास कळविणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.
**सुचक :** श्री.अ.रशिद अ.सत्तार,
**अनुमोदक :** श्री.प्रकाश निकाळजे,
श्री.दलबिरसिंग जबिंदा.

**संवाद :**
**मा.महापौर :** नामंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**
सदरील विषय सर्वानुमते नामंजूर करण्यांत येतो.

**संवाद :**
**श्री.प्रशांत देसरडा :** विषय क्र.६ मंजूर करण्यांत येऊ नये. महापालिकेचे हित लक्षात घ्यावे. प्रस्ताव रद्द करण्यांत यावा. नसता आमच्या सर्व भाजप सदस्यांचा यास विरोध आहे.
**डॉ.भागवत कराड :** हा विषय मंजूर करण्यांत येऊ नये. महापालिकेच्या फायद्याचा निर्णय घेण्यांत यावा.
**डॉ.जगदीश सिध्द :** माझा आक्षेप आहे, या प्रकरणात कोर्टात पैसे जमा केलेले आहे.
**मा.महापौर :** प्रस्ताव क्र.६ मंजूर केलेला आहे.

(यावेळी मा.महापौर डायस समोर काही स.सभासद मोठमोठ्याने बोलतात. काहीही ऐकू येत नाही.)

<u>**प्रश्नोत्तरे**</u>

<u>सौ.सिद्दीकी नईम सुलताना, नगरसेविका</u>

**प्रश्न क्र.१४७ :**

**अ)** औरंगाबाद टाईम्स कॉलनी मंजूर रेखांकनातील एकूण प्लॉट किती? प्रत्येकी क्षेत्र किती? रेखांकनाची मुळ संचिका महानगरपालिका कार्यालयास उपलब्ध आहे का? असेल तर मुळ नकाशाची प्रत का देण्यांत येत नाही? नसेल तर मुख्य संचिका कोठे व कशाकरिता देण्यांत आली? परत कधी मागविणार? रेखांकनाची मुळ संचिका उपलब्ध नसल्यास या रेखांकनातील प्लॉट धारकांनी बांधकाम परवानगी मागविण्यांस देता येईल का? सविस्तर माहिती देण्यांत यावी.

**उत्तर :** <u>सहाय्यक संचालक, नगर रचना :</u> औरंगाबाद टाईम्स कॉलनी या रेखांकनाची संचिका शोधण्याचे काम चालू आहे. संचिका उपलब्ध होताच माहिती पुरविण्यांत येईल.

**ब)** चंपा मस्जिद ते भुमी अभिलेख कार्यालयाकडे जाणाऱ्या विकास रस्त्याची रुंदी किती? या रस्त्याकरिता एकूण किती जागा संपादन करण्यांत आली? मोबदला

देण्यात आला का/ पुनर्वसन करण्यांत आले का? पुनर्वसन केल्यानंतर देखील काही लोकांनी रस्त्यावरच अतिक्रमण केलेले आहे हे खरे आहे काय? संपादित केल्याप्रमाणे सध्या रस्ता अस्तित्वात आहे का? अतिक्रमण झालेले आहे का? अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करणार का? सविस्तर माहिती देण्यांत यावी.

**उत्तर :** चंपा मस्जिद ते भुमी अभिलेख कार्यालय (दमडीमहल) हा मंजूर विकास योजनेनुसार १०० फुट रुंदीचा रस्ता आहे. सदर रस्त्याने बाधित शहाबाजार येथील मिळकत धारकांचे मजनुहिल येथे महानगरपालिकेतर्फे पुनर्वसन करुन दिलेले आहेत. तथापि काही लोकांनी रस्त्या लगत तात्पुरते स्वरुपाचे ओटे, पत्राचे शेड असे अतिक्रमण केलेले दिसून येते. उक्त रस्त्यालगत वरीलप्रमाणे झालेले ७ ते ८ अतिक्रमण काढणेसाठी प्रशासकीय अधिकारी यांना कळविण्यांत आले आहे.

**क)** रविंद्र नगर (रोशनगेट प्रभागातील) मंजूर रेखांकनातील एकूण प्लॉट किती? प्रत्येकी क्षेत्र किती? खुल्या जागा किती? प्रत्येकी क्षेत्र किती? रविंद्रनगर रेखांकनातील खुल्या जागावर अतिक्रमण झालेले आहे का? अतिक्रमण हटविण्याची जबाबदारी कुणाची? अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करणार का? कधी? सविस्तर माहिती देण्यांत यावी.

**उत्तर :** रविंद्र नगर (रोषनगेट प्रभागातील) मंजूर रेखांकनातील एकूण प्लॉट ४० आहेत. सर्व प्लॉट वेगवेगळ्या क्षेत्राचे आहेत. (सोबत सुलभ संदर्भासाठी अवलोकनार्थ सदर रेखांकनाची झेरॉक्स प्रत देत आहेत.) रेखांकनातील खुल्या जागा दोन ठिकाणी सोडण्यात आल्या आहेत. तसेच Lawn ची खुली जागा सुध्दा सोडली आहे. सदर रेखांकन सहाय्यक संचालक, नगर रचना यांच्या कार्यालयातर्फे AGD/१-C/VII/१४१२/६६ अन्वये मंजूर झालेले असून नकाशावर खुल्या जागेचे क्षेत्र नमूद केलेले नाही.

**ड)** रविंद्रनगर झोपडपट्टीमधील समाजमंदिर भाडेपट्ट्याने देण्यात आले का? या समाजमंदिरमध्ये अतिक्रमण करण्यात आले का? समाज मंदिराच्या देखभालीची जबाबदारी कुणाची? अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करणार का? कधी? सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर :** उपआयुक्त (म.) (मालमत्ता अधिकारी)

उपरोक्त विषयांकित प्रकरणी सविनय माहिती सादर करण्यांत येते की, मो.रविंद्रनगर या मंजूर रेखांकनातील खुल्या जागा एकूण तीन सोडण्यांत आलेल्या होत्या. त्याबाबत माहिती याप्रमाणे.

| | |
|---|---|
| १. न.भु.क्र.-११२७१ | क्षेत्र १०००.५ चौ.मी. |
| २. न.भु.क्र.-११२५८ | क्षेत्र १३६८.३५ चौ.मी. |
| ३. न.भु.क्र.-११२७२ | क्षेत्र १७६.२५ चौ.मी. |

उपरोक्त प्रमाणे रविंद्रनगर या रेखांकनातील खुल्या जागा असून न.भु.क्र.११२७१, ११२७२ या दोन्ही जागावर कुठल्याही प्रकारचे अतिक्रमण नसून त्यापैकी न.भु.क्र.११२५८ क्षेत्र १३६८.३५ पुर्णपणे अनधिकृत वसाहतीचे अतिक्रमण आहे. याच खुल्या जागेवर समाज मंदिर असून त्या समाज मंदिरामध्ये विभाग क्र.४ मधील कर्मचारी श्रीमती तुळसाबाई रमेश साळवे हे राहत आहेत.

सदर समाज मंदिर झोन क्र.८ यांचे कडे देखरेखीसाठी देण्यांत आलेले आहे. दिनांक १७.०६.२००३ रोजी स्थळ पाहणी केली असता सदर समाज मंदिरात श्रीमती

तुळसाबाई रमेश साळवे मजूरीन ही रहाते. त्यांना त्वरीत समाज मंदिर रिक्त करण्यासाठी नोटीस देण्यांत आली आहे.

**इ)** सिटी चौक ते जुनाबाजार रस्ता रुंदीकरणाचे शिट क्र.४१ मधील सि.स.नं.३४४०,३४६७,३४६८ आणि ३४६९ मधील जागा संपादन करण्यांत आली का/ जागेचा मोबदला देण्यांत आला का? किती? मोबदला दिल्यानंतर जागेचा ताबा घेण्यात आला का? नसेल तर मा.न्यायालयाने स्थगिती आदेश दिला का? ताबा घेण्यासंबंधी काही कायदेशीर अडचणी निर्माण होत आहे का? सविस्तर माहिती देण्यांत यावी.

**उत्तर :** सहाय्यक संचालक, नगर रचना : न.भु.क्र.३४४०, ३४६७, ३४६८ व ३४६९ या मिळकती पैकी न.भु.क्र.३४४० व ३४६७ चे बांधित क्षेत्र अनुक्रमे ७१.५० चौ.मी. व ४०.५० चौ.मी. क्षेत्राचा मोबदला देऊन संपादन केलेले आहे. न.भु.क्र.३४६८ व ३४६९ चे बाधीत क्षेत्र संपादन केलेले नाहीत. संपादित केलेल्या वरील मिळकती पैकी ३४६७ बांधित क्षेत्रावरील बांधकाम प्रशासकीय विभागामार्फत काढण्यात आलेले आहे. उर्वरीत संपादित मिळकतीचे बांधित क्षेत्र काढण्यासाठी प्रशासकीय अधिकारी यांना कळविण्यांत आले असून बांधित क्षेत्राचे सिमांकन करुन दिलेले आहे.

श्री.संजय शिरसाट, नगरसेवक

**प्रश्न क्र.१४८ :** महानगरपालिका अस्थापनेवर वर्ग-१ व वर्ग-२ संवर्गामधील एकूण किती अधिकाऱ्यांची पदे सध्या रिक्त आहेत. अशी कोणकोणती पदे सध्या रिक्त आहेत. अशा अधिकाऱ्यांची ही पदे केव्हापासून रिक्त आहेत. रिक्त पदांवर अधिकाऱ्यांची नियुक्ती केव्हा करणार आहात. अशा अधिकाऱ्यांची पदे रिक्त ठेवण्याचे कारण काय?

महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग-१ व वर्ग-२ संवर्गातील एकूण किती पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे देण्यात आलेला आहे. अशा पदांचा अतिरिक्त कार्यभार त्या त्या अधिकाऱ्यांकडे केव्हा पासून देण्यांत आलेला आहे. नियमानुसार एका अधिकाऱ्यांकडे एकूण किती महिने एखाद्या पदाचा अतिरिक्त कार्यभार ठेवता येतो? संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्षानुवर्षापासून असा अन्य विभागाचा अतिरिक्त कार्यभार ठेवण्याचे कारण काय? या अधिकाऱ्यांकडे अन्य विभागांचा अतिरिक्त कार्यभार कोणत्या नियमान्वये देण्यांत आला. अधिकाऱ्यांकडे असलेल्या अतिरिक्त कार्यभार देण्याची मुदत किती वेळा वाढविता येते. अशा रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे न देता अथवा या पदांवर पदोन्नती देऊन नवीन पात्र अधिकारी नियुक्त न करण्याचे कारण काय? अशा पदांवर पुर्ण वेळ सक्षम अधिकारी केव्हा नियुक्त करणार आहात? सध्या असलेल्या अन्य विभागांचा अतिरिक्त कार्यभार केव्हा काढणार आहात?

अधिकाऱ्यांचे सध्या रिक्त असलेल्या पदांबाबत तसेच अतिरिक्त कार्यभार असलेल्या पदांबाबत विहित आकडेवारी व आपले अभिप्रायासह सविस्तर माहिती सभागृहात सादर करण्यांत यावी.

**उत्तर :** उपआयुक्त (प्र.)

महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग-१ व वर्ग-२ संवर्गातील खालील पदे/अतिरिक्त कार्यभार दिल्याची तारिख/अतिरिक्त कार्यभार दिलेल्या अधिकाऱ्यांचे नांव -

| अ. | पदनाम | रिक्त | पद रिक्त | अतिरिक्त कार्यभार | पद रिक्त असल्याची | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|

| क्र. | | पदे | असल्याचा कालावधी | दिलेल्या अधिकाऱ्यांचे नांव, पदनाम व दिनांक | कारणे | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्य लेखापरिक्षक | ०१ | २६.०५.२००३ | श्री.एम.पी.खैरनार, मुख्य लेखाधिकारी, दि.२६.०२.२००३ | मा.सर्वसाधारण सभेचा ठराव शासन निर्णयानुसार सदरील पदे भरण्याची कार्यवाही करण्यांत येत आहे. | |
| २ | आरोग्य वैद्यकीय अधिकारी | ०१ | ०९.१२.२००२ | डॉ.जयश्री कुलकर्णी, वैद्यकीय अधिकारी, दि.०९.१२.२००२ | प्रतिनियुक्तीवर आरोग्य वैद्यकीय अधिकारी पाठविणेस्तव शासनास कळविण्यांत आलेले आहे. | |
| ३ | विधी सल्लागार | ०१ | ऑक्टों.९७ | श्री.ओ.सी.शिरसाठ, विधी सहाय्यक, दि.०७.०२.१९९८ पासून | विधी सल्लागार पद भरणेस्तव प्रकरण कार्यवाही अंतर्गत आहे. | |
| ४ | कर निर्धारक व संकल | ०१ | मार्च १९९९ | | दि.१५.०५.२००२ व दि.२२.०५.२००२ च्या पत्रान्वये या पदावर सक्षम अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्ती करणे संबंधाने शासन आदेश निर्गमित करण्यात यावे अशी शासनास विनंती करण्यात आलेली आहे. | |
| ५ | सहा.संचालक नगर रचना | ०१ | २७.०५.२००३ | श्री.सी.एस.सोनी, शहर अभियंता, दि.२७.०५.२००३ | जा.क्र./मनपा/मआ/स्वीस/ ०३/१२५, दि.०८.०५.२००३ च्या अर्धशासकीय पत्रान्वये सचिव नगर विकास विभाग यांना सहा.संचालक नगर रचना या पदावर नियमित व सक्षम अधिकारी देण्यासाठी संचालक नगर रचना पुणे यांना कळविण्यांत यावे, अशी विनंती करण्यांत आलेली आहे. | |

## वर्ग-२

| अ. क्र. | पदनाम | रिक्त पदे | पद रिक्त असल्याचा कालावधी | अतिरिक्त कार्यभार दिलेल्या अधिकाऱ्यांचे नांव, पदनाम व दिनांक | पद रिक्त असल्याची कारणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | ०१ | मार्च १९९७ | | प्रकरणांमध्ये शासनाकडुन मार्गदर्शन मागविण्यांत | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | आलेली आहे. | |
| २ | विभागीय अधिकारी | ०४ | मार्च ९८ ते ऑक्टो.०२ | श्री.अय्युब खॉन, वि.क्र.३ वि. अधिकारी (दि.०९.०६.२००३), भारसाखळे, वि.क्र.५ ज्ये.स्व.नि.(दि.०८.११. २००१), श्री.लोखंडे डी.बी., वि.क्र.६ कामगार अधिकारी, (३१.१०.२००२) श्री.एस.बी.शहाणे, वि.क्र.७ का.अधिक्षक, (दि.२१.०१.२००२) | नायब तहसिलदार संवर्गातील अधिकारी प्रतिनियुक्तीवर पाठविणेस्तव शासनास कळविण्यांत आलेले आहे. | |
| ३. | जिवशास्त्रज्ञ | ०१ | ०९.०६.२००३ | श्री.जे.आर.बोराडे मलेरिया सुपरवायझर, दि.०९.०६.२००३ | | |
| ४. | कर मुल्य निर्धारण अधिकारी-२ | ०१ | २०.०८.२००२ | श्री.जे.एस.खरवडकर, शाखा अभियंता, दि.२०.०८.२००२ | | |
| ५. | प्रशासकीय अधिकारी | ०१ | ०९.०६.२००३ | श्री.डी.बी.कंकाळ, शाखा अभियंता, दि.०९.०६.२००३ | | |

एखाद्या पदाचा अतिरिक्त कार्यभार देणे ही प्रशासकीय बाब आहे. ही प्रशाकीय बाब प्रशासकीय बाब असल्याने प्रशासनाचे सोयीनुसार अतिरिक्त कार्यभार देण्यात येतो. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ५६ प्रमाणे शासकीय अधि/कर्मचारी स्वतःच्या पदाव्यतिरिक्त दुसऱ्या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यांत आला तर अशा दुसऱ्या पदाकरिता अतिरिक्त वेतन देण्यांत येईल, अशी तरतूद आहे.

शासन परिपत्रक दिनांक ०१.०३.२००३ व शासन निर्णय दिनां २९.०६.२००० आणि शासन निर्णय दिनांक १०.०९.२००१ अन्वये शासनाने पदे भरण्यावर बंदी घातली आहे. त्यामुळे पदे भरण्यांत आलेली नाही. शासनाची मंजूरी मिळताच रिक्त पदे भरण्यांत येईल व त्या त्या पदाचा/विभागाचा अतिरिक्त कार्यभार काढण्यात येईल.

स्वाक्षरित/-
उपआयुक्त (प्र.)
महानगरपालिका, औरंगाबाद.

श्री.महंमद जावेद महंमद इसहाक, नगरसेवक

**प्रश्न क्र.-१४९ :** औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी म्हणून श्री.भारती सेवेत होते. त्यांची बदली होऊन किती कालावधी झाला? दिल्ली गेट येथील म.न.पा. क्वार्टर मध्येच ते सध्या रहात आहे, हे खरे आहे काय? त्यांच्यांकडून महानगरपालिकाने भाडे वसुल केले काय? असल्यास कोणत्या दराने?

किती? सध्या ते महानगरपालिकेच्या सेवेत नसल्याने त्यांच्याकडून इमारत (क्वॉर्टर) भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (PWD) दराने वसुल करण्यीच तरतूद आहे. किंवा मार्केट दराने भाडे वसुल करण्याची तरतूद आहे? त्याप्रमाणे वसुल केले काय? असल्यास किती? नसल्यास त्याची कारणे काय? बंगला कधी रिकामा करुन घेणार सविस्तर माहिती देण्यांत यावी.

**उत्तर :** मालमत्ता अधिकारी :

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणांस सविनय अहवाल सादर करण्यांत येतो की, श्री.पी.एल.भारती यांना जा.क्र./मनपा/मामअ/७७६/२००२, दि.०३.०९.२००२ रोजी मा.आयुक्तांच्या मंजूरी नुसार दिल्ली गेट येथील निवासस्थान प्रदान करण्यांत आले होते.

तसेच लेखा विभागात जा.क्र./मनपा/मामअ/११४३/२००२, दि.३१.१२.२००२ च्या पत्राच्या अनुषंगाने श्री.भारती यांच्या पगारातून घरभाडे भत्ता व भाडे प्रति महा रु.७००/- माहे ऑक्टोंबर २००२ पासून कपात करण्यात यावे असे लेखाधिकारी यांना वरील पत्रान्वये वसुल करणे बाबत कळविले आहे.

दिनांक ०९.१२.२००२ रोजी श्री.भारती यांना या महानगरपालिकेतून कार्यमुक्त करण्यांत आले असून त्यांना निवासस्थान रिक्त करणे संदर्भाने जा.क्र./मनपा/मामअ/५५५/२००३, दि.२२.०५.२००३ अन्वये पत्र देऊन कळविले आहे. त्यानुसार उपसंचालक आरोग्य सेवा औरंगाबाद विभाग यांना त्यांच्या कार्यमुक्त तारखे पासूनचे वरील प्रमाणे घरभाडे भत्ता व भाडे पगारातून कपात करुन महानगरपालिकेच्या फंडात जमा करणे बाबत कळविले आहे. करिता पुन्हा त्यांना निवासस्थान रिक्त करणे बाबत नोटीस दिली असून मुदतीत निवासस्थान रिक्त करुन घेण्यांत येईल. माहितीस्तव सादर.

**प्रश्न क्र.१५० :** मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाने औरंगाबाद महापालिका क्षेत्रातील ९.०० मीटर आणि त्यापेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यांत येत आहे. आतापर्यंत कोणकोणत्या रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यांत आले? किती? अतिक्रमण हटाव कार्यवाहीत किती टपरीधारकांना पुर्वी परवानगी देण्यांत आली होती? अनधिकृत किती? रस्त्यावरील टपऱ्या अतिक्रमण हटवितांना जास्त वर्दळीच्या रस्त्याचा प्रथम प्राधान्याने विचार करण्यांत येतो की, महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या मर्जीनुसार? शहराच्या मध्यवस्तीत (रहदारीचा फारच त्रास असल्याने) देखील ही मोहीम राबविणार का? केव्हा? परवानगी घेतलेल्या टपरीधारकांचे इतर ठिकाणी पुनवर्सन करणार का? सविस्तर माहिती देण्यांत यावी.

**उत्तर :** अप्राप्त.

या बरोबरच जन गण मन या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## दिनांक १८.जुलै, २००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शुक्रवार दिनांक १८.०७.२००३ रोजी मा.महापौर सौ.विमलबाई भिकनसिंग राजपूत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.४० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा.आयुक्त तसेच संबंधित अधिकारी यांचेसह खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | - | सभासद |
| २. | स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक | - | सभासद |
| ३. | स.स.श्री. राधाकृष्ण गायकवाड | - | सभासद |
| ४. | स.स.श्री. वाणि ठकुजी रामसिंग | - | सभासद |
| ५. | स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु | - | सभासद |
| ६. | स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी | - | सभासद |
| ७. | स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी | - | सभासद |
| ८. | स.स.श्री. राजु रामराव शिंदे | - | सभासद |
| ९. | स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा | - | सभासद |
| १०. | स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव | - | सभासद |
| ११. | स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार | - | सभासद |
| १२. | स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब | - | सभासद |
| १३. | स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | - | सभासद |
| १४. | स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन | - | सभासद |
| १५. | स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे | - | सभासद |
| १६. | स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तम बिनवडे | - | सभासद |
| १७. | स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | - | सभासद |
| १८. | स.स.सौ. विजया किशोर रहाटकर | - | सभासद |
| १९. | स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर | - | सभासद |
| २०. | स.स.सौ. ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे | - | सभासद |
| २१. | स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | - | सभासद |
| २२. | स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण | - | सभासद |
| २३. | स.स.श्री. नजर हमीद अ.गफुर | - | सभासद |
| २४. | स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | - | सभासद |
| २५. | स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | - | सभासद |
| २६. | स.स.श्री. डॉ.कराड भागवत किसनराव | - | सभासद |
| २७. | स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | - | सभासद |
| २८. | स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव | - | सभासद |
| २९. | स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | - | सभासद |
| ३०. | स.स.श्री. नासेर खान सरदार खान | - | सभासद |
| ३१. | स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसहाक | - | सभासद |
| ३२. | स.स.श्री. मोहन मेघावाले | - | सभासद |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३. | स.स.सौ. खरात कुसूमबाई दौलत | - | सभासद |
| ३४. | स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव | - | सभासद |
| ३५. | स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव | - | सभासद |
| ३६. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | सभासद |
| ३७. | स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | - | सभासद |
| ३८. | स.स.श्री. सोपान भाऊराव वारे | - | सभासद |
| ३९. | स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा | - | सभासद |
| ४०. | स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर | - | सभासद |
| ४१. | स.स.सौ. संगिता बाळु मैंद | - | सभासद |
| ४२. | स.स.श्री. रणधीर अशोकसिंग होलीये | - | सभासद |
| ४३. | स.स.श्री. नासेर खाँन अ.रहेमान खॉन | - | सभासद |
| ४४. | स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मणराव | - | सभासद |
| ४५. | स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ | - | सभासद |
| ४६. | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | - | सभासद |
| ४७. | स.स.श्री. स.सलीम स.युसूफ | - | सभासद |
| ४८. | स.स.श्री. तकीहसन खान कासी महसन खान | - | सभासद |
| ४९. | स.स.श्री. मीर हिदायत अली मीर लियाकत अली | - | सभासद |
| ५०. | स.स.सौ. सुलताना बेगम चाँद खान | - | सभासद |
| ५१. | स.स.श्री. लकडे भरत श्रीपती | - | सभासद |
| ५२. | स.स.श्री. शेख मुनाफ पटेल यासीन | - | सभासद |
| ५३. | स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल | - | सभासद |
| ५४. | स.स.श्री. किशोर बाबुलाल तुळशीबागवाले | - | सभासद |
| ५५. | स.स.श्री. जगदिश कन्हैय्यालाल सिध्द | - | सभासद |
| ५६. | स.स.सौ. बबिता सुभाष कागडा | - | सभासद |
| ५७. | स.स.श्री. स.अली सलामी स.मीरा सलामी | - | सभासद |

**स्विकृत सदस्य**

१. स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२. स.स.श्री. भगवान देविदास घडमोडे
३. स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
४. स.स.श्री. तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग धिल्लन

(वंदेमातरम् गित ध्वनीमुद्रणावरुन ऐकावयास येत नव्हते. ऑपरेटर गैरहजर होते.)

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे माजी सरसंघचालक प्राध्यापक राजेंद्रसिंह ऊर्फ रज्जु भैय्या यांचे दु:खद निधन झाले तसेच स्थानिक नागरिक असलेल्या स्व.सौ.माधुरी बेन रमेशचंद्र मिठावाला यांचे इमारत पडून मृत्यू झाला. तसेच बी.एस.एफ.जवान पै.इम्रान खॉन यांचे निधन झाले या सर्वांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

**श्री.भागवत कराड :** स.स.सौ.साधना सुरडकर यांचे सासुचे सुध्दा दु:खद निधन झालेले आहे, त्यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पण करावी यास माझे अनुमोदन आहे.

**श्री.मधुकर सावंत :** मंगला दाभाडे आंबेडकर नगर यांना हि श्रध्दांजली अर्पण करावी.

**मा.महापौर :** ठिक आहे. सर्वानी श्रध्दांजली साठी उभे रहावे.
(याच वेळी स्व.राजेंद्रसिंह उर्फ रज्जू भैय्या, स्व.माधुरीबेन रमेशचंद्र मिठावाला, स.स.सौ.सुरडकर यांचे सासू तसेच बी.एस.एफ. जवान पै.इब्रान खॉन व मंगला दाभाडे यांना सभागृहातर्फे ०२ मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.)

**श्री.अविनाश कुमावत :** प्रत्येक बैठकीत वंदेमातरम् गित व्यवस्थीत वाजविले जात नाही, संबंधित कर्मचाऱ्यास ताकीद द्यावी.

**श्री.भागवत कराड :** आजच्या सभेला मा.आयुक्त, महापौर तसेच सर्व अधिकारी उपस्थित असतांना सभागृहाचे कामकाज ध्वनीमुद्रण करण्यासाठी ऑपरेटर उपस्थित नाही. प्रशासनाने खुलासा करावा.

**श्री.संजय शिरसाट :** माईक चालू नसेल व ऑपरेटर नसेल तर काही वेळासाठी सभा तहकुब करावी.

(याचवेळी ऑपरेटर सभागृहात हजर होतात.)

**श्री.मधुकर सावंत :** माईकसाठी सभा खेळांवून ठेवणे योग्य नाही. संबंधित कर्मचाऱ्यांना ५० रुपये दंड आकारण्यांत यावा. व यानंतर वेळेवर उपस्थित राहण्याची ताकीद द्यावी.

**श्री.अविनाश कुमावत :** नेहमीच कॅसेट बरोबर लावत नाही. दंड आकारण्यात यावा.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** विषय पत्रिकेवर चर्चा करण्या अगोदर जनरल चर्चा घेण्यांत यावी.

**श्री.भागवत कराड :** विषय पत्रिका अगोदर घेण्यांत यावी नंतर चर्चा घेण्यांत यावी.

**विषय क्र.१०२/१**

दि.१९.०६.२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.भागवत कराड :** मागील बैठकीत काही विषयावर चर्चा न होताच प्रस्तावास मंजूरी देण्यांत आलेली आहे. सभागृहाचे मत लक्षात घेतले नाही. धोबीघाट जागेच्या संदर्भात प्रस्ताव होता. चर्चा न होताच मंजूरी दिली. या ठरावास आमचा विरोध आहे. सभा संपल्यानंतर लगेच मा.आयुक्त यांना सुध्दा तसे लेखी पत्राने कळविलेले होते. त्या ठरावास आमचा विरोध असून तो मंजूर केलेला प्रस्ताव रद्द करावा. महानगरपालिकेचे हित पहावे.

**श्री.तकी हसन खान :** ठराव क्र.९८/५ पासून सर्व विषय चर्चा न होताच मंजूर करण्यांत आले. शिवाय त्या ठरावास कायम सुध्दा करण्यांत आले. सभागृहाचे मत लक्षात न घेता कोणतीही चर्चा न करता मंजूरी कशी दिली, रद्द करावे.

**श्री.प्रशांत देसरडा :** स.सदस्य श्री.जगताप, श्री.खुंगर यांचे अभिनंदन करतो. त्यांचे तसेच इतर सदस्यांचा सुध्दा विरोध असतांना ठरावास मान्यता दिली. त्यांचेमुळे या प्रकरणास वेगळे वळण लागण्याची शक्यता आहे. या ठरावास शासनाने स्थगिती दिली. सी.आय.डी. मार्फत चौकशी होणार आहे. जे जे स.सदस्य विरोध करतील. त्यांची नांवे नमूद झाली पाहिजे. चौकशी झाल्यास कुणी यामध्ये दोषी असेल त्यांना हातकड्या लागतील. नागपूर महानगरपालिकेसारखी परिस्थिती निर्माण होऊ शकते. या मंजूर केलेल्या ठरावास आमचा विरोध असून तो प्रस्ताव रद्द करुन इतिवृत्त कायम करावे.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** मागील बैठकीत धोबीघाटाच्या जागे संदर्भात प्रस्ताव होता. त्यास सभागृहाने मान्यता दिलेली आहे. प्रशासनाला योग्य वाटत नसेल तर प्रशासन रद्द करेल. सभागृहात वेगळ्या प्रकारची चर्चा करुन नगरसेवकांना हातकड्या वगैरे लागतील असे शब्द बोलणे बरोबर नसून हा सभागृहाचा अपमान आहे. चौकशीच्या वेळी ते सामोरे जातील. आज वक्तव्य करणे बरोबर नाही. नगरसेवकांची बदनामी झालेली आहे. इतिवृत्त कायम करावे. शासनाला वाटल तर रद्द करतील.

**श्री.तकी हसन खान :** मागील बैठकीत चर्चा न होताच सर्व विषय मंजूर केले. एवढ्याच ठरावांना कन्फर्म करण्याची काय गरज होती. नागरिकांसमोर चुकीच्या पध्दतीने असे निर्णय घेतले जाऊ नये. चुकीचे केले तर हातकड्या लागतील.

**श्री.सुरजित सिंग खुंगर :** लोक प्रतिनिधीच्या मार्फत अशासकीय ठराव सभागृहात येतात. ज्या पध्दतीने व उद्देशाने हा ठराव पास केला पास करण्याची पध्दत आहे का? आलेला ठराव योग्य होता की, नाही प्रशासनाने विचारणा केलेली आहे. किंवा नाही ठरावास राष्ट्रवादी, काँग्रेस, भाजपा व काही शिवसेनेच्या सदस्यांचाही विरोध होता असे असतांना ठराव मंजूर कसा करण्यांत येतो. अशा प्रकारचे कुणीही ठराव आणतील ते आपण मंजूर करणार काय? हा सभागृहाचा अपमान आहे. या संदर्भात शासन स्तरावर चौकशी चालू आहे. मंजूर केलेला ठराव रद्द करावा. शासनाचे पत्र आहे. मा.राज्यमंत्री यांनी महापालिका आयुक्तांना सदर प्रकरणांत अहवाल मागविला आहे. व तोपर्यंत स्थगिती दिली आहे. धोबीघाट संबंधी आम्ही पत्र दिलेले आहे. खाजगी वाटाघाटीने जागा संपादन केली असून रु.२,८१,५००/- कोर्टात जमा आहे. नगर रचना विभागाने मा.आयुक्तांना पत्र देवून त्यांची प्रत मला दिलेली आहे. त्यात असे स्पष्ट लिहीले आहे की, दोन्ही ठराव स.सदस्यांनी ठेवले असून प्रशासनाचे मत न घेता ठराव मंजूर केलेले आहे. विधी विभागाचे अभिप्राय घेवून पुढील योग्य ती कार्यवाही करु असे दिलेले आहे.

(याचवेळी मा.महापौर डायस समोर जाऊन स.सभासद मोठमोठ्याने बोलतात काही ऐकू येत नाही.)

**श्री.भगवान घडमोडे :** मागील बैठकीत धोबीघाट जागेच्या संदर्भात जो प्रस्ताव होता त्यास भाजपा सदस्यांचा तसेच राष्ट्रवादी पक्षाचे सदस्यांचाही विरोध होता. घाईघाईने तो प्रस्ताव मंजूर करण्यांत आला. कोणताही चर्चा न होता. प्रस्ताव मंजूर केल्यामुळे वृत्तपत्रात उलटसुलट बातम्या येऊन स.सदस्यांची जनते समोर बदनामी झालेली आहे. काही स.सदस्यांनी शासनास कळविले शासनाने चौकशी करण्याचे आदेश दिले. प्रस्तावात अुनमोदक म्हणून श्री.आनंद तांदुळवाडीकर यांचे नांव होते ते आले नाही. प्रत शासनाकडे गेलेली आहे. प्रस्ताव मंजूर करुन महानगरपालिकेचे हित साधारणार नसून मंजूर केलेला ठराव स्थगित करण्यांत यावा.

**श्री.प्रकाश निकाळजे :** ठराव मंजूर केल्यानंतर स.सदस्य श्री.खुंगर तसेच स.स.श्री.जगताप यांनी शासनाकडे पत्र दिले. त्यावर शासनाने प्रशासनाचा खुलासा मागविलेला असून प्रशासनाने सुध्दा अहवाल शासनाकडे दिलेला आहे.

शासनाने स्थगिती दिलेली आहे. प्रस्ताव स्थगित किंवा रद्द करता येणार नाही.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** या प्रस्तावास शासनाने स्थगिती दिलेली आहे. चौकशी करण्याचे आदेश दिले. प्रशासनाचे मत घ्यावे.

**श्री.भागवत कराड :** आमचा त्या प्रस्तावास विरोध होता. तरी सुध्दा मंजूरी देण्यांत आली. सभा संपल्या नंतर, लगेच मा.आयुक्त यांना तसे पत्र देण्यांत आलेले आहे. काही सदस्यांनी पत्राने शासनास कळविलेले आहे. या बाबतीत प्रशासनाचे मत काय आहे. शासनाकडुन निश्चित काय पत्र आले ते सभागृहासमोर वाचून दाखवावे.

**श्री.सुनिल मगरे :** धोबीघाटाच्या जागेच्या संदर्भात मागील बैठकीत प्रस्ताव होता. प्रस्ताव मंजूर करण्यांत आला. ज्यांचा विरोध होता. त्याची नोंद असावी. शासनापर्यंत प्रकरण गेले. शासनाने सुध्दा यात लक्ष घातलेले आहे. या प्रस्तावास शासनाने स्थगिती आणलेली आहे. या ठरावा बरोबरच मागील ३ वर्षात जे जे भूखंडाच्या संदर्भात प्रस्ताव मंजूर झाले. स.सदस्यांचे प्रस्ताव आलेले होते. त्या ठरावाची शासनामार्फत चौकशी झाली पाहिजे. तसे आदेश आपण प्रशासनास द्यावे. एकाच प्रस्तावाच्या संदर्भात शासनाने लक्ष घालून स्थगिती देणे बरोबर नाही.

**श्री.भगवान घडमोडे :** ठरवास आमचा विरोध होता व आज सुध्दा विरोध आहे. इतिवृत्त कायम करण्यांत येऊ नये. चर्चा व्हावी.

**श्री. सुरजितसिंग खुंगर :** महापालिकेची मालमत्ता जपण्याचे काम आम्ही करतो आहे. चौकशी करावयाचे काम आपल्या माध्यमातून आम्ही करु.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** महानगरपालिका स्थापन झाल्या पासून जेवढे भूखंडा विषयीचे ठराव पारित झाले. त्यांची चौकशी करण्यांत यावी.

**डॉ.आशा बिनवडे :** दोन दोन सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात शिस्त लावावी. कोणते सदस्यांनी काय मुद्दा मांडला स्पष्ट होत नाही. एकदा एका सदस्यांनी विचार मांडावयास सुरुवात केली. त्यांनी त्यांचे बोलणे पुर्ण करुन खाली बसावे. त्यात कोणी हस्तक्षेप करु नये. इतिवृत्त कायम करण्यावर चर्चा होत असतांना मागील सभेतील इतिवृत्तातील पान क्र.२८ वर विषय क्र.९८/५ काला दरवाजा या प्रस्तावावर रुलींग दिली आहे की, या प्रस्तावासह विषय क्र.६ व ७ स्विकृतीसह मंजूर विषय क्र.८ नामंजूर पुढचे विषय यायच्या आधिच मत ऐकून न घेताचे मंजूरी दिली हे योग्य आहे का? विषय क्र.६ हा धोबीघाट पान क्र.२९ वर शेवटच्या ३ ओळी. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबद्दल करण्याची कार्यवाही करण्यांस बहुमताने स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. याला अर्थ उरत नाही. त्यावर कुठलीही चर्चा व सभागृहाचे मत न घेता मंजूरी दिली. दोन्ही ठरावाचे बाबतीत सभागृहाचे मत घ्यावे. नंतरच मान्यता द्यावी. स्विकृतीसह मंजूरी याचा अर्थ काय याचा खुलासा करावा. हा प्रस्ताव रद्द करावा, अशी माझी मागणी आहे.

**श्री.रतनकुमार पंडागळे :** प्रस्ताव मंजूर केलेला आहे. आपणाकडे असे अनेक प्रस्ताव येतात. मागच्या स्थायी समितीमध्ये विकास आराखड्याचा प्रस्तवा आला होता. ९१६ आरक्षणे अनेक आरक्षणे भूसंपादन केलेले नसल्याने डिलीट करण्यांस ठेवले. प्रस्ताव सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला आहे. इतिवृत्त कायम करावे.

स्थगित ठेवता येत नाही. दुरुस्ती काय असेल ती करता येईल. एकदा मंजूर झालेला ठराव त्यास ३ महिन्यानंतरच बदलता येतो.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** या प्रस्तावा संबंधी काही चौकशी झाल्यास आम्ही समोरे जाण्या तयार आहोत. इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

**श्री.प्रशांत देसरडा :** हा विषय मंजूर करण्यासाठी मतदान घ्यावे, नसता रद्द करावा. ज्यांचा विरोध आहे. त्याची नांवे नोंदवावी.

(यावेळी स.स.श्री.जगताप, श्री.तकी हसन खॉन, श्री.तायडे, श्री.रगडे, श्री.मीर हिदायत अली मतदान घेण्याची मागणी करतात. व महापौर यांचे डायस समोर काही सदस्य जाऊन मोठमोठ्याने बोलतात.)

**मा.उपमहापौर :** ज्यांचा विरोध आहे. त्यांची नांवे नोंदवावी.

**मा.महापौर :** दुरुस्ती असेल तर करता येईल. ठराव मंजूर केलेला आहे. सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

**मा.उपमहापौर :** ज्यांचा विरोध असेल त्यांची नांवे नोंद करावे.

**मा.महापौर :** १० मिनीटासाठी सभा तहकुब करण्यांत येते.

(वेळ दुपारी १२.१५ वाजता सभेला पुन्हा सुरुवात १२.५५ वाजता)

**मा.महापौर :** विषय क्र.१, २ मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

दिनांक १९.०६.२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

**विषय क्र.१०३/२ :**

सर्वसाधारण सभा ठराव क्र.६४०/३, दि.३०.०९.२००२ अन्वये निर्णय झाल्या प्रमाणे दारिद्र्य रेषेखालील कुटूंबातील बेरोजगार युवक/युवतींना प्रशिक्षण देणेचा प्रस्ताव दिनांक ३० एप्रिल, २००३ च्या गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समिती समोर ठेवण्यांत आला असता समितीने ठराव क्रमांक ८ नुसार महानगरपालिकेने स्वयंसेवी संस्था मार्फत प्रस्तावित ४ लोकसेवा केंद्र कार्यान्वित करण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सुशिक्षीत बेरोजगार युवकांना सेवा सहकारी संस्था कडुन प्राप्त झालेल्या अर्जापैकी खालील चार सहकारी संस्थाना (१) नुतन महात्मा फुले मगासवर्गीय सुशिक्षीत बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित फुलेनगर, औरंगाबाद. (२) सुमनेश सुशिक्षीत बेरोजगार सेवा सहकारी संस्था म.फुलेनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद. (३) भवानीमाता सुशिक्षीत बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित वार्ड क्र. १३ मुकूंदवाडी, औरंगाबाद. (४) ज्योतीबा फुले मा.स्वंयरोजगार सहकारी संस्था म.नंदनवन कॉलनी, औरंगाबाद यांना खालील १ ते ११ नियमास अधिन राहून मान्यता देवून सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस केलेली आहे.

नियम :

१. लाभार्थ्यांना दुरुस्तीचे साहित्य/अवजारांची पेटी योजनेच्या अनुदानातून द्यावी. त्यासाठी रु.६००/- मर्यादा विचारात घ्यावी.

२. महानगरपालिकेच्या जागेत सुमारे १५x१५ चे बांधकाम योजनेच्या निकषास आधीन राहून सेवा केंद्र स्थापन करण्यांत यावीत. त्यामध्ये प्रशिक्षित तरुणांना बसण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध असावी. उपलब्ध समाज मंदिराचा वापर यासाठी करता येईल.

३. या लोकसेवा केंद्राच्या बांधकामाचा खर्च व इतर अनुषंगीक खर्च अंदाजे रु.२ लाखापर्यंतच्या मर्यादेत योजने अंतर्गत मुलभूत सोयीसाठी सहाय्य तसेच सामाजिक संरचना या घटका अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधी मधून भागविण्यांत यावा, असे शासनाचे आदेश आहेत.

४. लोकसेवा केंद्रासाठी आवश्यक असलेले फर्निचर २ टेबल, १२ खुर्च्या, व ३ बँच व एक दुरध्वनी संच महानगरपालिकांनी मोफत पुरवावयाचा असून त्यावरील आवर्ती अनावर्ती खर्च मनपाने स्वनिधीतून भागवावा.

५. समाज सेवा केंद्रात नागरिकांसाठी सेवा तक्रार नोंद वहीत ठेवण्यांत यावी.

६. सेवा केंद्रा मार्फत पुरविण्यांत येणाऱ्या सेवांचे वाजवी दर समाज विकास संस्थानी/महानगरपालिकांनी निश्चित करावेत.

७. सेवा केंद्रावरील संबंधित प्रशिक्षीत लाभार्थ्यांची नांवे नोंदविणे ओळखपत्रे देणे ही जबाबदारी महानगरपालिकेची असेल.

८. सेवा केंद्रासाठी माहिती महानगरपालिकांनी सर्व नागरिकांना स्थानिक केबल टी.व्ही. द्वारे (लोकल टि.व्ही. चॅनल) माहिती देण्यांत यावी.

९. सेवा केंद्राच्या बाजुला दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या सुट्या भागाचे दुकान योजना अंतर्गत लाभार्थ्यांसाठी उघडण्यांत यावे.

१०. सेवा केंद्राच्या दुरुस्ती देखभालीची जबाबदारी महानगरपालिकेची राहील.

११. सुडा/हुडाने महानगरपालिकेस समाज सेवा केंद्र स्थापन करण्यासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करुन द्यावा.

तसेच सदर संस्थाना एक खोली विनामूल्य द्यावयाची असल्याने आणि केंद्र सरकारला व राज्य सरकारला विनंती करण्यांत यावी की, आगामी वर्षात सर्व ८३ प्रभागात लोकसेवा केंद्र स्थापन करण्यांत यावे.

प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील कुटूंबातील बेरोजगार युवक/युवतींना प्रशिक्षण देण्यांकरिता स्वयंसेवी संस्था मार्फत दर्शविलेले ४ लोकसेवा केंद्रांना प्रस्तावित १ ते ११ नियमांना अधिन राहून कार्यान्वित करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र.१०४/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक २५ जून २००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये चर्चा झाल्यानुसार महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकांचे स्थायी समिती सभापतींची परिषद, औरंगाबाद शहरामध्ये आयोजित करण्याचे ठरले. यापुर्वी कल्याण-डोंबिवली, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतर्फे अशा प्रकारे राज्य पातळीवर सभापती (स्थायी समिती) यांची परिषद आयोजित करण्यांत आलेली होती. आगामी दोन महिन्यामध्ये औरंगाबाद शहरामध्ये महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्रातील सर्व मनपाच्या सभापतींची परिषद आयोजित करण्यास्तव सतेच या परिषदेसाठी येणाऱ्या खर्चास (अंदाजे खर्च रक्कम रुपये ३,००,०००/-) (तीन लक्ष) मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**सुचक :** श्री.भाऊसाहेब ताठे,
**अनुमोदक :** श्री.रतनकुमार पंडागळे,
श्री.नंदकुमार घोडेले.

**संवाद :**

**श्री.जयवंत ओक :** सभापती परिषदेसाठी ०३ लक्ष खर्च करणार शहरातील विकास कामे होत नाही पैसा नाही. हा खर्च करुन काय साध्य होणार आहे. खर्चाची तरतूद आहे का? कोणत्या हेड मधून खर्च करणार आहे. खुलासा करावा.

**मा.महापौर :** विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आगामी दोन महिन्याच्या काळात औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे औरंगाबाद शहरात महाराष्ट्रातील सर्व महापालिकेच्या सभापतीची परिषद आयोजित करण्यांस व त्यासाठी लागणाऱ्या रक्कम रु.३,००,०००/- (तीन लाख) च्या अंदाजे खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०५/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, पाण्याचा बंबा रोड, नेहरु नगर येथील ड्रेनेज लाईनचे काम मंजूर झाले होते. परंतू काही कारणास्तव सदरचे काम रद्द झाले आहे. त्याच कामाच्या निधीतून यशोधरा कॉलनी येथील ड्रेनेज लाईनचे काम करणे बाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.
**सुचक :** सौ.नुसरत बानो,
श्री.फिरोज खान
**अनुमोदक :** श्री.मीर हिदायत अली मीर बिसालत अली.

**संवाद :**

**मा.महापौर :** विषय क्र.२ मंजूर करण्यांत येत आहे.
(याचवेळी पुन्हा काही सदस्य विषय क्र.१ इतिवृत्त कायम करु नये व त्यातील धोबीघाट भुखंडा संदर्भाचा प्रस्ताव नामंजूर करावा म्हणून मागणी करतात. मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

**मा.महापौर :** इतिवृत्तामध्ये दुरुस्ती असेल तर करता येईल. धोबीघाट प्रस्ताव मंजूर झालेला आहे. सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.
(मा.महापौर यांनी सुचना देऊनही स.सभासद जागेवर बसण्याच्या तयारीत नव्हते. इतिवृत्तातील धोबीघाट प्रस्ताव कायम करु नये अशी मागणी करीत होते.)

**श्री.भगवान रगडे :** विषय क्र.१ मंजूर करु नये. महापालिकेचे हित लक्षात घ्यावे. सर्वच जागा विक्री करण्याचा प्रयत्न करु नये. नागरिकांचे विकास कामे करण्यासाठी आपण येथे आलेलो आहेत.
(याचवेळी स.सदस्य श्री.भगवान रगडे हे मा.महापौर यांचे जवळील राजदंड उचलण्याचा प्रयत्न करतात.)

**मा.महापौर :** विषय क्र.१ कायम केलेला आहे. सर्व विषय मंजूर करण्यांत येतात. ऐनवेळचे विषय पुढील सभेत ठेवावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाण्याचा बंबा रोड नेहरुनगर येथे ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम रद्द करुन याच कामाचे निधीतून यशोधरा कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०६/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, हत्तेसिंगपुरा येथील पाण्याच्या टाकीच्या समोरील म.न.पा.च्या जागेमध्ये म.न.पा. ने वाचनालय बांधली आहे. परंतू सदरच्या इमारतीमध्ये शादीखाना सुरु करावा अशी इच्छा सदरील परिसरातील नागरिकांची आहे. म्हणून वाचनालयाच्या इमारतीमध्ये शादीखाना करण्यात यावा.

तसेच सदरील शादीखान्यास ख्वाजा गरीब नवाज नांव देणेस प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** सौ.नुसरत बानो फेरोजखान,

**अनुमोदक :** श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हत्तेसिंगपुरा येथील पाण्याच्या टाकी समोर बांधण्यात आलेल्या महापालिका वाचनालयाच्या इमारतीमध्ये शादीखाना सुरु करण्यास व या शादीखान्यास ख्वाजा गरीब नवाज असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०७/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महापालिकेच्या आस्थापनेवर डॉ.किरण सुरवसे हे जीवशास्त्रज्ञ तथा हिवताप अधिकारी या पदावर कार्यरत होते. डॉ.सुरवसे यांना प्रशासनाने काही कारणास्तव दिनांक ०९.०६.२००३ पासून कार्यमुक्त करुन मुळ शासकीय विभागात पाठविले होते. तथापि, शासकीय सेवेचा बदली पात्र कालावधी ३० जुन, २००३ संपून ही शासनाने त्यांची कोठेही बदली किंवा प्रतिनियुक्ती केलेली नाही. त्यामुळे डॉ.सुरवसे सध्या घरीच बसून आहेत. मनपाच्या आरोग्य विभागातील जीवशास्त्रज्ञ पदावर ही कोणीही रुजू झाले नाही. सध्या पावसाळ्याच्या दिवसात विविध साथ रोग उदा.गॅस्ट्रो, मलेरिया, विषमज्वर, डेंग्यु, अतिसार इ.वगैरे आजारांची साथ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जन आरोग्याच्या दृष्टीकोनातून डॉ.किरण सुरवसे यांना जीवशास्त्रज्ञ या रिक्त पदावर परत रुजू करण्याबाबतच प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेने विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** सौ.जयश्री मोरे,

**अनुमोदक :** श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली,
श्री.भारत श्रीपती लकडे, श्री.साहेबराव कावडे,
श्री.पांडुरंग तायडे, श्री.चंद्रशेखर लक्ष्मीनारायण जैस्वाल,
श्री.मोतीलाल जगताप, श्री.मधुकर सावंत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सध्या पावसाळ्याचे दिवसात विविध साथीच्या रोगाची उदा.गॅस्ट्रो, मलेरीया, विषमज्वर, डेंग्यु, अतिसार इ.लागण होण्याची शक्यता नाकारता येत असल्यामुळे जन आरोग्याचे दृष्टीकोनातून महापालिका आस्थापनेवरील रिक्त असलेल्या जीवशास्त्रज्ञ तथा हिवताप अधिकारी या पदावर कार्यमुक्त केलेले डॉ.किरण सुरवसे यांना पुन्हा रुजू करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०८/५ :**

महानगरपालिका हद्दीत थोर समाज सुधारक प्रबोधनकार कै.केशव सिताराम ठाकरे यांचा पुतळा अद्याप बसविण्यांत आलेला नाही. पबोधनकार कै.सिताराम ठाकरे यांचा पुतळा उभारणे बाबत असंख्य नागरिकांनी मागणी केली आहे.

प्रभाग क्र. (१६) अलंकार कॉलनी, गारखेडा प्रभागातील गजानन महाराज मंदिरा लगतचे मुख्य चौकात कै.केशव सिताराम ठाकरे यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.राधाकृष्ण गायकवाड,
**अनुमोदक :** श्री.नंदकुमार फुलारी,
सौ.कचराबाई लोखंडे.

**ठराव :**

पस्ताव दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.१६ अलंकार कॉलनी गारखेडा प्रभागातील श्री.गजानन महाराज मंदिरा लगतचे मुख्य चौकात कै.केशव सिताराम ठाकरे यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०९/६ :**

महानगरपालिका हद्दीत विविध विभागामध्ये थोर राष्ट्रीय महापुरुषांचे पुतळे उभारण्यांत आलेले आहेत. काही पुतळे मुख्य रस्त्यावरील चौकात बसविण्यांत आलेले आहे. विविध राजकीय पक्ष, संघटना, संस्था तसेच खाजगी उद्योग आपली जाहिरात होणेसाठी पत्रक, फलक, पोस्टर्स, तसेच कापडी बॅनर पुतळ्यांचे चबुतऱ्यावर तसेच सभोवतालचे परिसरात लावतात. त्यामुळे पुतळ्याचे व परिसराचे सौंदर्यास बाधा येते, राष्ट्रीय महापुरुषांचे पुतळे विद्रुप दिसतात. अशा व्यक्ती, संस्थाना अशा कृत्यापासून परावृत्त करणेसाठी तसेच पुतळ्यांचे व सभोवतालच्या परिसरांचे सौंदर्य अबाधित राखणेसाठी भविष्यात असे जाहीरात फलक, भिंतीपत्रक, पोस्टर्स, बॅनर्स न लावणेची सक्ती करणे तसेच लावणारांवर दंडात्मक कार्यवाही करणे तसेच सर्वही राष्ट्रीय महापुरुषांच्या पुतळ्याचे संरक्षणाची जबाबदारी महापालिकेने घेणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.राधाकृष्ण गायकवाड,
**अनुमोदक :** श्री.नंदकुमार फुलारी.

**ठराव क्र.१०९/६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराचे मुख्य रस्त्यावरील चौकात उभारण्यांत आलेल्या राष्ट्रीय महापुरुषांचे पुतळ्याच्या चबुतऱ्यावर विविध राजकीय पक्ष, संघटना संस्था

तसेच खाजगी उद्योगाकडून लावण्यांत येणाऱ्या पत्रक, फलक, पोस्टर्स तसेच कापडी बॅनर यामुळे पुतळ्याचे सौंदर्यात बाधा येत असल्यामुळे शहरातील विविध चौकात उभारण्यांत आलेल्या महापुरुषांचे पुतळ्याचे व सभोवतालच्या परिसरात भविष्यात लावण्यांत येणाऱ्या जाहिराती, फलक, भित्तीपत्रक, पोस्टर्स, बॅनर्स लावण्यांस सक्त मनाई करणे, आणि लावणारांवर दंडात्मक कार्यवाही करुन राष्ट्रीय महापुरुषांच्या पुतळ्याचे संरक्षणाची जबाबदारी महापालिकेने घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## प्रश्नोतरे

श्री.जयवंत ओक, नगरसेवक (प्राप्त दि.१९.०६.२००३)

**प्रश्न क्र.१५१ :**

१) महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत येणाऱ्या शासकीय व अशासकीय ठरावात काय फरक आहे? यातील कुठल्या ठराव महत्वाचा असतो? अथवा प्राधान्य असते? सर्वसाधारण सभेत ठराव पास झाल्यावर तसेच त्याचे इतिवृत्त कायम झाल्यावर किती दिवसात त्यावर कार्यवाही होते? सदरची कार्यवाही न झाल्यास त्याची वैधता काय? सदर मंजूर झालेला ठराव रद्द करण्यांस किती कालावधी लागतो?

२) महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात एकूण किती आरक्षित भुखंड आहेत? त्यापैकी शैक्षणिक कारणास्तव किती भूखंड आरक्षित आहेत? शैक्षणिक आरक्षणातील किती भूखंड रद्द झालेले आहेत? त्यावर किती व्यावसायिक बिल्डर्सनी बांधकामाची परवानगी मिळवलेली आहे? त्याची सविस्तर माहिती द्यावी.

३) महापालिकेच्या मालकीच्या शहरात किती मिळकती आहेत. त्याची खालील तक्त्यात माहिती द्यावी. १. अ.क्र, २. म्यु.नं., ३. सिटी सर्व्हे नं., ४. क्षेत्र आकार, ५. पी.आर.कार्ड आहे काय? ६. जागेवर सध्या काय आहे?

**उत्तर :** विधी सल्लागार :

१) महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत येणाऱ्या शासकीय व अशासकीय ठरावात फरक करणे बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये तर तरतूद नाही. अशासकीय व शासकीय असो फरक केलेला नाही. यामधील प्रत्येक ठराव महत्वाचा महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत ठराव पारित झाल्यानंतर तसेच त्यांचे इतिवृत्त कायम झाल्यावर किती दिवसांत त्यावर कार्यवाही करावी. हया बाबत नियमात तरतूद नाही. अशासकीय ठराव असा फरक केलेला नाही. सदरची कार्यवाही झाली नाही तरी वैधता नष्ट होत नाही.

एकदा ठराव पारित झाल्यानंतर ३ महिन्यांच्या आत १/२ सभासदांनी पाठींबा दिल्याशिवाय रद्द किंवा दुरुस्त करता येणार नाही. (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचीचे प्रकरण-२ एक-आर नुसार)

सहाय्यक संचालक, नगर रचना :

२) औरंगाबाद शहर मंजूर सुधारित विकास योजना व वाढीव मंजूर विकास योजना प्रमाणे एकूण ५४२ आरक्षणे आहेत. त्यापैकी शैक्षणिक कारणास्तव (प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा) १६९ आरक्षणे आहेत. शैक्षणिक आरक्षणातील कोणतेही आरक्षण

रद्द झालेले नाहीत. तसेच कोणत्याही शैक्षणिक आरक्षित भूखंडावर बिल्डर्सना बांधकाम परवानगी महानगरपालिकेने दिलेली नाही.
(टिप :- भूखंड म्हणजे आरक्षण असे वाचावे कारण प्रत्येक आरक्षणात एकापेक्षा जास्त भूखंड असू शकतात.)

**प्रश्न क्र.१५२ :**

अ) महापालिकेत एकूण किती कर्मचाीर आहेत? त्यापैकी प्रतिनियुक्तीवर किती आहेत? मनपा चे नियुक्त किती आहेत? त्यापैकी कायम किती आहे व रोजंदारीवर किती आहेत?

ब) वरील कर्मचाऱ्यांची प्रवर्गनिहाय अ-जाती जमाती मागासवर्गीय भटके व विमुक्त, धरणग्रस्त, अपंग तसेच स्वातंत्र्य सैनिकांनी निर्देशित व इतर किती आहेत? सोबत तक्ता जोडल्या आहे.

क) म.न.पा. च्या शहरात फक्त सफाई कामगार किती आहेत? त्यापैकी कायम किती व अस्थाई अथवा रोजंदारीवर किती? किती लोकांची नांवे हजेरी पटावर आहेत? त्यांचे कामाचे तास किती? व वेळ कोणती? प्रत्येक झोन व वार्डमध्ये किती कामगार आहेत? शासनाच्या नॉर्म प्रमाणे किती असावयास पाहिजे त्याची माहिती द्यावी.

**उत्तर :** उपआयुक्त (प्रशासन)

(अ) महानगरपालिका औरंगाबाद मधील कर्मचाऱ्यांची माहिती

| अ.क्र. | कर्मचारीवर्ग | शासनाने प्रतिनियुक्त केलेले | महापालिकेने नियुक्त केलेले | | म.न.पा. एकूण (४+९) | एकूण सर्व कर्मचारी (३+५) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कायमस्वरुपी | रोजंदारी | | | |
| १. | वर्ग-१ | ०३ | ०८ | -- | ०८ | ०३ | |
| २. | वर्ग-२ | ०१ | ४२ | १६ | ५८ | १९ | |
| ३. | वर्ग-३ | -- | १३४८ | ११३ | १४६१ | ११३ | |
| ४. | वर्ग-४ | -- | २२१२ | १२८६ | ३४९८ | १२८६ | |
| | **एकूण** | **०४** | **३६१०** | **१४१५** | **५०२५** | **१४२१** | |

स्वाक्षरीत/-
सहाय्यक आयुक्त-१
महानगरपालिका, औरंगाबाद.

ब) महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांचे प्रवर्गनिहाय वर्गीकरण

| अ.क्र. | कर्मचारी वर्ग | अनु.जाती | अनु.जमाती | इमाव | भ.वि. | प्रकल्प ग्रस्त | अपंग | स्वातंत्र्य सैनिकांवर अवलंबून असलेले | इतर | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वर्ग-१ | ०४ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०७ | ११ | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | वर्ग-२ | ०९ | ०५ | -- | ०५ | -- | -- | -- | २४ | ४३ | |
| ३. | वर्ग-३ | २१२ | ८३ | १९१ | १४५ | १० | २० | ०२ | ६८५ | १३४८ | |
| ४. | वर्ग-४ | ७४ | २५ | ३८ | २९ | -- | १० | -- | २०३६ | २२१२ | |
| | **एकूण** | २९९ | ११३ | २२९ | १७९ | १० | ३० | ०२ | २७५२ | ३६१४ | |

स्वाक्षरीत/-
सहाय्यक आयुक्त-१
महानगरपालिका, औरंगाबाद.

क) <u>महानगरपालिकेतील फक्त सफाई कर्मचारी</u>

| **अ.क्र.** | **विभाग क्रमांक** | **एकूण सफाई कर्मचारी** | **त्यापैकी** | | **हजेरी पटावर असेलेले कर्मचारी** | **मापदंडा नुसार आवश्यक कर्मचारी** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **कायम** | **रोजंदारी** | | | |
| १ | विभाग क्र.१ | १९६ | १२३ | ०७३ | १९६ | २३६ | साफ सफाईचे काम सकाळी ५.३० ते दुपारी १.३० या वेळेत करुन घेतली जाते. तसेच काही प्रमाणात दुपार पाळीत कचरा उचलण्याचे कामे केली जातात. ७ १/२ तास कामाची वेळ आहे. तसेच वार्डनिहाय माहिती पुढील बैठकीत देण्यांत येईल. |
| २ | विभाग क्र.२ | १६८ | ११९ | ०४९ | १६८ | २२४ | |
| ३ | विभाग क्र.३ | १४४ | ०९३ | ०५१ | १४४ | ११३ | |
| ४ | विभाग क्र.४ | २०७ | ११६ | ०९१ | २०७ | ३४१ | |
| ५ | विभाग क्र.५ | १५२ | ०४४ | १०८ | १५२ | ३२३ | |
| ६ | विभाग क्र.६ | १५५ | ०८१ | ०७४ | १५५ | २४७ | |
| ७ | विभाग क्र.८ | १८१ | ०८८ | ०९३ | १८१ | १७५ | |
| | **एकूण** | **१२०३** | **६६४** | **५३९** | **१२०३** | **१६५५** | |

स्वाक्षरीत/-
सहाय्यक आयुक्त-२
महानगरपालिका, औरंगाबाद.

**प्रश्न क्र.१५३ :** गारखेडा येथील सर्व्हे नं.६ मधील भूखंड व ले-आऊट संबंधी यापुर्वी सुनावणी चालू असल्याचे उत्तर देण्यांत आलेले आहे. सदर सुनावणी पुर्ण झालेली आहे काय? असल्यास त्यावर काय निर्णय घेण्यांत आला? वर्तमानपत्रातील वृत्ताप्रमाणे महापालिकेची फसवणूक झालेली आहे काय? स्थायी समितीच्या निर्देशानुसार गुन्हा दाखल करण्यांत आला आहे काय? आज त्या जागेवर काय स्थिती आहे. नगरभूमापन च्या अधिक्षक भूमि अभिलेख यांनी ७६ पी.आर.कार्ड रद्द केल्यामुळे महापालिका आता काय करणार आहे?

**उत्तर :** <u>सहाय्यक संचालक, नगर रचना :</u> उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार माहिती देण्यांत येते की, सर्व्हे नंबर ६ गारखेडा यामधील रेखांकना बाबतची सहाय्यक संचालक, नगर

रचना महानगरपालिका, औरंगाबाद यांचे स्थरावर सविस्तर सुनावणी होऊन सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी स्वयं स्पष्ट अभिप्राय देऊन संचिका मा.आयुक्त महोदय यांचे कडील निर्णयास्तव पाठविण्यांत आली होती. दरम्यानचे काळात प्रतिबंध केले आहे. आज स्थितीत वरील आदेशाचे विरुध्द सदरील प्रकरणी वादीन व महानगरपालिकेने अपील केलेले असून अपील प्रलंबित आहे. त्यामुळे आज स्थितीला न्यायालयाकडून पुढील आदेशा होईपर्यंत निर्णय घेता येणे शक्य होणार नाही.

करिता माहितीस्तव सविनय सादर.

या बरोबरच जण-गण-मन या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## दिनांक २०.०८.२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

बुधवार दिनांक २०.०८.२००३ रोजी मा.महापौर सौ.विमलबाई राजपूत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे सकाळी ११.४० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा.आयुक्त यांचे संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | - | सभासद |
| २. | स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक | - | सभासद |
| ३. | स.स.श्री. राधाकृष्ण गायकवाड | - | सभासद |
| ४. | स.स.श्री. वाणि ठकुजी रामसिंग | - | सभासद |
| ५. | स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र | - | सभासद |
| ६. | स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद | - | सभासद |
| ७. | स.स.श्री. शे.ईलियास किरमाणी शेख ऊमर | - | सभासद |
| ८. | स.स.श्री. रावसाहेब ममतु औताडे | - | सभासद |
| ९. | स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी | - | सभासद |
| १०. | स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी | - | सभासद |
| ११. | स.स.श्री. राजु रामराव शिंदे | - | सभासद |
| १२. | स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा | - | सभासद |
| १३. | स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव | - | सभासद |
| १४. | स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार | - | सभासद |
| १५. | स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब | - | सभासद |
| १६. | स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | - | सभासद |
| १७. | स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन | - | सभासद |
| १८. | स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | - | सभासद |
| १९. | स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे | - | सभासद |
| २०. | स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तम बिनवडे | - | सभासद |
| २१. | स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानू | - | सभासद |
| २२. | स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | - | सभासद |
| २३. | स.स.सौ. साधना गणेश सुरडकर | - | सभासद |
| २४. | स.स.सौ. विजया किशोर रहाटकर | - | सभासद |
| २५. | स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर | - | सभासद |
| २६. | स.स.सौ. ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे | - | सभासद |
| २७. | स.स.श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग | - | सभासद |
| २८. | स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण | - | सभासद |
| २९. | स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | - | सभासद |
| ३०. | स.स.श्री. नजर हमीद अ.गफुर | - | सभासद |
| ३१. | स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | - | सभासद |
| ३२. | स.स.श्री. डॉ.कराड भागवत किसनराव | - | सभासद |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३. | स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | - | सभासद |
| ३४. | स.स.श्री. मगरे सुनिल यादवराव | - | सभासद |
| ३५. | स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब | - | सभासद |
| ३६. | स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | - | सभासद |
| ३७. | स.स.श्री. नासेर खान सरदार खान | - | सभासद |
| ३८. | स.स.श्री. महम्मद जावेद महम्मद इसहाक | - | सभासद |
| ३९. | स.स.सौ. खरात कुसूमबाई दौलत | - | सभासद |
| ४०. | स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खान | - | सभासद |
| ४१. | स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव | - | सभासद |
| ४२. | स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव | - | सभासद |
| ४३. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | सभासद |
| ४४. | स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | - | सभासद |
| ४५. | स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय | - | सभासद |
| ४६. | स.स.श्री. सोपान भाऊराव वारे | - | सभासद |
| ४७. | स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा | - | सभासद |
| ४८. | स.स.श्री. म.कदिर मौलाना सय्यद | - | सभासद |
| ४९. | स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर | - | सभासद |
| ५०. | स.स.श्री. अशरफ मोतीवाला | - | सभासद |
| ५१. | स.स.सौ. संगिता बाळु मैंद | - | सभासद |
| ५२. | स.स.श्री. रणधीर होलिये | - | सभासद |
| ५३. | स.स.श्री. नासीर खान अ.रहेमान खान कुरैशी | - | सभासद |
| ५४. | स.स.श्रीमती शाहीन जफर महमद जफर | - | सभासद |
| ५५. | स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मणराव | - | सभासद |
| ५६. | स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ | - | सभासद |
| ५७. | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | - | सभासद |
| ५८. | स.स.श्री. स.सलीम स.युसूफ | - | सभासद |
| ५९. | स.स.श्री. तकीहसन खान कासी महसन खान | - | सभासद |
| ६०. | स.स.श्री. गाजी सादीद्दीन गाजी जहीर | - | सभासद |
| ६१. | स.स.श्री. मीर हिदायत अली मीर लियाकत अली | - | सभासद |
| ६२. | स.स.सौ. सिद्दीकी नईम सुलताना | - | सभासद |
| ६३. | स.स.श्री. अफसर खान यासीन खान | - | सभासद |
| ६४. | स.स.सौ. सुलताना बेगम चाँद खान | - | सभासद |
| ६५. | स.स.श्री. लकडे भरत श्रीपती | - | सभासद |
| ६६. | स.स.श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान | - | सभासद |
| ६७. | स.स.सौ. बबिता सुभाष कागडा | - | सभासद |
| ६८. | स.स.श्री. स.अली सलामी स.मीरा सलामी | - | सभासद |
| ६९. | स.स.श्री. तनवाणी किशनचंद लेखराज | - | सभासद |
| ७०. | स.स.सौ. निखत परवीन ईजाज अली | - | सभासद |

**स्विकृत सदस्य**

१. स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायणराव कच्छवाह

२. स.स.श्री. भगवान देविदास घडमोडे

३. स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
४. स.स.सौ. सलमा बानो मीर मो.अली

**चर्चा :**

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** राम जन्मभूमी न्यासाचे अध्यक्ष रामचंद्र परमहंस महाराज स.सदस्य, श्री.नंदकुमार फुलारी यांचे बंधु स्व.अशोक फुलारी आणि स.स.श्री. जगदीश सिध्द यांचे पत्नी स्व.लक्ष्मीबाई जगदीश सिध्द यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

**श्रीमती निखत जैदी, श्रीमती शाहीन जफर :** महानगरपालिकेचे माजी अधिकारी पै.शमीम आफंदी यांचे निधन झाले, त्यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पण करावी.

**डॉ.भागवत कराड :** यास माझे अनुमोदन आहे.

**श्री.घोडेले नंदकुमार :** ज्यांना श्रध्दांजली अर्पण केली जाते. त्यांचे नातेवाईकांना तसे पत्र देऊन कळविण्यांचा या सभागृहाने मागील दोन बैठकीपुर्वीच निर्णय घेतला होता, ती पध्दत अवलंबविण्यांत येते की नाही.

**नगरसचिव :** सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही होत आहे.

**डॉ.भागवत कराड :** जे स्थानिक नागरिकांना श्रध्दांजली अर्पण केल्यास त्यांचे नातेवाईकांना घरपोच तसे पत्र देण्यांत यावे. जे शहराच्या बाहेरील असतील. त्यांना पोस्टाने किंवा कुरीयरने पाठविण्याची कार्यवाही करावी.

**मा.महापौर :** ठिक आहे. सर्वांनी श्रध्दांजलीसाठी उभे राहावे.

(याच वेळी रामजन्मभूमी न्यासाचे अध्यक्ष रामचंद्र परमहंस महाराज स.सदस्य श्री.नंदकुमार फुलारी आणि स.स.श्री.जगदिश सिध्द यांचे पत्नी स्व.लक्ष्मीबाई जगदिश सिध्द, महानगरपालिकेचे माजी अधिकारी पै.शमीम आफंदी यांचे नुकतेच दुःखद निधन झाले त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.)

**श्री.नंदकुमार घोडेले :** महाराष्ट्र क्रिकेट बोर्डाच्या सहसचिव पदी नुकतीच श्री.जे.यु.मिटकर यांची नियुक्ती झालेली आहे. त्यांचे अभिनंदन या सभागृहातर्फे करण्यांत यावे. भविष्यात मनपातर्फे त्यांचा सत्कार सुध्दा करण्यांत यावा.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** माजी महापौर डॉ.भागवत कराड यांची सुध्दा भारतीय जनता पार्टीच्या शहर अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे सुध्दा अभिनंदन करावे.

**श्री.जयवंत ओक :** यास माझे अनुमोदन आहे. श्री.जे.यु. मिटकर यांची महाराष्ट्र क्रिकेट बोर्डाच्या कार्यकारीणीवर निवड झाली. त्यांचे अभिनंदन करावे तसेच त्यांचा मनपातर्फे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यांत यावा, जेणेकरुन मराठवाड्यातील क्रिकेट खेळाडूंना प्रोत्साहन मिळेल. संधी मिळेल म्हणून सत्कार करण्यांत यावा.

**डॉ.भागवत कराड :** जेष्ठ स.सदस्य यांनी सुचना मांडलेली बरोबर आहे. श्री.जे.यु.मिटकर यांचा मनपातर्फे आदरपूर्वक सत्कार करण्यात यावा. तसचे गरवारे स्टेडियम वर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट सामना घेता येवू शकेल काय. यासाठी प्रयत्न व्हावेत.

**मा.महापौर :** श्री.जे.यु. मिटकर यांची महाराष्ट्र क्रिकेट बोर्डाच्या कार्यकारणीवर निवड झाल्याबद्दल त्यांचे या सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येते. तसेच त्याचा मनपातर्फे सत्कार करण्यात यावा.

**श्री.रतनकुमार पंडागळे :** मनपाचे प्रकल्प संचालक श्री.जावरे यांचे महाराष्ट्र शासनाने अभिनंदन केले. त्यांचे सुध्दा महानगरपालिकेतर्फे अभिनंदन करण्यात यावे.

**श्री.जयवंत ओक :** यास माझे अनुमोदन आहे. शासनाने प्रकल्प संचालक श्री.जावरे यांचा सन्मान केला. महानगरपालिकेने सुध्दा त्यांचे अभिनंदन करुन आदर पूर्वक सत्कार करावा.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** संपूर्ण देशामध्ये भारतरत्न कै.राजीव गांधी यांचे स्मरणार्थ २० ऑगस्ट ते ०५ सप्टेंबर हा कालावधी सद्‌भावना पंधरवाडा म्हणून पाळण्यांत येतो. सभागृहाच्या वतीने विनंती की, या संदर्भात स.सदस्यांना आपआपल्या भावना व्यक्त करण्याची संधी द्यावी. या सद्‌भावना पंधरवाडा संदर्भात शासनाने एक परिपत्रक काढून प्रतिज्ञा घेण्याचे निश्चित केले त्यानुसार सभागृहाने सुध्दा सद्‌भावना दिन म्हणून प्रतिज्ञा घ्यावी.

**मा.महापौर :** ठिक आहे. नगरसचिव यांनी प्रतिज्ञा वाचावी. त्यासोबत स.सभासद, अधिकारी, कर्मचारी प्रतिज्ञा घेतील.

(यावेळी नगरसचिव सद्‌भावना दिन प्रतिज्ञा सभागृहात वाचून दाखवितात.)

**नगरसचिव :** मी अशी प्रतिज्ञा करतो/करते की, मी आज, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता सर्व भरतीय जनतेचे भावनिक ऐक्य आणि सामंजस्य या साठी काम करीन. मी आणखी प्रतिज्ञा करतो/करते की, आमच्या मधील वैयक्तिक किंवा सामूहिक स्वरुपाचे सर्व प्रकारचे मतभेद मी हिंसाचाराचा उवलंब न करता विचार विनिमय करुन व संविधानिक मार्गाने सोडवीन.

**श्री.अफसरखान :** ईटखेडा नं.६८, ६९ यावर ३९ कोटी कर्ज असूनही ले-आऊट मंजूर करुन देण्यात आलेले आहे. याची संपूर्ण चौकशी करण्यात यावी. तोपर्यंत ले-आऊटला दिलेली मंजूरी रद्द करण्यांत यावी नसता या जागेवर संबंधित इमारत उभी करेल व फ्लॅट बांधून विक्री होतील. सामान्य नागरिक यात गुंतला जाईल. संपूर्ण चौकशी करुन पुढील बैठकीत माहिती सादर करण्याचे आदेश द्यावेत.

**श्री.स.अली मिरा सलामी :** आताच स.स.श्री.अफसर खान यांनी गट नं.६८, ६९ ले-आऊट मंजूर करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला असे प्रकार एक झालेला नसून अनेक जागेच्या बाबतीत झालेले आहे. नगर रचना विभागातून यापुर्वीही ४०० ते ४५० ले-आऊट प्रकरणांत सर्व नियम धाब्यावर बसवून मनमानी देवाण-घेवाण करुन मंजूर करुन दिले आहे, असे समजते. साधारण सामान्य नागरिक पिठाची गिरणी किंवा टपरी साठी एक ओ.सी.साठी आल्यास तात्काळ एन.ओ.सी. दिली जात नाही. संपूर्ण नियम पाहिले जातात. परंतू जेव्हा मोठमोठे प्रकरण येतात तेव्हा नियम बाजुला ठेवून ले-आऊट मंजूर केले जाते हे योग्य नाही. प्रशासनाने हे काम कशा पध्दतीने चालते कळायला मार्ग नाही. प्रशासनावर वचक नाही. अधिकारी चुकीच्या पध्दतीने काम करतात. काही महत्वाचे प्रस्ताव या सभागृहात मंजूर होतात. त्याची अंमलबजावणी चुकीच्या पध्दतीने काम करतात. काही महत्वाचे प्रस्ताव या सभागृहात मंजूर होतात त्याची अंमलबजावणी होत नाही. कारणे दाखविले जातात. पत्रकारांना जागा देण्यासंदर्भात प्रस्ताव मंजूर केला. १.९० लक्ष रुपये हि दिली जात नाही. ज्या ठिकाणी आर्थिक व्यवहार होतात अशी कामे नगर रचना विभागामार्फत तात्काळ केली जातात. म्हणून नगर रचना विभागांची संपूर्ण चौकशी होणे आवश्यक असून अनेक वेळा सभागृहात या

विभागासंबंधी चर्चा, प्रश्न उपस्थित झालेले आहे. सभागृहात स.सदस्यांना प्रश्न विचारायचे असतात. परंतू विषय पत्रिकेवर चर्चा करावी. असे करुन विषय पत्रिका घेवून सर्व विषय मंजूर-मंजूर असे म्हणून सभा संपविली जाते. शहरातील नागरिकांच्या समस्या काय हे जाणून घेण्याची आवश्यकता आहे. यापुर्वी २-३ सभामध्ये अशाच प्रकारे विषय मंजूर करण्यात आले. लोक सभेत कशा प्रकारे सभागृहाचे काम चालत. शिस्त दिसून येते. सन्मान केला जाते. सर्व प्रश्न मांडण्यांत वेळ दिला जातो. सन्मान ठेवला जातो. त्याप्रमाण या सभागृहात का कामकाज चालविले जात नाही. खेद वाटतो. सर्व सदस्यांना बोलण्याचा अधिकार द्यावा. ज्यांना जेवढे बोलता येते तेवढे बोलू द्यावे. हा सदस्यांचा अधिकार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटना लिहून आम्हाला अधिकार दिला आहे. ज्या कामाच्या संदर्भात पैसे मिळत नाहीत ती संचिका पुढे जात नाही. टपरी, गिरणी, यांना एन.ओ.सी. तसेच पत्रकार यांना जागा देण्याबाबत तात्काळ कार्यवाही होत नाही. वृत्तपत्रात बातम्या येतात. यात या सभागृहाच्या अपमान होतो. प्रतिमा खराब होते. असे किती दिवस हे चालणार आहे. स.सदस्यांचे प्रश्न सुटणार आहेत की नाही? ईटखेड्याच्या जागे संदर्भात वृत्तपत्रात आले. चौकशी व्हावी यात कुणाचा हात आहे. अहवाल मागवावा.

**श्री.जयवंत ओक :** चर्चा करण्यासाठी परवानगी दिलेली आहे का? दिली असेल तर स.सदस्य सलामी यांच्या प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा.

**श्री.मीर हिदायत अली :** माझा विषय इतिवृत्तांताशी निगडीत असल्याने काही प्रश्न मला विचारणा करावयाचे आहेत. गेल्या २-४ बैठकीपासून कोणत्या ना कोणत्या भूखंडावर चर्चा होते. यामुळे शहरातील नागरिकांना उलटसुलट चर्चा करण्यास वाव मिळतो. मनपाची प्रतिमा खराब होत आहे. सभा केव्हा होईल व नवा मजकुर मनपाचा वृत्तपत्रात येवून केव्हा वाचण्यासाठी मिळणार याची प्रतिक्षा नागरिक करतात. सदस्यांमार्फत प्रस्ताव येतात? एखाद्या प्रस्तावावर वृत्तपत्राच्या माध्यमातून प्रसिध्दी केली जाते. त्यात सदस्यांची काही चुक नसतांना बिनकामाचा नारळ फोडला तो. ईटखेडा येथील जागेच्या नोटीसबद्दल प्रश्न उपस्थित झाला. संबंधित मालकाने कलम १२७ ची नोटीस देऊन जी कार्यवाही प्रशासनामार्फत पुर्ण होणे गरजेचे होते. ती झालेली नाही. भूसंपादनाचा प्रस्ताव ऑक्टोंबरला नोटीस मिळाली व मार्च मध्ये प्रस्ताव ठेवला. वेळीच प्रस्ताव न ठेवता उशिरा प्रस्ताव आला तो स्थगित ठेवला गेला. स्थगित ठेवल्यानंतर मा.आयुक्त यांनी दुसऱ्याच महिन्यात स्वतः या प्रस्तावाबाबत स्थगित ठेवला म्हणून पुढील मुदत संपणार आहे. म्हणून टिप्पणी ठेवावयास पाहिजे होती. ते आवश्यक होते. या प्रस्तावासंबंधी इतिवृत्तात नोंद झालेली असतांना प्रशासनास सर्व माहिती असतांना जाणून बुजून ठेवला. हा प्रस्ताव सभागृहामध्ये पाच महिने उशिरा आणण्यास व कार्यवाही करण्यास विलंब केला. ऑक्टोंबर महिन्यात संबंधित मालकाने १२७ ची नोटीस दिली, पाच महिन्यानंतर भूसंपादनाचा प्रस्ताव सभागृहात येतो हे योग्य नाही. या जागेच्या संदर्भात मा.जिल्हाधिकारी यांचेकडे काय माहिती पाठविण्यांत आली. या नंतर काय कार्यवाही करता येईल. ले-आऊटसाठी परवानगी सादर झालेली आहे. परवानगी देता येईल का? यास

कोण जबाबदार आहे. पाच महिने का पडून राहिली? स्थगित नंतर मंजूर घ्यायला पाहिजे होती. या सर्व बाबतीत प्रशासनाने खुलासा करावा.

**सौ.निखत परवीन जैदी :** स.स.श्री. सलामी यांनी विचारणा केली. त्याचा प्रथम खुलासा व्हावा.

**श्री.सुनिल मगरे :** वृत्तपत्रात जी ईटखेडा येथील गट नं. संदर्भात बातमी आली व स.स.श्री. अफसर खान यांनी मुद्दा उपस्थित केला ही आलेली बातमी सत्य की असत्य याचा खुलासा करावा. अनेक वर्षापासून नगर रचना विभागाच्या संबंधित बातम्या वृत्तपत्रात प्रसिध्द होतात. भ्रष्टाचाराचा आरोप करण्यात येतो. त्यामुळे मनपाची मोठ्या प्रमाणात बदनामी होत आहे. प्रतिमा खराब होत आहे. मागील बैठकीत मी मागणी केली होती की, नगर रचना विभागात जे अनेक वर्षापासून अधिकारी कार्यरत आहेत. त्यांच्या त्वरीत बदल्या कराव्यात. अद्याप बदल्या झालेल्या नाहीत. कामावर अंकुश नाही. वृत्तपत्रात आलेल्या बातमी संदर्भात प्रशासनाने खुलासा करावा. अनियमित, गैरमार्गाचा वापर केला असेल तर स्थगित करावे. तारण ठेवले असेल तर ले-आऊट देता येत नाही. जर नियमाला सोडून ले-आऊट मंजूर केले असेल तर त्या अधिकाऱ्यावर आजच कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात यावा. (याच वेळी मा.महापौर यांचे डायस समोर स.सभासद मोठमोठ्याने बोलतात. खुलासा करण्याबाबत मागणी करतात काहीही ऐकू येत नाही.)

**श्री.सुरजितसिंग खुंगर :** यापुर्वी ही अनेक जागेच्या संदर्भात भ्रष्टाचार झाला. अनेक वेळा सभेत प्रश्न उपस्थित झाले. काही ही कार्यवाही झाली नाही. आणखी दुसरे जागेच्या चर्चा करायची असून सर्वांचाच खुलासा एकत्रित व्हावा.

**मा.महापौर :** सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

**श्री.नंदकुमार घोडेले :** स्थानिक वृत्तपत्रात जी बातमी आली. त्या संदर्भात गट क्र.८४, ८६ हे आरक्षणातून वगळण्यांत आलेले आहे. दहा वर्षे एखाद्या जमिनीवर आरक्षण असेल व दहा वर्षात मनपा भूसंपादनाची कार्यवाही करीत नसेल तर मुळ मालकास १२७ ची नोटीस देता येते. त्यानुसार त्यांनी नोटीस दिलेली आहे. भूसंपादनाचा प्रस्ताव सभागृहासमोर सुध्दा आलेला होता. सभागृहात प्रस्ताव आला त्याची प्रत माझ्याकडे आहे.

**श्री.सुरजितसिंग खुंगर :** ले-आऊट मंजूर करुन अनेक जागा हडप करण्याचे प्रकार घडत आहेत. बेगमपुरा येथील सोसायटीमधील जागा सुध्दा हडप झाल्या. नारेगांव येथील कचरा डेपोसाठी ५-६ एकर जमीन स्थायी समितीने मान्य केल्यानुसार निर्णय घेतला. प्रत्यक्षात त्या मालकास १५-१६ एकर जमीन दिलेली दिसून येते. सन २००१ मध्ये ओपन स्पेस च्या जागेचे पी.आर.कार्ड तयार करावे म्हणून निर्णय घेतला. कार्यवाही नाही, पत्राने खुलासा मागविला. दि.१८.१२.२००१ ला उत्तर दिले. त्यात जागा कोठे आहे. याचा उल्लेख नाही. दि.१९.१२.२००१ ला पुन्हा उत्तर दिले त्यात जागा कोठे आहे. याचा उल्लेख नाही. दि.१९.१२.२००१ ला पुन्हा उत्तर दिले एकूण जागा ४२० मालमत्ता आहे. ते ४१८ दाखविले व २०६ जागेचे पी.आर.कार्ड असल्याचे कळविले. उर्वरित २१२ जागाचे पी.आर.कार्ड सध्या नाहीत. मनपाची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. मनपाच्या मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. आज मालमत्तांची काय स्थिती आहे. मागील बैठकीत बन्सीलालनगर येथील बांधकाम परवानगीचा मुद्दा उपस्थित

झाला. त्यापुर्वी विकासासाठी मनपाने दिलेल्या बांधकाम परवानगीस जागेतील २५% हिस्सा मनपास मिळाला नाही. जेवढ्या जागा विकास कामासाठी दिल्या, मालखेर बिल्डर्स निराला बाजार येथील जो २५% हिस्सा मिळावयास पाहिजे तो का मिळालेला नाही? २५% मध्ये देखील पुढील भागाचा समावेश असावा. चार दुकान पुढे तर एक मागे यामध्ये मनपाचा लाखोंचा फायदा झाला असता. या संदर्भात योग्य चौकशी होण्याची आवश्यकता आहे. मनपाच्या मालकीच्या ४१८ जागांची नोंद आहे. त्या सर्वांची पुर्ण पाहणी करावी, त्यापैकी किती जागेवर अतिक्रमण झाले, किती जागा देण्यात आल्या, कोणास दिल्या यांचा संपुर्ण खुलासा सभागृहात होणे आवश्यक आहे. विद्युत कॉलनी, धोबीघाट असे कित्येक विषय मंजूर झाले, ताळमेळ नाही. अधिकारी मनमानी करतात त्यांचेच स्तरावर जाणुन बुजून नियमात न बसणारी कामे करतात. शहरात अनेक ठिकाणी छतावर होर्डींग्ज लावण्यास येतात. त्यापासून मनपास उत्पन्न मिळाले का? कुणीही परवानगी घेत नाही. या शहरातील नागरिकांना सोयी सुविधा देण्याची जबाबदारी या सभागृहावर आहे. सभागृहाचे मत जाणून घेवून योग्य निर्णय महापौरांनी घ्यायचा असतो. महानगरपालिकेचे हिताकडे लक्ष द्यावे. आपण अध्यक्ष आहात. आपणांवर सर्वस्वी जबाबदारी आहे. जमिनीबाबत प्रत्यक्ष पाहणी व्हावी. कालबध्द कार्यक्रमाची आखणी व्हावी.

**सहा.संचालक, नगर रचना :** विकास योजना वाढीव हद्द आरक्षण क्र.ए.जी.-१ मध्ये गट नं.८६ ईटखेडा येतो. गट नं.८४, ८६ या आरक्षणाबाबत अर्जदार निर्मला विजयदत्त त्रिवेदी यांनी महानगरपालिका प्रांतिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दि.२१.१०.२००२ रोजी दिलेली आहे. त्यानुसार मा.आयुक्तांची मान्यता घेऊन मार्च २००३ च्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव भूसंपादनाच्या कार्यवाहीस्तव सादर करण्यात आलेला होता. प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला.

**श्री.अफसर खान :** मी गट नं.६८, ६९ संबंधी विचारले होते.

**सहा.संचालक, नगर रचना :** सर्वसाधारण सभेत मार्च २००३ ला ठेवला. यावर चर्चा होऊन स्थगित ठेवण्यात आला. सदरील इतिवृत्त मे मध्ये आले. सहा महिन्याची मुदत २०.०४.२००३ ला संपणार होती. विहीत मुदतीत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर होऊ शकला नाही. लॅप्स झाला.

**श्री.नंदकुमार घोडेले :** रितसर खुलासा करण्यात आला. मिळकतधारकाने १२७ ची नोटीस दिल्यानंतर वेळीच कार्यवाही न झाल्याने आरक्षण विकास आराखड्यातून वगळण्यांत आले. रेखांकन मंजूर करुन द्यावे लागेल.

**श्री.प्रशांत देसरडा :** १२७ ची नोटीस मिळकत मालकांकडून मिळाल्यानंतर सहा महिन्याच्या आत कार्यवही होणे आवश्यक आहे. प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीसाठी आलेला होता. त्यास स्थगिती दिली. नगर रचना विभागाला माहिती असून सुध्दा सर्वसाधारण सभेला या संदर्भात टिप्पणी दिलेली नाही. आक्टोंबर मध्ये येणारा प्रस्ताव मार्चमध्ये आला. सहा महिने पुर्ण झाले. १.८४ कोटी खर्च येणार सर्वसाधारण सभेने मंजूरी दिली असती. याबाबत विचार करण्यापेक्षा प्रशासनाने पाच महिने का ठेवला, जबाबदार कोण. यासंबंधी टिप्पणी मिळाली का? सहा महिने संपत आहेत अशी टिप्पणी दिली का?

लहान-सहान प्रकरणे नाही. संपादनाला पाठविले असते. पैसे देता आले असते. या सर्व बाबीस जबाबदार कोण आहे?

**श्री.भगवान घडमोडे :** संबंधित मालकाने १२७ ची नोटीस २१.१०.२००२ मध्ये दिली. प्रस्ताव मार्च २००३ च्या सभेत सादर झाला. प्रस्ताव येण्यास उशीर का झाला याची चौकशी करण्यात यावी.

**श्री.सुनिल मगरे :** भूसंपादनाची जागा किती? एकूण किती जागा होती? त्या जागेची किंमत काय? या सर्व बाबतीत खुलासा करावा.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर :** संबंधित मालकाने १२७ ची नोटीस देवून खरेदी सूचना पाठविल्यानंतर कार्यवाहीस सहा महिने अपघात असतात. परंतू मागचा अनुभव लक्षात घेतला तर असे जागेचे प्रस्ताव नगर रचना विभागामार्फत पाचव्या किंवा सहाव्या महिन्यात सादर होतात. प्रस्ताव पास केले नाही तर आरक्षण व्यपगत होईल. प्रस्ताव स्थगित ठेवले. यापुर्वी अशा प्रकरणात मा.आयुक्तांनी त्यांचे अधिकारात भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविले होते. या प्रस्तावावर का नाही. कोण दोषी आहे. याची चौकशी करावी. १२७ खाली दिलेल्या सूचनांचा सहा महिन्याचा कालावधी व प्रस्ताव पाचव्या महिन्यात पाठवता. चुकीचे आहे. एक दोन किंवा तीन महिने पुरे होतात. धोरणात्मक निर्णय घेण्यास दिशा मिळाली असती. यास कोण जबाबदार आहे?

**श्री.स.अली मीरा सलामी :** मनपाच्या खुल्या जागा ४२०/४१८ आहेत असे दाखविण्यात येते. याचे काय करणार? पैठण गेटाजवळील एक जागा स.स.नगर रचना यांनी पी.आर.कार्ड केले नाही. मनपाला १९७४ ला हस्तांतर झाले. आतापर्यंत दोन वेळेस त्याच जागेचे पैसे देण्यात आले. सिटी स.क्र.१३९१४ ते १३९१७ असे आहेत. आतापर्यंत आपले नावाचे पी.आर.कार्ड नाही. लगतचे लोकांनी मोजणी करुन आपली जागा त्यांचे जागेत सामील करुन घेतल्या आहेत. सुलभ शौचालय तोडून तेथे मनपाच्या शाळेचे काम सुरु केले. एकूण ७.५० लक्ष रुपये खर्च केले. आता सध्या तेथील होत असलेले बांधकाम बंद पडलेले आहे. कलम ३७ खाली कार्यवाहीचा ठराव मंजूर झालेला आहे. अद्यापही प्रस्ताव पाठवावयाचा किंवा नाही. येथेच आहोत. खाजगी असते तर पैसे मिळाले असते. ७.५ लाख खर्च झाले का पाठवले नाही?

**मा.महापौर :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**सहा.संचालक, नगर रचना :** या संबंधीची माहिती अत्यंत विस्तृत आहे. कमी वेळात सादर करु शकत नाही.

**मा.आयुक्त :** मी १९.०४.२००३ ला कार्यभार सांभाळला मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात नगर रचना विभागाला महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन मा.महापौर, आयुक्त यांना देण्यांत येत जावी म्हणून सूचना दिलेल्या आहेत. १२७ ची खरेदी सूचना मुळ मालकांकडून दिली जाते. त्याची कार्यवाही करण्यासाठी सहा महिन्याची मुदत असते. संपादन करावे अशा भावना व्यक्त केल्या जात आहेत. नगर रचना विभागाला मी सूचना दिलेल्या आहेत. जितक्या कलम १२७ खालील सूचना प्राप्त झाल्या त्याची एक यादी करावी. त्यात प्रस्तावाचे नांव, मिळकत धारकाचे नांव, सर्व्हे नं., क्षेत्र, केंव्हा प्राप्त झाली. सहा महिने मुदतीची अंतिम तारिख केव्हा आहे. या संदर्भात याची यादी करुन एक प्रत

मा.महापौर तसेच त्याची एक प्रत आयुक्तांना देण्यांत यावी. अशा सूचना नगर रचना विभागाला देण्यांत आल्या आहेत. महानगरपालिकेची भूमिका स्पष्ट करण्याच्या दृष्टीने जे निर्णय सर्वसाधारण सभेला घ्यावयाचे असतात ते घेऊ शकतात. मी दिलेल्या सूचनांची ताबडतोब अंमलबजावणी सहा.संचालक, नगर रचना यांनी करावी.

**श्री.स.अली मिरा सलामी :** शहरात ज्या जागा महापालिकेच्या मालकीच्या आहेत. त्यांचे पी.आर.कार्ड तयार केले नाही. माझ्या वार्डात शाळेचे बांधकाम चालू होते. सध्या बंद पडलेले आहे. ईटखेडा येथील रेखांकन नियमाने मंजूर करण्यात आलेले नाही. चौकशी करण्यात यावी.

**श्री.नंदकुमार घोडेले :** ईटखेडा येथील गट क्र.८४ आणि ८६ च्या संदर्भात एखादी जागा दहा वर्षे आरक्षण असेल व महापालिका भूसंपादनाची कार्यवाही करीत नसेल तर सबंधित मालकास १२७ ची नोटीस देण्याचा अधिकार आहे. रितसर नोटीस देऊनही कार्यवाही झाली नाही. ते आरक्षण डिलीट केले असेल तर परवानगी द्यावी लागेल.

**श्री.प्रशांत देसरडा :** जे आरक्षण डिलीट झाले यास जबाबदार कोण आहे? माझ्या दोन प्रश्नांची उतरे द्यावी विलंबाला कारण काय? जिल्हाधिकारी कार्यालयास क गेला नाही?

**श्री.भगवान घडमोडे :** या संदर्भात चौकशी समिती नियुक्त करण्यात यावी. जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** अशा जागेच्या संदर्भात स्वतंत्र बैठक घेऊन चर्चा घडवून आणावी.

**श्री.तकी हसन खॉन :** महानगरपालिकेच्या २१२ जागेचे रेकॉर्ड महानगरपालिकेत नोंद नाही. त्यास कोण जबाबदार आहे? वृत्तपत्रात तशी बातमी नुकतीच प्रसिध्द झाली आहे. त्यामुळे मनपाची बदनामी झालेली आहे. महानगरपालिकेच्या एकूण ४१८ जागा त्यापैकी रेकॉर्डला किती आहेत? २१२ जागा मनपाच्या नकाशावर नाहीत. कोट्यावधी रुपयांची मालमत्ता संपली आहे. ४१८ जागांची यादी सहा.संचालक नगर रचना यांनी ठेवावी. चार दिवसांपुर्वी आरोप करण्यांत आले. त्यांचेकडे यादी आहे किंवा नाही? डोळे बंद केलेले दिसते. मी महानगरपालिकेच्या जागा दाखवल्या. पन्नास वेळा बोलून अतिक्रमण निघत नाही. किती वेळा बोलावे. दुसरी बाब वाहनतळासंबंधी नगर रचना विभागाला संचिका गेल्याचे सांगण्यात येते. वाहनतळाची जागा विकली जाते. निदर्शनास आणून दिले. नगर रचना विभागाला वेळ नाही. अनधिकृत इमारती झाल्या. महानगरपालिकेत कोणत्याही प्रकारच्या नोंदी नाहीत. जाणून बुजून नगर रचना विभाग महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत आहे. यामुळे उत्पन्न येण्याऐवजी घटत चालले असून जनतेच्या विकास कामासाठी पैसा उपलब्ध होत नाही. वृत्तपत्राच्या बातमीनुसार २१२ जागेची नोंद मनपामध्ये नसल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे.

**सौ.निखत परवीन जैदी :** महानगरपालिकेच्या जागा किती, रिजर्वेशन किती या संबंधीची माहिती मागविण्यांत आली होती. अद्याप उत्तर देण्यांत आले नाही.

**श्री.प्रशांत देसरडा :** महानगरपालिकेच्या एकूण ४२० जागा असून ज्या जागा संरक्षित नसेल तर कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात यावा.

**सहा.संचालक, नगर रचना** : रेखांकनातील खुल्या जागेची संपूर्ण माहिती हक्कसोड प्रमाणपत्रासह मालमत्ता विभागाकडे दिलेली आहे. ही माहिती मालमत्ता विभागाकडून कळविण्यांत येईल, असे पत्र दिले आहे.

**श्री.अफसर खान** : महानगरपालिकेच्या ईटखेडा येथील रेखांकन नियमानुसार मंजूर झालेले नाही. चौकशी करण्यात यावी.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड** : स.सदस्या सौ. निखत परवीन जैदी यांचा प्रश्न गांभीर्याने घ्यावा. एखाद्या विषयाची माहिती अखत्यारित नाही. तर ज्या विभागाशी संबंधित आहे. त्यांनी उत्तर द्यावे. मालमत्ता अधिकारी यांना बोलावून त्यांचे प्रश्नाबाबत खुलासा देण्यात यावा.

**मा.महापौर** : स.सदस्यांच्या भावना लक्षात घेवून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १५२ नुसार खरेदी सूचना दिलेल्या सूचनेची विहीत मुदत संपल्यानंतर सहा.संचालक नगर रचना यांना अशा प्रकरणामध्ये स्थगित असलेले ठराव मुदत संपण्याच्या आधी शासनाकडे पाठविण्याचे अधिकार नसतांनाही त्यांनी अशी कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही. म्हणून महापौरांच्या अधिपत्याखाली उप आयुक्त (म.) सहा.संचालक, नगर रचना यांची चौकशी समिती नेमून येत्या १५ दिवसांत अहवाल सादर करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी व रेखांकनाला १५ दिवसांसाठी स्थगिती देण्यात येते. (याव वेळी स.सदस्य मा.महापौर डायस जवळ जाऊन घोषणा देतात. काहीही ऐकू येत नाही.)

**मा.महापौर** : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. एका वेळेस एकाच स.सदस्य यांनी बोलावे.

**श्री.स.अली सलामी** : मा.महापौर यांनी जो निर्णय घेतला तो योग्यच आहे. चौकशी व्हावी दिलेले रुलींग बदलत येणार नाही. इतिवृत्तांतात नोंद घ्यावी.

**श्री.भगवान घडमोडे** : महानगरपालिकेच्या फायद्यासाठी मा.महापौर यांनी योग्य व चांगला निर्णय घेतलेला आहे. याबद्दल अभिनंदन चौकशी व्हावी. असा प्रकार बऱ्याच जागा बाबत झालेला असेल. संपूर्ण चौकशी करण्यांत यावी.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड** : दोन विषय वेगवेगळे आहेत. एक विषय महानगरपालिकेचे मालमत्तेचे विषय वेगळे आहेत.

**श्री.नंदकुमार घोडेले** : संबंधित मालकाने १२७ नोटीस दिल्यानंतर वेळीच कार्यवाही न झाल्याने नोटीस कायम झाली. सदर आरक्षण व्यपगत झाले.

**मा.महापौर** : निर्णय घेतलेला आहे. त्या विषयावर बोलू नये.

**श्री.भगवान घडमोडे** : यापुर्वी जागेच्या संदर्भात अनेक वेळा सभागृहात मत मांडले कार्यवाही काहीच नाही. अनेक भूखंडातून घोटाळे झाले. भ्रष्टाचार झाला. आज घेतलेला निर्णय योग्य आहे. महानगरपालिकेच्या हिताचा व नागरिकांमध्ये महापालिकेची प्रतिमा राहील. नागरिकांच्या विकास कामाच्या संदर्भात समस्या बाजूला ठेऊन भूखंडावर नेहमीच चर्चा करणे योग्य नाही. योग्य निर्णय घेतला.

**श्री.आनंद तांदुळवाडीकर** : महापौर हया महिला आहे. स.सदस्य नेहमीच व्यासपीठाजवळ जाऊन मोठमोठ्याने बोलतात किंवा धाऊन जातात हे योग्य नाही. सर्वसाधारण सभा चालवणे मा.महापौरांची एकट्याचीच जबाबदारी नसून स.सदस्यांची देखील जबाबदारी आहे. महिला महापौर डायस जवळ धावून जाणे योग्य नाही. दिलेला निर्णय योग्य असून मान्य करावा.

**श्री.सुनिल मगरे :** नगर रचना विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्या का करण्यांत येत नाही. १०-१० वर्ष झाले. मागच्या सभेतही बदल्या संदर्भात आदेश दिले होते. कार्यवाही करण्यांत येत नाही.

**मा.महापौर :** बदल्यांचे आदेश देवून ही बदल्या होत नाही.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** इतर विषय घेण्या अगोदर चर्चेला सुरुवात करण्यांत आली. चर्चेच्या माध्यमातून महापालिका मालमत्तांचे ३५० ते ४०० प्रकरणे समोर आले. स.सदस्यांच्या भावना विचारात घेवून चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले. स.सभासदांची आपआपले मत व्यक्त केले. चौकशी समिती नियुक्त झाली. १५ दिवसांत अहवाल घेणार चांगला निर्णय घेतलेला आहे. तो विषय आता संपलेला आहे.नागरी समस्यांच्या बाबतीत जी चर्चा होणे आवश्यक होते ती झालेली नाही. ०६ महिन्या पुर्वीचा कालावधी बघितला तर शहरात पाणी, ड्रेनेज विद्युत लाईट, साफसफाई एक दिवसा आड होते. या सर्व बाबतीत नागरिकांना समस्यांना तोंड द्यावे लागते. या संबंधिच्या बातम्या वृत्तपत्रांत झळकतात. ज्या सोयी सुविधा द्यावयास पाहिजे. त्या दिल्या जात नाही. ज्योतीनगर भागाच्या संदर्भात सुध्दा वृत्तपत्रात बातमी होती. नगरसेवक पोर्टातडकीने प्रश्न मांडतात. आश्वासन दिले जाते. निर्णय होतात. परंतू त्यांची अंमलबजावणी प्रशासन करीत नाही. मालमत्ता कर/पाणीपट्टी थकीत रक्कमेवरील व्याज माफ करण्याचा निर्णय या सभागृहाने घेतला त्याची अद्याप अंमलबजावणी केलेली नाही. वार्ड वाईज वसुली ठरवून दिली. त्याची अंमलबजावणी होते की, नाही. तेव्हढी वसुली जमा होते. किंवा नाही माहिती दिली जात नाही. ०६ महिन्यापुर्वी स्वेच्छा निधीतून काम करण्यांबाबत पत्र दिले. सहाय्यक संचालक नगर रचना यांनी काहीही कळवले नाही. एक संचिका एका टेबलावर किती दिवस असावी. याची सुध्दा मर्यादा असते. ०६ महिन्यापुर्वी दिलेल्या पत्राचे उत्तर अद्याप दिले नाही. काम करता येते किंवा नाही. कळवावयास पाहिजे होते. परंतू कोणत्याही प्रकारची माहिती मला देण्यांत आली नाही. निर्णय घ्या. अंमलबजावणी करणार की नाही. पाणी पुरवठ्या संदर्भात अनेक वेळा सभागृहात चर्चा होते. पाणी आहे. तेवढेच आहे. त्याचे नियोजन व्यवस्थित करावे. ज्या शाळेचे बांधकाम चालू होते. त्यास नगर रचना विभागाने ना हरकत दर्शविली होती. काही बाबत दुषित पाणी येते. त्याची तपासणी होणे गरजेचे आहे. काही भागातील पाणी पुरवठा वेळेवर होत नाही. तर काही भागात १ दिवसाआड २ दिवसाआड पाणी पुरवठा केला जातो अशी परिस्थिती किती दिवस चालणार आहे. ते रस्त्यात आहे किंवा नाही याचा पाठपुरावा नगरसेवक करतात. महापालिकेने स्वत:च्या बजेटमधून काम सुरु केलेले आहे. सुरेवाडी भागात ले-आऊटला परवानगी दिली. बेटरमेंट चार्जेस घेतले. काम का होत नाही. घाणपाणी, सांडपाणी जळगांव रस्त्यावर येते. सिडको वसाहतीत येते. घाणीचे साम्राज्य झाले अधिकाऱ्यांनी का पाहणी केली नाही. संबंधित अधिकाऱ्यांना खुलासा विचारण्यांत यावा.

**श्री.स.अली सलामी :** नगर रचना विभागावर चर्चा चालू आहे. माझ्या वार्डात शाळेचे बांधकाम चालू होते. सध्या बंद ठेवले खुलासा द्यावा.

**श्री.तकी हसन खॉन :** बजेट मंजूर झाले. त्यात ५०% स्पील ओहरची कामे. तरतूद कमी पडते. पैसा नाही म्हणून सांगितले जाते. ड्रेनेज रस्त्यासाठी, पाणी लाईन

टाकण्यासाठी आर्थिक तरतूद शिल्लक नाही असे सांगितले जाते. स्पील ओहरची कामे चालू आहे. नवीन कामे करण्यांस पैसा नसेल तर कुठल्या तरी हेड मधून तरतूद करावी लागेल. कामांचे अग्रक्रम ठरवावे लागेल. यात इमारती बांधकामे भूसंपादनासाठी ठेवलेली तरतूद कमी केल्या १०-२५ कोटी उपलब्ध होऊ शकेल. मुलभूत सुविधा साठी उपलब्ध करुन घ्यावेत. टी.डी.आर. प्रस्ताव मंजूर केला असता तर ७.५ कोटी भूसंपादनावर तरतूद ठेवण्याची गरज पडली नसती. आज रोजी टी.डी.आर. सर्वसाधारण सभेपूढे आणावे फंडला डायवर्ट करावे.

**सौ.निखत परवीन :** स.सदस्यांच्या प्रभागात भूसंपादनाची कामे झालेली आहेत. प्रश्नोत्तरे प्रथम घेण्यात यावे.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** वृत्तपत्रात महापालिकेल्या बाबतीत उलटसुलट बातम्या छापून येतात. त्यात साफसफाई असेल, जागेच्या बाबत असेल कचऱ्या संदर्भात असेल ड्रेनेजच्या बाबतीत असेल, यासाठी दर दोन महिन्याला आढावा घेण्यासाठी एक विशेष बैठक बोलविण्यांत यावी. तसेच थकीत विजेचे बिल महापालिका भरणार वृत्तपत्रात बातमी आली भरणा करणार आपली परिस्थिती आहे का. १.१० कोटी ऐवजी १.५० कोटी भरले तर विकास कामे करु शकतो का? काळ बातमी होती. पैसे भरले ते खरे आहे का? मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

**श्री.रतनकुमार पंडागळे :** जाधवाडी हर्सुल इत्यादी भागात ३२ रेखांकन प्रकरणे आहेत. पैकी २२ प्रकरणांत १००% विकास खर्च भरलेला आहे. १.५ कोटी जमा केले. ५०% विकास निधी भरणा केलेले प्रकरणांसह सुमारे २ ते २.५ कोटी जमा झालेले आहे. एवढी लोकसंख्या लिगल असून एक पाण्याची पाईप लाईन सुध्दा त्या भागात टाकण्यात आली नाही. तेथील नागरिकांना दुषित पाण्यामुळे धोका निर्माण झाला. पैसे जमा केले परंतू सुविधा नाही. डांबरीकरणाचे काम सुध्दा केले नाही. जेथे १००% टॅक्स भरतात, तेथे नागरी सुविधा दिल्या पाहिजे. मागील स्थायी समिती मध्ये विकास आराखड्याचा प्रस्ताव आला होता. सर्वसाधारण सभेकडे आणावयास पाहिजे होता. प्रस्ताव आल्यानंतर मान्यता देऊन महापालिकेचे उत्पन्न वाढेल त्यातून विकास कामासाठी पैसा खर्च करता येईल. तातडीने कार्यवाही करण्यांत आली पाहिजे तर विकास कामे होण्यास मोठी मदत होईल.

**श्री.माणिक साळवे :** नगर रचना विभागावर प्रत्येक बैठकीत २.३ तास चर्चा होते. वृत्तपत्रात बातम्या येतात, महापालिकेची प्रतिमा दिवसेंदिवस खराब होत आहे. या विभागाच्या संबंधित चर्चा करण्यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यांत यावे. तारिख निश्चित करावी.

**श्री.रतनकुमार पंडागळे :** १९९८ पासून किती ले-आऊट मंजूर करण्यांत आले. खुलासा देण्यांत यावा.

**मा.महापौर :** नगर रचना विभागाच्या संदर्भात विशेष बैठक आयोजित करुन सविस्तर चर्चा करुन निर्णय घेतले जातील. सभेची तारिख नंतर ठरविण्यांत येईल.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** नगर रचना विभागाचा विषय संपलेला आहे. विकास कामे होण्याच्या दृष्टीने अति.शहर अभियंता, शहर अभियंता पाणी पुरवठा, ड्रेनेज, विद्युत या विभागासाठी जी बजेटमध्ये तरतूद करण्यांत आली त्यानुसार विकास कामांना सुरुवात का करण्यांत आली नाही, खुलासा करण्यांत यावा.

**श्री.जयवंत ओक :** मा.आयुक्त येथे आल्यापासून विकास कामांना चांगल्याप्रकारे वाटचाल झाली. स्वेच्छा निधीतून होणारी कामे ०१ महिन्यात निकाली काढावी. याबाबत प्रशासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. विकास कामाच्या बाबतीत किती संचिका मा.आयुक्तांकडे थांबून आहेत. सिडको हडको भागात स्वेच्छा निधीतून विकास कामे करता येऊ शकतात का? खुलासा करावा. स्पील ओव्हरची कामे असेल तर इतर कामे करणार की नाही. किती प्रकरणे तुंबून पडलेली आहे. खुलासा व्हावा. शासनाने गुंठेवारी कायदा लागू केला. त्यामुळे विकास कामे बंद झाली. त्याबाबत काय निर्णय घेणार आहे. मा.आयुक्त रुजू झाले. तेव्हा त्यांनी खुल्या जागेचे संरक्षण व्हावे म्हणून ताबडतोब तार फिन्सींग केली जाईल. ज्यानुसार तार कुंपन झाले का? पाणीपट्टी वसुली मालमत्ता कर वसुली तसेच जकातीचे उद्दिष्ट पुर्ण करणार काय? काही विकास कामाच्या बाबत अंदाजपत्रके तयार झाली. परंतू कामे थांबून आहेत. शहरात एकूण ५२ स्लम भाग आहे. त्या भागासाठी बजेट ठेवले. तेथील विकास कामाची काय परिस्थती, किती स्लम भागात कामे झाली. आणखी कोणत्या भागात कामे होणार आहे. टी.डी.आर. चा प्रस्ताव आणावा. त्यास मान्यता द्यावी. महापालिकेचे उत्पन्न वाढेल विकास करता येईल. घरांना नंबर दिल्यास मालमत्ता कर, पाणीपट्टी वसुलीत भर पडेल. सर्व सुचनाची दखल घेऊन तसेच वृत्तापत्रातील बातम्याची दखल घेऊन मा.आयुक्त, मा.महापौर यांनी एकत्र येऊन जनतेची विकास कामे होण्यासाठी महापालिकेचे उत्पन्न जास्तीत जास्त कसे वाढविता येईल. यासाठी प्रयत्न करावेत. गुंठेवारी कायदा लागू लागणार नाही, तोपर्यंत अशा भागातील नागरिकांना सुविधा देता येणार नाही. या शासनाने महापालिकेस बेदनाम करण्याचे काम चालविले. या अगोदर १० वर्षापासून या भागात सुविधा दिल्या गेल्या. गुंठेवारी कायदा काढला सुविधा बंद केल्या. काही सदस्य सत्तेतील या ठिकाणी बोलत नसतील. परंतू, अंतर्गत त्यांची शासनाबाबत नाराजी आहे. बोला शकत नाही. अशा भागात आता सुविधा दिल्या जात नाही. तेथील नागरिकांना सांगितले पाहिजे. शासनाची आडकाठी आहे. कामे करु शकत नाही. महापालिका प्रशासनाचा दोष नाही. वाहन चालक प्रशिक्षण, संगणक तसेच औषधोपचारासाठी स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत दिली जात असे. ते सुध्दा बंद केले. गरीब लोकांना फायदा होत होता. शासनाचा यात दोष आहे. महापालिकेचा नाही. जनतेच्या कामासाठी आपणा सर्वांना निवडून दिले. विकास कामे झाली पाहिजे, त्यासाठी प्रयत्न करावे.

**श्री.मिर हिदायत अली :** मा.आयुक्तांचे खऱ्या अर्थाने अभिनंदन केले पाहिजे. बजेटनुसार विकास कामे होत आहे.

**श्री.नंदकुमार फुलारी :** सिडको-हडको भागात स्वेच्छा निधीतून ०३ वर्षापासून विकास कामे होत नाही का?

**श्रीमती शाहीन जफर :** स्वेच्छा निधीतून वाहन चालक प्रशिक्षणासाठी मदत करण्याची मान्यता द्यावी. तसा निर्णय या सभागृहाने घ्यावा.

**श्रीमती पार्वती मानकापे :** गुंठेवारी कायदा तात्काळ लागू न केल्यास आम्ही उपोषणांस बसणार आहोत. विकास कामे होणे गरजेचे आहे. ०३ वर्षात कोणतीही कामे वार्डात झालेली नाही.

**मा.आयुक्त :** विज बिल भरण्याबाबत प्रश्न उपस्थित झाला. दर महिन्याला विज बिल १.६० कोटी पर्यंत येते. या संदर्भात सभागृहात कोणताही ठराव झालेला नाही. परंतू न्यायालयाने दिलेले निर्देश व शासनाचे आदेश याचा विचार करावाच लागतो. महापालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असली तरी स्वतंत्रपणे कारभार करु शकत नाही. निर्णय घ्यावयाचा झाल्यास स्थायी समिती, सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार अधिकारी दिलेले आहे. प्रशासनाला एका बाजूने न्यायालयाचे निर्देश शासनाचे निर्देश दोन्ही बाजू विचारात घ्याव्या लागतात. विज मंडळाचे संपूर्ण बिल अदा केलेले नाही. सभेच्या अगोदर या संदर्भात मा.महापौर, स.पदाधिकारी यांचेशी चर्चा केलेली आहे. प्रशासनाने १.६० विज बिल भरलेले नाही. विकास कामाच्या संदर्भात बोलायचे झाल्यास जी महत्वाची विकास कामे करणे गरजेचे आहे. ती करावीच लागणार आहे. विकास कामे करण्यासाठी भांडवल उभे करणे, मालमत्ता कर, पाणीपट्टी जकात या ३ स्त्रोतातून ९५ ते १०० गृहीत धरुन खर्च होईल, असे अपेक्षित आहे. या तीन विभागावर वसुली जास्तीत जासत होण्याच्या दृष्टीने प्रशासनाने कठोर पावले उचलली आहे. आवश्यक असे प्रयत्न केले जात आहे. विशेष करुन ३ आठवड्यात प्रयत्न केले. शहरात एकूण ९०,८२६/- मालमत्ता आहे. शहरातील मालमत्ताचे सर्वेक्षण खाजगी संस्थेमार्फत व्हावे म्हणून सभागृहाने एक मताने ठराव पारित केला. त्यानुसार निविदा अंतिम टप्प्यात आहे. महाराष्ट्र स्तरावरील वृत्तपत्रात प्रकाशित झाली आहे. तात्काळ कार्यवाही होणार आहे. आजच्या दैनिक वृत्तपत्रात प्रकाशित झालेली आहे. हा सर्वेक्षण व्यवस्थित होण्याची अपेक्षा असून आपल्या सहकार्याची आवश्यकता आहे. काही कोटीने मिळत नसलेले, उत्पन्न महापालिकेस मिळणार आहे. यावरच अवलंबून न राहता प्रत्येक वर्षी कर मूल्य निर्धारण विभागाकडून शेवटच्या तीन महिन्यांत कार्यवाही होत असे. म्हणून मागील आठवड्यात ३६ कर्मचारी याची मालमत्ता कर आकारणी व वसुलीच्या कामासाठी सकाळ दुपार सत्रात नियुक्ती करुन जास्तीत जास्त उत्पन्न कशा पध्दतीने वाढविता येईल. याकडे प्रशासन लक्ष देऊन आहे. दररोजच्या वसुलीत किती वाढ झाली. नियमित किती वसुली यावयास पाहिजे या करिताही आवश्यक उपाययोजना केल्या जातील. मालमत्ता कराचे निव्वळ थकबाकीदार ६४७ असून न्यायप्रविष्ट प्रकरणे २४२ असून येणारी रक्कम रु.६,१८,५४,८७१/- रस्ता रुंदीकरणात बांधित असलेल्या मालमत्ता ११५ असून त्यातून मिळणार कर रु.१३,४५,७०८/- पडलेल्या मालमत्ता ८६ असून त्यापोटी रु.२३,८३,७०१/- इतकी तर कर आकारणीच्या प्राप्त निर्णयासाठी वादग्रस्त प्रलंबित असलेले २५६ प्रकरणे असून त्यावर रुपये १,६०,९४,९४८/- कर येणे आहे. न्यायालयीन प्रकरणांत रक्कम रुपये ६७,४५,९८२/- आहे. कर आकारणी झालेल्या व न सापडलेल्या मालमत्ता ४३ असून त्यापोटी येणारा कर १४,५०,७३३/- इतकी आहे. बरीच प्रकरणे न्याय प्रविष्ट असून झोनल कमीशनर तसेच उपआयुक्त (म.) हे नागरिकांच्या तक्रारी संबंधात तसेच न्या प्रविष्ट असलेल्या केसेसचा निपटारा होण्याच्या दृष्टीने झोन मध्ये वेळोवेळी बैठका घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेतील व त्या केसेस अंतिम होतील. त्या निकाली लागेल. यामुळे महापालिकेस जवळपास १.५६ कोटी रुपये मिळतील. तसेच दोन वेळेस

एकाच मालमत्तेची नोंद असलेल्या अशा मालमत्तेची तपासणी करुन कार्यवाही होईल. कर आकारणी झालेल्या परंतू न सापडलेल्या अशा ४३ मालमत्ता आहे. त्या मालमत्ताची संपूर्ण माहिती घेतल्यानंतर त्यापासून १४.५० लक्ष रुपये मिळणार आहे. थकबाकीदारांकडून वसुली होण्यासाठी आवश्यक उपाययोजना करुन एक महिन्याच्या आत वसुली करण्याचे आदेश/सुचना उपआयुक्त (म.) यांना दिलेल्या आहेत. मोठे थकबाकीदार जे की, २५,०००/- व या पेक्षा जास्त रक्कमा असलेले थकबाकीदार यांचेकडून अगोदर वसुली संदर्भात कार्यवाही करावी. झोन अधिकारी यांनी स्वत: त्यांचेकडे जाऊन तगादा करावा. ज्या थकबाकीदाराकडून वसुली जमा झाली नाही. तर त्यांचेवर जप्तीची कार्यवाही करता येईल. व वसुली करण्यांत येईल. मालमत्ता कराची कर्मचारी निहाय किती वसुली झझली. त्याचा मालमत्ता निहाय आढावा घेण्यांत येईल. त्याच प्रमाणे पाणी पट्टीही वसुल केली जाईल. जकाती पोटी ६९ कोटी अपेक्षित आहे. मागील वर्षाची तुलना केली असता २४-२५ दिवसाचा संप होऊन देखील वसुली जास्त आहे. शहरात ९० हजाराच्या वर मालमत्ता आहेत. त्याचा आढावा घेतला थकबाकीदार व चालू मागणीतील थकबाकीदार यांना सर्वांना नोटीसा एकदम देणे शक्य होणार नाही. म्हणून ५४ हजार थकबाकीदारांना नोटीसा दिल्या. काहींना या महिन्यात दिल्या जातील. नोटीस दिल्यानंतर थकबाकीदार कराच्या रक्कमा भरतात. तरी सुध्दा पाणीपट्टीची वसुली १.८० कोटी तर मालमत्ता कराची वसुली २.४० कोटी झालेली आहे. १८ ऑगस्ट २००३ पर्यत विविध १० कराच्या माध्यमातून महापालिकेस ३३.१२ कोटी रुपये मिळालेले असून त्यात जकात वसुली ही २१ कोटी आहेत. या वर्षीचे उद्दिष्ट १४९ कोटीचे आहे. किमान ११५ कोटी पर्यंत वसुली होईल अशी अपेक्षा वाटते. जोपर्यंत जास्तीत जास्त उत्पन्न मिळत नाही. तोपर्यंत होणारी विकास कामे करण्यास वेळ लागणार आहे. विकास कामचे प्रस्ताव नावानिशी घेण्यात आलेले आहे. चार तांत्रिक कार्यकारी अभियंता यांचे विभागामार्फत विकास कामचे प्रस्ताव येतात. त्यात चार विभागाचे मिळून एकूण ९२७ अंदाजपत्रक असून त्यापैकी ४८३ क्लीअर केली आहेत. वेगवेगळ्या विकास कामासाठी ४४.६७ कोटी अपेक्षित खर्च असून मागील वर्षाची राहिलेली कामे करावी लागणार आहे. त्यावर सुमारे १५.८४ कोटी रुपये खर्च होतील. या वर्षासाठी नवीन रु.२८.८३ कोटी रुपये विकास कामासाठी खर्च होतील. आतापर्यंत २०.१९ कोटीची विकास कामे मंजूर केलेली आहे. उर्वरीत ७ ते ८ कोटी रुपयाची कामे मंजूर होऊ शकतील. परंतू, उत्पन्न किती येते. किती कालावधीपर्यंत किती उत्पन्न येऊ शकेल. कोणत्या कामाची आवश्यकता आहे. स्थायी समिती, सर्वसाधारण सभेने मार्गदर्शन करावे. त्याप्रमाणे प्रशासन निश्चित चालेल. नगर रचना विभागासंबंधी कालच मी माहितीची विचारणा केलेली असून प्रत्येक प्लॅटवर जाऊन जागेची पाहणी करुन माहिती घेणार आहे. सिटी सर्व्हे कार्यालयात अशा जागांवर महानगरपालिकेचे नांव असणे आवश्यक आहे. आखीव पत्रिका दाखवा म्हटल्यावर धावपळ होते. कर्मचाऱ्यांचे गोपनिय अहवाल जसे जपून ठेवण्यांत येतात. तसे महानगरपालिकेच्या मालकीचे आखीव पत्रिका

जतन करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. जिल्हाधिकारी, शहर भूमापन अधिकारी यांना भेट देऊन आढावा घेण्यांत येईल.

**श्री.अविनाश कुमावत :** महापालिकेने खर्च करुन अनेक ठिकाणी इमारती बांधल्या, शॉपींग सेंटर तयार केले. इमारतीचा वापर होत नाही तसेच शॉपींग सेंटर भाडे तत्वावर देण्यांत आले नाही. महापालिकेचे उत्पन्न बुडत आहे.

**श्री.जयवंत ओक :** जे मालमत्ता कर पाणीपट्टी वसुलीसाठी कर्मचारी जाणार वारंवार मागणी करुनही वसुली न झाल्यास कर धारकांवर कार्यवाही करणार की, कर्मचाऱ्यांवर करणार आहे. जे कर भरणा करणार नाही. २-३ वेळेस मागणी करावी, एवढे करुनही कर भरणा न झाल्यास कर धारकांवर कार्यवाही करण्यांचा निर्णय घेण्यांत यावा.

**मा.आयुक्त :** जमीन महसुल कायद्यानुसार वसुली संदर्भात अगोदर नोटीस द्यावी लागते. नोटीसचे उत्तर येण्याचा कालावधी दिला जातो. त्यानंतर मालमत्ता जप्त करण्याची कार्यवाही करता येऊ शकते. उपआयुक्त (म.) हे महसुल खात्यातच त्यांची त्यांना त्याबाबत चांगली माहिती आहे, ते वेळीच कार्यवाही करतील.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** महापालिकेच्या उत्पन्न वाढी संदर्भात ज्या उपाय योजना करण्यांत आल्या त्याबद्दल आयुक्त यांनी खुलासा केला. प्रश्न असा की, स्वेच्छा निधीतून होणारी कामे बंद झाली. ज्या भागात १००% बेटरमेंट चार्जेस भरणा होतो. तेथे सुविधा दिल्या जात नाही. ७-८ महिन्यापुर्वी स्वेच्छा निधीतून काम होण्याबाबत पत्र दिले. अद्याप खुलासा नाही, कार्यवाही नाही. सभागृहाने मालमत्ता कर व पाणीपट्टी थकीत रक्कमेवर व्याज आकारु नये. निर्णय घेतला त्याची अंमलबजावणी का करण्यांत आली नाही. सर्वच वार्डातील विकास कामाच्या संदर्भात मी बोलतो आहे. वृत्तपत्रात बातम्या प्रसिध्द होतात त्याची शहानिशा होत नाही. दुपारी ३ वाजेनंतर सर्व अधिकारीयांनी कार्यालयात उपस्थित राहणे बाबत आयुक्तांनी सूचना देऊनही अनेक वेळा अधिकारी जागेवर दिसून येत नाही. नगरसेवकांचा वेळ वाया जातो. नागरिकांची वेळेवर कामे होत नाही. त्यामुळे नागरिकांचा रोष हा नगरसेवकांवर असतो. सर्वसामान्य जनतेच्या समस्या कशा पध्दतीने तातडीने सोडवल्या जातील. या बाबतची प्रशासनाची भूमिका काय हा मुळ प्रश्न या सभागृहाचा आहे. वृत्तपत्रात बातमी येतात, त्याचा विचार व्हावा. जाधववाडी संदर्भात बातमी आली खरी की खोटी तपासणी होऊन खुलासा अपेक्षित आहे.

**मा.महापौर :** १/२ तासासाठी सभा तहकुब करण्यांत येते.

(वेळ दुपारी २.१० वा सभा पुन्हा ३.१० वाजता सुरु.)

**श्री.जयवंत ओक :** "गुंठेवारी" या संबंधीचा खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.)** : "गुंठेवारी विकास" या संदर्भात शासनाने २००३ पर्यंत मुदत दिलेली होती. ते दिनांक ०५ जुलै, २००३ ला प्राप्त झाले. कार्यवाही करण्या संदर्भात स्वतंत्र विभाग स्थापन केलेला आहे. शहरात संपूर्ण ११८ अनधिकृत वस्त्या आहेत. व्यवस्थित रेखांकन करणे, घरा मालकांचे अर्ज घेणे यासाठी झोन निहाय एक टीम तयार केलेली आहे. यात उप अभियंता, दुय्यम आवेक्षक, लिपीक असा कर्मचारी वर्ग आहे. झोन क्र.४ मध्ये तसेच झोन क्र.८ मध्ये

एक-एक अतिरिक्त टीम दिली आहे. सकाळी ९.०० ते दुपारी १.०० पर्यंत ही टीम महापालिकेचया शाळा, समाजमंदिरामध्ये बसून काम करणार आहे. जाहीर रित्या प्रसिध्दी करण्यांत येणार आहे. भित्ती पत्रके, जाहीरात पत्रक, पांप्लेट घरोघरी वाटणार. सुशिक्षीत नागरिकांपर्यंत गुंठेवारी संदर्भात कायद्याची प्रत सामुहिकरित्या पुरविण्यांत येईल. व गुंठेवारी विकास या योजनामध्ये जास्तीत जास्त लोकांचा सहभाग होईल त्या दृष्टीने कार्यवाही होत आहे. जी रक्कम त्या त्या भागातील नागरिक भरणा करतील. ती रक्कम त्याच वस्त्यामध्ये विकास कामासाठी खर्च होईल. हे जनतेस समजून देण्यांत येईल. जी अर्ज प्राप्त झालेली आहेत. वसाहतींचे रेखांकन करणे, रस्ते आरक्षित जागा ईत्यादी तपासणी करणे. पुढील २/३ महिन्यामध्ये गुंठेवारी विकास संदर्भात कार्यवाही पुर्ण करण्याचा प्रयत्न करणार व प्राग्रेसीव्ह माहिती देण्यांत येईल.

**श्री.साहेबराव कावडे** : प्रत्येक वार्डात जाऊन किती कर्मचारी काम करणार आहे. एकूण ११७ वसाहती आहे. आता पर्यंत किती वसाहतीचा पुर्णतः गुंठेवारी नुसार नियमित करण्यांत आले आहे.

**श्री.जयवंत ओक** : ३ वर्ष ०४ महिने गेले. ११४ ते ११७ अनधिकृत वसाहती आहेत. ड्रेनेज, पाणी, विद्युत ईत्यादी सुविधा बंद आहेत. ते देणार का याचा समावेश आहे का? येत्या ८-१० दिवसात संपूर्ण वसाहतीला गुंठेवारी विकास कायद्यात आणण्यासाठी कार्यवाही सुरु करावी. चिकलठाण्यापासून सुरुवात करुन पडेगांव, मिटमिटा तसेच हर्सुल पासून सातारा, कांचनवाडी या मधील वस्त्यामध्ये फिरुन जनतेला या संबंधीची सविस्तर माहिती द्यावी. त्यांनी स्वतःहून योजनेत भाग घेतल्यास चांगलीच मदत होईल. नागरिकांचा प्रतिसाद कसा मिळतो ते पहावे.

**श्री.अविनाश कुमावत** : झोन वाईज टीम बसवून गुंठेवारीच्या संदर्भात जनतेपर्यंत माहिती पुरवून तात्काळ कार्यवाही करावी. गुंठेवारी मध्ये २०X३० चे प्लॉट जास्त असतात. सामान्य व्यक्ती, कर्मचारी मंजूर यांनी घेतलेले रु.७,२००/- लागतील. २-३ हप्त्यात वसुल करावी. सवलत द्यावी.

**श्री.भगवान रगडे** : गुंठेवारी संदर्भात माहिती मागविली देण्यांत येत नाही. मनपा हद्दीत ११८ वसाहती येतात. या वस्त्यातील लोकांना गुंठेवारी विकास कायदा लागू करणार. विकास शुल्क भरुन घेणार त्या नंतर किती कालावधी नंतर मुलभूत सुविधा देणार याचा सुध्दा खुलासा देण्यात यावा. ज्या वस्त्यामधून विकास निधी जमा केल्यास त्याच वसाहतीसाठी वापरणार काय? खऱ्या अर्थाने ही योजना राबवायची असेल तर पैसे जमा करण्यासाठी फिरते पथक ठेवा. आर.टी.ओ. ज्या प्रमाणे मंडप टाकतात त्या प्रमाणेच वसुली करावी.

**श्री.मोतीलाल जगताप** : ज्या वस्त्या गुंठेवारी विकास कायद्यात येतात अशा वस्त्यात टिम पाठविल्यास अनेक नागरिकांचे सहकार्य मिळेल असे वाटते.

**श्रीमती पार्वती मानकापे** : ३ वर्षाचा कालावधी या बॉडीचा गेला आणखी दोन वर्ष जाईल. झ ोन अधिकाऱ्यांना माहिती विचारल्यास देत नाही. प्रत्येक वार्डात एक पथक गुंठेवारीची कार्यवाही करण्यासाठी ठेवावे. जनतेचा सहभाग मोठ्या प्रमाणात मिळेल. लोकांना कसे कळणार रिक्शा फिरवून माहिती द्यावी.

**श्री.राजु शिंदे** : गुंठेवारी योजनेत किती अर्ज प्राप्त झाले. त्याचा सर्वे केला आहे का?

**उपआयुक्त (म.) :** आतापर्यंत जवळपास ४००० अर्ज प्राप्त झालेले आहे. मुदत २८ फेब्रुवारी, २००३ होती. मुदतवाढ झाली नव्हती.

**श्री.राजु शिंदे :** ११८ वसाहतीमधून आतापर्यंत ४००० हजार अर्ज प्राप्त झाले. उर्वरीत नागरिकांचे अर्ज का प्राप्त झाले नाही. ही संख्या फार कमी आहे. गरीब नागरिकांचे प्लॉट आहे. दोन दोन मिळून प्लॉट घेतले. पैसे भरणा केले. गुंठेवारीमध्ये एक घरासाठी १४-१५ हजार रक्कम येत आहे तेवढी रक्कम भरण्याची ऐपत नाही. प्लॉटची किंमत ५,०००/- व शुल्क १५,०००/- लोक भरणार नाहीत. सुविधा दिल्या ते चालू ठेवण्यात यावे. या संदर्भात मी मा.विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये उपोषण केले होते. त्यांनी सुध्दा तात्पुरत्या स्वरुपात सुविधा देण्यात याव्यात. असे सुचविले. या शहरामध्ये गुंठेवारी कायदा लागू होण्यास भौगोलिक परिस्थिती योग्य नाही. एखाद्या वस्तीतील १०० घरांचे १ लक्ष जमा झाले. पाणी पाईप लाईन २ लक्ष, रस्त्यासाठी ५ लक्ष लागणार. उर्वरीत रक्कम कोठून खर्च करणार प्रश्न आहे. ज्यांची रक्कम जमा झाली ते नागरिक आमच्याकडे तगादा लावतील. माझ्या माहिती प्रमाणे ९०% रक्कम खर्च करणार १०% इतर खर्च होईल.

**सहा.संचालक, नगर रचना :** ही योजना अशी की, जागेवर वस्ती झालेली त्या वस्तीचे तालुका निरिक्षक भूमी अभिलेखा यांचेकडून जागेचे सर्वेक्षण करुन घ्यावे लागणार आहे. प्रत्येक घर त्या सर्वेक्षणामध्ये आले पाहिजे. तसा नकाशा तयार झाल्यानंतर त्या नकाशाची तुलना विकास योजनेशी करुन विकास योजनेचे जे प्रस्ताव आहे. काही आरक्षण असतील, डी.पी.रोड असतील त्या प्रस्तावाने ने बाधित होते ते वगळून उर्वरीत जे घरे राहतील. त्यास अधिकृत करता येईल.

**श्री.राजु शिंदे :** जेवढी रक्कम जमा झाली. तेवढेच सुविधा पुरविणार का? ९०% रक्कम खर्च केल्यास लोक आमच्या घरी चकरा मारतील. योजना यशस्वी होणार आहे का? जमा झालेल्या रक्कमेतून ९०% रक्कम खर्च करुन त्या त्या वस्तीचा विकास होणार नाही.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** गुंठेवारीच्या संदर्भात माझे वैयक्तिक मत वेगळे आहे. अनधिकृत वसाहत ही कुणी नगरसेवकांनी बसविलेली नाही. नागरिकांना सोयी सुविधा मिळाल्या पाहिजे. एवढेच मत प्रत्येक वेळी सदस्य मांडतात. जमा होणारा विकास निधी यातून त्या भागात सर्वच सुविधा देणे शक्य नाही. हे आपणा सर्वांना माहिती आहे. कुणीही प्रतिनिधी असेल ते जसे पक्षाचे काम करतात. तसेच त्यांचे वार्डात एकमत करुन गुंठेवारीच्या संदर्भात प्रचार करुन जनतेचा जास्तीत जास्त सहभाग कसा होईल हे बघणे गरजेचे आहे. एवढी रक्कम भरणा केल्याप्रमाणे सुविधा मिळेल असे लोक प्रतिनिधीच्या माध्यमातून प्रशासनाच्या माध्यमातून सांगण्यात आले पाहिजे. एखाद्या वसाहतींतील ५ लक्ष रुपये जमा झाले तेथे ड्रेनेजची आवश्यकता आहे. तर तेच काम घेतले पाहिजे. जनतेला प्रवृत्त करा. त्यानंतर पाणी लाईनचे असेल ते घेता येईल. क्रम लावून सुविधा करुन घ्याव्या लागणार आहे. जनतेला समजावून सांगण्याची गरज आहे. तरच योजना पुर्ण होवू शकेल. सन २००० पर्यंत केलेल्या कामावर देखभाल दुरुस्तीसाठी स्वेच्छा निधीतून खर्च केला जात असे. गुंठेवारी कायदा शासनाने महाराष्ट्रात अंमलबजावणी करण्याचे सांगितले त्यादृष्टीने जनतेचा रोष हटवून त्याचे पाठीमागे लागून खऱ्या

अर्थाने नागरिकांची सेवा करण्याचे काम प्रत्येक नगरसेवकांना करावे लागते. गुंठेवारी कायदा अंमलात आणावा लागेल. जनतेला हे सुध्दा माहित आहे. एन-३ भागात प्लॉट घेतल्यास २००/- रु. चौ.फुट प्रमाणे मिळतो. त्याच बाजुला जयभवानी नगर येथे १०/- रु.चौ.फुट प्लॉट मिळतो. हे सभागृहाने सांगण्याची गरज नाही. एखाद्या वार्डात प्रभाग समितीच्या अंतर्गत येणारा भाग तेथे अनाधिकृत वसाहती मोठी असेल. त्या भागात सर्वांनी मिळून किंवा एक संयुक्त कमेटी नियुक्त करुन नागरिकांना गुंठेवारी कायद्याचे नियमित करण्याच्या दृष्टीने त्यांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केल्यास ही योजना यशस्वी होवू शकते. यात रिझर्वेशन असेल ते डिलीट करुन शासनास कळवून मान्यता घ्यावी. आपल्या सर्वाचे सहकार्य प्रशासनास मिळाले तर निश्चितपणे कार्यवाही पुर्ण होवू शकेल.

**श्री.फुलारी नंदकुमार :** मराठवाड्यात गुंठेवारी पध्दत लागू होते का? जेथे गुंठेवारी मध्ये जमीन घेतलेली असेल २०X३० चे प्लॉट आहे. तेथे लागू होवू शकेल. पश्चिम महाराष्ट्रात ही पध्दत आहे. खुलासा द्यावा.

**श्री.राजु शिंदे :** गुंठेवारी पध्दतच आपणांस माहिती नाही. मी अनधिकृत वसाहतीत राहतो. तेथील लोकांची पैसा भरण्याची मानसिकता नसते. बाकीचा खर्च करणार का? माझ्या वार्डातील मी सर्व नागरिकांना गुंठेवारीत शुल्क भरण्यास सांगतो. १ लक्ष रक्कम जमा झाली. वार्डात त्या भागात सर्व सुविधा देणार काय? गुंठेवारीसाठी ४ हजार अर्ज प्राप्त झाले. त्याला लिगल केलेली ज्या प्लॉटची किंमत ४,०००/- आहे. १४-१५ हजार कसे भरणार त्यांची ८-१० हजार भरण्याची क्षमता नाही. सभागृहाच्या भावना शासनास कळवाव्यात. स.सदस्य श्री.कोकाटे यांना विनंती की, वरीष्ठ पातळीवर त्यांचे पक्षाचे शासन आहे. शासनास त्यांनी या सभागृहाच्या भावना व्यक्त कराव्या. भौगोलिक परिस्थिती नुसार या शहरात गुंठेवारी कायदा लागू होवू शकत नाही. शासनाची योजना आहे. महानगरपालिका किंवा सदस्यांची योजना नाही.

**श्री.स.अली सलामी :** गुंठेवारीच्या संदर्भात चर्चा चालू आहे. यापुर्वीच प्रस्ताव सभागृहाने मंजूर केला. शासनाकडून पत्रक प्राप्त झाले. त्यानुसार प्रस्ताव झाला चर्चा झाली आता फक्त अंमलबजावणी कशा पध्दतीने करावी. या प्रश्नावर चर्चा चालू आहे. आताच उपआयुक्त यांनी खुलासा केला ५५०० ते ६००० अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी किती लिगल करण्यात आले. किती नोटीसा दिल्या. माझ्या माहितीप्रमाणे ज्या अटी ठेवल्या त्या फार जाचक स्वरुपाच्या आहे. १९९५ च्या नंतर २०X३० चे किती भूखंड आहेत. खरेदी खत पाहून नियमित करावे. संबंधित विभाग लाईट बील, टेलिफोन बीलाची मागणी करीत आहे. ज्या भागात लाईटची व्यवस्थाच नाही. लाईट बील कोठून आणणार याचा विचार व्हावा. अटी शिथील कराव्यात तसेच नागरिक या गुंठेवारीच्या प्रकरणात सहभाग घेतील.

**श्री.भगवान घडमोडे :** गुंठेवारी कायदा अंमलात येत आहे. दोन वर्षापुर्वी ठराव झाला. त्याची चर्चा पुन्हा आजा होत आहे. अर्ज प्राप्त झाले त्या संदर्भात प्रशासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केली, केली नसेल तर का केली नाही. कार्यवाही केली. केली नसेल तर का केली नाही. कार्यवाही झाली नसेल तर अधिकारी ही योजना राबविण्यास असमर्थ ठरले असेच म्हटले तर योग्य

होईल. गुंठेवारी विकास शुल्क भरुन घेवुन तेथे सुविधा देता येतील का? ताबडतोब कार्यवाही करावी. आजची परिस्थिती अशी की, ड्रेनेज चोकअप झ ाल्यास दुरुस्त करता येत नाही.

**मा.आयुक्त :** गुंठेवारी विकास नियमावली मध्ये कायद्याचे स्वरुप प्राप्त आहे. अनधिकृत वस्त्यांमध्ये जे नागरिक राहतात. त्यांना गुंठेवारी कायद्या लागू होतो का, अन्यायकारक आहे हे शब्द काढून टाकावे. मराठवाड्याबाहेर सुध्दा गुंठ्याच्या क्षेत्रावर कार्यवाही होत नाही. प्लॉटच्या विचार करुनच गुंठेवारी कायदा अंमलबजावणी होणार आहे. हा विषय सांगली महानगरपालिकाने १० वर्षापूसन लागोपाठ शासनाकडे तगादा केला होता म्हणून कायदा पास झाला असेल वैयक्तिक कुणाचे मत घेवून शाससनाने निर्णय घेतलेला नाही. ११४ वसाहतीतील मुलभूत सेवांची कामे संदर्भात हा जो प्रश्न समोर आला पदाधिकारी जेव्हा मुंबईला बैठकीसाठी गेलेले होते. तेथे सुध्दा याबाबत चर्चा झाली. त्या संदर्भात थोडक्यात माहिती देत आहे. गेल्या दोन अडीच वर्षात कोणत्या तरी महत्वाच्या राहिल्या त्यातील नागरिकांमध्ये झालेला गैरसमज जो की पैसे कुठे भरणा करायचे, पैसे भरणा केल्या नंतर सुविधा मिळणार की नाही. या सर्व समस्या सोडविण्यासाठी व त्यातून बाहेर पडण्यासाठी १३-१४ पथक तयार केलेली आहे. त्या पथकांनी झोनमध्ये थांबावे अशी माझ ी इच्छा नाही. उपआयुक्तांची सुध्दा नाही. गैरसमज दूर करावा. परंतू बसण्याचे ठिकाण ठरवून दिले. त्यांनी प्रसंगी वस्त्यात पण गेले पाहिजे. प्रबोधन व्हावे, चर्चा केली पाहिजे, संवाद केले पाहिजे. सुविधा रक्कमा प्राप्त झाल्यानंतर कोणास काय सवलत सुविधा पाहिजे. त्यावर विचार करता येईल. वस्तीला नियमित करण्याचा प्रस्ताव आहे. झोन वाईज विकासा योजना रस्ते आरक्षणे, खुली जागा येऊ शकतील. नियमान्वये करतांना सुसंगत होईल. मा.पदाधिकारी यांची नगर विकास विभागाचे मा.सचिव श्री.लाला यांचेसह चर्चा झाली आहे. त्यांनी मान्य केले. गती द्यावी. शहर मोठे सुविधा पासून वंचित राहते. कामाला लागा.......... अडचणी निर्माण झ ाल्यास नगरविकास विभागाचे सचिवांना कळवावे. अशा सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्यक्ष या कामाला हात लागत नाही. तोपर्यंत चर्चा करणे बरोबर नाही.

**श्री.अफसर खॉन :** सर्वे क्र.६८, ६९ चे ले-आऊट केले. रेखांकनास स्थगिती देण्यात यावी. संपूर्ण चौकशी करण्यात यावी.

**मा.महापौर :** स्थगिती दिलेली आहे.

**सौ.निखत परवीन :** महिला बाल कल्याण समितीचे टेंडर कॉल केले. केव्हा फायनल होतील. आयुक्तांनी खुलासा करावा. या संदर्भात आपणही पत्र दिलेले आहे.

**प्रकल्प संचालक :** महिला बाल कल्याण समितीच्या माध्यमातून संगणक प्रशिक्षणाचा प्रश्न स.सदस्यांनी उपस्थित केला. याबाबत गेल्या ३० तारखेला जाहिरात प्रकाशित झालेली आहे. जे टेंडर प्राप्त झाले ते ओपन करण्याची कार्यवाही फक्त बाकी आहे. टेंडर आपण झाल्यानंतर ऑर्डर देण्यांत येईल.

**मा.महापौर :** तात्काळ टेंडर काढून पुढील कार्यवाही कण्यात यावी.

**श्री.गाजी सादोद्दीन :** वृत्तपत्रात टेंडर प्रकाशित होते. बाहेरील मालेगांव, मुंबई, हैद्राबाद येथील वृत्तपत्रात का टेंडर प्रकाशित केले जात नाही. खुलासा करण्यात यावा. वृत्तपत्रांना जाहिरात देतांना इतर वृत्तपत्रांना का दिली जात नाही

जसे, इन्कसावा, सिभारुत, उर्दू टाईम्स ईत्यादी त्यांना का देत नाही. याचा खुलासा व्हावा.

**मुख्य लेखाधिकारी :** महानगरपालिकेच्या लिस्टवर जे वर्तमानपत्र आलेले आहे. शासन मान्य दर आपल्याकडे नमूद करुन दिलेले आहे. त्यांना रोटेशननुसार जाहिरात प्रकाशित करीत असतो. ज्या वृत्तपत्राची महानगरपालिकेकडे रजिस्ट्रेशन नाही. इन्वॉलमेंट म्हणून मोठ्या प्रमाणात जाहिरातीसाठी देतो.

**श्री.घोडेले नंदकुमार, श्री.राधाकृष्ण गायकवाड :** वैद्यकीय अधिकाऱ्यांची किती पदे रिक्त आहे केव्हा भरती करणार आहे. खुलासा करावा. काही वैद्यकीय अधिकारी ठराविक वेतनावर होते, सोडून गेले सात पदे रिक्त आहे.

**मा.आयुक्त :** सेवा भरती नियमाप्रमाणे करावे लागते. ०३ महिन्यात दुरुस्ती होऊ शकते. आपण पाठवलेले आहे.

**श्री.भगवान रगडे :** सन २००० मध्ये मिसारवाडी स्लम घोषित व्हावा म्हणून ठराव पारित झ ाालला आहे. काय कार्यवाही केली. खुलासा व्हावा. हा भाग स्लम म्हणून का घोषित होत नाही. मागील एका बैठकीत या संदर्भात मी प्रश्न उपस्थित केला. प्रकल्प संचालक, शहर अभियंता हे दोन्ही विभाग एकमेकांवर चालढकल करतात. सदर बाबतीची संचिका कोठे आहे. खुलासा द्यावा. एक महिन्यात करु असे बोलले होते. प्रकरण प्रकल्प संचालक, शहर अभियंता किंवा सहाय्यक संचालक नगर रचना यांचे कडे आहे, खुलासा व्हावा.

**प्रकल्प संचालक :** मिसारवाडी हा भाग गुंठेवारी योजनेत समाविष्ट आहे. त्यामुळे झोपडपट्टी घोषित करण्यांवर पाबंदी आली. नगर रचना विभागाने म.प्रा.व.न.र. अधि.१९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करावी. अशा मा.आयुक्तांनी सुचना दिलेल्या आहेत.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** मिसारवाडी हा भाग स्लम घोषित करण्याचा ठराव झाला, तेथील सर्वे का करण्यांत आला नाही. वस्तुस्थिती काय आहे.

**प्रकल्प संचालक :** किती कुटूंब आहे. स्त्री, पुरुष किती, घरे किती, लोकसंख्या याचा सर्वे केला होता. एकच कशी घोषित करावी असे सुचविले व मा.आयुक्त यांनी किरकोळ फेरबदल करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

**श्री.भगवान रगडे :** ठराव मंजूर करुन झाल्यानंतर नकाशा वगैरे काढून शासनाकडे पाठविण्यांत आला आहे का? करता येत नाही असे पत्र उपलब्ध आहे का? अमुक वस्ती घोषित करु नका असे शासन आदेश नसतांना या भागाच्या स्लम घोषित करण्याबाबत का कार्यवाही झालेली नाही. असल्या वसाहती अनधिकृत त्या गुंठेवारीत आल्या का...... लोकांची दिशाभूल करता सर्वे करा, घरे मोजा, नकाशा काळा व शासनास पाठवा विनंती की, २-३ वर्ष गेले. १ १/२ वर्ष राहिले. हा प्रश्न मार्गी लागला नाही. ०२ महिन्यात कार्यवाही न झाल्यास आत्मदहन करेल नोंद घ्यावी. ३ वर्ष ४ महिने झाले. डॉ.कराड साहेब महापौर असतांना स्लम घोषित करण्याबाबत निर्णय घेतला. आज्ञापालन का झाली नाही. शासनाकडे का प्रस्ताव या संदर्भातील पाठविला गेला नाही. अशा अधिकाऱ्यावर रितसर कार्यवाही केली पाहिजे. पुर्वी कार्यवाही केली जाईल असे सांगितले होते. काय कार्यवाही केली.

**श्री.जयवंत ओक :** ५२ स्लम आहे. जेथे एक मजल्यापेक्षा उंच घरे नाहीत. झोपडपट्टी कच्चे घर तो भाग स्लम करण्यास हरकत नसावी. सरकारीला की खाजगी जमिनीला स्लम करतो.

**प्रकल्प संचालक :** मिसारवाडी भागाचे सर्वेक्षण केले आहे. स्लम घोषित करावयाचा असेल तर किरकोळ फेरबदलाचा प्रस्ताव नगर रचना विभागामार्फत सर्वसाधारण सभेसमोर येणे आवश्यक आहे. नंतरच शासनाकडे पाठवून कार्यवाही करु शकतो.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** स.सदस्यांचा प्रश्न लक्षात घेतलेला नाही. गुंठेवारी वेगळा, स्लम वेगळा, ०३ वर्षापुर्वीच प्रस्ताव मंजूर झाला. शासनाकडे पाठविणार होतो. त्यानंतर गुंठेवारी कायदा अंमलात आलेला आहे. या मधल्या काळात का प्रस्ताव पाठविण्यांत आलेला नाही. स्लम घोषित करणे/आणि गुंठेवारी मध्ये तो भाग बसविणे हे दोन्ही विषय वेगवेगळे आहे. उत्तर वेगळ्या पध्दतीने मिळत आहे. दिरंगाई केलेल्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही झाली पाहिजे.

**मा.आयुक्त :** किरकोळ फेरबदलाची गरज आहे का. शहर अभियंता यांनी सांगावे.

**शहर अभियंता :** जागेवर आरक्षण असेल तर किरकोळ फेरबदल करावे लागतील.

**मा.उपमहापौर :** आरक्षण उठवावे असा ठराव पारित झालेला आहे.

**श्री.जयवंत ओक :** आरक्षण जमिनीचे ठराव पास झाले, शासनाला पाठवले म्हणून ११४ अनधिकृत वस्त्यांना देखील स्लम घोषित करावे. सर्व भागातील सर्वच आरक्षण वगळावे. पी.आर.कार्ड करा.

**मा.महापौर :** या संदर्भात प्रशासनाने पुढील सभेत खुलासा करावा.

**श्री.भगवान रगडे :** कलम ३७ खालील प्रस्ताव प्रशासनाने शासनास का पाठवले नाही.

**मा.आयुक्त :** या संदर्भात सविस्तर माहिती घेऊन मी स्वतः जातीने लक्ष घालून कार्यवाही करेल. संचिका मागवून घेण्यांत येईल.

**सहा.संचालक, नगर रचना :** या संदर्भात कलम ३७ नुसार कार्यवाही झालेली आहे किंवा कसे माहिती घेतो. गुंठेवारीत घेतल्यास आरक्षणाची महानगरपालिकेस आवश्यक आहे किंवा नाही हे सभागृहाला ठरवावे लागेल.

**विषय क्र.११०/१ :**

दिनांक १८.०७.२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.सुरजितसिंग खुंगर :** इतिवृत्तातील पान क्र.५ वर विषय क्र.१०३/२ यावर कोणतीही चर्चा न होता प्रस्ताव मंजूर केला. गलिच्छ वस्ती निर्मूलन समिती कडील प्रस्ताव असून मुकूंदवाडीतील ०२ संस्थाना काम दिले. त्याबाबत तेथील स.सदस्य यांना विश्वासात घेतले का? विचारणा केली का? असे ठराव पास करणे योग्य आहे का?

**श्री.प्रकाश निकाळजे :** ठिक आहे. नंतर पाहण्यांत येईल.

**मा.महापौर :** गेल्या बैठकीत हा विषय होता मंजूर झालेला असून दुरुस्ती काय करायची ते करता येईल. इतिवृत्त कायम करण्यांत येते.

**ठराव :**

दिनांक १८.०७.२००३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येते.

**विषय क्र.१११/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग आदेश क्र.डीटीपी/११/२००३ प्र.क्र.-१७३/ई-१, दि.१२.०६.२००३ नुसार श्री.अण्णासाहेब शिंदे स्वागत अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यांची उपआयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद या पदावर प्रतिनियुक्तीच्या विहीत अटी व शर्तीनुसार नेमणूक करण्यांत आली आहे.

करिता श्री.अण्णासाहेब शिंदे यांची रुजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दिनांक १७.०६.२००३ रोजी मध्यान्हापुर्व उपआयुक्त (महसुल) महानगरपालिका, औरंगाबाद या पदावर १ वर्षासाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार नियुक्ती करण्यांत आली आहे. प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग आदेश क्र.डीटीपी/११/२००३ प्र.क्र.-१७३/ई-१, दि.१२.०६.२००३ नुसार श्री.अण्णासाहेब शिंदे, स्वागत अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यांची उपआयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद या पदावर प्रतिनियुक्तीच्या विहीत अटी व शर्तीनुसार नेमणूक करण्यांत आली आहे. ते रुजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दिनांक १७.०६.२००३ रोजी मध्यान्हापुर्व पासून १ वर्षासाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार केलेल्या नियुक्तीस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११२/३ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजना (जायकवाडी उध्दव ते औरंगाबाद शहर दरम्यान टाकलेली ७०० व १४०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी व त्यांची उपांगे) ही दिनांक ०५.०४.१९९८ पासून महानगरपालिकेत हस्तांतरीत झालेली आहे. सदर योजना हस्तांतरणाच्या वेळेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पाच स्थापत्य अभियंते पाणी पुरवठा योजना चांगल्या पध्दतीने चालविण्याकरिता महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर घेण्यांत आलेले होते. त्यापैकी एक अभियंता सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या रिक्त जागेवर एका शाखा अभियंत्यास अतिरिक्त कार्यभार सोपवून, काम करुन घेण्यांत येत होते.

दिनांक १२.०२.२००३ रोजी प्रतिनियुक्तीवर आलेले शाखा अभियंता श्री.जी.बी. जावळे यांना उपअभियंता म्हणून बढती मिळालेली असून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्यांची प्रतिनियुक्तीवर महानगरपालिकेत बदली केलेली आहे. बढती मिळाल्यामुळे श्री.जावळे यांच्या रिक्त जागेवर एक शाखा अभियंताच्या नियुक्तीकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला विनंती करण्यांत आलेली होती. त्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्यांचे आदेश (अधिक्षक अभियंता, म.जी.प्रा.यांचे आदेश क्र.१७०, दि.३०.०६.२००३ प्रमाणे) श्री.के.पी.धांडे, शाखा अभियंता यांची एक वर्षाकरिता महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर बदली केलेली आहे. श्री.के.पी.धांडे, शाखा अभियंता यांना मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेच्या अधिन राहून पाणी पुरवठा विभागात दि.०८.०७.२००३ रोजी रुजू करुन घेण्यांत आलेले आहे.

तरी एक वर्षा करिता श्री.के.पी.धांडे यांना प्रतिनियुक्तीवर महानगरपालिकेत ठेवण्याकरिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

**श्री.काशिनाथ कोकाटे :** जायकवाडी ते औरंगाबाद शहरा दरम्यान टाकलेली ७०० व १४०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी महापालिकेकडे हस्तांतरीत झाली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कनिष्ट अभियंता, उप अभियंता, अभियंते पाणी पुरवठा योजना चांगल्या पध्दतीने चालविण्याकरिता महापालिका आस्थापनेवर एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीने घेण्यांत आले व एक वर्षात आपल्या कडील कर्मचारी यांना प्रशिक्षण देऊन प्रशिक्षीत करावे असा निर्णय सभागृहाने घेऊन ठराव पास केला होता व त्यानंतर महापालिकेतील कर्मचारी या योजनेचे संपूर्ण काम बघतील व जीवन प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी यांना परत पाठवणे असे ठरले होते. यास ०५ वर्ष झाले. महापालिकेतील कर्मचारी प्रशिक्षीत झाले किंवा नाही. त्याचा खुलासा करावा. आपणांकडुन प्रयत्न झालेला वाटत नाही. तसेच जीवन प्राधिकरणाचे सध्या किती कर्मचारी कार्यरत आहेत. १९९८ ला मंजूरी दिली. ०१ वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर घेतले होते. नंतरची परिस्थिती काय सविस्तर खुलासा करावा. एक वर्षासाठी होते. तर पगार भत्ते ई. कोणच्या परवानगीचे काढले. असा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे का आला नाही. सविस्तर खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** १९९८ च्या ठरावाप्रमाणे आपणांकडे जीवन प्राधिकरणाचे मनपा आस्थापनेवर १ उपअभियंता व ४ कनिष्ठ अभियंते असे एकूण ०५ कर्मचारी प्रतिनियुक्तीवर घेण्यांत आले होते. त्यानंतर मा.आयुक्त यांनी आपल्याकडील कर्मचाऱ्यांमधून १ उपअभियंता व ३ कनिष्ट अभियंता यांना प्रशिक्षणासाठी देण्याबाबत सुचविले. आस्थापना विभागाकडे ही कार्यवाही चालू आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** १९९८ ला जेव्हा करार झाले तेव्हा मर्ज केले सहमत पाणी पुरवठ्याचा हा जिव्हाळ्याचा प्रश्न होता. म्हणून मान्यता दिली. त्यांना महापालिकेमध्ये मर्ज करुन घेतले. पुढील कार्यवाही आस्थापना विभागाकडून काय झाली.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** श्री.जावळे यांचे काम सुध्दा चांगले आहे. सध्या कर्मचारी वर्ग सुध्दा महापालिकेच्या या विभागात कमी आहे. त्यांची या विभागाला आवश्यकता आहे.

**मा.आयुक्त :** कनिष्ठ अभियंताचा सरळ संबंध येत नाही. श्री.जावळे यांची वेळावेळी भेट होते. श्री.जावळे यांनी मुळ जायकवाडी पाहिली. पाहिली रेघ ओढण्यापासून श्री.जावळे तेथे आहेत. महापालिकेची मोठी योजना आहे. त्यांना सोडणे हिताचे नाही. आपण आपले अभियंते वेळीच शिकवून ठेवावे. आस्थापना विभागाकडून मुदत संपण्यापुर्वीच प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे यायला पाहिजे. त्यांना महापालिका सेवेत घ्यावे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** आतापर्यंत संबंधित अधिकाऱ्यांचे वेतन कशाच्या आधारे काढण्यांत आले. आस्थापना विभागाकडून आदेश पारित होतात. त्यानंतर हजेरी जाते. नंतरच वेतन काढले जाते. नोंद नसेल तर या कर्मचाऱ्यांना मधल्या काळाचे सेवा वेतन, निवृत्तीचे वेतन मिळणार नाही ते वंचित राहतील. आस्थापना-१ वेळेवर का माहिती देत नाही की, वेतन व भत्ते कसे काढले.

**उपआयुक्त (प्र.)** : पाणी पुरवठा विभागाचा आस्थापना पाणी पुरवठा विभागाकडेच आहे. आस्थापना-१ कडे नाही.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** खेद वाटतो. हसावे की रडावे माझे म्हणणे स्पष्ट आहे की, ज्या कर्मचाऱ्यांचा आपण पगार काढतो. त्याची माहिती आस्थापनातूनच गेल्या

नंतरच पगार निघतो. आस्थापनाचे विभाग प्रमुख उपआयुक्त (प्र.) आहेत. असे हेत राहील. तर कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर ५-६ नंतरच सेवानिवृत्ती वेतन मिळेल.

**श्री.भगवान घडमोडे :** कनिष्ट अभियंताना प्रशिक्षीत करावे.

**मा.आयुक्त :** कार्यकारी अभियंता विभाग प्रमुख आहेत. त्यांनी कालावधी ठरवावा. महापालिकेचे कर्मचारी कमीत कमी कालावधीत कसे प्रशिक्षीत होतील याकडे लक्ष द्यावे. वेळोवेळी मुदतवाढ, मान्यता घेतली किंवा नाही. याबाबत सुध्दा तपासणी करुन घेतली जाईल.

**मा.महापौर :** प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजना (जायकवाडी उध्दव ते औरंगाबाद शहर दरम्यान टाकलेली ७०० व १४०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी व त्यांची उपांगे) ही योजना महानगरपालिकेस हस्तांतरीत होत असतांना प्रतिनियुक्तीवर घेण्यांत आलेले एक अभियंता सेवानिवृत्त झाल्याने श्री.के.पी.धांडे, शाखा अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना रिक्त जागेवर दिनांक ०८.०६.२००३ पासून रुजू करुन घेण्यांत आलेले असल्याने त्यांना रुजू करुन घेण्यांत आलेले असल्याने त्यांना रुजू झालेल्या तारखेपासून ०१ वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर महानगरपालिकेत ठेवण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११३/४ :**

मा.आयुक्त यांच्या दिनांक १५.०७.२००३ च्या मान्यतेनुसार मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन, मुंबई. तसेच जिल्हाधिकारी नाशिक तसेच आयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांनी खालीलप्रमाणे पाच पत्र पाठविलेले आहेत.

१. पत्र क्र.सिंहस्थ/नवि-१९/३३/२००३, दि.१३ जानेवारी, २००३.
२. पत्र क्र./अशा/वशी/कक्ष-१/२९७/२००३, दि.०२ जून, २००३.
३. अग्निशमन सल्लागार, म.शा.मुंबई, यांच पत्र क्र.२९४, दि.११ जून, २००३.
४. अग्निशमन सल्लागार मुंबई यांचे दालनातील बैठक दि.१६ जून, २००३.
५. नाशिक महानगरपालिका अग्निशमन दल पत्र क्र./वशी/कक्ष-१/३७८/२००३, दि.०९ जुलै, २००३.

उपरोक्त पत्रान्वये त्यांनी ठाणे/कल्याण डोंबिवली/भिवंडी-निजामपुर/नवी मुंबई/पुणे/पिंपरी चिंचवड/मालेगांव व औरंगाबाद महानगरपालिका यांना प्रत्येकी किमान - १ व कमाल - २ फायर टेंडर सिंहस्थ कुंभमेळा नाशिक येथे अग्निशमन सुरक्षेसाठी तसेच आपत्कालीन व्यवस्थापनासाठी पाठवण्याची आदेश/सुचना विनंती केलेली आहे. एक फायर टेंडर वर आठ कर्मचारी लागणार आहेत. किमान - १७ व कमाल-५१ दिवस फायर टेंडर ठेवावे लागणार आहे. त्यासाठी औरंगाबाद महनगरपालिकेस १,४९,०००/- अपेक्षित खर्च येणार आहे. त्यासाठी पत्राने खर्च देण्यांबाबत मा.आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक, मा.जिल्हाधिकारी नाशिक यांना पत्राद्वारे कळवलेले आहे. खर्च देण्याबाबचती मान्यता देण्यास वेळ लागणार आहे. तत्पुर्वी दि.२८.०७.२००३ ला एक फायर टेंडर व आठ कर्मचारी पाठवावे लागणार आहेत.

उपरोक्त सिंहस्थ कुंभमेळा निमित्त जगणाऱ्या लाखो भाविकांच्या अग्निशमन सुरक्षेच्या व आपत्कालीन व्यवस्थापनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या व संवेदनशील घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन फायर टेंडर पाठवण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव व निर्णयास्तव सादर.

**मा.महापौर :** मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नाशिक येथील सिंहस्थ कुंभ मेळाव्यासाठी अग्निशमन सुरक्षेसाठी तसेच आपत्कालीन व्यवस्थापनासाठी प्रस्तावित केल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेचे अग्निशमन दलाचे फायर टेंडर व त्यासह आवश्यक कर्मचारी पाठविण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११४/५ :**

शहर अभियंता महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर रिट याचिका क्र.४२१/१९८६ (किसन हिवाळे विरुध्द सिडको प्राधिकरण) या प्रकरणी सुनावणी सुरु आहे. दिनांक ०४ जुलै, २००३ रोजी मा.उच्च न्यायालया समोर सुनावणी झाली असता सिडकोतर्फे मा.उच्च न्यायालयात दिवानी अर्ज सादर करण्यांत आला, यात मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्देशानुसार अतिक्रमणे काढण्यात आलेली आहेत. आता शासन निर्णय दिनांक १२ जुलै, २००१ नुसार सिडकोचे हस्तांतरण औरंगाबाद महानगरपालिकेकडे करण्यासाठी परवानगी द्यावी. मा.उच्च न्यायालयाने याबाबत महानगरपालिकेस दिनांक २३ जुलै, २००३ पुर्वी महानगरपालिकेचे काय म्हणणे आहे. ते सादर करण्याबाबत आदेशित केले आहे.

सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतर करण्यांबाबत प्रस्ताव दिनांक २८.०२.२००२ च्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.५७७/७ अन्वये ठेवण्यांत आला असता सभागृहाने सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा असा निर्णय घेतला आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मा.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका व सिडको अधिकाऱ्यांची एक बैठक दिनांक ११.०७.२००३ रोजी विभागीय आयुक्त यांचे कार्यालयात संपन्न झाली. या बैठकीत ठरल्याप्रमाणे सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरणा संबंधी जो करारनामा करावयाचा आहे. तो करारनामा सर्वसाधारण सभेपुढे सादर करावा असा निर्णय घेण्यांत आला आहे.

सिडको हस्तांतरणाच्या करारनाम्याचा मसुदा इंग्रजी भाषेत सिडको प्रशासनाने सादर केला असून सदरच्या मुळ इंग्रजी मसुद्याचे मराठी भाषेत भाषांतर तयार करण्यांत आले आहे. सुलभ संदर्भातील मुळ इंग्रजी भाषेतील करारनाम्याचा मसुदा व त्याचे मराठी भाषांतर या प्रस्तावासोबत अवलोकनार्थ जोडले आहे.

या प्रस्तावित करारनाम्यातील कलमा बाबत महानगरपालिका सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन त्यास सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता होणे आवश्यक आहे. या मान्यतेनंतर सिडको प्रशासनाची हस्तांतरणा संबंधी करारनामा करण्यांत येईल. करिता प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**टिप :-** सोबत करारनाम्या बाबतच्या इंग्रजी व मराठी भाषेतील प्रती माहितीस्तव जोडण्यांत आल्या आहेत.

इंग्रजी करारनाम्याचा मराठी अनुवादीत गोषवारा

| | **सिडकोतर्फे प्रस्तावित केल्याप्रमाणे** | **मनपा प्रशासनातर्फे प्रस्तावित केल्याप्रमाणे** |
|---|---|---|
| | हा करारनामा औरंगाबाद येथे दि. / / रोजी करण्यात येत आहे. सिडको ही कंपनी १९५६ च्या कंपनी कायद्यान्वये नोंदणी झालेली आहे. (०१.१९९६) व त्यांचे मुख्य कार्यालय निर्मल, दुसरा मजला नरिमन पॉईट मुंबई येथे आहे. (यापुढे सिडकोचा अर्थ सिडको व त्यानंतर त्यांचे येणारे वारसदाराचा समावेश राहील.) करार लिहून देणार व औरंगाबाद महानगरपालिका यांचे ऑफिस टाऊन हॉल एरिया येथे आहे. (यानंतर याचा उल्लेख मनपा असा होईल तेव्हा) त्यांचा अर्थ मनपाचे आयुक्त त्यांच्या तर्फे येणारे अधिकारी व मनपाचे वारसदार असा गृहीत धरण्यात येईल) व यास करार लिहून घेणार असे संबोधण्यांत येईल. | बदल नाही. |
| | ज्या अर्थी, सिडको ही १०.११.९६ हेक्टर या क्षेत्रासाठी नवी शहरे औरंगाबाद साठी महाराष्ट्र शासनाचा जाहिरनामा क्र.यु.डी.पी.एच. आणि ११ डी-टीपीएस-३०७२/७६८४०/डब्ल्यु-२, दि.३ जुलै, १९७३ त्या उपरांत यास कायदा म्हणण्यात येईल) साठी विशेष नियोजन प्राधिकरण संस्था म्हणून नेमण्यात आली. | बदल नाही. |
| | सिडकोने नियमान्वये व सुचना देऊन नवीन शहर बसविण्यासाठी ही जमिन ताब्यात घेऊन त्याचे नियोजन केले. | बदल नाही. |
| | सिडकोला विशेष नियोजन संस्था म्हणून नेमणूक केल्यानंतर नवीन औरंगाबादसाठी नेमलेली जबाबदारी पूर्ण केली व मनपा ही नियोजन संस्था व स्वायत्त संस्था मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ ने नागरी सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी व त्याचा रख रखाव करण्यासाठी व त्यांना कर लादण्याचा अधिकार असल्यामुळे व नवीन शहरे त्यांचा अखत्यारित येत असल्यामुळे सिडको व मनपाच्या पुर्ण चर्चेअंती महानगरपालिकेने हा भाग (नवीन औरंगाबाद) तब्यात घेण्याबाबत व | बदल नाही. |

| | | |
|---|---|---|
| | सिडकोने देण्याबाबत ठरविले आहे व त्याचा शर्ती व अटी खाली नमूद केल्याप्रमाणे राहतील सोबत विशेष करुन सुचित व्हावे म्हणून नवीन औरंगाबादचा नकाशा-१ मध्ये म्हणून जोडत आहोत. | |
| | हा करार खालीलप्रमाणे शर्ती व अटीसह राहील. | |
| १. | हया सोबत जोडलेले सर्व परिशिष्ट व विवरण पत्र हे करारनाम्याचा हिस्सा म्हणून बंधनकारक आहे. | बदल नाही. |
| २. | सिडकोनी पाणी पुरवठा साठी बांधलेले जमिनीवर (E.S.R.) व जमिनीच्या खाली (G.S.R.) व त्यासाठी बांधलेले पंपगृह त्यासाठी लागणारी मशिनरी विद्युतीकरण व त्याचे भाग व ती चालू करण्यासाठी सर्व यंत्रणा पुर्ण नियोजनासहित व नकाशासहीत हस्तांतरण करण्याचे कबुल केले. ज्याची माहिती परिशिष्ट १११-अ प्रमाणे आहे. | बदल नाही. |
| ३. | सिडको महानगरपालिकेचा जल:निसारण योजा, जल:निसारण पंप घरासहीत व नकाशा सहीत परिशिष्ट ११ मध्ये दाखविला प्रमाणे हस्तांतर करीत आहे व मनपा ते स्विकार करीत आहे. | बदल नाही. |
| ४. | सिडको, रस्ते, खेळण्याची मैदाने मोकळी जागा, बगीचे झाडे जमिन अंतर्गत जल:निसारण योजना विद्युत वाहिनी, पथदिवे व विद्युत उपगृहे, सार्वजनिक स्वच्छतागृह जेथे आहे. त्या आधारावर हस्तांतरण करीत आहे व मनपाने ते स्विकारण्याचे कबुल केले आहे. ज्याचे सविस्तर माहिती परिशिष्ट-III, VII, VI, VI-A, II-A मध्ये आहे. ज्यावर योग्य त्या संबंधित अधिकाऱ्यांच्या सह्या करुन ते या सोबत जोडलेले आहे. | सिडको, रस्ते, खेळण्याची मैदाने मोकळी जागा, बगीचे अंतर्गत जल:निसारण योजना विद्युत वाहिनी, पथदिवे व विद्युत उपगृहे, सार्वजनिक स्वच्छता गृहे जेथे आहे. त्या आधारावर (अतिक्रमणापासून मुक्त) हस्तांतरण करीत आहे व मनपाने ते स्विकारण्याचे कबुल केले आहे. ज्याचे सविस्तर माहिती परिशिष्ट-III, VII, VI, VI-A, IIA मध्ये आहे. ज्यावर योग्य त्या संबंधित अधिकाऱ्यांच्या सह्या करुन ते या सोबत जोडलेले आहे. |
| ५. | लिहून देणार व लिहून घेणार दोन्ही या याबाबतीत सहमत आहे की, हे हस्तांतर परवाना उपयुक्त (लिव्ह आणि लायनस बेसीस) आधारावर ९९ वर्षाच्या करारन्वयेच हस्तांतर करीत आहे व कुठल्याही जागेचा | लिहून देणार व लिहून घेणार दोन्ही या बाबतीत सहमत आहे की, हस्तांतर परवाना उपयुक्त (लिव्ह आणि लायनस बेसीस) आधारावर ९९ वर्षाच्या करारन्वये हस्तांतर करीत |

| | | |
|---|---|---|
| | वापर, जागेचा अथवा योजनेचा उपयोग उल्लेखित केल्याप्रमाणेच केला जाईल व तेव्हा त्या जमिनीचा अथवा योजनेच्या उपयोगामध्ये कसलाही बदल केल्यास सिडको उपयुक्त परवाना रद्द करुन त्या जागेचा ताबा कसलाही मोबदला मनपास न देता परत घेऊ शकण्याचा अधिकार अबाधित ठेवत आहे. | आहे. व कुठल्याही जागेचा वापर, जागेचा अथवा योजनेचा उपयोग उल्लेखित केल्याप्रमाणेच केला जाईल व जेव्हा त्याचा वापर करारा व्यतिरिक्त जमिनीच्या वापरात काही बदल करावयाचा झाल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चा कायदा तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कायद्यातील तरतूदीस अधिन राहून मनपास असे बदल करता येतील. व त्या व्यतिरिक्त इतर बदल केल्यास सिडको उपयुक्त परवाना रद्द करुन त्या जागेचा ताबा कसलाही मोबदला मनपास न देता परत घेऊ शकण्याचा अधिकार अबाधित ठेवत आहे. |
| ६. | महानगरपालिक, उपयुक्त योजना (fnfrastructure) व त्यासाठी लागणारे सर्व प्रकारच्या इमारती, जल:निसारण पाणी पुरवठा योजना, पथदिवे इ ह्या हस्तांतरणानंतर स्वखर्चाने वापर करु शकेल व त्याचा रख रखावे. देखरेखीसाठी अथवा दर्जा उंचावण्यासाठी जो काही खर्च करावयाचा असेल ते त्यांनी स्वत: करावा. व त्यापोटी कसलीही भरपाई सिडको तर्फे केली जाणार नाही. | बदल नाही. |
| ७. | सिडको सध्या काही सेवा सुधारण्यासाठी कामे (Development work) हाती घेतलेली आहेत. जो काही भाग मनपाला हस्तांतर होणार आहे. सिडको अशी हाती घेतलेली कामे हस्तांतर झाल्यानंतर सुध्दा पुर्ण करील व काही कामे पुढील भविष्यांत हाती घेईल. (जमिनी लिजवर देतांा त्या अटी पूर्ण करण्यासाठी काही कामे हाती घेईल) जसे जलनि:सारण, रस्ते, पाणी पुरवठा इ. | सिडको सध्या काही सेवा सुधारण्यासाठी कामे (Development work) हाती घेतलेली आहेत. जो काही भाग मनपाला हस्तांतर होणार आहे. सिडको अशी हाती घेतलेली कामे हस्तांतर झाल्यानंतर सुध्दा पूर्ण करील व काही कामे पुढील भविष्यांत हाती घेईल (जमिनी लिजवर देतांना त्या अटी पूर्ण करण्यासाठी रस्ते पाणी पुरवठा इ. व ही कामे ते पूर्ण करतील.) |
| ८. | सिडको उपयुक्त सेवेसाठी असलेल्या जमिनीचे ९९ वर्षाचे परवाना पध्दतीने हस्तांतर | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | करीत आहे. त्याचे वर्णन व वापर खालीलप्रमाणे | | | | |
| | सेवा | क्षेत्रफळ चौ.मीटर | | सर्व सेवेसाठी लायसन फी टोकन म्हणून दरसाल रुपये १०० प्रति पार्सल | सर्व सेवेसाठी लायसन फी टोकन म्हणून दरसाल नाममात्र रुपये १.०० प्रति पार्सल |
| | १. | रस्ते परिशिष्ट III प्रमाणे | १४०७२३६ | निरंक | निरंक |
| | २. | बगीचे परिशिष्ट VI, VIA प्रमाणे | १५६३१९ | रु.२५००/- | रु.२५.०० |
| | ३. | खुली जागा व मैदाने परिशिष्ट VII प्रमाणे | ५००२००.५८ | रु.३५,९००/- | रु.३५९.०० |
| | ४. | पाणी पुरवठा वाहिन्या, साठा पंपपिंग स्टेशनन्स सातारा | १९०५.०० | निरंक | निरंक |
| | ५. | एस.टी.पी. आणि दोन पंपींग स्टेशन्स, सिवरेज पंप हाऊस आणि त्या संबंधिच्या मशिनरी, सार्वजनिक मुताऱ्या/स्वच्छता गृहे परिशिष्ट II प्रमाणे | २९२०६.०० | रु.३००/- | रु.३.०० |
| | ६. | भूमिगत जलःनिसारण योजना परिशिष्ट II प्रमाणे | ५६६५८.०० | निरंक | निरंक |
| | ७. | विद्युत वाहिन्या, पथदिवे आणि विद्युत सबस्टेशन परिशिष्ट V प्रमाणे | ५९११ नग व त्यावरील फिटींग सहीत | रु.६००/- | रु.६.०० |
| | **एकूण रु.** | | | **३९,३००/-** | **रु.३९३/-** |
| ९. | मनपा दरवर्षी परवाना फी म्हणून रुपये ३९,३००/- १ जानेवारी ते ३१ डिसेंबर किंवा त्याच्या हिश्यासाठी म्हणून देण्याचे कबुल करीत आहे. परवाना फी दरवर्षी १० जानेवारीच्या अगोदर व वर्षाच्या सुरुवातीलाच देईल. व अशी फी जोपर्यंत परवाना रद्द करीत नाही तो पर्यंत देत राहील. | | | मनपा दरवर्षी परवाना फी म्हणून ३९३/- १ जानेवारी ते ३१ डिसेंबर किंवा त्यांच्या हिश्यासाठी म्हणून देण्याचे कबुल करीत आहे. परवाना फी दरवर्षी १० जानेवारीच्या अगोदर व वर्षाच्या सुरुवातीलाच देईल व अशी फी जोपर्यंत परवाना रद्द करीत | |

| | | |
|---|---|---|
| | | नाही तोपर्यंत देत राहील. |
| १०. | वरील निर्देशित जमिनी व्यतिरिक्त त्यावर उभारलेली मशिनरी मनपा ताब्यात घेत आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे :<br>सेवा प्रकार व त्याचे ढोबळ मानाने त्याचे वर्णन<br>१) एस.टी.पी. मशिनरी, फिक्चर्स आणि अवजारे<br>२) पाणी पुरवठा पंपींग स्टेशन्स आय इक्युपमेंट<br>३) सिवरेज पंप हाऊस एन-१ व एन-६ मधील<br>४) पथदिवे परिशिष्ट-V प्रमाणे | बदल नाही |
| ११. | सध्या सिडकोने सर्वे नंबर ३० मुर्तीजापूर (विमानतळाजवळ) जल:निसारण प्रक्रीया प्लॉन्ट बांधलेला आहे व तो सर्व मशिनरी सहीत त्या जमिनीसहीत मनपाने घेण्याचे कबुल केले आहे व ते देण्याचे सिडको कबुल करीत आहे. ज्याचे संपूर्ण वर्णन परिशिष्ट-II मध्ये जोडण्यात आले आहे. | बदल नाही. |
| १२. | सिडको व मनपाव्या सहमतीने असे ठरले की, जी जमिन ज्या उद्देशासाठी (कामासाठी) हस्तांतरीत करण्यांत आली विचा वापर बदलण्याचा अधिकार सिडको राखून ठेवित आहे. परंतू ज्या कारणासाठी जमिन हस्तांतरीत केली. त्या करणासाठी (कामासाठी) दुसरी जमिन उपलब्ध करुन देईल. अथवा त्या कामासाठी वापर करित असतांना सुध्दा त्या जमिनीचा दुसऱ्या कामासाठी उपयोग सिडको करु शकेल. हे सर्व मनपाच्या सहमतीने केले जाईल. व त्या वेळेस ज्या सेवा (उद्देश) त्या जमिनीवरुन उपलब्ध होतो. त्यावर कसलाही परिणाम होणार नाही हे पाहण्यांत येईल. | हे कलम प्रशासनास मान्य नाही. कारण एकच काम जेव्हा एकाच भागात दोन संस्था करतात तेव्हा नियमाची गल्लत होते व त्यातून सर्व साधारण नागरिकांची गैरसोय निर्माण होते. व कोर्ट कचऱ्याचे प्रमाण वाढते म्हणून हे कलम मनपा प्रशासनास मान्य नाही. |
| १३. | अैरंगाबाद महापालिका निर्देशित जमिनीचा वापर करण्यासाठी हस्तांतर करतांना मान्य करीत आहे. व भविष्य निर्देशित उद्देशासाठी जमिनीचा वापर करावयाचा नसल्यास मनपा ती जागा व जागेचा ताबा सिडकोस देईल. मनपा त्या जागेवर कुठल्याही तिसऱ्या व्यक्तीला अथवा संस्थेला तात्पुरता अथवा कायमचा हक्क देणार नाही व मनपा त्या | औरंगाबाद महानगरपालिका निर्देशित जमिनीचा वापर करण्यासाठी हस्तांतर करतांना मान्य करीत आहे. व भविष्यात निर्देशित उद्देशासाठी जमिनीचा वापर करावयाचा नसल्यास मनपा ती जागा व जागेचा ताबा सिडकोस देईल. मनपा त्या जागेवर कुठल्याही तिसऱ्या व्यक्तीला अथवा |

| | | |
|---|---|---|
| | जागेवर कसलेही अतिक्रमण होणार नाही हे पाहिल व हस्तांतरण करणाऱ्या शर्तीची बारकाईने पालन करील. जमिनीच्या वापरात कुठलाही बदल केल्यास सिडको त्या जमिनीचा ताबा घेण्याचे हक्क अबाधित ठेवित आहे व त्या जमिनीचे हस्तांतर करण्यासाठी मनपा कसलाही वाद घालणार नाही. | संस्थेला तात्पुरता अथवा कायमचा हक्क देणार नाही व मनपा त्या जागेवर कसलाही अतिक्रमण होणार नाही हे पाहिल व हस्तांतरण करणाऱ्या शर्तीची बारकाईने पालन करील. |
| १४. | सिडकोने प्रक्रिया प्लॅन्ट, पंप हाऊस, बगीचा, झाडलोट व साफसफाई इत्यादी कामांची रख रखाव करण्यासाठी पुष्कळशा ठेकेदारांशी करार केलेला आहे. त्याचे सविस्तर करार परिशिष्ट-VI, II, VIIIA मध्ये जोडलेली आहे. मनपा त्या ठेकेदाराकडून चालू ठेक्याचा अवधी पूर्ण होईपर्यंत काम करुन घेईल व त्याची अदायगी कराराप्रमाणे देत राहील व मनपाला जे योग्य वाटेल त्या प्रमाणे ठेक्यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यावर बदल करण्याचा अथवा नवीन ठेका देण्याचा अधिकार पूर्णपणे मनपाकडे राहील. | बदल नाही. |
| १५. | मनपाने नवीन औरंगाबाद मधील पथ दिव्यांचा वापर व रख रखाव ताबडतोब सुरु करण्याचे कबुल केले आहे. (परिशिष्ट-V प्रमाणे) | बदल नाही. |
| १६. | मनपा जमिनीखालील जल:निसारण योजना, नवीन औरंगाबाद मधील वापर व रख रखाव परिशिष्ट II प्रमाणे ताबडतोब करण्याचे हाती घेण्याचे कबुल करीत आहे. | बदल नाही. |
| १७. | मनपा नवीन औरंगाबाद मधील बगीचे परिशिष्ट-IV प्रमाणे एन-१२ मधील रोपवाटीकांचा रख रखाव व वापर ताबडतोब हाती घेण्याचे कबुल करीत आहे. | बदल नाही. |
| १८. | मनपा नवीन औरंगाबाद मधील रस्ते, साफसफाई कचरा गोळा करण्याचे काम व रख रखाव ताबडतोब हाती घेण्याचे कबुल करीत आहे. | बदल नाही. |
| १९. | मनपा पाणी पुरवठा योजना परिशिष्ट IIIA प्रमाणे तारखि ...................... पासून वापर करण्याचे हाती घेण्याचे कबुल करीत आहे. परंतू काही ठिकाणी सिडकोच्या पाणी पुरवठ्याचे विस्तारीकरणाचे काम चालू आहे. ते पूर्ण झाल्यावर ते देखील मनपा ताबडतोब ताब्यात घेईल. | बदल नाही. |

| | | |
|---|---|---|
| २०. | सिडकोने हया कराराचे ज्या सेवा व सोई, इमारती व मशिनरी (Intrastructures) हस्तांतरीत केलेले आहे. ते किंवा त्याच्याशी संबंधित सेवा व सोयी (Infrastrures) स्वत:च्या विकास करण्यासाठी वापरण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे. | बदल नाही. |
| २१. | सर्वसेवा हस्तांतर केल्यानंतर मनपा नियोजन संस्था म्हणून नवीन औरंगाबादसाठी राहील. सिडकोस अद्यापही वेगवेगळ्या सेवा उपलब्ध करण्यासाठी लिज धारकांकडून/ खरेदीदाराकडून थकबाकी येणे आहे. म्हणून मनपा कबुल करते की, जोपर्यंत सिडको नवीन औरंगाबाद मधील भूधारकांना ना हरकत प्रमाणपत्र देत नाही तोपर्यंत मनपा त्यांना कुठल्याही परवानगी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना १९६६ नियमाखाली विकास करण्याची परवानगी देणार नाही. | सर्वसेवा हस्तांतर केल्यानंतर मनपा नियोजन संस्था म्हणून नवीन औरंगाबादसाठी राहील. सिडकोस अद्यापही वेगवेगळ्या सेवा उपलब्ध करण्यासाठी लिज धारकाकडून/खरेदीदाराकडून थकबाकी येणे आहे. म्हणून मनपा कबुल करते की, जोपर्यंत सिडको नवीन औरंगाबाद मधील भू-धारकांना ना हरकत प्रमणपत्र फक्त आर्थिक बाबी बाबत देत नाही तो पर्यंत मनपा त्यांना कुठल्याही परवानगी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना १९६६ नियमाखाली विकास करण्याची परवानगी देणार नाही अथवा वापर करण्याची देखील परवानगी देणार नाही. |
| २२. | मनपा व सिडको हया बाबतीत सहमत आहेत की, ज्या जमिनी अद्याप सिडकोकडे विकसीत करावयाच्या आहेत व त्या विकसीत करुन सिडकोने त्या विकावयाच्या आहेत व सिडकोस नियोजन प्राधिकरण संस्था म्हणून काम करता यावे म्हणून सिडकोला असे काम करण्यासाठी मनपाकडून बांधकाम परवाना घेण्याची गरज नाही. | बदल नाही. |
| २३. | सिडकोच्या जमिनीचे अतिक्रमणापासून व बेकायदेशीर विकास होण्यापासून अथवा बेकायदेशीर ताबा करण्यापासून त्यांचे संरक्षण करता यावे म्हणून व असे बेकादेशीर ताबा हटविणे व बेकादेशीर विकास थांबविणे तसेच, मोकळ्या जागेचे पथ रस्ते, रस्त्याच्या बाजूस मोकळ्या जागेचे संरक्षण करता यावे म्हणून मनपास नियोजन प्राधिकरण संस्थेचे अधिकार राहतील. परंतू सिडकोच्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम | बदल नाही. |

| | | |
|---|---|---|
| | ५२, ५३, ५४ खालील अधिकार बहाल करीत आहे. तसेच सिडकोला म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ च्या कलम १३५, १३९ व १४२ खालील अधिकार बहाल करीत आहे. ज्यामुळे बेकायदेशीर जमिनीवरील व पथ रस्त्यावरील व रस्त्याच्या बाजुवरील ताबा हटविता यावा. | |
| २४. | सिडको शासन निर्णय क्रमांक डीओसी-१०९५/७५९/प्र.क्र.-९६५/नवि-२०, मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दिनांक १२ जुलै, २००१ प्रमाणे मनपाला खालील रक्कम देईल.<br>I) रक्कम रु.१७५ लाख पाणीपुरवठा व जल:निसारणामधील जनतेचा भाग म्हणून<br>II) जलप्रक्रिया प्लॅट, जल:निसारण प्रक्रिया व जल:निसारण पंप इत्यादी खर्चापोटी पूर्ण रक्कम म्हणून हस्तांतर करतांना देईल. | बदल नाही. |
| २५. | नाट्यगृह बांधण्यासाठी सिडकोला दिलेले २५ लक्ष रुपये सिडको मनपास या हस्तांतरा सोबत परत करणार असून सिडकोने नाट्यगृहाची जमिन विनामूल्य मनपास देण्याचे कबुल केले आहे. | बदल नाही. |
| २६. | शासन निर्णय दिनांक १२ जुलै, २००१ प्रमाणे सिडको तळमजला अधिक पाहिला मजला, मजल्याचा इमारतीचा एक भाग नकाशात दाखविल्याप्रमाणे मनपास विना मोबदला वापरण्यास देण्याचे कबुल करीत आहे. | बदल नाही. |
| २७. | मनपा सफाई ठेकेदारांची, सिडको भागासाठी केलेले ठेके, ठेक्यांच्या शर्ती व अटीनुसार ठेक्यांचा कार्यकाळ पूर्ण होईपर्यंत चालू ठेविल अथवा पर्यायी व्यवस्था झाल्याबरोबर त्या ठेक्यांना कोणताही मोबदला न देता बंद करु शकेल. | बदल नाही. |
| २८. | मनपा ३९ सिडको आस्थापनावरील माळी तसेच ३२ कायम स्वरुपी कर्मचाऱ्यांचे (परिशिष्ट-X प्रमाणे ) हस्तांतर करुन घेण्याचे कबुल करीत आहे. त्यांच्या खाती असलेली भविष्य निर्वाह निधीची रक्कम (Gravity) इ. रक्कम ही मनपाकडे सिडकोने हस्तांतरण करण्याचे कबुल केले आहे व अशा हस्तांतरणास त्या कर्मचाऱ्यांची मान्यता असेल. | मनपा ३९ सिडको आस्थापना वरील माळी तसेच ३२ कायम स्वरुपी कर्मचाऱ्यांचे (परिशिष्ट-X प्रमाणे) हस्तांतर करुन घेण्याचे कबुल करीत आहे. त्यांच्या खाती असलेली भविष्य निर्वाह निधीची रक्कम (Gravity) इ रक्कम हि मनपाकडे सिडकोने हस्तांतरण करण्याचे कबुल केले आहे व अशा हस्तांतरणास त्या कर्मचाऱ्यांी |

| | | |
|---|---|---|
| | | मान्यता असेल व त्याची हस्तांतरणास त्या कर्मचाऱ्यांची मान्यता असेल व त्यांची सेवा जेष्ठता ज्या दिवशी सिडको हस्तांतरीत करील (वर्ग करील) त्या दिवसापासून धरण्यांत येईल. |
| २९. | सध्या सिडकोने अतिक्रमण व बेकायदेशीर भोगवटा पासून सिडको भागाचे संरक्षण करता यावे म्हणून सुरक्षा एजन्सीला लावले आहेत, त्यांचे हस्तांतरण करण्याबाबतीत सिडको व मनपा नंतर ठरवतील. | बदल नाही. |

हा करार लिहून देणार व लिहून घेणार यांच्या सही व शिक्यानिशीवर लिहिलेल्या दिवशी केला आहे.

मुख्य प्रशासक
सिडको नवीन औरंगाबाद

आयुक्त/उपआयुक्त
महानगरपालिका, औरंगाबाद.

समक्ष

१)

२)

समक्ष

१)

२)

## <u>AGREEMENT</u>

| As proposed by CIDCO | | As proposed by AMC |
|---|---|---|
| 1. | This agreement made at Aurangabad the _______ day of ________ Two Thousand BETWEEN LIMITED a Company incorporated under the companies Act. 1956 (1 of 1956) 400 021 (hereinafter refereed to as "The CIDCO" which expression shall where the context so admits be deemed to include its successors and assignees) of the one part AND AURANGABAD MUNICIPAL CORPORATION having its office at Town Hall Area, Aurangabad 431 210 (hereinafter referred to as "The AMC" which | No Change |

| | | |
|---|---|---|
| | expression shall, where the context so admits be deemed to include their respective heirs, executors, administrators and representatives) on the other part. | |
| | WHEREAS | |
| i. | The CIDCO is the Special Planning Authority for the once admeasuring 10.11.96 Ha. This was designated as a site for the New Town of New Aurangabad by the Government Maharashtra in exercise of its powers vide Notification No.UDPII and IID TPS-30772/76840-53577/W-2 dated 30.07.1973 (hereinafter referred to as "The Said Act.) | No Change |
| ii. | The CIDCO has acquired the lands with due process of law within the notified area of New Town for development and disposal and accordingly the CIDCO has made planned development within the Notified Area of New Aurangabad. | No Change |
| iii. | The CIDCO after its appointment as a special planning Authority has successfully completed its duty of creation of notified now Aurangabad and for the mea of New Aurangabad, the AMC is successor in interest. Being planning Authority the AMC owes statuary duty in terms of provisions of the Bombay Provincial Municipal Corporations Act. 1949 to maintain and operate all the civic amenities provided in the New Town and further empowered to levy property Tax within the area of New Town. | No Change |
| iv. | After due negotiations and discussion the AMC agreed to take over and the CIDCO agreed to handover the area of New Aurangabad more particularly described and delineated on the map annexed herewith as ANNEXUE-I along with all basic infrastructures and Civil amenities provided in New Aurangabad on the terms and | No Change |

| | | |
|---|---|---|
| | conditions referred hereinafter. | |
| | NOW THIS AGREEMENT WITNESS AS FOLLOWS | |
| 1. | All Annexures and schedules attached to this Agreement shall form part and participle of this Agreement. | No Change |
| 2. | The CIDCO agree to transfer water supply with E.S.R./G.S.R. along with Ground Storage Reservoir with pump House Elevated Storage Kaservoirs Pumping Machinery including all necessary electrical installations, the electrical components and machinery already commissioner. More particularly described in ANNEXURE-III-A with all scheme details plans duly signed by concerned authority. | No Change |
| 3. | The CIDCO agree to transfer AMC and the AMC agree to take over sewage treatment plan sewage pump house more particularly described in ANNEXURE-II with all scheme details plans duly signed by concerned authority. | No Change |
| 4. | The CIDCO agree to handover the AMC agree to take over roads play grounds and open spaces, gardens, tree plantation, underground drainage system, power line, street light and electric sub-stations and public toilets on as is where is basis. The details are annexed herewith as ANNEXURE-III, VII, VI-A, II, V duly signed by concern authority. | The CIDCO agree to hand over and the AMC agree to take over roads playgrounds and open space Gardens. Tree plantation, underground drainage system, power line, street light and electric sub-stations and public toilets on as is where is basis and all free from an croachments and liabilities. The details are annexed herewith as ANNEXURE-III, VII, VI, VI-A, II, V duly signed by concern authority. |
| 5. | It is further agreed by both the parties that, the lands below the infrastructures will be transferred on leave and license basis for period of 99 years and AMC specifically agreed to use these for specified use of lands the CIDCO reserves its right and authority to cancel the leave and license and resume the land without any payment of compensation take | It is further agreed by both the parties that, the lands below the infrastructures will be transferred on leave and license basis for period of 99 years and AMC specifically agreed to use these for specified purpose mentioned in the mentioned in the Agreement. In case AMC desire to after modify the use of land for public purpose |

| | | |
|---|---|---|
| | | it can do so, till it is done within the framework of MRTP Act. 1966 and BPMC Act. 1949 and in the event the AMC alter or change the specified use of lands other than modify and alter the CIDCO reserved its right and authority to cancel the leave and license and resume the land without and payment of compensation to the AMC. |
| 6. | The AMC agree that, after transfer of infrastructural facilities and services the AMC shall be fully responsible and liable for operation maintenance, repairs and up gradation of these infrastructures and services at their own cost of expenses and shall not have any claim against the CIDCO. | No Change |
| 7. | The CIDCO is presently carrying out certain development works in the area which are to be handed over to the AMC CIDCO agree the complete the on going works even after handing over to the AMC Besides, CIDCO shall also undertake such works for execution and completion where while (seeing the land) leasing out the land to various persons/institutions, it has undertaken to develop certain infrastructure like drainage, roads, water distribution pipelines so on and so forth. | The CIDCO is presents carrying out urban development works in the area which are to be hand over to the AMC CIDCO agree the complete the on going works even after handing over to the AMC besides. CIDCO shall also undertake such works for execution and completion where while (seeing the land) leasing out the land to various personal institutions, it has undertaken to develop certain infrastructure like drainage, roads, water distribution pipe lines, so on and so forth. |
| 8. | The CIDCO agree to transfer the lands under infrastructures on leave and license basis for period of 99 years. description of lands for specified use is given as follows : | |

| | Type of services | Area sq.mtr. | Annual license fee@100/- parcel (Rs.) | Annual license fees as. per parcel |
|---|---|---|---|---|
| | Road (ANNEXURE-III) | 1407236.00 | Nil | Nil |
| | Gardens (Annexure-VI, VI-A) | 156319.00 | 2,500.00 | 12525.00 |
| | Playgrounds/open spaces (Annexure-VII) | 500200.58 | 35,900.00 | 359.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Water supply lines storage and pumping stations (Satara) | 1905.00 | Nil | Nil |
| | S.T. pond 2 pumping stations sewerage pump house and allied | 29206.00 | 300.00 | 3.00 |
| | Machinery (Annexure-II) public toilet | Nil | Nil | Nil |
| | Underground drainage system (peripheral) Annexure-II) | 56658.00 | Nil | Nil |
| | Power lines/street lights and electrical sub-stations (Annexure-V) | 5911 No. of fittings | 600.00 | 6.00 |
| | **Total Rs.** | | **39,300.00** | **393.00** |

| | | |
|---|---|---|
| 9. | The AMC agree to pay annual license fees of Rs.39,300/- for the period stating from 1st January to 31st December or part there of each year. The said license will be paid in advance without any declaction whatsoever on or before the 10 the day of January of each and every year and such fee shall be paid till the leave and license is revoked. | The AMC agree to pay annual license fees of Rs.393.00 for the period stating from 1st January to 31st December part there of each year. The said license fee will be paid in advance without and deduction what so ever on or before the 10th day of January of each and every year and, such fee shall be paid till the leave and license is revoked. |
| 10. | In addition to the above the Machinery erected at the installation being taken over, by AMC as described below :<br>Type of Broad description of machinery (separate service schedules/Annexure enclosed)<br>i) Cost of S.T.P. and machinery, fixtures and equipment etc.<br>ii) Cost of water supply equipments/pumping stations etc.<br>iii) Sewerage pump house at N-land Ns-6.<br>iv) Street lights (Annexure-V) | No change<br><br><br><br>No change<br><br>No change<br><br>No change<br><br>No change |
| 11. | At present CIDCO has constructed a sewerage treatment plant in S.No.30 Murtizapur near Airport The AMC agrees to take over the said. utilities along with its allied equipments/ Machinery and CIDCO agreed to | |

| | | |
|---|---|---|
| | hand over the possession of the sewerage system the description of which is annexed herewith as Annexure-II. | |
| 12. | It has also been mutually agreed by both the parties that for all the lands which have been transferred for the purpose more particularly specified in Para-of this agreement CIDCO reserves the right to simultaneously utilize the said. land for any other purpose subject to condition that, CIDCO shall have made available alternate land for providing the same services for which the lands presently are used and subject to the concurrence of AMC to such change of use The CIDCO shall also have the right to simultaneously put the land to another use along with present use of land in such a way that the present services continue to be provided from the said land. shall not be affected however this will be done in concurrence with AMC. | Administration not agreed with this clause hence proposed to delete. |
| 13. | It is agreed that the AMC shall use the land exclusively for the purpose for which the CIDCO has handed over to it in case the AMC does not require the land for the designated use the AMC shall deliver possession of such lands to CIDCO. The AMC agree that they will not create any third party interest by way of transfer or alienation by any means, temporarily permanently of these lands to any person or body. The AMC shall protect these lands from encroaonments and also observe the terms and conditions of the transfer scrupulously. Any change in the land use shall entitle CIDCO to resume the lands and, AMC shall not dispute for handing over the levels. | It is agree that the AMC shall use the land exclusively for the purpose for which the CIDCO has handed over to it in case the AMC does not require the land for the designated use the AMC shall deliver possession of such lands to CIDCO the AMC agree that, they will not create any third party interest by way of transfer or alternation by any means temporarily or permanently of these lands to any personor body. The AMC shall protect these levels from encroachments and also observe terms and conditions of the transfer scrupulously. |
| 14. | CIDCO has engaged various agencies for the maintenance and operation of the treatment plants pump houses | No Change |

| | | |
|---|---|---|
| | development of gardens sweeping, cleaning and paste control, etc. on contact basis. The details of such contracts are at Annexures-VI, II, VIII-A. The AMC may continue to avail the services of these agencies till expiry of the present contract on making payments as per the contract. and shall have right to make their arrangements as may be sound suitable on the expiry of each of the contract. | |
| 15. | The AMC agrees to take over the maintenance and operation of the street lighting of New Aurangabad Area with immediate effect as per Annexure-V | No Change |
| 16. | The AMC agrees to take over the maintenance and operation of the underground drainage system, S.T.P. and sewerage pump houses of New Aurangabad with immediated effect as per Annexure-II. | No Change |
| 17. | The AMC agrees to take over the maintenance and operation of gardens as per Annexure-VI with N-12 Nursery. | No Change |
| 18. | The AMC agrees to take over the maintenance and operation of roads along with sweeping, cleaning and garbage disposal of New Aurangabad area with immediate effect. | No Change |
| 19. | The AMC agrees to take over the balance water supply system from CIDCO on or from dated ............................ as per Annexure-III-A. There are some pockets where CIDCO is going to develop water supply system. That system will also be handed over to AMC immediately after completion of works. The AMC agrees to this also. | No Change |
| 20. | CIDCO reserves its rights to use of all infrastructures transferred as a result of this Agreement for its related as well as its own developmental works. | No Change |
| 21. | On transfer of infrastructures the | OIn transfer of infrastructures the |

| | | |
|---|---|---|
| | powers of planning Authority are to be exercised by the AMC in respect of transferred area of New Aurangabad by CIDCO. However, to facilitate the recovery of huge arrears to CIDCO from its buyers and lessees, it has been agreed by the AMC that they will not grant development permission under section 45 of the Maharashtra Regional and Town planning Act.1966 without obtaining No Objection Certificate from CIDCO similarly the AMC shall not grant occupancy certificates without NOC of CIDCO. | powers of planning Authority are to be exercised by the AMC in respect of transferred area of New Aurangabad by CIDCO however, to facilitate the recovery of huge arrears to CIDCO from its buyers and lessees it has been agreed by the AMC that they will not grant development permission under section-45 of the Maharashtra Regional and Town Planning Act.1966 without obtaining No Objection Certificate from CIDCO. the extend of financial dues (Arrears on A/C of various charges) Similarly the AMC Shall not grant occupancy certificates without NOC of CIDCO. |
| 22. | It is agreed between the AMC and the CIDCO that with the New Aurangabad Considerable portion of land is still to be developed and disposed by the CIDCO in order to unable CIDCO to discharge Its function as a special planning Authority, it shall not be necessary for CIDCO to approach AMC for development permission in respect of areas/lands being developed by the CIDCO. | No Change |
| 23. | it is further agreed between the parties that, for the purpose of protecting CIDCO's lands free from encroachments unauthorized occupation and unauthorized developments etc. It is imperative to remove the unauthorized occupation developments taking place on CIDCO's land and also necessary to protect open spaces like foot, paths roads sides, etc for which the AMC shall exercise the power of plasming Authority. However, in the interest of protecting CIDCO's lands. CIDCO shall have a concurrent jurisdiction for exercising the powers under section 52, 53 and 55 of the M.R.T.P. | No Change |

| | | |
|---|---|---|
| | Act.1966 to enable the CIDCO to remove unauthorized encroachments as well as unauthorized developments as explained above. Also, the CIDCO shall exercise powers under section 135. 139 and 142 of the M.R.T.P. Act. 1966 for the purpose of removal of unauthorized occupation on CIDCO's land on foot paths and road sides. | |
| 24. | It is agreed between AMC and CIDCO that as per the Government decision vide letter No.Doc-1095/759/CR-165/UD-16/dated 12.07.2001 following amount shall be paid by CIDCO.<br>a) Rs.175.00 Lakhs popular contribution towards water supply sewerage system.<br>b) Rs.275.00 Lakhs towards repairs to the road drainage system, sewage treatment plant sewage pump house and other miscellaneous expenditure as full and final payment towards handing over of services to AMC. | No Change<br>No Change<br>No Change |
| 25. | It is agreed between AMC and CIDCO that CIDCO should refund Rs.25.00 lakhs to AMC towards the land cost of the proposal Auditorium plot at N-5, and allot the plot free of cost to AMC for development of Auditorium. | No Change |
| 26. | It is agreed between AMC and CIDCO that as per the Government decision vide letter No.Doc.-1095/759/CR-165/VD-10, dated 12.07.2001 to hand over one wing of Gt structure of existing CIDCO office building to AMC free of cost more specifically marked on plan planed as Annexure-XI. | |
| 27. | The AMC agreed to take over the existing contract of sweeping and cleaning of CIDCO area on the saneteons and conditions of the contract and continue to operate till expiry of contract period or shall | No Change |

| | | |
|---|---|---|
| | terminate immediately after marking alternate arrangement without making of compensation. | |
| 28. | It has been agreed by the AMC that along with 39 malies they will absorb 32 permanent employees of CIDCO in different cadres in the AMC and CIDCO agreed to transfer in the dues on account of G.P.F. gratuity, etc. payable to them. This is subject to the condition that, these employees shall give consent for transfer. The details are annexure here with as Annexure-X. | It has been agreed by the AMC that along with 39 malies they will absorb 32 permanent employees of CIDCO in different carders in the AMC Qn % seniority basis and CIDCO agreed to transfer their dues on account of G.P.F. Gratuity etc. payable to mem this is subject to the condition that these employees shall give consent for transfer. The details are annexure here with us Annexure-X. |
| 29. | Presently within CIDCO area, for protecting the lands from encroachments and unauthorized occupation CIDCO has engaged security Agencies and after transfer of the services the AMC and the CIDCO will mutually decided regarding continuation of these agencies in due course of time. | No Change |

WITNESS WHEN REEF The Lessor and Lessee has /have herewith set and subscribed his/their hands and seal the day and year first above written.

signed and delivered for and on behalf of the city and Industrial Development Corporation of Maharashtra Limited by the hand of

( )

Jr. Managing Director/
Chief Administrator
(New Towns)

In Presence of
1.
2.

signed and delivered by the within Aurangabad Municipal Corporation by the hand of

( )

Commissioner/Dy.Commissioner
of A.M.C.

In Presence of
1.
2.

**संवाद :**

**श्री.तकी हसन खॉन :** सन १९७२-७३ मध्ये सिडकोसाठी विकास योजना तयार झाली. उद्यान, क्रिडांगणे व इतर आरक्षणे विकास योजनेत दाखविले आहे. परंतू ते आज आढळून येत नाही. आरक्षणांचे क्षेत्र कमी कमी करुन दुकान केंद्र व इतर कारणासाठी दिली. स्टेडीयम नाही. रस्ते, विद्युत, पाणी पुरवठा, जलनि:सारण ईत्यादी महालीची कामे, पैसे खर्च करावे लागणार. सर्व उपकरणे विद्युतवर चालणार विद्युत बिल देण्याचा प्रश्न उध्दवतो. नियोजन प्राधिकरण सिडको आहे. विकास परवानगीचे अधिकार देणार का एम.जी.एम.मधून रस्ता जातो. न्यायप्रविष्ट प्रकरणे आहेत. हे सर्व आपण घेतो. यावर सर्वांकश विचार होण्याची गरज आहे. बारकाईने पाहावे लागेल. वेळ ठरवून सविस्तर चर्चा घडवून आणावी.

**श्री.मीर हिदायत अली, स.अली सलामी :** विशेष बैठक घेण्यांत यावी.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** सिडकोने कबुल केलेले बऱ्याच सुविधा देणे बाकी आहे. ज्या सुविधा देण्याचे मान्य केले. त्या दिल्या नाही. नागरिकांची गैरसोय होत आहे. जोपर्यंत सुविधा पूर्ण करुन देत नाही. तोपर्यंत करारनामा प्रस्ताव मंजूर करु नये.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** शहर अभियंता यांनी प्रस्तावाबाबतची संकल्पना मांडली तर पुढील चर्चा करता येईल.

**श्री.नंदकुमार फुलारी :** मा.न्यायालयाचे काय आदेश आहेत.

**विधी सल्लागार :** सिडको हस्तांतरण करण्याचा हा प्रस्ताव शहर अभियंता यांचे विभागाकडून सादर झालेला आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. श्री.किसन हिवाळे यांनी सिडको भागातील नागरिकांना आवश्यक अशा सोयी सुविधा देण्या विषयी याचिका दाखल केलेली आहे. सुनावणी चालू आहे. सिडको प्रशासनातर्फे दि.०४.०७.२००३ रोजी न्यायालयात अर्ज दाखल केला. शासनाने यापुर्वीच १६ मार्च २००१ रोजी सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्याचा निर्णय घेतला. या प्रकरणांमध्ये शासनाचे आदेशाचे कार्यवाहीस न्यायालयाने स्थगिती दिली. सिडको मार्फत अर्ज दाखल झाला की, स्थगिती उठवावी. परंतू सिडको हस्तांतरणाच्या बाबतीत मा.उच्च न्यायालयाने महानगरपालिकेचे हया बाबतीत काय म्हणणे आहे. विचारणा केली आहे. त्याअनुषंगाने हा करारनाम्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

**श्री.जयवंत ओक :** तात्काळ आदेश द्यावे असे काही आहेत का? किती कालावधी लागणार आहे. मा.न्यायालयाने कालमर्यादा ठरवून दिल्या आहेत का?

**विधी सल्लागार :** पॅनल वरील जे वकील आहे, त्यांनी याबाबत महापालिकेची भूमिका काय आहे. पत्राने कळविलेले आहे. या प्रकरणां संबंधी पुन्हा दि.२९.०८.२००३ रोजी सुनावणी आहे. विचारणा केल्यास सभागृहाने घेतलेल्या निर्णयाबाबत माहिती सादर करावी लागणार नाही.

**श्री.भगवान घडमोडे :** विधी सल्लागार यांनी कायदेशीर सल्ला दिला नाही. वकीलांचे काय म्हणणे आहे. व आपल्या भावना काय आहेत. मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार योग्य निर्णय घ्यावा लागेल. सभागृहाची भूमिका काय याबाबत विचारणा झाली. स्थगिती देण्यांत आली. सिडकोने पत्र दिल्यानंतर महापालिकेची या संदर्भात काय भूमिका आहे. न्यायालयाने विचारणा केली सिडको प्रशासनाने विकासाबाबत आश्वासन दिले होते. झालेले अतिक्रमण

काढून त्या ठिकाणी सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याचे कबुल केले होते. त्या दिल्या नाही. आजही दिल्या नाही. सिडकोने आमच्या सेवा सुविधा पुर्ण करुन द्याव्यात. जनता होरपळली आहे. हस्तांतरण झाल्यानंतर व योग्य अशा सर्व सोयी सुविधा दिल्यानंतर हस्तांतरण होईल असे मत न्यायालया समोर मांडावे. जोपर्यंत ठरल्याप्रमाणे सोयी सुविधा झालेल्या मोजून देत नाही, तोपर्यंत हस्तांतरण करु नये.

**श्री.अविनाश कुमावत :** सिडको भागातील डॉ.कराड महापौर असतांना पुंडलिक नगर नोटीफाईड भागासाठी खते विकासासाठी १० कोटी, नाट्यमंदिर बांधकाम ईत्यादी त्यावेळेस ठरले होते ते होत नाही, तोपर्यंत करारनामा मंजूर करु नये.

**श्री.स.अली सलामी :** विशेष सभा बोलवावी.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** हस्तांतरणाबाबत २००१ मध्ये मा.सचिव, नगर विकास विभाग मंत्रालय यांचे सह सिडकोचे संचालक, महानगरपालिका पदाधिकारी, मा.महापौर, मा.आयुक्त, महापालिका अधिकारी, सिडकोचे अधिकारी काही स.सदस्य यांचेत सिडको हस्तांतरणाच्या संदर्भात संयुक्त बैठक झाली. त्या बैठकीत करारनामा झाला. त्यावेळेस त्या भागात नागरिकांच्या सुख सुविधा करुन देण्यासाठी रुपये ४.५० कोटी देण्याचे कबुल केले होते. ज्या विकसीत भूखंड मोफत देणार होते. सामाजिक सुविधा व नियोजन प्राधिकरण महापालिका राहील. डेव्हलपमेंट झालेल्या गृह निर्माण संस्था, रस्ते, ड्रेनेजचे काम व इतर सुविधा सिडकोने करुन द्याव्यात असा अहवाल शासनाकडे गेल्या नंतरच गृहीत धरुन त्यावेळाच्या मा.मुख्यमंत्र्यांनी सिडकोचे महापालिकेकडे हस्तांतरण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. ज्यावेळेस महानगरपालिकेकडे हस्तांतरण होईल. त्यावेळी ०२ नियोजन प्राधिकरण व्हायला नको असे चालवणे अवघड होईल. म्हणून ज्या कारणासाठी याचिका दाखल झाली. त्याची पुर्तता सिडकोने केलेली नाही. तसेच लिज होल्डचे फ्रि या तत्वावर मिळकती हस्तांतर व्हावयास पाहिजे. शासनाकडे पाठवावयाचा मसुदा त्यात सोसायटीचे रस्ते, विद्युत, ड्रेनेज ई कामे करुन द्यावयाचे ठरले होते. सिडकोने कबुल केलेल्या सुविधा देण्याबाबत कार्यवाही होत नाही. तोपर्यंत हस्तांतरण करण्यांत येऊ नये. त्या भागातील जनतेला १९७५ पासून सिडकोने प्रत्येक सेक्टरमध्ये ज्या सोयी सुविधा देण्याचे कबुल केले. त्याचे पुस्तक नाही. त्या विभागाचे अधिकार आजच्या सभेला माहिती घेण्यासाठी उपस्थित नाही. सिडको भागास ४-५ कोटी रुपये नाट्य गृहासाठी लागणार आहे. सिडकोने जे अधिवचन दिले होते.ते पूर्ण करावे. अर्थसंकल्पात तरतूद केली. हस्तांतरण केल्यानंतर आणखी तरतूद करावी लागणार नाही. शब्द दिल्यानंतर महापालिकेचे सिडको भागातील नाट्यगृह होऊ शकले नाही. ५ कोटीची इमारत कशी बांधणार जलतरण तलाव, नाट्यगृह याचे उद्घाटन झालेले आहे. तेथे सद्य:परिस्थितीत कोणतेही काम झालेले नाही. या एस.टी.पी. प्लॅट मधून त्या एस.टी.पी. प्लॅटकडे न्यावे लागेल. महापालिकेकडे तज्ञ व सक्षम अधिकारी आहेत. कार्यकारी अभियंता आहेत. दोन लक्ष लोकसंख्येसाठी विकास हाती घेण्याच्या दृष्टीने सिडकोचे महापालिकेकडे हस्तांतरणा संबंधात कायदेशिर बाजू मांडावी.

**श्री.नंदकुमार फुलारी :** हस्तांतरण होण्यासाठी जे आश्वासन दिले होते. उद्यान व्यवस्थित करुन दिले नाही. ते सिडकोने पूर्ण केलेले नाही. आवश्यक त्या सुविधा करुन दिल्या नाही. इंटरनल ड्रेनेजची कामे केली नाही. अंतर्गत ड्रेनेजची लाईन बदलण्याची कामे ही केली नाही.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** सिडको प्रशासनाने ज्या सुविधा सिडको भागात द्यावयास पाहिजे त्या दिल्या नाही. महापालिकेकडे हस्तांतरण झाल्यानंतर कोणत्याही सुविधा सिडको करुन देणार नाही. हस्तांतर होण्याच्या दृष्टीने महापालिका व सिडकोचे अधिकारी यांचे संयुक्त बैठक व्हावी. ज्या सुविधा देण्याचे मान्य केले होते. त्याबाबत विचारणा करुन सर्वांचे समाधान झाले तरच विशेष बैठक लावून हस्तांतरण करण्याचा निर्णय व्हावा. तोपर्यंत हा विषय स्थगित ठेवावा.

**मा.महापौर :** सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन सिडको तर्फे सिडको भागास ज्या ज्या सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे. त्या करुन दिलेल्या नाही. तसेच सर्व खुल्या जागांना संरक्षित भिंत करण्यांत आलेले नाही. तसेच ड्रेनेज अंतर्गत रस्ते, फुटपाथ इ.सुविधा ठरल्याप्रमाणे पूर्ण करुन दिलेले नाही. त्या बद्दलची संपूर्ण माहिती घेवुन त्यानंतरच सर्व सदस्यांचे मत विचारात घेवून सिडको हसतांतर करण्याबाबत व करारनाम्यास मंजूरी देणे बाबत विचार करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सिडको कडून सिडको वासियांना ज्या ज्या आवश्यक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे. अद्यापही त्या सुविधा उपलब्ध करुन देण्यांत आलेले नाहीत. सर्व खुल्या जागांना संरक्षित करण्यांत आलेले नाहीत. जलनि:सारण अंतर्गत रस्ते, फुटपाथ, ईत्यादी सुविधा ठरल्याप्रमाणे पूर्ण झालेल्या नाहीत या संबंधीची पूर्ण माहिती घेतल्यानंतरच सिडको हस्तांतरण करण्याबाबत व करारनाम्यास मंजूरी देण्यांबाबत विचार करण्यांत येईल यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.११५/६ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, दिनांक २६.०४.२००३ रोजी पैठण रस्त्यावर रेल्वे उड्डाण पुलाच्या दक्षिणेकडील Approach टोकाजवळ १४०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी अचानक फुटली. त्यामुळे सदर ठिकाणी काही नागरिकांच्या दुकानामध्ये व घरांमध्ये पाणी घुसल्याने त्यांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. सदर नुकसान झालेल्या रहिवाशांनी त्यांना नुकसान भरपाई मिळण्याकरिता महानगरपालिकेत लेखी स्वरुपात अर्ज दिलेले आहे. या आर्जमध्ये त्यांनी अवास्तव रक्कमेची मागणी केलेली आहे.

ज्या नागरिकांचे जलवाहिनी फुटल्यामुळे आर्थिक नुकसान झालेले आहे, त्यांची घरे/दुकाने अनधिकृत रित्या बांधलेली आहेत. या प्रस्तावा सोबत नुकसान झालेल्या नागरिकांच्या नावांची यादी देण्यांत येत आहे. यापुर्वी मानवतेच्या दृष्टीकोनातून जलवाहिनी फुटल्यामुळे आर्थिक नुकसान झालेल्या नागरिकांना महानगरपालिकेतर्फे रुपये ५००/- ते ५०००/- पर्यंत आार्थिक मदत देण्यांत आलेली आहे. त्याच धर्तीवर रेल्वेस्टेशन उड्डाण

पुलाजवळील आपदग्रस्त नागरिकांनाही योग्य ती आर्थिक मदत देण्याच्या विचारार्थ प्रस्ताव सादर.

**नावांची यादी**

१. स.गौस हुजूर साहेब (महराष्ट्र फेब्रीकेशन वर्कशॉप)
२. नजम खॉन हाफीस खॉन (अजिंठा सिल्क मिल)
३. शे.जावेद शे. अब्दुल (जावेद पान सेंटर)
४. मो.अतिक मो.सरवर (किराणा दुकान)
५. शे.इफ्तेकार (पान टपरी)
६. मो.जुनेद मो.जावेद (स्क्रीन प्रिटींग साहित्य)
७. शे.इकबाल (इकबाल टी हाऊस)
८. प्रभाकर काकडे (किराणा दुकान)
९. हाफीस हुसैन चाऊस (बुक सेलर्स)
१०. सुलतान खा हबीब खा (ग्रीन इंजिनिअरींग वर्क्स)
११. शे. खलील शे. अब्दुला (खलील टी हाऊस)
१२. शे.शकील शे.बाबा (थ्रीस्टार टी सेंटर)
१३. शे.आसिफ शे.हुसैन (आसिफ इंजिनिअरींग)
१४. अ.कलीम अ.करीम (नॅशनल वॉल्कनायझींग)
१५. बी.एन. चव्हाण (सागर प्रोसेस)
१६. सलीमोद्दीन अफसर उद्दीन (पॅरामाऊंट एजन्सी)
१७. असिफ सिद्दीकी बीसीत सिद्दीकी (ऑफिस ॲटो पार्टस)
१८. अ.हकीम अ.करीम (हार्डवेअर)
१९. आरेफ खा इस्माफील खा (ए.के.टुस्टर, सिल्क मिल)
२०. सत्यनारायण पेदापत्ती (फर्निचर)
२१. शे.इब्राहीम शे.युसूफ (वेल्डींग वर्कशॉप)
२२. रमेश सत्यनारायण
२३. इफ्तेकार अहमद निसार अहमद (सिटीजन्स इलेक्ट्रीकल्स)
२४. तनवीर कुरेशी (घरगुती सामान)
२५. इस्माईल खॉ हाजी अब्दुल खॉ (घरगुती सामान)
२६. मुस्तबा महेमूद (स्टॅंडर्ड सिल्क मिल)
२७. मो.जफर (घरगुती सामान)
२८. शे.युसूफ शे.लाल (घरगुती सामान)
२९. शे.शिकूर (घरगुती सामान)
३०. सत्तार भाई (घरगुती सामान)
३१. अजीजभाई (घरगुती सामान)
३२. स.बुन्हाउद्दीन (घरगुती सामान)
३३. रफत भाई (घरगुती सामान)
३४. सुलतान खॉन (घरगुती सामान)
३५. मो.सादीक मो.जफर (घरगुती सामान)

**संवाद :**

**श्री.अविनाश कुमावत :** प्रस्तावित केल्यानुसार सदर नागरिकांचे नुकसान झाले, परंतू जो व्यवसाय करीत होते, ती जागा अनधिकृत होती. असे नमूद केले. आर्थिक मदत देता येईल का? खुलासा करावा.

**श्री.नजर हमीद :** यापुर्वी आर्थिक मदत दिलेल्या आहे. महापालिकेच्या पाईप लाईन फुटली नुकसान झाले. मदत दिलेली आहे. यांना सुध्दा देण्यांत यावे.

**श्री.भगवान घडमोडे :** महापालिका ही धर्मादाय संस्था नाही. स्थानिक स्वराज्य संस्था आहे. असे प्रस्ताव सादर करुन चुकीच्या पध्दतीने कार्यवाही होऊ नये. उद्या मी नाल्यावर घर बांधण्यास सांगणार पाणी आल्यास घरे पाण्यात जाणार मी सुध्दा आर्थिक मदत देण्याची मागणी करणार अशा नागरिकांना मदत देणार का? योग्य तो निर्णय घ्यावा.

**श्री.अफसर खॉन :** सभागृहात असे यापुर्वी प्रस्ताव आलेले आहे. मंजूर करुन आर्थिक मदत देण्यांत आलेली आहे. यांना सुध्दा आर्थिक मदत देण्यात यावी.

**श्री.भगवान घडमोडे :** अनधिकृत बांधकाम केले. अशा लोकांना आर्थिक मदत करणार काय?

**श्री.काशिनाथ कोकाटे :** प्रशासकीय प्रस्ताव झालेला आहे. नगरसेवकांचा प्रस्ताव नाही. त्या पध्दतीनेच चर्चा होऊन निर्णय होणे गरजेचे आहे. यापुर्वी ठराव होऊन अशा पध्दतीने आर्थिक मदत दिली असेल तर देण्यास हरकत नाही. प्रशासकीय प्रस्ताव आहे. प्रशासनाने भूमिका स्पष्ट करावी.

**श्री.भगवान घडमोडे :** प्रस्ताव मंजूर करण्यास विरोध नाही. परंतू असे प्रस्ताव सादर करुन चुकीचा पायंडा पाडू नये. मदत द्यावयाची असल्यास यापुर्वी सुराणानगर भागात सुध्दा पाईप लाईन फुटलेली आहे. तेथील नागरिकांना सुध्दा आर्थिक मदत देण्यांत यावी.

**श्री.भरत लकडे :** रक्कम किती देणार उल्लेख नाही. ५००/- ते ५०००/- असा उल्लेख आहे.

**श्री.नंदकुमार फुलारी :** पंचनामा झालेला आहे का? अनधिकृत वस्तीत असलेल्या अशा दुकान दारांना आर्थिक मदत देता येईल का?

**मा.आयुक्त :** पुर्वीचा इतिहास काय झाला माहित नाही. परंतू नैसर्गिक आपत्तीचे निवारण करणे आवश्यक आहे. कपडे, भांडी, ई मदत देण्याचा प्रश्न आहे. नुकसान झाल्यास शासन धोरणानुसार महसुल विभागामार्फत आर्थिक मदत दिली जाते. महापालिकेचे धारेण काय आहे. पुर्वी मदत दिली असेल आपणांस माहित आहे. हा प्रस्ताव विचारार्थ ठेवलेला आहेत.

**श्री.स.अली सलामी :** सन १९९७-९८ मध्ये अशाच प्रकारे नैसर्गिक आपत्ती झालेली होती. त्यांना आर्थिक मदत देण्यांत आली की नाही. या लोकांच्या घरात पाणी गेले. वस्तुचे नुकसान झाले. खाद्य पदार्थ पाण्यात बुडाले, मोठे नुकसान झाले. सुराणानगर येथील जे नुकसान झाले, त्या दुकान धारकांनी दुकानांचे इन्शुरन्स काढलेला होता.

**श्री.अविनाश कुमावत :** माझ्या वार्डात उत्तमनगर भागात एका नाल्यावरील घर पाण्यामुळे पडले त्यांना ही मदत देणार काय.

**श्री.नंदकुमार घोडेले :** या लोकांच्या घरात, दुकानामध्ये ३ ते ४ फुट पाणी होते. एकही साहित्य जागेवर राहिले नाही. प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी सुध्दा केलेली आहे. परिस्थिती माहित आहे. नुकसान झाले ते देण्यांत येईल असे आश्वासन त्यावेळीच दिले होते.

**सौ.सुवर्णा चंद्रात्रे :** महापालिके मार्फत आर्थिक मदत न देता प्रत्येक नगरसेवकांच्या मानधनातून आर्थिक मदत देण्यांत यावी. यास सर्व सभागृह मान्यता देईल यात शंका नाही.

**मा.महापौर :** प्रशासकीय प्रस्ताव आहे. मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक २६.०४.२००३ रोजी पैठण रस्त्यावर रेल्वे उड्डाण पुलाच्या दक्षिणेकडील Approach टोकाजवळ १४०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी अचानक फुटल्यामुळे प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अ.क्र.१ ते ३४ आपतग्रस्त नागरीकांना प्रस्तावित केल्याप्रमाणे, योग्य ती आर्थिक मदत देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११६/७ :**

दिनांक २०.१२.२००२ च्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र.९/३ अन्वये हेरीटेज नियमावली बाबतचा प्रस्ताव शहर सुधार समितीमार्फत सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात यावा. अशी शिफारस केली आहे. त्यानुषंगाने दिनांक ०४.०१.२००३ च्या शहर सुधार समिती पुढे विषय क्र.७/२ आणि दिनांक १५.०१.२००३ च्या शहर सुधार समिती पुढे ठेवण्यांत आला होता. सदर प्रस्ताव पुन्हा दि.१६.०८.२००३ च्या शहर सुधार समितीव्या सभेपुढे ठेवण्यांत आला. असता सदर प्रस्तावास शहर सुधार समितीने परिशिष्ट-यु चे नियम क्र.२८ पोट नियम ६ हस्तांतरणीय विकास हक्क लागू झाल्यानंतर अंमलबजावणी करण्यांत येईल. या अटी सह मंजूरी देऊन दि.२०.०८.२००३ रोजी संपन्न होणाऱ्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यास शिफारस केलेली आहे. त्यानुषंगाने हे री टेज नियमावली बाबतचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे ......

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील प्रस्ताव क्रमांक : टीपीएस-२४००-३६७/प्र.क्र.-२४/नवि-९, दि.३० सप्टेंबर २००० अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) खाली महानगरपालिके साठी शासनाने मंजूर केलेल्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये हेरीटेज नियमावली व ऐतिहासिक दृष्ट्या वास्तुशास्त्रीय दृष्ट्या जतन करावयाच्या वास्तुंची यादी समाविष्ट करावी म्हणून आदेश दिलेले आहेत. त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबद्दल करणे आवश्यक आहे. त्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीत खालील दर्शविल्यानुसार नवीन नियम क्र.२८ म्हणून प्रस्तावित करण्यांत येत आहे. त्याचे २८ (६) चे नियमन ॲपेंडीक्स "यु" (U) म्हणून प्रस्तावित केले असून वास्तुशास्त्रीय व ऐतिहासिक दृष्ट्या जतन करावयाच्या वास्तुंची यादी समाविष्ट करणेचे दुरुस्ती करण्यास प्रस्तावित करण्यांत येत आहे.

करिता सोबत जोडलेल्या नियम क्र.२८ साठीचे शेड्युल व ॲपेंडीक्स "यु" प्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीत दुरुस्ती करणेस व यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेर बदल करणेस मंजूरी होणेस्तव व सर्वसाधारण सभेच्या मंजूरीनंतर कलम ३७ ची कार्यवाही करणेचे व शासनास प्रस्ताव सादर करणेचे सर्व अधिकार व मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना देणेचे मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.तकी हसन खान :** सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे. विशेष सभा बोलविण्यांत यावी.

**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** य विषयावर सविस्तर चर्चा करुनच निर्णय घेण्यात यावा. विशेष सभेचे आयोजन करण्यांत यावे.

**मा.महापौर :** या प्रस्तावा संदर्भात विशेष सभेचे आयोजन करुन सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यांत येईल.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार हेरीटेज नियमावली संदर्भात विशेष सभेचे आयोजन करुन निर्णय घेण्यांत येईल, असे सर्वानुमते ठरले.

## पुरवणी विषय

**विषय क्र.११७/१ :**

दरवर्षीप्रमाणे रमजान ईदच्या निमित्ताने शहागंज चमन ते निजामोद्दीन रोडपर्यंत मिनाबाजार चे आयोजन करण्यांत येते. महानगरपालिकेला या मिना बाजार करिता पाणी, पथदिवे, अग्नीशमन व इतर सोयी पुरवाव्या लागतात. मनपाला या बाजारापासून कोणतेही उत्पन्न मिळत नाही. या बाजारामध्ये बाहेरील राज्यातील व्यापारी देखील माल घेवून येतात. तीन-चार वर्षापासून संयोजन समितीच्या अरेरावीमुळे सर्वच व्यापारी त्रास्त होत आहेत. स्वतःच्याच मालकीचाच बाजार असल्याचे संयोजन समितीचे पदाधिकारी समजतात. त्यामुळे येथील दुकानदार यांनाही त्रास होतो. दुकाने देण्यामध्ये पक्षपाती धोरण अवलंबविण्यात येते. संयोजन समितीच्या जवळीक असणाऱ्या व्यापाऱ्यांनाच मोक्याच्या ठिकाणी दुकाने देण्यांत येतात. बेसूमार भाडे आकारुन व्यापाऱ्यांची लूट करण्यांत येते. या भाडेवाढीचा अप्रत्यक्ष परिणाम स्थानिक नागरीकांवर होतो.

करिता प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मिनाबाजार आयोजनाकरिता जाहिर लिलाव करावा. स्वयंसेवी संस्थानाच जाहिर लिलावामध्ये सामील होण्याची अट टाकावी. मनपाने ठरवून दिलेल्या दरानेच भाडे आकारण्याची सक्ती करावी. स्वयंसेवी संस्थांना ना नफा ना तोटा या तत्वावर ठराविक दिवसाकरिता मिनाबाजार चालविण्यास देण्यांत यावा. चिठ्ठ्या टाकून व्यापाऱ्यांना गाळे देण्यांत यावे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.मीर हिदायत अली

**अनुमोदक :** श्री.तकी हसन खॉन.

**संवाद :**

**श्री.अफसर खॉन :** पर्वी ज्या पध्दतीने कार्यवाही होत होती. त्याप्रमाणेच व्हावी. नफा नुकसानचा प्रश्न नाही. भावनेचा प्रश्न आहे. संस्था कोणीही असो कोणाच्या फायद्याचा नाही. प्रस्ताव चुकीच्या पध्दतीने आला. रद्द करावा. कोणी मोफत घेत नाही.

**श्री.मिर हिदायत अली :** प्रस्ताव मंजूर करावा.

**श्री.अफसर खॉन :** रमजानचा पवित्र महिना आहे. पुर्वी जसे चालू होते तसे चालू द्यावे. प्रस्ताव रद्द करावा.

**श्री.तकी हसन खॉन :** प्रत्येक दुकानदाराकडून रु.१०००/- व ते ५०००/- ते १००००/- हजार वसुल करतात. दुकानदाराची संयोजक समिती दिशाभूल करते. त्याच्या बाजुला बस स्टँड आहे, त्यांना ३५०००/- रुपये ठेका दिला जातो. यात

महापालिकेचे मोठे नुकसान होत आहे. किती जागेसाठी किती व कोणत्या जागेसाठी किती भाडे आकारले पाहिजे. याचा निकष असावा. टेंडर पध्दतीने कार्यवाही झाल्यास महापालिकेचा यात मोठा फायदा होईल या प्रस्तावास मंजूरी दिली जावी. अशी माझी मागणी आहे.

**सौ.निखत परवीन :** फटाका दुकानांना देखिल लिलाव पध्दतीने देण्यांत यावे.

**श्री.अफसर खॉन :** ओपन ॲक्शन करुन योग्य होणार नाही. भाडे कमी आकारले जात असेल तर जास्त भाडे आकारावे. लिलाव पध्दतीने कार्यवाही होऊ नये माझा विरोध आहे. राजकीय हेतूने प्रस्ताव मांडण्यांत आला. एखाद्या सदस्यांला कार्यक्रमांसाठी बोलविले नाही. सत्कार केला नाही. म्हणून हेतू पुरस्कर प्रस्ताव ठेवणे योग्य नाही. राजकारण करु नये. प्रस्ताव रद्द करावा. संस्थेकडून भाडे वाढवून घ्यावे. वाढीव भाडे ठरवून देण्यांत यावे.

**श्री.कैसर खान बद्रोद्दीन खान :** ते फक्त ६ हजार भरतात. १ वेळा प्रयत्न करुन पहावे. हा बाजार पुढे निजामोद्दीन दर्गाह रोड पर्यंत वाढवण्यांत यावे.

**श्री.अफसर खॉन :** लिलावास विरोध आहे. येथे दर्गा होत आहे. भाडे वाढवून घ्यावे.

**श्री.अविनाश कुमावत :** महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल ते पहावे.

**श्री.तकी हसन खान :** लिलाव करुन द्यावे.

**श्री.मीर हिदायत अली :** प्रस्ताव महापालिकेच्या फायद्याचा आहे. मान्य करावा. लाखो रुपये मिळणार आहे.

**श्री.महंमद जावेद महंमद इसहाक :** टेंडर पध्दतीने कार्यवाही व्हावी.

**श्री.अशरफ मोतीवाला :** सदर ईद बाजारास पैंगबरदासी अमानुल्ला मोतिवाल ईद बाजार हेच नांव पुढे कायम ठेवावे.

(याचवेळी मा.महापौर डायस जवळ जाऊन स.सभासद मोठमोठ्याने बोलतात. काहीही ऐकू येत नाही.)

**मा.महापौर :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रमजान ईदच्या निमित्ताने शहागंज चमन ते निजामोद्दीन रोड पर्यंतच्या रस्त्यावर आयोजित करण्यांत येणाऱ्या मिना बाजार करीता महापालिकेस पाणी, पथदिवे, अग्नीशमन व इतर सोयी उपलब्ध करुन द्याव्या लागत असल्यामुळे हा मिनाबाजार जाहिर लिलाव पध्दतीने व या लिलावात स्वयंसेवी संघटनांनाच भाग घेता येईल, महापालिकेने ठरवून दिलेल्या दराने भाडे आकारणीची सक्ती राहील. स्वयंसेवी संघटनांना ना नफा ना तोटा या तत्वावर आणि चिठ्ठया टाकून गाळे वाटप करणे या अटीस पात्र राहून ठराविक दिवसाकरिता मिनाबाजार चालविण्यांस देण्याकरिता बहूमताने मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११८/२ :**

विरशैव समाजाचे प्रवर्तक महात्मा बसवेश्वर यांचे नाव आकाशवाणी समोरील चौकास चौक देण्यांत आलेले आहे. तथापि औरंगाबाद शहरात महात्मा बसवेश्वरांचा पुतळाही उभारणे बाबत ठराव पारित झालेला आहे. सध्या बसवेश्वर चौकात एक गरुडाची प्रतिकृती आहे. तथापि सदरील गरुडाची प्रतिकृती बाजूच्या चौकात स्थलांतरीत करुन त्या ठिकाणी महात्मा बसवेश्वरांचा अश्वारुढ पुतळा उभारणेचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.भरत लकडे,
श्री.प्रशांत देसरडा.
**अनुमोदक :** श्रीमती मानकापे पार्वतीबाई,
श्री.काशिनाथ कोकाटे

**संवाद :**
**मा.महापौर :** पुरवणी विषय क्र. २ ते १५ सर्वानुमते मूंजर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आकाशवाणी समोरील चौकात अस्तित्वात असलेली गरुडाची प्रतिकृती बाजूच्या चौकात स्थलांतरीत करुन त्या ठिकाणी वीरशैव समाजाचे प्रर्वतक महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा उभारण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११९/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, झोन क्र.४ हा भाग भौगोलिक दृष्ट्या व लोकसंख्येचा मानाने मोठा असून सुमारे २ ते २.५० लाख लोकसंख्या असून पैठणगेट ते बीड बायपास रोड पर्यंतचा भाग येतो. त्यामुळे या भागातील साफसफाई, वसुली, पाणीपट्टी, आरोग्य व स्वच्छतेची कामे इत्यादीसाठी योग्य प्रकारे नियंत्रण ठेवण्यास अडचण निर्माण होते. तसेच जनतेच पाणी पुरवठा, स्वच्छता, ड्रेनेज, इत्यादी सेवा आणि मालमत्ता व पाणीपट्टी कर भरणा करणे सोयीचे व्हावे व जनतेला सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि गारखेडा व त्यालगतचा परिसर झपाट्याने विकसीत होत असल्याने आणि अधिकृत आणि अनाधिकृत वसाहती मोठ्या प्रमाणात उदयास आलेल्या असल्याने भौगोलिक क्षेत्र व लोकसंख्येचा विचार करुन झोन क्र. ३ चे ज्या पध्दतीने झोन क्र. ३ व ८ अशा दोन भागात विभागणी करण्यात आली, त्याच धर्तीवर व तोच दृष्टीकोन समोर ठेवून झोन क्रमांक ४ चे दोन स्वतंत्र झोन (विभाग) करण्यांत यावेत. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्रीमती मानकापे पार्वतीबाई
**अनुमोदक :** श्री.भाऊसाहेब ताठे,
श्री.राधाकृष्ण गायकवाड.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेट ते बीड बायपास पर्यंत विस्तारीत असलेल्या झोन क्र.४ मधील साफसफाई, आरोग्य, पाणी पुरवठा, ड्रेनेज इत्यादी कामावर योग्य प्रकारे नियंत्रण ठेवणे आणि भौगोलिक दृष्ट्या व लोकसंख्येच्या मानाने विस्तारीत असलेल्या भागातील नागरिकांना मालमत्ता कर व पाणी पट्टी कराचा भरणा करणे सोईचे होण्याच्या दृष्टीने झोन क्र.४ चे स्वतंत्र दोन भाग करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२०/४ :**

महानगरपालिका हद्दीत दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर कचरा साचत आहे. महानगरपालिकेकडे असलेली साधन सामुग्री, मनुष्यबळ व यंत्रणा दररोज जमा होणारा

कचरा उचलणेस कमी पडत आहे. त्यामुळे सर्वत्र कचऱ्याचे ढिगार तसेच पडलेले असतात. त्यामुळे विविध भागात साथीचे रोग पसरत असून शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. महापालिका हद्दीत जमा होणारा कचरा दररोज नियमित उचलणेचे कामासाठी खाजगी एजन्सी नेमणे व प्रायोगिक तत्वावर अशा एजन्सीस कचरा उचलणेचे काम देणे आवश्यक आहे. जेणेकरुन शहरातील साचणारा कचरा दरोज नियमित उचलला जाईल. साथीच्या रोगांना आला बसेल. शहराची स्वच्छता कायम राहून शहर सुंदर व स्वच्छ दिसेल. प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.
**सुचक :** श्री.राधाकृष्ण गायकवाड
**अनुमोदक :** श्री.चंद्रशेखर जैस्वाल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिका हद्दीत मोठ्या प्रमाणांवर कचरा उचलण्यास महापालिकेकडील साधन सामुग्री, मनुष्यबळ व यंत्रणा अपुरी पडत असल्याने या कचऱ्यापासून उद्ववणारे साथीचे रोगावर आळा घालणे व शहराची स्वच्छता कायम राहण्यासाठी महापालिका हद्दीतील कचरा उचलण्याचे काम प्रायोगिक तत्वावर खाजगी एजन्सीकडे देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२१/५ :**

श्रीमती सुशिलाबाई जगताप यांनी त्यांचे कडे स्वातंत्र्य सैनिक स्व.हिरुभाऊ जगताप संग्रहालयातील छत्रपती शिवाजी महाराज यांचे दोन दुर्मिळ छायाचित्र (तसबिर) तसेच मौल्यवान वस्तू महानगरपालिकेस देण्याची तयारी दर्शविली आहे.

त्यांचे कडील शिव छत्रपतींचे दुर्मिळ छायाचित्र तसेच मौल्यवान पुराण वस्तु स्विकारणे तसेच श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालया मध्ये स्वातंत्र्य सैनिक स्व. हिरुभाऊ जगताप यांच्या नावाने स्वतंत्र दालन सुरु करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.
**सुचक :** श्री.राधाकृष्ण गायकवाड
**अनुमोदक :** श्री.आनंद तांदुळवाडीकर,
श्री.जयवंत ओक.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्वातंत्र्य सैनिक स्व. हिरुभाऊ जगताप यांचे संग्रहालयातील छत्रपती शिवाजी महाराज यांचे दोन दुर्मिळ छायाचित्र, तसेच मौल्यवान पुराण वस्तू स्विकारुन या सर्व वस्तु श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालयातात स्वातंत्र्य सैनिक स्व. हिरुभाऊ जगताप यांचे नांवे स्वतंत्र दालन सुरु करुन जतन करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२२/६ :**

महानगरपालिका हद्दीत अनेक कंपन्या तसेच विविध खाजगी संस्था आपल्या उत्पादित मालाची जाहिरात महानगरपालिकेची परवानगी न घेता करीत असतात. त्यामुळे महानगरपालिकेस जाहिरात करा पासून मिळणारे उत्पन्न बुडते. राजकीय पक्षांचे कार्यक्रम

वगळता बॅनर पोस्टर व वॉल पेंटींग साठी अशा उद्योग समुहाच्या जाहिराती खाजगी एजन्सीला करणेस रितसर परवानगी देण्यांत यावी. जेणेकरुन महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.राधाकृष्ण गायकवाड,
**अनुमोदक :** श्री.किशनचंद तनवाणी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिकेच्या उत्पन्नात भर पडण्याच्या दृष्टीने महापालिका हद्दीत अनेक कंपन्या तसेच विविध खाजगी संस्था यांच्याकडून उत्पादित माला बाबत करण्यांत येणाऱ्या जाहिरातीसाठी (बॅनर, पोस्टर व वॉल पेंटीग) अशा उद्योग समुहाच्या जाहिराती करण्याचे काम खाजगी एजन्सीला करणे बाबत रितसर परवानगी देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२३/७ :**

महानगरपालिकेच्या मराठी व उर्दू माध्यमातील शाळांचा शैक्षणिक दर्जा सुधारणे शालेय विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे यासाठी राज्यातील प्रख्यात शिक्षण तज्ञ तथा विचारवंताना निमंत्रीत करुन शैक्षणिक विचार मंथन घडवून आणणेसाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक चिंतन परिषद आयोजित करणेसाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.राधाकृष्ण गायकवाड
**अनुमोदक :** श्री.भरत लकडे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिकेच्या मराठी/उर्दू माध्यमाच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा सुधारणे शालेय विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणेसाठी शिक्षणतज्ञ तथा विचारवंत यांना निमंत्रीत करुन शैक्षणिक विचार मंथन घडवून आणण्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक चिंतन परिषद आयोजित करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२४/८ :**

पैठणगेट परिसरात नगर परिषदेमार्फत लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा अर्धाकृती पुतळा यापुर्वी बसविलेला आहे. पैठणगेट हा परिसर हयावेळी शहराचे बाहेर होता. आता शहराचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झालेला असून पैठणगेट परिसर हा शहराचे मध्यवर्ती भागात येतो. या परिसरात मोठमोठ्या बहुमजली इमारती उभारलेल्या असून येथे असलेला पुतळा अत्यंत कमी उंचीचा दिसतो. टिळकांचा अर्धाकृती पुतळा काढून त्या जागी टिळकांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे तसेच पुतळ्याचे सभोवतालचे परिसराचे सौदर्यीकरण तथा सुशोभीकरण करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.राधाकृष्ण गायकवाड,
**अनुमोदक :** श्री.नंदकुमार फुलारी,
श्री.रणधीर होलिये.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेट परिसरात असलेल्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे अर्धाकृती पुतळ्याभोवती बहुमजली इमारती उभारल्यामुळे अस्तित्वात असलेला पुतळा अत्यंत कमी उंचीचा वाटत असल्यामुळे लोकमान्य टिळक यांचा अर्धाकृती पुतळा काढून त्याच जागेवर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यास व सभोवतालचा परिसर सुशोभीत करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२५/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मनपाच्या सन २००३-०४ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक १७२ वर आणि अनुक्रमांक ६२ वर गटार दुरुस्ती व आर.सी.सी.स्लॅब टाकण्याकरिता २,००,०००/- रु.ची तरतूद ठेवण्यांत आली आहे. परंतू मुजीब कॉलनी भागात ड्रेनेजची समस्या गंभीर असून मुजीब कॉलनी येथील नागरिकांच्या घरामध्ये घाण पाणी साचते आहे. करिता गटार दुरुस्ती व स्लॅबच्या कामा ऐवजी मुजीब कॉलनी येथील १५ फुटी रोडवर नवीन ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम करण्यांत यावे. तसेच काम लवकरात लवकर सुरु करण्यासंबंधी कार्यवाही करण्यांत यावी.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर.

**सुचक :** सौ.सिध्दीकी नईम सुलतानत.
**अनुमोदक :** सौ.साजेदा बेगम.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००३-०४ च्या अर्थ संकल्पातील गटार दुरुस्ती व आर.सी.सी. स्लॅब कामाच्या तरतूदी ऐवजी मुजीब कॉलनी येथील १५ फुट रोडवर नवीन ड्रेनेज लाईन टाकण्यांचे काम करण्यांस व या कामासाठी सदर तरतूदीचा वापर करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२६/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मनपाच्या सन २००३-०४ च्या अर्थसंकल्पात रोशनगेट प्रभागातील क्रॉंक्रीटच्या कामाकरिता पृष्ठ क्र.१४१ आणि अ.क्र.१३ वर २,००,०००/- रु. ची तरतूद करण्यांत आली आहे. या भागात रस्त्यांचे डांबरीकरण करणे आवश्यक असल्याने क्रॉंक्रीटच्या कामा ऐवजी करीम कॉलनी मकसुद कॉलनी येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यांत यावे. करिता मंजूरीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर.

**सुचक :** सौ.सिद्दीकी नईम सुलताना,
**अनुमोदक :** सौ.रशिदा बेगम गफ्फार यार खॉन.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००३-०४ च्या अर्थसंकल्पातील रोशनगेट प्रभागातील क्रॉंक्रीट रस्ते या तरतूदी ऐवजी मकसुद कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरणाचे काम या तरतूदीतून करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२७/११ :**

महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती विचारात घेता शहरातील भूषणावसह ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा परिसर, महामार्ग व मुख्य रस्ते मुख्य बाजार पेठेतील रस्ते, चौक तसेच राष्ट्रीय नेत्यांचे पुतळ्यांचा परिसर व वाहतुक बेटांचे सौंदर्यीकरण तथा सुशोभीकरणे शहरातील नामांकित उद्योजक, व्यापारी, कंपन्या व कारखानदारांकडून प्रायोजक तत्वावर करुन घेणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.राधाकृष्ण गायकवाड

**अनुमोदक :** श्री.नंदकुमार घोडेले.

**ठराव :**

प्रस्तावास दर्शविल्याप्रमाणे, शहरातील ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा परिसर, महामार्ग, मुख्य रस्ते, मुख्य बाजार पेठेतील रस्ते, चौक, राष्ट्रीय पुतळ्यांचा परिसर व वाहतुक बेटाचे सौंदर्यीकरण तथा सुशोभीकरण शहरातील नामांकित उद्योजक, व्यापारी, कंपन्या व कारखानदार यांचेकडून प्रायोजक तत्वावर करुन प्रायोजक घेण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२८/१२ :**

वार्ड क्रमांक ६५ या प्रभागात खडकेश्वर येथील जनावरांचा दवाखाना व परिहर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची कॉलनी व परिसर तसेच जिल्हा परिषद कर्मचारी व पदाधिकारी कॉलनी व परिसर यांचा अंतर्भाव आहे. या परिसरातील मिळकतीवर मालमत्ता कर व इतर कर आकारण्यांत येतात. तसेच येथे राहणारे महापालिकेचे मतदार आहेत. नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून रस्ते, पाणी, लाईट, ड्रेनेज, हापसा, सिमेंट बेंचेस, क्रॉंक्रीट रस्ते आदी कामे करण्यास सभागृहाने मान्यता द्यावी.

**सुचक :** श्री.जयवंत ओक,

**अनुमोदक :** श्री.भाऊसाहेब वाघ.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.६५ येथील जनावरांच्या दवाखाना व परिसर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची कॉलनी व परिसर, जिल्हा परिषद कर्मचारी व पदाधिकारी कॉलनी व परिसर या भागात नगरसेवक स्वेच्छा निधीतून, रस्ते, पाणी, लाईट, ड्रेनेज, हापसा, सिमेंट बेंचेस, क्रॉंक्रीट रस्ते आदि कामे करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२९/१३ :**

महानगरपालिका मार्फत विविध क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यांत येते. दरवर्षी या स्पर्धेमध्ये अनेक खेळाडू सहभागी होतात. अन्य क्रिडा स्पर्धा सोबतच. दरवर्षी आखिल भारतीय व राज्यस्तरावरील क्रिडापटूसाठी महापौर चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यांत यावे, जेणेकरुन या खेळात देखील अनेक खेळांडूना सहभागी होण्याची संधी मिळेल. अन्य खेळाप्रमाणे महापौर चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यासाठी प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**सुचक :** सौ.कुसूमताई खरात,

**अनुमोदक :** श्री.पांडूरंग तायडे,
श्री.काशिनाथ कोकाटे.

**संवाद :**
**श्री.राधाकृष्ण गायकवाड :** टेनिस बॉल ऐवजी लेदर बॉल दुरुस्ती व्हावी.
**मा.महापौर :** दुरुस्तीसह मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिकेतर्फे आयोजित करण्यांत येणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धा बरोबरच महापौर चषक लेदर बॉल क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३०/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, संजय नगर, मुकूंदवाडी वार्ड क्र.१२ येथील समाज मंदिरावर बांधण्यात आलेल्या हॉलला मातोश्री रमाबाई आंबेडकर बालक मंदिर असे नांव देण्यांत यावे. करिता प्रस्ताव सर्वानुमते मान्यतेस्तव सादर.

**सुचक :** सौ.लिलावती घायतिलक,
**अनुमोदक :** श्री.भाऊसाहेब ताठे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर मुकूंदवाउी वार्ड क्र.१२ येथील समाज मंदिरावर बांधण्यात आलेल्या हॉलला मातोश्री रमाबाई आंबेडकर बालक मंदिर असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३१/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शहरात गलिच्छ वस्तीमध्ये अनेक देखभाल, दुरुस्तीची कामे प्रलंबित आहे. गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समिती अंतर्गत गलिच्छ वस्ती निर्मूलन व घरबांधणी व सामज कल्याण समितीच्या कार्यक्षेत्रात सर्व प्रश्न मोडतात. शहरातील विविध गलिच्छ वस्ती मध्ये या सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता व देखभाल दुरुस्तीची कामे तातडीने होऊन जनतेच्या तक्रारीचे निवारण होण्यासाठी गलिच्छ वस्ती निर्मूलन घरबांधणी व समाज कल्याण समितीला या आर्थिक वर्षात सुचविलेली कामे करण्यासाठी १५ लक्षची तरतूद अर्थसंकल्पातून उपलब्ध करुन देणे.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी सादर.

**सुचक :** श्री.जयवंत ओक,
श्री.भाऊसाहेब वाघ,
**अनुमोदक :** श्री.साहेबराव कावडे.

**ठराव :**

पस्तावात दर्शविल्याप्रमाणे गलिच्छ वस्तीतीला जनतेच्या देखभाल व दुरुस्तीच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी या आर्थिक वर्षात सुचविलेली कामे करण्यांसाठी गलिच्छ

वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समितीला ही कामे करण्यासाठी रु.१५ लाखाची तरतूद अर्थसंकल्पात उपलब्ध करुन देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३२/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.७६ कैसर कॉलनी भागातील जो भाग बशीर कॉलनी म्हणून ओळखला जातो. त्याचे पुर्वीचे नांव जियाऊद्दीन ले-आऊटच होते. परंतू मनपा प्रशासनाची दिशाभूल करुन त्याचे नांव हे बशीर कॉलनी ठेवण्यांत आले.

तरी आपण त्याचे नांव बदलून जियाउद्दीन ले-आऊट करावे. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.सलीम पटेल समशेर पटेल,
**अनुमोदक :** सै.सलमा बानो मिर मोहमंद अली,
श्री.कैसर खान बद्रोद्दीन खान.

**संवाद :**

**मा.महापौर :** सुचक उपस्थित नाही. प्रस्ताव स्थगित करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाचे सूचक सभागृहात उपस्थित नसल्यामुळे प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१३३/१७ :**

औरंगाबाद शहरामध्ये बऱ्याच वसाहती, स्लम विभागामध्ये अत्यंत दाट लोकवस्ती आहे. या वसाहतीमध्ये स्वच्छतेच्या दृष्टीने पोर्टेबल संडास बसविणे गरजेचे आहे. असे पुर्वरचित पोर्टेबल संडास अशा वसाहतीमध्ये बसविल्यास तेथील नागरिकांना सोयीचे होईल. करिता शहरातील दाट लोकवस्ती असलेल्या ठिकाणी तसेच स्लम विभागांमध्ये पोर्टेबल हलविता येण्याजोगे संडास बसविण्यांत यावेत.

करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**सुचक :** श्री.डॉ.भागवत कराड,
**अनुमोदक :** श्री.राधाकृष्ण गायकवाड,
श्री.भाऊसाहेब ताठे, श्री.भगवान घडमोडे,
श्री.साहेबराव कावडे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागरिकांच्या सोयीसाठी शहरातील दाट लोकवस्ती असलेल्या ठिकाणी तसेच स्लम विभागामध्ये पोर्टेबल संडास बसविण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३४/१८ :**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत मा.खासदार, मा.आमदार, मा.नगरसेवक यांच्या स्वेच्छा निधीतून समाज मंदिरे बांधण्यांत आली आहेत. ज्या उद्देशाने ही समाज मंदिरे बांधली

आहेत. त्याच उद्देश पुर्तीसाठी समाज मंदिराचा उपयोग स्थानिक रहिवाशांना व्हावा या बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.
**सुचक :** श्री.राधाकृष्ण गायकवाड,
**अनुमोदक :** श्री.भरत लकडे.

**मा.महापौर :** विषय सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**
प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.खासदार, मा.आमदार, मा.नगरसेवक यांचे स्वेच्छा निधीतून ज्या उद्देशाने समाज मंदिरे बांधली आहेत. त्याच उद्देश पुर्तीसाठी या समाज मंदिराचा स्थानिक रहिवाशांना उपयोग करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.१३५/१ :**
शहराचे सौंदर्यीकरण वाढावे व महाराणा प्रताप सारख्या वीराची प्रेरणा तरुणांना मिळावी म्हणून जालना रोडवर असलेल्या अन्नीकुंडाची प्रतिकृती इतर ठिकाणी स्थलांतरीत करुन दुध डेअरी समोरील चौकात महाराणा प्रताप यांचा भव्य पुर्णाकृती पुतळा उभा करण्यांत यावा. पुतळा उभारणीची तरतूद सन २००३-०४ च्या अंदाजपत्रकात करण्यांत आलेली आहे.
करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.
**सुचक :** श्री.रणधीरसिंह होलिये,
**अनुमोदक :** श्री.भरत श्रीपती लकडे,
श्री.सोपान पारे, श्री.नंदकुमार फुलारी.

**संवाद :**
**मा.महापौर :** या विषयासह ऐनवेळचे सर्व विषय स्विकृतीसह मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**
प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालना रोडवर असलेल्या अग्नीकुंडाची प्रतिकृती इतर ठिकाणी स्थलांतरीत करुन दुध डेअरी समोरील चौकात महाराणा प्रताप यांचा भव्य पुर्णाकृती पुतळा सन २००३-०४ च्या अर्थसंकल्पातील तरतूदीतून उभारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३६/२ :**
प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ नुसार महानगरपालिका आस्थापनेवर मुख्य लेखा परिक्षक पद पदोन्नतीने भरण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली आहे. कुठलेही पद पदोन्नतीने भरत असतांना पदोन्नतीच्या पदाकरिता कनिष्ठ पदांवरील अनुभव ही महत्वाची अट असते.

पद जर नामनिर्देशनाने भरावयाचे असल्यासच मुळ शैक्षणिक अर्हता विचारात घेणे संयुक्तिक व उचित असते. तथापि महानगरपालिकेने जे सेवा भरती नियम केलेले आहेत. त्यातील बऱ्याच पदांना पदोन्नतीचे वेळेससुध्दा बेसीक क्वालीफिकेशन आवश्यक असल्याचे म्हटले आहे. जे की अव्यवहार्य आहे. कारण शासनाची विविध वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे जी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने भरली जातात. अशा प्रशासकीय पदांकरिता कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक अशी सर्वसाधारण अट असते.

करिता महानगरपालिका सेवाभरती नियमातील (फ) चे (३) मध्ये खालील स्वरुपाचा बदल करणे आवश्यक आहे.

मनपा कर्मचाऱ्यांना बढती देवून की जे, गणित विज्ञान अथवा अर्थशास्त्रासह कला अथवा गणिताशास्त्रासह शास्त्र अथवा वाणिज्य पदवीधारक

ऐवजी

मनपा कर्मचाऱ्यांना बढती देवून की जे कोणत्याही विद्या शाखेचे स्नातक असून व ज्यांना महानगरपालिकेत लेखाधिकारी पदाचा सात वर्षाहून कमी अनुभव नसलेल्या व ज्यांना लेखा व अंकेक्षणाचा अनुभव आहे असे

अशी सेवा भरती नियमात दुरुस्ती करणे करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**सुचक :** श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली,

**अनुमोदक :** श्री.नंदकुमार घोडेले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिका आस्थापनेवरील मुख्य लेखा परिक्षक पद पदोन्नतीने भरण्यासाठी महानगरपालिका सेवाभरती नियमातील (फ) चे (३) मनपा कर्मचाऱ्यांना बढती देऊन की जे गणित, विज्ञान अथवा अर्थशास्त्रासह कला अथवा गणितशास्त्रासह शास्त्र अथवा वाणिज्य पदवीधारक

ऐवजी

मनपा कर्मचाऱ्यांना बढती देवून की जे कोणत्याही विद्या शाखेचे स्नातक असून व ज्यांना महानगरपालिकेत लेखाधिकारी पदाचा सात वर्षाहून कमी अनुभव नसलेल्या व ज्यांना लेखा व अंकेक्षणाचा अनुभव आहे असे अशी सेवा भरती नियमात दुरुस्ती करणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३७/३ :**

सन २००३-०४ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये नवीन उद्याने अंतर्गत "शांती निकेतन कॉलनी शनिमंदिराजवळ दोन जागा विकसित करणे" या लेखाशिर्षाखाली रु.२.०० लक्षची तरतूद करण्यांत आलेली आहे. याऐवजी सदरील तरतूदीतून या भागात "व्यायामशाळा" बांधण्यांत यावा. करिता उपरोक्त आर्थिक तरतूदीचे लेखाशिर्ष बदलणे करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.भागवत कराड, श्री.प्रशांत देसरडा,

श्री.राधाकृष्ण गायकवाड

**अनुमोदक :** श्री.भाऊसाहेब ताठे, श्री.आनंद तांदुळवाडीकर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००३-०४ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये नवीन उद्याने अंतर्गत "शांती निकेतन कॉलनी शनिमंदिराजवळ दोन जागा विकसीत करणे" या लेखाशिर्षाखाली रु.२.०० लक्षची तरतूद करण्यांत आलेली आहे.

याऐवजी सदरील तरतूदीतून या भागात "व्यायामशाळा" बांधण्यास व उपरोक्त आर्थिक तरतूरीचे लेखाशिर्ष बदलण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३८/४ :**

माझ्या प्रभागातील समतानगर भागामध्ये शाळेसाठी इमारत बांधलेली आहे. परंतू या ठिकाणी शाळा सुरु झालेली नाही. या भागातील नागरिकांची बऱ्याच दिवसापासूनची दवाखाना सुरु करण्याची मागणी असून या इमारतीमध्ये महापालिकेचा दवाखाना सुरु करण्यांत यावा.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.भागवत कराड, श्री.राधाकृष्ण गायकवाड.
**अनुमोदक :** श्री.भाऊसाहेब ताठे, श्री.भगवान घडमोडे,
श्री.नंदकुमार घोडेले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समतानगर भागामध्ये शाळेसाठी इमारत बांधण्यांत आलेली आहे, परंतू शाळा सुरु झालेली नसल्यामुळे सदरील इमारतीमध्ये महापालिकेचा दवाखाना सुरु करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३९/५ :**

महानगरपालिकेच्या २००३-०४ या अर्थसंकल्पात महानुभव आश्रम पैठण रोड ते रामकृष्ण आश्रम बीड बायपास पर्यंत ६" व्यासाची जलवाहिनी टाकणे, या कामाकरिता पृष्ठ क्र.१५३ आणि अ.क्र.७४ वर १५००/- हजार रु. ची तरतूद करण्यांत आली आहे. या भागात जलवाहिनी टाकणे आवश्यक आहे. या कामा ऐवजी प्र.क्र.२८ मध्ये १००% विकास भरलेल्या राघवेंद्र सोसायटी, अजिंक्य सोसायटी, गंगासागर सोसायटी या मंजूर रेखांकनामध्ये विविध ठिकाणी ६" व्यासाची जलवाहिनी टाकणे.

**सुचक :** श्री.नंदकुमार घोडेले,
**अनुमोदक :** श्री.भगवान घडमोडे,
श्री.भाऊसाहेब ताठे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानुभाव आश्रम पैठण रोड ते रामकृष्ण आश्रम बीड बायपास पर्यंत ६" व्यासाची जलवाहिनी टाकणे या कामाऐवजी राघवेंद्र सोसायटी, अजिंक्य सोसायटी, गंगासागर सोसायटी या मंजूर रेखांकनामध्ये विविध ठिकाणी ६" व्यासाची जलवाहिनी टाकण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४०/६ :**

महानगरपालिकेच्या अर्थसंकल्प २००३-०४ या अर्थसंकल्पात कांचनवाडी येथील काश्मीरनगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरिता पृष्ठ क्र.१३० आणि अ.क्र.२९ वर ३००/- हजार रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

या कामाऐवजी प्र.क्र.२८ नक्षत्रवाडी प्रभागातील १००% विकास खर्च भरलेल्या अजिंक्य सोसायटी, राघवेंद्र सोसायटी, गंगासागर सोसायटी, या मंजूर रेखांकनामध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करण्यांत यावे.

**सुचक :** श्री.नंदकुमार घोडेले,
**अनुमोदक :** श्री.भागवत कराड.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००३-०४ या अर्थसंकल्पात कांचनवाडी येथील काश्मीरनगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाऐवजी प्र.क्र.२८ नक्षत्रवाडी प्रभागातील अजिंक्य सोयायटी, राघवेंद्र सोसायटी, गंगासागर सोसायटी या मंजूर रेखांकनामध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४१/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मसनतपूर भागातील नागरिकांनी मागणी केल्यानुसार या परिसरातील महानगरपालिकेच्या शाळेच्या प्रांगणात उभारण्यांत आलेल्या सांस्कृतिक मंचास "बुध्दवासी रामभाऊ यशवंतराव शिंदे" असे नामकरण करण्यांत यावे. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री.राजु शिंदे,
**अनुमोदक :** श्री.भाऊसाहेब ताठे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मसनतपूर भागातील महानगरपालिकेच्या शाळेच्या प्रांगणात उभारण्यांत आलेल्या सांस्कृतिक मंचास "बुध्दवासी रामभाऊ यशवंतराव शिंदे" असे नामकरण करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४२/८ :**

महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी घेण्यांत येणाऱ्या महापौर चषक क्रिडा स्पर्धा अंतर्गत सन २००३-०४ या आर्थिक वर्षात अपंग विद्यार्थ्यांच्या स्पर्धा घेण्यांत याव्यात. सदरील स्पर्धा हया जनार्थ हया संस्थेमार्फत आयोजित करण्यांत याव्यात. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**सुचक :** सौ.साधना गणेश सुरडकर
**अनुमोदक :** श्री.भाऊसाहेब ताठे,
श्री.राधाकृष्ण गायकवाड.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिकेच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यांत येणाऱ्या महापौर चषक क्रीडा स्पर्धा अंतर्गत सन २००३-०४ या आर्थिक वर्षात अपंग विद्यार्थ्यांच्या स्पर्धा हया जनार्थ संस्थेमार्फत आयोजित करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## प्रश्नात्तरे

मा.सौ.निखत परवीन एजाज अली, नगरसेविका
(प्राप्त दिनांक ०७.०८.२००३)

**प्रश्न क्र.१५४ :** महिला व बाल कल्याण समिती २००१-०२ च्या ठरावानुसार किती गरजू महिलांना संगणक प्रशिक्षण देण्यांत आले. व कोणत्या संस्थेच्या मार्फत व कोणत्या कालावधीत सदरील प्रशिक्षण देण्यांत आले. प्रशिक्षणार्थीना प्रमाणपत्र देण्यांत आले नाही? हे खरे आहे का व ते का देण्यांत आले नाही. ज्या संस्थे मार्फत प्रशिक्षण देण्यांत आले आहे, ती संस्था अस्तित्वात नाही हे खरे आहे का? सदरील संस्था कोठे आहेत.

**उत्तर :** प्रकल्प संचालक :

१) महिला व बाल कल्याण समिती २००१/२००२ च्या ठरावानुसार ४७ गरजू महिलांना संगणक प्रशिक्षण देण्याचा आदेश देण्यांत आला.

२) संदर्भ :- इन्फोसिस्टीम कॉम्प्युटर यांचे दि.२७.०३.२००३ पत्रान्वये (एम.एस.सी.आय.टी.) एम.एस.सी.आय.टी.संगणक प्रशिक्षण २२ विद्यार्थ्यांनीना देण्यांत आले आहे. तर इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट ट्रेनिंग ॲण्ड प्रोफेशनल स्टडीज या संस्थेमार्फत २५ प्रशिक्षणार्थीनींना संगणक प्रशिक्षण देण्यांत आले व विद्यार्थ्यांनींची हजेरी सादर करण्यांत आली आहे. परंतू प्रमाणपत्रे सादर केलेली नाहीत. त्यामुळे त्यांना कायदेशीर नोटीस पाठविण्यांत आल्या आहे.

३) सदरचे संगणक प्रशिक्षण माहे फेब्रुवारी २००२ पासून देण्यांत आले आहे.

४) "संचालक, इन्फोसिस्टीम, कॉम्प्युटर अँण्ड सर्व्हीस शॉप नं.७ मेघमल्हार" "ब" कॅनॉट पॅलेस सिडको, औरंगाबाद.

संचालक, इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंटर ट्रेनिंग अँण्ड प्रोफेशन स्टडीज १४५ शांतीसदन विकास हाऊसिंग सोसायटी टिळकनगर, औरंगाबाद वरीलप्रमाणे सदरच्या संस्था अस्तित्वात आहेत.

**प्रश्न क्र.१५५ :** सन २००२-०३ मध्ये प्रत्येक वार्डातून १० गरजू महिलांना संगणक प्रशिक्षण देण्यांबाबत निविदा (टेंडर) काढण्यांत आले होते. ती निविदा फायनल करण्यांत आली नाही हे खरे आहेत का? असल्यास सदरील निविदा का फायनल करण्यांत आली नाही व केंव्हा करणार?

